# THE
# INDIAN UNREST

BY

MR. VALENTINE CHIROL.

मि. व्हालेनटाईन चिरोल-कृत

# हिंदुस्थानची अस्वस्थता

ह्या इंग्रजी पुस्तकाचें

मराठी भाषांतर.

## पूर्वार्ध.

सन १९११ ई.

कोल्हापुर.

Published by M. G. Dongre,

*KOLHAPUR.*

"JAINENDRA PRESS" KOLHAPUR.

# अनुक्रमणिका.


भाषांतर–कर्त्यांची प्रस्तावना ........................ १—१५

मि. चिरोल यांच्या पुस्तकाचें समालोचन (सर आल्फ्रेड
सी लायल) ........................ १—१३

भाग १ ला—परिस्थितीचें सामान्य वर्णन ........ १५—२३

भाग २ रा—वर्तमानपत्रें व वक्ते यांचें स्वराज्य .... २४—४५

भाग ३ रा—हिंदुधर्माचें पुनरुज्जीवन ............ ४६—६९

भाग ४ था—ब्राह्मणीधर्म आणि महाराष्ट्रांतील
असंतोष ........................ ७०–११६

भाग ५ वा—पुणें आणि कोल्हापूर..............११७–१३०

भाग ६ वा—विभागणीपूर्वीं बंगालची स्थिति ....१३१–१४५

भाग ७ वा—बंगाल्यांतील वादळ ..............१४६–१८६

भाग ८ वा—पंजाब व आर्यसमाज..............१८७–२०६

भाग ९ वा—मुसलमानलोकांची स्थिति............२०७–२३७

भाग १० वा—दक्षिणहिंदुस्थान ..................२३८–२५१

भाग ११ वा—हिंदुस्थानाबाहेरील क्रांतिकारक
संस्था ..........................२५२–२६५

भाग १२ वा—हिंदी राष्ट्रीयसभा......................२६६–२७९

मूळपुस्तकांतील चुकीची दुरुस्ती ....................२७९–२८०

# भाषांतरकर्त्यांची प्रस्तावना.

मि. **व्हालेंटाईन चिरोल** यांच्या " हिंदुस्थानांतील अस्वस्थता " ( Indian Unrest ) ह्या पुस्तकाच्या मराठी भाषांतराचा हा **पूर्वार्ध** वाचकांपुढें ठेवित आहों; व **उत्तरार्ध**हि लवकरच प्रसिद्ध होईल, अशी उमेद आहे.

**टाइम्स** नांवाचें मोठें वजनदार पत्र इंग्लंडांत आज शंभर वर्षांवर चालू आहे. अतिशय खर्च सोसून व मोठ्या मेहनतीनें मिळविलेल्या विश्वसनीय माहितीच्या आधारानें वेळोंवेळीं लेख लिहून, ह्या पत्रानें राष्ट्राची मोठीच सेवा केली आहे; व त्याचें हेंच व्रत अद्यापिहि चालू आहे. **मेघनाद** ( Thunderer ) ह्या गंभीर व लोकप्रिय नांवानें त्याची जगांत प्रसिद्धि असून, कोणत्याहि प्रश्नावर त्याची एकदां **गर्जना** सुरू झाली, ह्मणजे सर्व ब्रिटिश राष्ट्रांत---किंबहुना सर्व सुधारलेल्या जगांत—त्या विषयासंबंधानें मोठी खळबळ उडून जाते; व त्याचा आतां कांहींतरी समाधानकारक निकाल खास लागणार, असें सर्व लोक समजूं लागतात. स्वदेशांतील किंवा परदेशांतील कोणत्याहि बाबीसंबंधानें लेख लिहावयाचे झाल्यास, चांगल्या हुशार, विद्वान् व धाडशी माणसांची योजना, मोठा खर्च सोसून, त्या कामाकडे करावयाची, व त्यांच्याकडून खात्रीलायक अशी खरी खरी सर्व माहिती मिळविल्यावर, सर्व बाजूंचा नीट विचार करून, मग लेखणी हातीं घ्यावयाची, असा ह्या अद्वितीय पत्राचा संप्रदाय आहे. ह्या कामासाठीं मोठे विद्वान्, धाडशी व व्यवहारचतुर अशा

मदतगारांचें एक मोठें पथकच बाळगावें लागतें; व त्यांनीं मिळविलेली माहिती संगतवार जुळवून व तिची निवडानिवड करून, नंतर लेख लिहिण्यांत येतात. आशियाखंडांतील माहिती मिळविणाऱ्या लोकांच्या पथकाचें प्रमुखत्व चिरोलसाहेबांकडे आहे, इतकें सांगितल्यानेंच त्यांच्या योग्यतेची वाचकांस कल्पना येईल. सर्व जगभर, व विशेषतः आशियाखंडांत, मोठा प्रवास करून, दुसऱ्यांवर अवलंबून न राहतां स्वतः अनेक मतांच्या व स्थितींच्या लोकांस भेटून व प्रत्येक प्रश्नाची उलटसुलट बाजूनें चर्चा करून, त्यांनीं जबरदस्त माहिती मिळविली आहे. हरएक प्राच्य प्रश्नासंबंधानें ठाम मत देण्याचा जर कोणास अधिकार असेल, तर तो चिरोल-साहेबांसच आहे; व त्यामुळें ह्यांचे असे लेख मोठे प्रमाणभूत मानण्यांत येत असतात. आपल्या हिंदुस्थानांत त्यांनीं अनेक वेळां प्रवास करून, येथील प्रत्येक हालचालीसंबंधानें विश्वसनीय माहिती मिळविली आहे; व तत्संबंधी यांचे लेख **लंडन-टाइम्स**मध्यें प्रसिद्ध होऊन, त्यांच्या योगानें बऱ्याच प्रश्नांचा विचार करण्यास उत्तम साह्य झालें आहे.

हिंदुस्थानांतील राजद्रोहात्मक चळवळींवरील झांकण निघून, त्या बाहेर दिसूं लागल्यापासून **टाइम्स**-चें लक्ष तिकडे वेधलें; व ह्या बाबतींत चौकशी करून व खात्रीलायक माहिती मिळवून, लेख लिहिण्याच्या अत्यंत जबाबदारीच्या, मोठ्या नाजूक व कठीण कामावर ह्या भीष्माचार्यांची नेमणूक झाली. त्यानंतर, मि. चिरोल यांनीं हिंदुस्थानांत मोठा प्रवास केला; व ठिकठिकाणीं जाऊन, व तेथील प्रमुख व पुढारी लोकांच्या गांठी घेऊन, हरएक प्रश्नासंबंधानें ज्ञान स्वतः करून घेतलें, व एकंदर परिस्थितीचें मोठ्या सूक्ष्मतेनें अवलोकन केलें. ह्याच उद्देशानें

साहेब मजकूर करविरीं आले होते; व येथील **श्रीशाहु सोशल क्लबाच्या** विद्यमानें त्यांनीं येथील सर्व दर्जांच्या व जातींच्या पुढाऱ्यांची भेट घेतली होती. त्यावेळीं, **भाषांतरकर्त्यांस** साहेब बाहदुरांच्या परिचयाचा अलभ्य लाभ होऊन, नाना प्रकारच्या विषयांवरील आपली माहिती त्यांना देण्याची संधी मिळाली होती.

हिंदुस्थानांतील अस्वस्थतेसंबंधानें यांचे लेख **लंडन–टाइम्स** मध्यें वेळोंवेळीं प्रसिद्ध झाले होते; व ते क्रोडों लोकांच्या वाचनांत येऊन, तिचें सद्यःस्वरूप, हिंदुस्थानाची सामाजिक, धार्मिक, औद्योगिक, राजकीय वगैरे स्थिति, इत्यादि गोष्टींचें ज्ञान चांगलेंच झालें, व ह्या लेखांची सर्वत्र मोठी वाहवा झाली. असे सर्वमान्य लेख वर्तमानपत्रांतून एकदांच वाचण्यांत येऊन, फायलींत पडून राहणें वाजवी नसल्यामुळें, ते पुनः व्यवस्थित रीतीनें पुस्तकरूपांत प्रसिद्ध व्हावेत, अशी लोकांची उत्कट इच्छा दिसून आल्याबरोबर, अर्थात् ते अशा रीतीनें पुनः छापून प्रसिद्ध करण्यांत आले. ह्या पुस्तकास परलोकवासी **सर आल्फ्रेड सी लायल** ह्या विद्वान् राजकार्यधुरंधरानें लिहिलेली प्रस्तावना जोडली आहे; व तिच्यांत एकंदर लेखांचें, थोडक्यांत पण मोठ्या मार्मिक रीतीनें, समालोचन केलेलें आहे. ह्या पुस्तकासंबंधानें दुसरी एक विशेष गोष्ट अशी आहे कीं, चिरोलसाहेबांचे परममित्र **व्हायकौन्ट मोर्लेसाहेब** हे हिंदुस्थानचे स्टेट सेक्रेटरी असतांना, त्यांना हें पुस्तक त्यांच्या परवानगीनें अर्पण करण्यांत आलें होतें.

चिरोलसाहेबांनीं मिळविलेली सर्वच माहिती अगदीं बिनचूक आहे, असें कोणासहि ह्मणतां यावयाचें नाहीं. कारण, कित्येक गोष्टींचा ताळा पाहण्यास त्यांस मुळींच साधन नव्हतें.

तसेंच, मिळालेल्या माहितीवरून त्यांनीं काढिलेलीं कांहीं अनुमानें पुढें उपलब्ध होणाऱ्या माहितीवरून कदाचित् बदलण्याचाहि संभव आहे. शिवाय, त्यांचीं कांहीं मतें सर्वमान्य होतील, असेंहि ह्मणतां येत नाहीं. पण असें जरी असलें, तरी त्यांच्या ग्रंथाची एकंदर योग्यता कमी होत नाहीं, असें कोणासहि प्रांजलपणें कबूल करावें लागेल. गाढ विद्वत्ता, विशाल अनुभव, सूक्ष्म अवलोकन, विलक्षण श्रमसहिष्णुता, दीर्घ प्रवास, मनाचा समतोलपणा, विकारवशतेचा अभाव, निःपक्षपाती गुणग्राहकता, सत्यप्रीति, न्यायबुद्धि, मानवी स्वभावाचें पूर्ण ज्ञान, सौजन्य, इत्यादि गुणसमुच्चय चिरोलसाहेबांच्या ठिकाणीं असल्यामुळें, त्यांनीं जें काम हातीं घेतलें होतें, त्यास ते जसे योग्य होते, तसे इतर कोणी इंग्रज गृहस्थ क्वचित्च असतील. साहेबबाहदुरांचें हें वर्णन कोणास अतिशयोक्तीचें वाटण्याचा संभव आहे, हें आह्मी पूर्ण जाणून आहों. परंतु, त्यांचा आह्मांस दोन वेळां जो कांहीं प्रत्यक्ष परिचय झाला, व त्यांचे लेख एकत्र वाचण्याची जी संधी मिळाली, त्यामुळें त्यांचे गुण आमच्या निदर्शनास आले. आणि, आमची अशी पक्की समजूत आहे कीं, ज्या महात्म्यानें वृद्धपणीं एवढा दीर्घोद्योग करून, हिंदुस्थानच्या वस्तुस्थितीचें यथार्थ ज्ञान इंग्रजी भाषा बोलणाऱ्या सर्व जगास करून दिलें, त्याच्याविषयींची आमची आदरबुद्धि येथें व्यक्त न केल्यास, आह्मांवर कृतघ्नतेचा मोठाच आरोप येईल.

अशा योग्यतेच्या ग्रंथाचें भाषांतर होऊन, मराठी वाङ्मयांत भर पडावी, हें अगदीं इष्ट आहे. तथापि, एवढ्याच कारणाकरितां केवळ ह्या ग्रंथाचें भाषांतर करण्याचें काम आह्मीं अंगावर घेतलें आहे, असें नाहीं. आह्मांस असें वाटतें कीं,

ह्या ग्रंथांत दिलेली माहिती, तीवरून काढलेलीं अनुमानें व शेवटीं हिंदी लोकांस केलेला उपदेश प्रत्येक हिंदी मनुष्यानें — विशेषतः महाराष्ट्रांतील लोकांनीं — काळजीपूर्वक मनन करण्यासारखा आहे. प्रत्येक प्रांतांतील सुज्ञ हिंदीलोक आपल्या उन्नतीविषयीं विचार करूं लागले आहेत एवढेंच नव्हें, तर भिन्न भिन्न मतांचे पुढारी लोक, आपल्या सामर्थ्याप्रमाणें व पसंतीप्रमाणें, नानाप्रकारच्या चळवळीहि सुरू करूं लागले आहेत. आतां, "हिंदीलोकांच्या जागृतीचें पूर्वचिन्ह" ह्या दृष्टीनें ही हालचाल अभिनंदनीय आहे खरी. तथापि, ह्या देशांतील नानाविध धर्म, जाती व पंथ, त्यांतील लोकांचीं भिन्न भिन्न मतें व उद्देश, निरनिराळ्या लोकसमाजांचे निरनिराळे इतिहास व आकांक्षा, ह्यामुळें हल्लींच्या चळवळींमध्यें एकधोरण नाहीं इतकेंच नाहीं, तर पुष्कळ वेळां परस्परविरोधहि दिसून येतो. हिंदुलोक आपल्या धर्माचें पुनरुज्जीवन करण्याची टूम काढून, मुसलमान, ख्रिस्ती वगैरे परधर्मीय लोकांविषयीं सर्वत्र द्वेषबुद्धि दाखवूं लागले आहेत. पण, वास्तविक त्यांचा खरा उद्देश धार्मिक नसून, राजकीय आहे. ह्मणजे, धर्माचें घोडें पुढें करून, सर्व हिंदूंच्या एकजुटीनें मुसलमानलोकांवर राजकीय बाबतींत आपलें वर्चस्व स्थापन करण्याची कुबुद्धि त्यांना झाली आहे. ह्या पुनरुज्जीवनाचा दुसरा एक अंतस्थ हेतु असा आहे कीं, पाश्चात्य विद्याचारांच्या संसर्गामुळें, निंद्य जातिभेदाच्या पायावर रचलेली अमानुष हिंदु-समाज-रचना ढांसळून पडण्याच्या पंथास लागली आहे, त्यामुळें घाबरून जाऊन, ह्या स्थित्यंतराचें आदिकारण जी पाश्चात्य संस्कृति तिलाच मूळ विरोध करून, हिंदुधर्मांतील अपवित्र व राक्षसी जातिभेद कायम ठेवून, सर्व हिंदूंवरील

ब्राह्मणांचें वर्चस्व यत्किंचित्‌हि कमी न होऊं देण्याविषयीं हा सारा प्रयत्न आहे. पंजाबांतील **आर्यसमाज**, महाराष्ट्रांतील **गोरक्षणी सभा व गणपती-उत्सव**, व इतर ठिकाणच्या अशाच प्रकारच्या चळवळी यांच्यायोगानें मुसलमानांच्या मनांत हिंदूंविषयीं दिवसेंदिवस अधिकाधिक तेढ पडत चालली आहे; व तेहि लोक साधेल तेथें व तशी हिंदूंची खोड मोडण्याचा प्रयत्न करूं लागले आहेत. हिंदूंच्या मिरवणुकींस अडथळा करणें, ईदच्या वगैरे सणांत हिंदूंचें मन दुखावेल अशा रीतीनें गोवध करणें, इत्यादि गोष्टी मुसलमानांकडून झाल्यामुळें, द्वेषाग्नि अधिकच भडकूं लागला आहे. अव्वल इंग्रजींत ख्रिस्ती मिशनरी लोकांनीं हिंदुधर्मावर यथेच्छ तोंडसुख घेतलें होतें; पण, आतां त्याचा वचपा हिंदु-लोक सव्याज काढूं लागले आहेत. तसेंच, शहाणपणाचा टेंभा मिरविणाऱ्या कांही सुशिक्षित (?) महाराष्ट्रीय ब्राह्मण पुढाऱ्यांनीं **शिवाजी-उत्सव**, **नानाफडणवीस-उत्सव** वगैरे ऐतिहासिक सण उत्पन्न करून, राष्ट्रकार्य (!) करण्याचा उपक्रम केला आहे. तसेंच, ब्राह्मण इतिहासकार **पेशव्यांना**—विशेषतः बाळाजी बाजीराव पेशव्याला—अगदीं उच्च पदावर नेऊन बसवून, त्यांच्यासारखे **राजे** हिंदुस्थानांत भूतकाळीं कधीं झाले नाहींत, व भविष्यकाळीं (ब्राह्मणांच्या हातीं राजसत्ता न आल्यास) होणें शक्य नाहीं, असें जगास भासविण्याचा प्रयत्न करीत आहेत. आतां, हल्लींच्या हिंदुस्थानांत शिवाजी, नानाफडणवीस वगैरेसारखे केवळ महाराष्ट्राच्या इतिहासांतील पुरुष हिंदुस्थानचे **राष्ट्रीय पुरुष** होतील काय? शिवाजी---उत्सवानें मुसलमानलोकांस मोठा आनंद होईल काय? नानाफडणविसाचें किंवा बाळाजी बाजीरावाचें नांव निघाल्याबरोबर, शूर मराठे

लोकांच्या छात्या अभिमानानें फुगून जाऊन, त्यांच्या अंगरख्याचे बंद तटातट तुटतील काय? कां, भोळा शाहू राजा आसन्नमरणस्थितींत असतां करून घेतलेल्या, अथवा अगदींच बनावट अशा, सनदेच्या जोरावर मराठ्यांचें राज्य घशांत टाकणाऱ्या धूर्त पेशव्यांविषयीं मराठे लोकांच्या हृदयांत प्रेमातिशयाचें भरतें यावें? ज्या नेभळ्या नानाच्या अमदानींत पेशव्यांच्या घरांत भाऊबंदकीचा कलहाग्नि धुमसूं लागला, व शेवटीं त्याच्या ज्वाळा प्रखर होऊन, त्यांतच ब्राह्मणी राज्याची (आह्मी ह्मणतों, ईश्वरकृपेमुळेंच) आहुति पडली; ज्याच्या कारकिर्दींत जातीजातींमधील वैर विकोपास जाऊन, अनेक ब्राह्मणेतर जातींचा नाहक छळ झाला; ज्यानें शूर वीर राघोबाच्या पक्षाच्या लोकांचा नायनाट केला; ज्याच्या नीतिमत्तेविषयीं इतिहासकारांस मोठाच संशय पडला आहे, अशा नानाचे पोवाडे गावून, त्याला हिंदुस्थानचा **ऐतिहासिक पुरुष** बनविण्याची त्याच्या कांहीं खुळसट जातभाईंनीं खटपट करावी, हें किती हास्यास्पद आहे! पण ह्याहि–पेक्षां चमत्कार ह्मटला ह्मणजे, ज्यांना कांहींच इतिहास नाहीं, ज्यांच्यावर आज शेंकडों वर्षे परकी लोकांचा अम्मल चालत आलेला आहे, तरवार कशी धरावी—मुठीकडून कीं टोंकाकडून—ह्याची ज्यांना जन्मांत ओळखहि नाहीं, अशा मागचा पुढचा नीट विचार न करितां उल्लू होऊन जाणाऱ्या बंगाली लोकांनीं शिवाजीला आपला **राष्ट्रीयपुरुष** समजूं लागावें! आणि, तें कशाकरितां ह्मणाल, तर फक्त मुसलमान लोकांची केवळ हेटाळणी करण्याकरितां. परवां, कांहीं सुशिक्षित ह्मणविणाऱ्या मुसलमान गृहस्थांनीं, शिवाजी-उत्सवाचा सूड घेण्याच्याच केवळ हेतूनें, **अफझुल-**

**खान-जंयति** केल्याचें वाचण्यांत आलें आहे. वास्तविक मुसलमान—लोकांना मोठ्या ऐतिहासिक पुरुषासाठीं अफझुलखानाकडे धांव घेण्याचें कांहींएक कारण नाहीं. परंतु; एकानें खोडी केली, ह्मणजे दुसऱ्यासहि तसेंच करावेंसें वाटतें, ह्याचें हें एक डळढळीत उदाहरण आहे. अफझुलखानाचा उत्सव करून, महाराष्ट्रांतील हिंदूंच्या नाकांत काड्या घालण्याचा प्रयत्न ज्या कांहीं अल्लड वृत्तीच्या मुसलमानलोकांनीं केला, त्यांचे कान त्यांच्याच जातभाईनीं उपटले आहेत; व इतउत्तर ह्या वेढगळपणाची पुनरावृत्ति होणार नाहीं, अशी सर्वांस उमेद आहे. तथापि, ही गोष्ट सर्व हिंदु महाराष्ट्रीयांनीं लक्ष्यांत ठेविली पाहिजे कीं, मुसलमान-लोकांस चीड येईल असा शिवाजी-उत्सव हल्लींच्या काळीं हिंदूंनींच प्रथमतः सुरू केल्यामुळें, "जशास तसेंच पाहिजे," असें समजणाऱ्या कांहीं मुसलमान—बंधूंस **अफझुलखानउत्सव** सुरू करण्याची बुद्धि झाली.

ब्राह्मणेतर हिंदूंनीं **वेदोक्त** आचरण करूं नये; लिंगाइतांनीं **व्यासंतोळाची** मिरवणूक काढूं नये; जैनांनीं **पालखी** नेऊं नये; हिंदूंनीं मशिदीवरून **वाद्यें** वाजवीत जाऊं नये; वगैरेसारखे जातिभेदाच्या व धर्मभिन्नतेच्या वैषम्यामुळें जेथें रणें माजतात, तेथें प्रातिनिधिक तत्वांवर **स्वराज्य** स्थापन करण्याची व **कांग्रेस** काढण्याची हांव सुशिक्षित लोकांनीं धरून, कालाचा, संपत्तीचा व श्रमाचा अपव्यय करावा, ही मोठी आश्चर्याची गोष्ट आहे. कारण, पाश्चिमात्य पद्धतीचें प्रातिनिधिक तत्वांवरील **स्वराज्य** हिंदुस्थानांत स्थापन होऊन, तें लोकांस फायदेशीर होण्यासारखी ह्या देशाची **सामाजिक** स्थिति आज नाहीं. उदाहरणार्थ, हिंदुस्थानांतील तीस कोटी

लोकांपैकीं जवळजवळ सहा कोटी लोक **अस्पृश्य** असून, त्यांना कोठेंच कांहीं थारा नाहीं. हे लोक नांवाचे मात्र हिंदू आहेत; परंतु, इतर हिंदूलोक त्यांना कसे लेखतात व वागवितात, ह्याचें वर्णन चिरोलसाहेबांच्या पुस्तकांत फारच चांगलें आहे. शिक्षणाच्या दृष्टीनेंहि हा देश **स्वराज्यास** अद्यापि लायक नाहीं; व इंग्लंडसारखें पार्लमेंट येथें सुरू झाल्यानें, लोकांस कदापिहि सुख लागावयाचें नाहीं. मुनिसिपालिट्या, लोकलबोर्डें यांच्याकडे जरा नजर पोहोंचविल्यास, हिंदुस्थानांतील **स्वराज्याची** कल्पना कोणासहि थोडीतरी येईल. अहमदाबाद व राजापुर येथल्या मुनसिपालिट्यांच्या कामाची रीत व त्याबद्दल त्यांना सरकाराकडून मिळालेलें **शेलापागोटें**, ह्यांची सर्वांस माहिती असेलच.

ह्याशिवाय, देशी संस्थानें, राजकीय सुधारणा, पाश्चात्य शिक्षण, शिक्षणविषयक सुधारणा, धार्मिक शिक्षण, प्राथमिक शिक्षण, स्वदेशी व सांपत्तिक स्थिति, हिंदुस्थान व इंग्लंड यांच्यामधील व्यापारविषयक धोरण, ब्रिटिश साम्राज्यांत ह्या देशाचें स्थान, इंग्रज अधिकारी व हिंदी लोक यांच्यामधील सरकारी व खासगी दळणवळण, हिंदुस्थानांतील राज्यव्यवस्था, इत्यादि नाना विषयांवर ह्या पुस्तकांत सांगोपांग विचार झालेला आहे; व तो सर्व हिंदी लोकांनीं मनन करण्यासारखा असून, त्यांतील उपदेशाच्या अनुरोधानें त्यांनीं आपली सर्व बाजूंनीं उन्नति करून घेतली पाहिजे. नुसती राज्यकर्त्यांविषयीं द्वेषबुद्धि बाळगून व राजद्रोह पसरून, आणि अजाण व मूढ लोकांना हातीं धरून व त्यांच्याकडून दंगाधोपा करवून, ह्या देशाची स्थिति सुधारेल, असा कित्येकांस जो भ्रम आहे, तो त्यांनीं सोडून दिला पाहिजे.

आतां, एका अत्यंत महत्त्वाच्या प्रश्नासंबंधानें मात्र चिरोलसाहे-

बांचा व आमचा बराच मतभेद आहे. हिंदुस्थानांतील अस्पृश्य लोकां-संबंधानें सरकारास जी सल्ला त्यांनीं दिली आहे, त्यापासून खरोखर फायदा होईल कीं काय, ह्याबद्दल आह्मांस बळकट शंका आहे. साहेबबाहदुरास असें वाटत आहे कीं, हे अस्पृश्य लोक ख्रिस्ती-धर्मानुयायी झाले असतां, त्यांच्याठिकाणीं इंग्रज राज्यकर्त्यांविषयीं स्वाभाविक रीत्या प्रेम उत्पन्न होईल, व ते लोक नेहमींच सरकारच्या बाजूला राहून त्यांचें साह्य करतील. पण आमच्या अल्पमतीला असें वाटतें कीं, हा चिरोलसाहेबांचा समज बहुतेक चुकीचा आहे. राजा व प्रजा किंवा दोन राष्ट्रें एकाच धर्माचीं असलीं, ह्मणजे त्यांच्यामध्यें कधीं भांडण होत नाहीं, असें जर असतें, तर इंग्लंडचे राजे व इंग्रजलोक ह्यांच्यामध्यें, किंवा इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, रशिया वगैरे ख्रिस्ती राष्ट्रांमध्यें वैरभाव उत्पन्न होऊन, लढाया झाल्या नसत्या. तात्पर्य काय कीं, राजसत्ता व धर्म यांचा फारसा संबंध नाहीं. आज हिंदुस्थानामध्यें इंग्रजी अमला-खालीं जे एतद्देशीय ख्रिस्ती लोक आहेत, ते सर्वच राजनिष्ठ असतील काय? अथवा, पारशी, मुसलमानी, वगैरे धर्मांतील लोकांपेक्षां ह्या ख्रिस्ती लोकांचा सरकाराकडे अधिक ओढा आहे, असें ह्मणण्यास कोणी सिद्ध होईल काय? एतद्देशीय ख्रिस्ती लोकांविषयीं ज्यांना चांगली माहिती आहे, त्या लोकांच्या सांगण्यांत असें येतें कीं, जेवणखाण, लग्नसंबंध वगैरे बाबतींत अस्सल यूरोपियन लोक नेटिव ख्रिस्त्यांस बरोबरीनें वागवीत नाहींत, ह्मणून ह्यांना नेहमीं वाईट वाटत असतें; व त्यांच्यापैकीं कित्येकांचे ह्या बाब-तींत संतापजनक उद्गार निघाल्याचेंहि आह्मांस माहीत आहे. इंग्रज लोकांनीं एक गोष्ट चांगली लक्ष्यांत ठेविली पाहिजे ती ही कीं, नेटिव मनुष्य ख्रिस्ती झाला ह्मणजे तो तात्काळ,—लोखंडास

परीस लागून सोनें झाल्याप्रमाणें,—बदलून जाऊन, त्याच्या-ठिकाणीं यूरोपियन लोकांचे गुण उत्पन्न होतात, असें नाहीं; तर तो बहुतेक जशाचा तसाच राहतो. कित्येक किरकोळ बाबतींत तो यूरोपियन लोकांचें अनुकरण करूं लागतो, हें खरें आहे; पण यूरोपियन लोकांचें शील त्याच्या ठिकाणीं येण्यास बऱ्याच पिढ्या गेल्या पाहिजेत, असें वाटतें.

दुसरी गोष्ट अशी आहे कीं, सरकार जर मिशनरी लोकांचें साह्य घेऊन, ह्या अस्पृश्य वर्गास ख्रिस्ती करण्याच्या उद्योगास लागेल, तर खुद्द ह्या लोकांचाहि भलताच समज होऊन, सरकाराबद्दल त्यांच्या मनांत अप्रीति उत्पन्न होईल. शिवाय, राजद्रोह पसरण्याची खटपट करणाऱ्या चळवळ्या लोकांच्याहि हातीं एक नवीन शस्त्र सरकारानें आपणहोऊन दिल्यासारखें होईल. ह्मणून, आमची सरकारास अशी विनंति आहे कीं, ह्या हतभागी लोकांस फक्त विद्यामृत पाजून, त्यांना आपली स्वतःची स्थिति सुधारतां येऊं लागेल, अशा रीतीनें त्यांना तयार करण्याकरितां शक्य तितके प्रयत्न सरकारानें कृपाळु होऊन करावेत. परंतु, त्यांच्या धर्मसमजुतींत हात घालण्याची मात्र कोणाचीहि सल्ला ऐकूं नये.

आतां, आजपर्यंतचा जो कांहीं अनुभव आहे, त्यावरून कोणतेंहि राष्ट्रीय काम हातीं घेण्यास महाराष्ट्राची जशी पात्रता आहे, तशी इतर कोणत्याहि प्रांताची नाहीं, हें मोठ्या अभिमानानें आह्मी येथें सांगतों. कारणें कांहींहि असोत; पण, महाराष्ट्रीयांच्या अंगीं कांहीं खरेखरे राष्ट्रीय गुण आहेत, तसे इतर प्रांतांतील लोकांच्या ठिकाणीं क्वचित्च असतील. महाराष्ट्रांतील लोक योग्य दिशेनें काम करूं लागले, तर जसे इतर हिंदी लोकांस ते मागें सारतात, त्याचप्रमाणें ते भलतीकडे वाहूं लागल्यास,

गैरशिस्त गोष्टींतहि त्यांचा हात इतर प्रांतांतील लोकांच्यानें धरवत नाहीं. "डेक्कन एज्युकेशन सोसायटी," "सर्व्हंट ऑफ इंडिया सोसायटी," वगैरे संस्था ज्या महाराष्ट्रांत आहेत, तेथेंच गणपति-उत्सव, शिवाजी-उत्सव, गुप्त राज्यक्रांतीचे कट, वगैरे संस्थाहि अस्तित्वांत आल्या आहेत. ज्या महाराष्ट्रांत कै. रानडे व तेलंग, परलोकवासी बद्रुद्दीन तय्यबजी, डा० भांडारकर, दादाभाई नवरोजीशेट, सर फेरोझशहा मेथा, नामदार गोखले वगैरे-सारख्या साऱ्या हिंदुस्थानास ललामभूत होऊन राहिलेल्या विभूती निर्माण झाल्या आहेत, त्याच महाराष्ट्रांत टिळक—परांजपे या सारखे राजद्रोहप्रवर्तक लोक, व फडके, चाफेकरबंधु, सावरकरबंधु, कान्हेरे वगैरे सारखे अघोरकर्मी लोक जन्मास आले आहेत. राजकारणपटुत्वांत व स्वार्थत्यागांत ज्याप्रमाणें नामदार गोखल्यांस आज सर्व हिंदुस्थानांत कोणी जोड नाहीं, त्याचप्रमाणें टिळकासारखा सर्व राजद्रोहात्मक चळवळींचा सूत्रधारहि दुसरा कोणी नव्हता. इतर प्रांतांतील लोक कितीहि वल्गना करोत; परंतु, महाराष्ट्रानें पुढाकार घेतल्याशिवाय कोणतेंहि राष्ट्रीय काम चांगल्या रीतीनें कधींहि तडीस जाणार नाहीं, अशी आमची पुरी खात्री आहे. ह्मणून, अशा ह्या महाराष्ट्रांतील लोकांनीं मि० चिरोल यांच्या पुस्तकाचें विकारवश न होतां चांगलें मनन करून, कोणत्याहि राष्ट्रीय कामास हात घालावा, अशी आमची त्यांस प्रार्थना आहे.

आतां, ज्याप्रमाणें आह्मीं आपल्या महाराष्ट्रीय बंधूंस चिरोलसाहेबांच्या पुस्तकांतील उपदेशाचा विचार करून, आपली दिशा पतकरण्यास विनंति केली आहे, त्याचप्रमाणें, हिंदुस्थानच्या इंग्रज राज्यकर्त्यांसहि आमचें तेंच सांगणें आहे.

इंग्लंडनें हिंदुस्थानाविषयीं सहानुभूतीचें धोरण ठेवून, येथला राज्यकारभार कसा चालवावा, ह्याविषयीं साहेबबहादुरांनीं आपल्या लोकांस स्पष्टपणानें सांगितलें आहे. शास्त्रीय शिक्षणाचा प्रसार, व्यापारी धोरण, खरी स्वदेशी, ब्रिटिश साम्राज्यांत हिंदुस्थानच्या लोकांशीं होणारें वर्तन, वगैरे अनेक महत्त्वाच्या प्रश्नांसंबंधानें त्यांनीं इंग्रजलोकांस फार चांगला उपदेश केला आहे. कर्जवामामुळें व भांडणतंटे लागून, एखाद्या सरदाराची इस्टेट डबघाईस आली असतां, तिची नीट व्यवस्था लावून एकंदर स्थिति सुधारण्याकरितां, सरकार चांगल्या विश्वासू व कर्तृत्ववान् लोकांच्या स्वाधीन ज्याप्रमाणें ती इस्टेट करून देतें, त्याचप्रमाणें, ह्या हिंदुस्थान-देशाची अनेक कारणांमुळें झालेली दुर्दशा परमेश्वरास यापुढें पाहावेनाशी झाल्यामुळें, हा देश इंग्लंडच्या स्वाधीन करून, येथली व्यवस्था लावण्याचें काम त्यानें त्यावर सोंपविलें आहे, अशी आमची समजूत आहे. ह्मणून, ह्या गतवैभव व हतभागी देशाच्या राज्यकर्त्यांस आमची सविनय अशी प्रार्थना आहे कीं, त्यांनीं हें "ईश्वराचें काम" समजून, चिरोलसाहेबांच्या उप-देशाप्रमाणेंच ह्या देशाचा राज्यकारभार चालवून, त्याला ब्रिटिश साम्राज्यांत चांगलें स्थान मिळेल, व त्याचें गतवैभव त्याला पुन-रपि प्राप्त होईल, अशी योजना करावी; व त्याप्रमाणें ब्रिटिश-लोक करतील, अशी आह्मांस पूर्ण उमेद आहे. आणि, अशा रीतीनें ह्या विकलांगदेशपुरुषास आरोग्य व सामर्थ्य प्राप्त करून दिलें, ह्मणजे ब्रिटनरूपी धन्वंतऱ्याचें नांव जगाच्या इतिहासांत निरंतर दुमदुमत राहील.

शेवटीं, हें भाषांतर जगापुढें ठेवण्यास ज्या सद्गृहस्थांचें आह्मांस साह्य झालें आहे, त्यांच्याविषयीं दोन शब्द सांगतों.

मि. चिरोल यांच्या पुस्तकांतील उपदेश औषधाप्रमाणें पथ्यकर असूनहि, पुष्कळांस तो अगदीं विषासारखा कडू वाटण्याचा संभव असल्यामुळें, विकृतरुचीच्या वाचकवर्गाकडून या पुस्तकाच्या मराठी भाषांतरास उत्साहानें मदत मिळेल, असें आह्मांस वाटत नाहीं. त्यामुळें, स्वतःच्या अंगावर पैशाची जबाबदारी घेऊन, हें काम हातीं घेण्यास आह्मांस हिम्मत होत नव्हती. परंतु, परमेश्वराच्याच इच्छेमुळें आह्मांस श्रीमन्महाराज **श्रीशाहूछत्रपती** सरकार करवीर यांचा उदार आश्रय मिळाला; व त्यामुळें हें भाषांतर छापून प्रसिद्ध करण्याचें साधन आमच्या हातीं आलें. आमच्या महाराजांचें अनुकरण करून, बडोद्याचे श्री. सयाजीराव गायकवाड, ग्वालेरचे शिंदेसरकार व म्हैसूरचे महाराज, हे चिरोलसाहेबांच्या पुस्तकाचें अनुक्रमें गुजराथी, हिंदी व कानडी भाषांत तरजुमे करवून, इंग्रजी न जाणणाऱ्या क्रोडों हिंदी लोकांस वरील ग्रंथाची ओळख करून देण्याचें श्रेय घेतील, अशी आह्मांस आशा आहे. आमच्या महाराजांच्या उदाहरणामुळें, त्यांचे परमप्रिय व सन्मान्य बंधु श्री० **बापूसाहेब घाटगे**, सी. एस्. आय्; सी. आय्. ई; ह्मणजे कागलसंस्थानचे अधिपति, मे. **भाऊसाहेब देसाई** घोसरवाडकर, व मे. **आपासाहेब देसाई** चिंचलीकर, इत्यादि थोर थोर जहागिरदारांचा व इनामदारांचा आश्रय प्रस्तुत पुस्तकाच्या प्रकाशनास मिळाला आहे; व त्याबद्दल आह्मी वरील सद्गृहस्थांचे अत्यंत आभारी आहों.

तसेंच, मि. चिरोल यानीं आमच्या विनंतीस मान देऊन, आपल्या पुस्तकाचें मराठींत भाषांतर करून तें प्रसिद्ध करण्याची परवानगी आह्मांस दिली, ह्याबद्दल त्यांचे आह्मांवर व मराठी

साहित्यावर पुष्कळच उपकार झाले आहेत. आणि, ह्या भाषांतरांतील दोषांकडे दुर्लक्ष करून, मराठी वाचकवर्ग त्याचा उपयोग करतील, तर त्यांत देशाचें खरें कल्याण व वरील उपकारांची अंशतः फेड होईल, ह्यांत बिलकूल संशय नाहीं.

चिरोलसाहेबांच्या भाषेंत बरीच घनता असल्याकारणानें, व त्यांचे विचार साधतील तितक्या बरोबर रीतीनें मराठींत उतरण्याच्या आमच्या प्रयत्नामुळें, कोठें कोठें भाषेंत दुर्बोधता व दूरान्वय झाला आहे, हें आह्मी कबूल करितों. परंतु, ह्या भाषांतराकडे भाषेच्या दृष्टीनें न पाहतां, आंतील विचारांच्या दृष्टीनें पाहावें, अशी आमची वाचकांस विनंति आहे.

कोल्हापूर<br>जुलै १९११ इ. } भाषांतरकर्ते.

# मि. चिरोल यांच्या पुस्तकाचें समालोचन.

( लेखकः—सर आल्फ्रेड सी. लायल्. )

आमच्या विस्तीर्ण साम्राज्यासंबंधाच्या राजकीय प्रश्नांत अत्यंत कठीण अशा हिंदुस्थानच्या अस्वस्थतेच्या प्रश्नाबद्दल जीं पत्रें मि. व्हॅलेंटाईन चिरोल यांनीं लंडन टाईम्समध्यें छापिलीं होतीं त्यांची तपासून पुस्तकरूपानें काढिलेली आवृत्ती ह्मणजे या विषयावरील ग्रंथांत एक महत्वाची व बोधप्रद भर आहे. ज्या कारणांचा व परिस्थितीचा हिंदुस्थानांतील अलीकडच्या घोटाळ्याशीं संबंध लावितां येईल त्यांचा तपास करण्याकरितां एखादें कमिशन नेमिलें असतें तर त्याच्या रिपोर्टांत ज्या प्रकारचें सर्व स्थितीचें विस्तृत सिंहावलोकन, पुराव्याची सुव्यवस्थित मांडणी आणि त्याचें समर्थन करणारी वस्तुस्थिती मांडली गेली असती तसाच प्रकार या पुस्तकांत आढळून येतो.

जगाच्या इतिहासांत निरनिराळ्या काळीं, सुधारणेंत पुढें असलेल्या राष्ट्रांनीं युरोपीयन लोकांचीं साम्राज्यें आशिया खंडांत स्थापन करण्याचें साहस अंगावर घेतलें आहे आणि त्यांत त्यांना महत्वाचें यशहि मिळालें आहे. मॅसिडॉनच्या ग्रीक लोकांनीं या कामास आरंभ केला; नंतर रोमन लोकांनीं तें काम हातीं घेतलें; आणि लष्कराच्या श्रेष्ठपणामुळें व संघटित कार्य करण्याच्या त्यांच्या हातोटीमुळें त्यांस पश्चिम आशियांतील मोठमोठ्या लोकसमूहावर अनेक शतकें राज्य करितां आलें. तेथील शहरवासी लोकांत युरोपचीं भौतिक शास्त्रें व वाङ्मय भरभराटीस आलें; कारण तेथल्या

शिक्षित लोकांना रानटीपणामध्यें पुनः परतण्याच्या भीतीपासून बचाव करून घेण्यास परकीय राज्य हेंच एक साधन आहे असें वाटत होतें. या परकीय सत्तेविषयीं आशियांतील लोकांत विशेष असंतोष अथवा द्वेष होता असेंहि ह्मणण्यास जागा नाहीं. परंतु फार मागेंच ग्रीक व रोमन साम्राज्यांचा नाश झाला असून त्यांचे आतां विस्कळित अवशेष तेवढे राहिले आहेत. अर्वाचीन काळांत एका मोठ्या आशियाटिक जनसमाजावर राज्य करून त्यांस सुधारण्याचा व जुनाट आणि कांहीं बाबतींत बाल्यावस्थेंत असलेल्या एका समाजाच्या कल्पना बदलून त्याचें राजकीय बुद्धिसामर्थ्य परिणत करण्याचा प्रयत्न हिंदुस्थानांतील ब्रिटिश राज्यकर्ते करीत आहेत.

एकंदर परिस्थितीचा दूरदृष्टीनें व काळजीपूर्वक विचार करणाऱ्या लोकांस पुष्कळ दिवसांपासून या प्रयत्नास अंगभूत असलेलीं संकटें ठाऊक आहेत, आणि तो प्रयत्न मनस्वी कठीण आहे हें ते जाणत आहेत. तथापि, हिंदुस्थानच्या कांहीं प्रांतांत दिसून आलेली अलीकडची राजकीय तीव्र रुग्णावस्था दृष्टीस पडल्याबरोबर ब्रिटिश लोक आश्चर्यचकित झाले आहेत. मि. चिरोल यांच्या पुस्तकांत आमच्या अंगीकृत धाडसी उद्योगाची हल्लींची व पुढची संभवनीय स्थिती वर्णिली आहे. पसरलेल्या अस्वस्थतेच्या कारणांचा आणि परिणामांचा त्यांनीं तपास केला आहे. त्यांनीं पुष्कळच साहित्य जमविलें आहे व हिंदी आणि युरोपीयन उत्तमोत्तम माहितगारांचा सल्ला घेतला आहे. वस्तुस्थितीची त्यांची पूर्ण माहिती आणि ब्रिटिश राज्याविरुद्ध बंडाळ्याची प्रवृत्ती प्रचलित करणाऱ्यांच्या हेतूविषयीं, स्वभावाविषयीं आणि साधनांविषयीं त्यांचें अपूर्व ज्ञान, या पुस्तकांतील

त्यांच्या साहित्याच्या कुशलतायुक्त पृथक्करणावरून उत्तम प्रकारें दिसून येतात. उत्तम हेतूनें केलेल्या कामांतहि राज्यकर्त्यांनीं केलेल्या चुकांचीं उदाहरणें त्यांनीं पुढें ठेविलीं आहेत. नैतिक आणि भौतिक उन्नति करण्याचें कर्तव्य जरूरीमुळेंच अंगावर घेण्याचें ज्या राज्यकर्त्यांनीं व्रत घेतलें आहे, पण ज्यांचीं तत्वेंच त्यांच्या प्रयत्नांविरुद्ध उपयोगांत आणिलीं जात आहेत आणि त्यांनीं दिलेल्या फायद्यांचा उपभोग घेणाऱ्या वर्गांतच ज्यांचे मुख्य शत्रु आढळतात, त्यांच्या राज्यावरील संकटें या पुस्तकांत सर्वत्र सोदाहरण वर्णिलीं आहेत.

जगाच्या सर्व भागांत आणि विशेषतः युरोप व आशिया खंडांत दळणवळणाची सुखकर व जलदीचीं साधनें वाढविणें हें १९ व्या शतकाचें महत्कार्य होय. ही खंडें जोंपर्यंत अलग होतीं तोंपर्यंत आशिया खंड अगदीं अचल व स्तब्ध होतें. जर बदल कांहीं झाला असला तर तो वाईटाच्या बाजूलाच झाला होता; कारण सर्व हिंदुस्थानांत तरी सबंध १८ व्या शतकभर विलक्षण राजकीय धांदल उडून गेली होती. पण युरोपखंडांत मात्र याच्या उलट राष्ट्रीय संपत्ति, शास्त्रीय शोध, कला आणि युद्धविद्या यांची (त्या वेळीं) अपूर्व प्रगति झाली. लोकसंख्या वाढली व बहुगुणित झाली; आणि १९ व्या शतकांत, अंशतः प्रदेश काबीज करून व अंशतः शांततेच्या उपायांनीं आपला शिरकाव करून घेऊन, पाश्चात्य राष्ट्रांनीं आशियाखंडांत राजकीय वर्चस्व संपादन केलें. त्या लोकांनीं आपल्या बरोबर नवीन ज्ञान, नव्या कल्पना व नव्या रीतिभाती नेल्या; त्यांच्या योगानें नूतन संस्कार व आकांक्षा यांचा आशियांतील लोकांच्या मनांत प्रादुर्भाव झाला व पूर्वीं ज्यांचा अनुभव, किंबहुना कल्पनाहि नव्हती अशा गरजा आणि अड-

चणीं त्यांच्या लक्षांत येऊं लागल्या. याचा परिणाम आतां उघड दिसूं लागला आहे. तो हा कीं, त्या लोकांचा जुन्या समाज-पद्धतींतून नव्यांत एकदम प्रवेश झाला आहे. आशिया खंडांत हल्लीं जी अव्यवस्था किंवा असंतोषजन्य हालचाल दिसत आहे ती याच कारणामुळें होय. युरोप ज्या विलक्षण वेगानें आशिया खंडांत आपला शिरकाव करीत आहे त्यामुळें त्या खंडांतील लोकांच्या स्थितींत चलबिचल झाली आहे. या दोहोंचा परस्परसंबंध मुख्यत: हिंदुस्थानांत येतो.

शिवाय, १९ व्या शतकाच्या अखेरीस आणि २० व्या शतकाच्या आरंभीं अशा कित्येक गोष्टी घडल्या कीं, तेणेंकरून युरोपच्या वर्चस्वाबद्दलच्या आशियांतील लोकांच्या कल्पनांत मोठा फरक पडला. निदान तीनशें वर्षांत आशियाखंडांत राहणाऱ्या लोकांनीं युरोपीयन लष्करावर उघड्या मैदानांत मिळविलेला पहिला जय १८९६ सालीं इटलीच्या लोकांस जिंकून अबीसीनियन लोकांनीं संपादन केला. जमिनीवरीलच नव्हे तर समुद्रावरच्या लढायांत सुद्धां जपाननें रशियावर जे जय मिळविले त्यांवरून, आशियांत जाऊन सहज जय मिळविण्याचे दिवस गेले, असें स्पष्टपणें दिसून आलें. कारण पूर्वीं कधींहि आशियाच्या आरमारानें युरोपच्या आरमाराशीं युद्ध करून जय मिळविल्याचें इतिहासांत नमूद नाहीं. या सर्वसाधारण कारणांपासून उत्पन्न झालेली अस्वस्थता युरोपीयन राज्यकर्त्यांच्या ताब्यांत असलेल्या देशांत विशेष जोरानें उसळावी, हें अस्वाभाविक नाहीं. परकी राज्याविषयीं सर्व लोकसमूहांत सर्वस्वी संतोष कधींच नसतो. तो गुप्त असंतोष या अस्वस्थतेच्या हालचालीमुळें आपोआपच जागृत झाला. ईजिप्त देशांत आणि फ्रान्सच्या आशियाटिक मुलखांत

अशाच तऱ्हेचीं अस्वस्थतेचीं चिन्हें दिसत आहेत. अल्जेरीया देखील परकीय सत्तेखालीं संतुष्ट आहे असें आतांच ह्मणतां येत नाहीं.

कृतिरूपानें बाहेर पडणाऱ्या राजद्रोहाचें केंद्र महाराष्ट्रांत व खालच्या बंगाल्यांतच आढळून येत आहे, ह्याचा बरोबर खुलासा इंग्रजांच्या हिंदुस्थानांतील इतिहासावरून होण्यासारखा आहे. आठराव्या शतकाच्या आरंभापासून पुणें हें पेशव्यांच्या सत्तेचें आदिस्थान असून त्यांचें सिंहासन ह्मणजे ब्राह्मणांच्या धार्मिक व लौकिक सत्तेचें आश्रयस्थान होतें, या गोष्टीच्या ताज्या आठवणीमुळें महाराष्ट्रीय ब्राह्मणांत राजद्रोह पसरला आहे, असें या पुस्तकांत प्रतिपादन केलें आहे. पेशवे या शद्बाच्या अर्थावरूनच दिसून येतें कीं, ते प्रसिद्ध शिवाजीनें स्थापिलेल्या राजघराण्याचे मुख्य प्रधान होते व त्यांनीं त्या राजघराण्याची सत्ता झुगारून दिली होती. पण १८ व्या शतकाच्या अखेरीस त्यांची राजकीय सत्ता बहुतेक नांवाचीच राहून, खरी सत्ता लुटारू सैन्यांच्या पुढारी मंडळाकडे गेली होती व त्या मंडळापैकीं कांहीं कांहींच्या दांडगाईस कंटाळूनच शंभरापेक्षां जास्त वर्षांपूर्वी शेवटचा पेशवा इंग्रजांच्या आश्रयास आला. बाजीराव ब्रिटिशांच्या संरक्षणाखालीं स्वखुषीनें आला तेव्हांच ब्राह्मणांची राजकीय सत्ता नष्ट झाली. नंतर ब्राह्मणेतर मराठे सरदारांनीं आमचें वर्चस्व कबूल केलें तें अनेक निकराच्या लढाया देऊनच केलें; व त्या लढायांचा परिणाम असा झाला कीं, त्यांच्या वंशजाकडें हलीं चालत असलेल्या हद्दींत त्यांची सत्ता मर्यादित झाली. तथापि हें खरें आहे कीं, सर्व इतिहासांत एकच वेळ त्यांच्या जातीनें जें राजकीय वर्चस्व मिळविलें होतें त्याची स्मृति हें महाराष्ट्रीय ब्राह्मणांच्या राजद्रोही प्रवृत्तींचें कारण आहे.

बंगालची गोष्ट वेगळी आहे. दोन समुद्रांमधल्या सबंध आर्यावर्ताच्या रुंदीनें पुणें व कलकत्ता हीं शहरें विभागलेलीं आहेत; पण या भूविषयक अंतरापेक्षांहि जास्त अंतर या दोन शहरांतील, ह्मणजे मराठे व बंगाली या लोकांच्या ऐतिहासिक पूर्वपरंपरेमध्यें आहे. मोगलांच्या बादशाहीविरुद्ध बंड करणाऱ्यांत मराठे पुढारी होते; ब्रिटिश सत्तेच्या उदयाला त्यांचाच जबरदस्त अडथळा होता. ब्रिटिश वर्चस्वाखालीं येण्यापूर्वीं त्यांच्या सरदारांनीं निकराचें युद्ध केलें. उलट, खालचें (दक्षिणेकडचें) बंगाल आगोदरच मोगलांच्या सत्तेखालून निसटलें होतें व प्लासीच्या एका लढाईनेंच त्याचा ताबा तेथील नबाबाकडून इंग्रजांकडे आला. या लढाईंत बंगाल्यांनीं मुळींच भाग घेतला नाहीं; कारण; शास्त्यांच्या बदलामुळें समाधान मानण्यास त्यांना पुष्कळच कारण होतें.

या कारणामुळें, मराठे व बंगाली यांची तुलना केली असतां, अगदीं वेगळ्या व भिन्न स्वरूपाच्या कारणांचे एकाच तऱ्हेचे कसे परिणाम होतात याचा विलक्षण मासला दृष्टीस पडणार आहे. मराठ्यांच्या अस्वस्थतेचें कारण, मागच्या काळांतील राज्यकर्तृत्वाची आठवण आणि लढाऊपणाच्या कुलपरंपरा, यांमध्यें सांपडेल. बंगाल्यांच्या राजकीय किंवा लष्करी आठवणी कांहीं नाहींत, कारण त्यांच्या प्रांताला लढाईचा अनुभव मुळींच आलेला नाहीं. जवळ जवळ १५० वर्षांत त्या प्रांतांत पूर्ण शांतता नांदत आहे. बंगाली अस्वस्थतेंत जो उन्माद दिसत आहे त्याचें ही दीर्घकालिक शांतता हें एक उत्तेजक कारण आहे असें ह्मणण्यांत विलक्षण कांहीं नाहीं; कारण, क्रांतिकारक राजकीय चळवळ ह्मणजे गमतीचा खेळ नाहीं आणि ब्रिटिश सरकारास

तो बंद केला पाहिजे असें वाटतांच तो डाव फसणार आहे, या बद्दल बंगालच्या पांढरपेशा लोकांना स्पष्ट कल्पना नाहीं.

मात्र हें अगदीं खरें कीं, या दोन्ही प्रांतांतील राजद्रोहाचे पुरस्कर्ते ब्राह्मण्याच्या वजनाचा आपल्या बाजूनें उपयोग करण्याचा जोरानें यत्न करीत आहेत; आणि या मुद्यावर या पुस्तकांत जो विशेष जोर दिला आहे तो अगदीं बरोबर आहे.

योग्यता आणि अधिकार या दोहोंच्या दृष्टीनें ब्राह्मण व लेव्हाईट यांचें साम्य दाखविण्यांत येत असतें तें खरें आहे; जुन्या लोकांच्या आचारविचारांच्या परंपरेचे ते अधिष्ठाते आहेत; धार्मिक क्रियाकांड करण्यांत ते धुरीण असून, त्यांचा मक्ता बहुतेक त्यांच्याकडेच असतो; हें क्रियाकांड बहुतेक सर्व जुन्या धर्मांप्रमाणें हिंदुधर्मांतहि धर्माचा मुख्य भाग आहे; हिंदुधर्माच्या छत्राखालीं असणाऱ्या असंख्य जाती ज्या नियमांनीं आपसांत बद्ध व परस्परांपासून विभिन्न झाल्या आहेत ते या क्रियाकांडाशीं अगदीं संलग्न झालेले आहेत. जातीसंबंधीं विशेष नियम, विशेषतः रोटीबेटीव्यवहाराच्या कडक मर्यादा, हिंदुस्थानांत ज्या प्रमाणांत आढळतात तशा त्या जगांत इतरत्र कोठेंही आढळणार नाहींत. हिंदुस्थानची राजकीय संघटना निर्बळ करण्यास जातिभेद हें एक फार जुनें कारण आहे व त्यामुळें परकीयांना तो देश जिंकणें सोपें झालें आहे. परंतु उलट बाजूनें, परकीय धर्मांचा हिंदुलोकांवर पगडा बसण्यास, परकीय वर्णांची हिंदुलोकांत भेसळ होण्यास आणि राष्ट्रीय एकीकरणाच्या कामीं यश येण्यास तोच जातिभेद ह्मणजे मोठी अडचण झाली आहे.

ब्राह्मणांच्या हातीं या व्यवस्थेंत किती प्रचंड शक्ति ठेवण्यांत आली आहे व पाश्चात्त्य कल्पना, रीति आणि शिक्षण यांच्या

स्वीकारास ती किती विरुद्ध असावी, याची कल्पना सहज होण्यासारखी आहे. तथापि अत्यंत आनंदाची व सर्वांस ज्ञात गोष्ट अशी आहे कीं इंग्रजी शाळा व विश्वविद्यालयें यांत दिल्या जाणाऱ्या नवीन शिक्षणाचा, ज्ञानाच्या विकासाचा फायदा घेण्यास ब्राह्मण लोक पुढें आले आहेत, हें त्यांच्या बुद्धीस व चातुर्यास भूषण आहे. आमच्या भाषेचें व शास्त्रांचें त्यांनीं ज्ञान मिळविलें आहे. इंग्रजांनीं सुरू केलेल्या वकीलीच्या व वैद्यकीच्या धंद्यांतहि ते पुढें आले आहेत. आमच्या मुलकी खात्यांत त्यांनीं प्रवेश केला आहे; लष्करांत सुद्धां ते नोकऱ्या करीत आहेत. या लौकिक सुधारणांचा स्वीकार करण्याच्या त्यांच्या तयारीमुळें त्यांचें धार्मिक श्रेष्ठत्व मंदावल्यासारखें दिसत नाहीं; किंवा एकंदर लोकांवरील त्यांचें वजन कमी पडल्याचींहि चिन्हें दिसत नाहींत. तसेंच, हिंदु लोकांच्या देवभोळेपणाबरोबरच पाश्चात्यांच्या कल्पनांचा आश्रय घेण्यांत ब्राह्मणांना व इतर सुशिक्षित वर्गांना यश मिळावें, किंवा स्वतः जातिनिर्बंध मोडूनहि सामान्य लोकांनीं ते पाळण्याचा उपदेश त्यांनीं करावा, यांतहि कांहीं आश्चर्य नाहीं, हें हिंदुधर्माचा आलौकिक चिवटपणा ज्यांना ठाऊक आहे व जरूर लागेल तेंव्हा नियम चुकविण्याचे त्यांनीं कल्पनेंतून काढिलेले उपाय ज्यांच्या लक्षांत आहेत त्यांना माहीतच आहे. परंतु हिंदुधर्माचे लौकिक आचारविचार अर्वाचीन सुधारणेच्या तत्त्वांशीं अगदीं विरुद्ध आहेत हें स्पष्ट आहे; आणि अंशतः याच कारणामुळें, आपला जुना धर्म सुधारून शुद्ध करण्याचा सुशिक्षित हिंदु यत्न करीत आहेत. आपलें इतकें परस्परविरोधी वर्तन अखेरपर्यंत खपणें शक्यच नाहीं, व कालीदेवीकरितां बळी देणें आणि युनिव्हर्सिटीच्या पदव्या धारण करणें यांत न झांकण्यासारखा विरोध आहे, हें त्यांना ठाऊक आहे.

पाश्चात्य शिक्षणाचा प्रसार होण्यासाठीं ब्रिटिश सरकारांनीं केलेल्या उपायांचा इतिहास व परिणाम यांचा प्रस्तुत पुस्तककर्त्यानें चांगला विचार केलेला आहे. तो इतिहास ह्मणजे राजकीय धोरणांतील एका मोठ्या चुकीचें प्रत्यंतर आहे व त्यापासून, अशाच तऱ्हेच्या कामाचा आरंभ करणाऱ्या राष्ट्रांनीं धडा घेण्यासारखा आहे. अज्ञान हें अनेक अनिष्टांचें मूळ आहे हें निर्विवाद आहे; यामुळें, मनुष्यजातीच्या सर्व भ्रमांचें निरसन करण्याचा शिक्षण हा रामबाण उपाय आहे असें गेल्या शतकांत कांहीं तत्त्ववेत्त्यांना वाटलें व राजकीय अस्वस्थता आणि दंगेखोरपणा यांजवर शिक्षण हें खात्रीचें व उत्तम औषध आहे असें मेकॉलेनें ह्मटलें, यांत आश्चर्य मुळींच नाहीं. तें कसेंहि असो, आपल्या अस्तित्वाचें समर्थन उत्तम प्रकारें होण्यासाठीं हिंदुस्थानच्या लोकांची बुद्धि अज्ञानापासून मुक्त करणें हें ब्रिटिश सरकारचें स्पष्ट आणि अवश्य कर्तव्य होतें. आतां अनुभवावरून असें आढळलें आहे कीं, शिक्षण हें जरी अनेक रोगांवर गुणकारी आणि जोरदार औषध असलें, किंबहुना हितकर प्रगतिला तें जरी अगदी अपरिहार्य असलें, तरी त्याचा उपयोग वरवरच्या दृष्टीनें व अविवेकानें केला असतां दुसऱ्याच प्रकारच्या रोगास तें पोषक होतें. समाजव्यवस्था सैल पाडणें, अविचारी डोकीं भणाणून सोडणें, उतावळेपणाच्या महत्वाकांक्षांना प्रोत्साहन देणें आणि कटुपरिणामी व चीड आणणाऱ्या अपेक्षा जागृत करणें, हे त्या शिक्षणाचे जुनाट समाजावर परिणाम होतात. आपल्या गरीबीच्या झोपड्यांतून निघून विद्यालयांच्या न मानवणाऱ्या हवेंत पडून स्वतःच्या विनाशाची वाट धरणाऱ्या विद्यार्थ्यांचें जें वर्णन ली डर्सिनीस नामक नुकत्याच छापलेल्या फ्रेंच कादंबरींत दिलें आहे त्यावरून हे परिणाम युरोपा-

तहि दिसून आले आहेत हें उघड होतें. आशियांत तर हा रोग फारच जोरांत आहे; कारण तेथें ही क्रांती जास्त आकस्मिक झाली आहे आणि जुन्या आयुःक्रमांतून नव्या महत्वाकांक्षांमध्यें झालेला प्रवेशहि तेथें तीव्रपणें जाणवत आहे. इंडोचायनीज वसाहतींत तद्देशीयांना शिकविण्यापासून फार खोडसाळ परिणाम झाले आहेत व त्या शिक्षणक्रमांत समूळ फरक करणें अवश्य झालें आहे, असें तेथील एका हुशार फ्रेंच अधिकाऱ्याच्या रिपोर्टावरून कळून येतें. "C'est une tourbe de declasses" (हा एक पदभ्रष्ट लोकांचा तांडा आहे.) असें १९०९ सालीं एका फ्रेंच प्रवाशानें युरोपीयन लोकांच्या शाळांत शिकलेल्या लिव्हँटाइन तरुणांबद्दल ह्मटलें आहे. सरकारी नोकरींत शिरण्याकरितां परीक्षा देऊन त्यांत अपयश घेतलेले लोकच जगांतील अत्यंत प्राचीन चिनी बादशाही सामान्य लोकांच्या सत्तेखालीं यावी असा यत्न करणाऱ्यांत पुढें आहेत. प्रत्येक देशांत सरकारी नोकऱ्यांहून त्या मागणारांची संख्या भलतीच अधिक असते. बंगाली लोकांस पाश्चात्त्य शिक्षण देणारे राज्यकर्ते परके नसून तद्देशीयच असते तरी त्यांच्यापुढें हल्लींहून कमी अडचणी उभ्या राहिल्या नसत्या. त्या अडचणीखालीं बहुधा ते राज्यकर्ते चिरडूनच गेले असते यांत कांहीं शंका नाहीं.

गेल्या ५० वर्षांत हिंदी शिक्षणखात्याच्या सरकारी धोरणांत जीं स्थित्यंतरें झालीं त्यांचें खुलाशानें या पुस्तकांत वर्णन केलें आहे. स. १८८० आणि १८९० च्या मधल्या काळांत नेमलेल्या दोन कमिशनांच्या रिपोर्टामुळें सरकारची दिशाभूल झाली. त्यामुळें झालेल्या चुकांचा अदमास त्या वेळच्या राजकीय दूरदर्शित्वाचा थोडातरी गंध असणाऱ्यांना आगोदरच झाला होता.

तें शिक्षणखातें नव्या पद्धतीवर पुनः कसें रचावें, सुधारणेचे नवे मार्ग कोणते आखावे, हा आतां प्रश्न आहे. परंतु, जुन्या रस्त्यांत लागणारे डोंगर चुकविणारा म्हणून नवीनच मार्ग सुचविणाऱ्या धाडसी प्रवाशाची पुष्कळांस ऐकून माहिती असेलच. दुसऱ्या रस्त्यावर दुसरे तितकेच तुटलेले कडे होते कीं नाहीं हें मात्र त्यानें सांगितलें नाहीं. प्रस्तुत बाबतींत, मागें परतण्याची गोष्ट तर बोलतांच येत नाहीं आणि हिंदी शिक्षणक्रमाच्या सभोंवती घोटाळे माजूं देण्यांत आले आहेत त्यांचें निवारण होण्यासारखा मार्ग सुचविणें हें कांहीं सोपें दिसत नाहीं. खरी गोष्ट अशी आहे कीं, हिंदुस्थानांत आपले रस्ते पूर्वपरंपरेच्या अभावीं आपणच आखणें व हुडकणें इंग्रजांना भाग पडत आहे. भिन्न वर्णाच्या व धर्माच्या प्रचंड पौर्वात्य जनसमूहाचे प्रातिनिधिक तत्त्वाच्या संस्थाद्वारें राज्य चालविण्याचा, आपल्या कृत्यांचा शांतपणें व न्यायानें विचार व्हावा अशाकरितां अनियंत्रित वर्तमानपत्रावर आणि सभांवर भरंवसा ठेवण्याचा, आणि धर्महीन शिक्षणाच्या आणि धार्मिक तटस्थ वृत्तीच्या योगानें दुराचारी लोकांच्या बेताल वृत्तीचें नियमन करण्याचा कोणत्याही पौर्वात्य किंवा पाश्चात्य राष्ट्रानें प्रयत्न हातीं घेतलेला नाहीं. ज्यांना आमच्या नैतिक व भौतिक कल्पनांचा आणि शोधांचा उपयोग करण्याचा पहिला धडा आम्हीं शिकविला आहे ते लोक त्याच कल्पनांचा व शोधांचा आमच्याच विरुद्ध उपयोग करूं लागले आहेत हें आतां समजून चुकलें आहे. म्हणूनच हिंदुस्थानच्या कांहीं भागांत, प्रतिगामी व त्याबरोबरच क्रांतिकारक उपायांचे अवलंबन करणारे, क्रूर देवतांना संतोषविण्यासाठीं प्रार्थना आणि यज्ञ करणारे व त्या बरोबरच राजद्रोही वर्तमानपत्रांतून सरकारावर हल्ला करणारे, आणि

अगदीं अर्वाचीन पद्धतीच्या अग्रलेखांतून अगदीं रानटी तऱ्हेच्या देवभोळेपणाचें समर्थन करणारे–अशा लोकांचा विलक्षण देखावा दिसूं लागला आहे. विशेषतः आशिया खंडांत, धर्म आणि राजकारण यांच्या मिश्रणापासून अत्यंत स्फोटकारक पदार्थ नेहमीं उत्पन्न होत असतो.

"शांततामय जगतांतील खांडकें" असें ज्यांचें शेक्सपीयरनें वर्णन केलें आहे तशा प्रकारच्या या चळवळी आहेत. पुष्कळ पिढ्या ज्यांना दंग्याच्या व धोक्याच्या राजकारणाची संवय नाहीं अशा लोकांत, शिक्षणाच्या उबेनें कृत्रिमपणें पिकविलेल्या संस्कृतीचे हे स्वाभाविक परिणाम होत. अनेक शतकें एकतंत्री सत्तेखालीं राहिलेल्या लोकांमध्यें आणि स्थानिक स्वातंत्र्य व स्वराज्याच्या संवयी जेथें कधींच नव्हत्या अथवा असून फार पूर्वींच नष्ट झाल्या होत्या अशा देशांत, तात्विक राजकीय हक्काच्या कल्पना आणि प्रातिनिधिक संस्थांचें बीं आम्हीं पेरिलें आहे, हें हल्लीच्या परिस्थितीचें थोडक्यांत व ठोकळ मानानें वर्णन आहे. या बरोबरच, इंग्रजी राज्याच्या स्थापनेपूर्वीं ज्या देशांत मध्य युगांतील युरोपच्या शिक्षणपद्धतीहून एकहि पाऊल पुढें पडलें नव्हतें तेथें आम्ही सढळ हातानें अर्वाचीन शिक्षणाचा प्रसार करीत आहों. हल्लीच्या अस्वस्थतेचीं हीं मुख्य कारणें आहेत असें म्हणण्यास हरकत नाहीं. तसेंच हल्लीच्या राज्यव्यवस्थेचें यंत्र इतक्या चोख रीतीनें जुळविलें आहे, तें इतक्या सुरळीतपणें चालत आहे, कीं तें चालविण्यास अवश्य असलेले संस्कार व दीर्घकालिक शिक्षण बाजूस उभे राहणाऱ्यांच्या लक्षांत येईनासें झालें आहे. ब्रिटिश सत्तेच्या अदृश्य सांठ्यामुळेंच या यंत्रास चालक शक्ति प्राप्त झाली आहे व ब्रिटिशांच्या शास्तृत्वाला जो सर्वत्र मान

आहे त्यांतच ती शक्ती आहे ही गोष्ट विसरली जात आहे. हिंदी लोकांना राज्यकारभारांत जबाबदारीचा वांटा द्यावा हें आतां राजकारणांतील ठरलेलें तत्व झालें आहे. परंतु त्यांना तयार करण्यास हळूं हळूं आणि बेताबेतानेंच गेलें पाहिजे. देशाच्या बाह्य व अंतःस्थितीचें बरोबर ज्ञान करून घेण्याची असमर्थताच ब्रिटिश संबंध तोडण्याच्या अस्पष्ट इच्छेवरून सिद्ध होते. पाश्चात्य शास्त्रांच्या इतर फायद्यांची अद्याप ज्यांना अगदींच रुची नाहीं असे रानटी लोक वायव्य सरहद्दीपलीकडे अगदीं अर्वाचीन शस्त्रास्त्रांनीं सज्ज झालेले आहेत. हिंदुस्थानच्या मैदानांत असणाऱ्या निर्बळ राज्यास तें एक मोठें संकट आहे व शिक्षित वर्गाशीं त्यांची सहानुभूति अतिशय थोडी आहे. अशांविरुद्ध इंग्रज लोक हिंदुस्थानच्या द्वारांचें सुरेखपणें रक्षण करीत आहेत. कायद्याची कडक बजावणी करून देशांत शांती राखण्याच्या सरकारच्या निश्चयावरच देशाची सुधारणा व प्रगति अवलंबून आहे हें स्पष्ट समजणें जरूर आहे. देशांतील श्रेष्ठतम बुद्धिमत्तेचा आणि कर्तबगारीचा राज्यकारभारांत प्रवेश करून घेऊन, साम्राज्याच्या ऐक्यास विरोध न आणितां कायदे करण्याचें व कारभार पाहण्याचें स्वातंत्र्य हिंदुस्थानच्या मोठमोठ्या भागांना देण्यानें हीच सुधारणा व प्रगति सुलभ होणार आहे.

## भाग १ ला.

# परिस्थितीचें सामान्य वर्णन.

हिंदुस्थानांतील अस्वस्थतेच्या वादळास हल्लीं सुदैवानें खळ पडला आहे यांत शंका नाहीं. पण ही शांतता ह्मणजे स्वाभाविक आणि समाधानाच्या परिस्थितीची या देशांत होत असलेल्या स्थापनेचें चिन्ह आहे किंवा कसें? अथवा, उष्णकटिबंधांतील वातावरणांत होणाऱ्या वादळांत होतें त्याप्रमाणें, पुढें येणाऱ्या अधिक भयंकर तुफानाचें ही शांतता हें एक पूर्वचिन्ह आहे? लॉर्ड मोर्ले व लॉर्ड मिंटो यांनीं सुरूं केलेल्या दडपशाही व सुधारणा यांच्या मिश्र धोरणामुळें, दंग्याधोप्याचीं अथवा अराजक चळवळीचीं बीजें नष्ट झालीं काय? आणि शांतपणानें प्रगति करून घेण्याच्या मार्गास सर्व समंजस आणि नेमस्त हिंदी लोक लागले काय? किंवा पहिल्या बाजूस कायमपणें दाबून टाकणें आणि दुसऱ्या बाजूंत स्वतःबद्दल विश्वास आणि धैर्य उत्पन्न होणें अशक्य झाल्यावर फार उशीरानें हें धोरण अस्तित्वांत आलें?

हिंदुस्थानांतील हल्लीच्या स्थितीवरून हे प्रश्न वारंवार व साहजिकपणें सुचतात. पण पुढें उद्भवण्यासारखे सर्व प्रश्न वरील प्रश्नांत अंतर्भूत होतात असें मात्र नाहीं. हिंदुस्थानांतील तीव्र अस्वस्थता देखील हिंदी लोकांच्या राजकीय आकांक्षांचें एक स्वरूप आहे; ब्रिटिश सत्तेखालींच या आकांक्षा पूर्ण व्हावयाच्या आहेत; मात्र हल्लीच्या राज्यव्यवस्थेंतच आपणांस अधिक वाटा मिळावा असें ह्मणणाऱ्यांपासून तें इग्लंड व हिंदुस्थान यांच्या

संबंधांत समूळ बदल झाला पाहिजे असें ह्मणणाऱ्यांपर्यंत लोकांचे निरनिराळे वर्ग आहेत; आणि त्या सर्वांचें मागणें राजकीय स्वरूपाचेंच असल्यामुळें, केवळ राजकीय स्वरूपाचे हक्क दिल्यानें त्या मागणीचें समाधान होणार आहे; असें वरील प्रश्न करणाऱ्यांच्या मतें निश्चित असतें. परंतु त्यांच्याकडून महत्वाच्या सामाजिक धार्मिक आणि सांपत्तिक बाबींचा विचार केला जात नाहीं असें मला वाटतें. या बाबी वरील राजकीय प्रश्नास विशेष स्वरूप देण्याइतक्या, किंबहुना त्यास मागें सारण्याइतक्या महत्वाच्या आहेत. ह्मणून मी जो प्रश्न विचारासाठीं घेत आहें तो असा आहे कीं, कितीही चांगल्या हेतूनें चालविलें तरी जें परकी राज्य केंव्हा केंव्हा उग्र आणि जुलमी वाटणारच त्यापासून मुक्त होण्याची लोकांची स्वाभाविक इच्छा हीच या अस्वस्थतेचें कारण आहे किंवा त्या अस्वस्थतेच्या चळवळींतील निदान जहाल मंडळीस ब्रिटिश राज्यांतच नव्हें तर पाश्चात्य संस्कृतींत अंतर्भूत होणाऱ्या प्रत्येक गोष्टीबद्दल बेसुमार तिटकारा वाटूं लागल्यामुळें ही अस्वस्थता उत्पन्न झाली?

आह्मींच सुरूं केलेल्या शिक्षणपद्धतींतील शोचनीय दोष या अस्वस्थतेस किती अंशानें कारण आहेत हें ठरविण्याच्या भरीस मीं आतांच पडत नाहीं. त्या शिक्षणाची कांहीं चांगलीं फळेंही दृष्टीस पडतात हें कोणी नाकबूल करणार नाहीं. पण या शिक्षणापासूनच एका बाजूनें अर्धेकच्चे शिकलेले आणि ज्यांस धंदा मिळत नाहीं व मिळणें शक्यही नाहीं असे बाजारबुणगे उत्पन्न होत आहेत व दुसऱ्या बाजूनें, त्यांहून जास्त शिकलेले व पाश्चात्य कल्पनांचा पगडा ज्यांच्यावर बसल्यासारखा दिसतो पण त्याच मानानें हिंदी लोकांच्या परस्थितीची माहिती विसरलेले

लोक निर्माण होत आहेत, हें नाकबूल करण्याइतकें अज्ञानहि क्वचितच असलें पाहिजे. अस्वस्थतेच्या इतर अनेक कारणांचा विचार मला तूर्त तहकूब ठेवावयाचा आहे. त्यांपैकीं कांहीं सांपत्तिक आहेत; उदाहरणार्थ, गेल्या दहा वर्षांतील पदार्थांच्या किंमतीची विलक्षण वाढ हें एक कारण आहे. मध्यम स्थितींतील लोकांच्या रहाटीचा खर्च फार वाढला आहे आणि याच वर्गांत तर राजद्रोहाचा जास्त प्रसार झाला आहे. याच दहा वर्षांत हमाल आणि कारागीर यांच्या मजुरीचे दर महागाईच्या मानानें वाढले आहेत; पण कारकून, पंतोजी व सरकारी हलक्या दर्जाचे नोकर यांचे पगार कायमच असल्यामुळें, त्यांना मात्र आपली स्थिती मजूरांच्या तुलनेनें, कधीं कधींतर वस्तुतःच, जास्त निकृष्ट झाली आहे असें वाटत आहे. प्लेगमुळें गेल्या १४ वर्षांत ६० लक्ष लोक मृत्युमुखीं पडले. याच अवधींत दोन भंयकर दुष्काळ पडून हिंदुस्थानच्या अनेक भागांत लोकांचे वर्णनापलीकडे हाल झाले. जेथें व्यापार व धंदे वाढले आणि लोक व्यापारांत जास्त लक्ष घालूं लागले तेथें इंग्रज सरकारांनीं हिंदी व्यापारावर बसविलेल्या जकातीबद्दल त्वेष वाटूं लागला आहे. या जकाती ब्रिटिश कारखाने व व्यापार यांच्या लाभाच्या स्वार्थी हेतूनें बसविण्यांत आल्या आहेत असें हिंदी लोकांचें ह्मणणें आहे. दक्षिण आफ्रिकेंत हिंदी लोकांवर होत असलेल्या जुलमामुळें, आणि एकंदरीत इंग्रजांच्या वसाहतींत आशियांतील लोकांशीं जें वर्तन आढळतें त्यामुळें, हिंदी लोकांना पुष्कळ राग येत आहे. हिंदी व इंग्रज लोक यांचें सामाजिक संबंध ह्मणजे केंव्हाही एक बिकट व नाजुक प्रश्नच आहे. पण अलीकडे आगगाड्या व तारायंत्रें यांच्या सोयीसाठीं खालच्या दर्जाचे

पण वाकबगार साहेब नेमावे लागल्यामुळें, त्यांच्या संबंधानें या प्रश्नास जास्तच बिकट रूप आलें आहे. तसेंच, हपीसांतील कामाचा वाढता बोजा, विलायतेस वारंवार जाण्याची अलीकडे झालेली सोय व इंग्रजी कामदारांच्या वरचेवर होणाऱ्या बदल्या, यामुळें इंग्रजी अंमलदार व नेटिव लोक यांच्यांतील दळणवळण अंशतः कमी झालें आहे. याहून बऱ्याच अंशीं अप्रत्यक्ष असलेल्या अस्वस्थतेच्या कारणांत ट्रान्सव्हालशीं झालेलें युद्ध येथें नमूद करणें पुरें आहे. या युद्धामुळें इंग्रजी सैन्याची इभ्रत कमी झाली. रशियाचा जपाननें पराभव केल्यामुळें युरोपच्या वर्चस्वाचा नाश होण्यास सुरवात झाली, असा समज उत्पन्न झाला. त्याच्याही पूर्वीं अबिसिनियांत इटलीच्या सैन्याचा जो मोड झाला त्यानें हिंदी लोकांच्या मनावर घडलेल्या परिणामांचा मि. शरत्कुमार घोष यांनीं "नशीबाचा राजा" या कादंबरींत उल्लेख केला आहे, हेंही येथें सांगणें इष्ट आहे. या सर्व मुद्यांचा विचार झाला पाहिजे; कारण ते सर्व आपापल्या परीनें महत्वाचे आहेत. या मुद्यांपासून निष्पन्न होणाऱ्या प्रश्नांचा ज्या रीतीनें इंग्रज लोक निर्णय करितील, त्यावर हिंदी अस्वस्थतेच्या प्रश्नाचा उलगडा अवलंबून आहे. ज्या वर्गांत ही अस्वस्थता पसरली नाहीं, त्या वर्गाचा अस्वस्थतेच्या कारणांपासून बचाव करण्यांत इंग्रजांना यश मिळणार किंवा नाहीं, हें यावरूनच ठरणार आहे. परंतु हिंदी अस्वस्थतेचें अगदीं मूळ दुसऱ्याच ठिकाणीं सांपडणार आहे.

अस्वस्थतेच्या स्वरूपाबद्दल इंग्लडांत दोन गैरसमज आढळून येतात. तीव्र आणि उघड स्वरूपाचा असंतोष अलीकडेच दिसत आहे, हा पहिला गैरसमज होय. इंग्रजांनींच दिलेल्या शिक्षणामुळें पाश्चात्त्यांच्या प्रजासत्ताक राज्यपद्धतीचा हिंदी लोकांस

लोभ सुटून त्यामुळेंच ही अस्वस्थता जन्म पावली आहे; फक्त ती वाजवीपेक्षां लौकर निपजली व तिला चुकीचें वळण लागलें आहे एवढेंच काय तें; हा दुसरा गैरसमज होय. या दोनही गैरसमजांची उत्पत्ती कशी झाली, याची मीमांसा कांहीं कठीण नाहीं. इंग्लिश राष्ट्राला मागच्या गोष्टींचें स्मरण फार काळ रहात नाहीं. बंगाल प्रांतांतील उच्छृंखळपणाच्या चळवळी आणि वर्तमानपत्रांतील कल्पनेपलीकडचे कडक लेख आणि त्यांच्या मागोमाग घडलेले भयंकर व भ्याडपणाचे गुन्हे, यांमुळें जेव्हां ब्रिटिश लोक एकदाचे खडबडून उठले त्या वेळची त्यांची स्थिती झोंपलेल्या लोकांसारखी होती. ५७ च्या घोर बंडानंतर शांतता व कायदा यांचा भंग झाला नाहीं, असें इंग्लंडांतील बहुतेक लोकांस वाटत असे. आणि ज्या अर्थी अशा अचानक रीतीनें व कठोरपणानें इंग्लिश सत्तेला धक्का मिळाला, त्या अर्थी त्याचें कारणहि, एखाद्या नवीन कल्पनेची हिंदुस्थानावर आलेली लाट अथवा एखादी मोठीशी सरकारी कामाची चूक, हेंच असलें पाहिजे, आणि याच्याच योगानें राज्यकर्ते व प्रजाजन यांच्या प्रेमसंबंधास बाध आला असला पाहिजे, असें त्यांनीं गडबडीनें अनुमान काढिलें. वेगवेगळ्या स्वरूपाचा व कमजास्त जोराचा असंतोष हिंदुस्थानांतील कित्येक वर्गांत नेहेमींच आहे व तो हिंदुस्थानच्या हल्लीच्या राजकीय परिस्थितींत सर्वस्वी नाहींसा होणें शक्यच नाहीं, हें लोकांच्या लक्षांत नव्हतें. ब्रिटिश मुत्सद्यांनीं या असंतोषाच्या अस्तित्वाकडे सदोदीत लक्ष ठेविलें होतें कीं नाहीं, हा प्रश्न वेगळा आहे. उदाहरणार्थ, तीसापेक्षां जास्त वर्षांमागें, यंदाचा वर्तमानपत्रांचा कायदा ज्या कारणांमुळें केला त्याच कारणामुळें, देशी भाषांतील वर्तमानपत्रांच्या बेसुमार

हल्ल्यांचा बंदोबस्त करण्यासाठीं हिंदुस्थान सरकारनें एक कायदा केला होता; तसेंच बरोबर तेरा वर्षांमागें ( १८९७ सालीं ) ज्याप्रमाणें अलीकडे अनेक लायख गृहस्थांचे खून झाले त्याचप्रमाणें, दोन ब्रिटिश अधिकाऱ्यांचे ( पुणें येथें ) वर्तमानपत्रांतील लेखामुळें प्रोत्साहन मिळालेल्या कटवाल्याकडून खून करण्यांत आले होते.

हिंदुस्थानांतील अस्वस्थता अकस्मात उत्पन्न झाली, कारण तिचें हलींचें दृश्य रूप नवीन आणि आश्चर्यजनक आहे; असें समजणें हा एक घातुक भ्रम आहे. तसेंच, कधींकधीं आणि राजकारणाच्या सोयीसाठीं राजद्रोही लोक पाश्चात्य लोकनायकांच्या भाषेंत बोलतात, एवढ्यावरून, त्यांचा असंतोष पाश्चात्त्य शिक्षणाचा परिणाम आहे, अथवा पाश्चात्त्य प्रजासत्ताक कल्पनांचा तो एक प्रतिध्वनी आहे, असें मानणें हें देखील कमी गैरसमजुतीचें नाहीं. या असंतोषाचें दिखाऊ स्वरूप कोणतेंही असो, पाश्चात्त्य आणि विशेषतः इंग्लंडसारख्या प्रजासत्ताक देशांतील समाजव्यवस्था ज्या तत्त्वांवर स्थापन झाली आहे, त्या तत्त्वांशीं असलेला कित्येक वर्गांचा दृढमूल द्वेष हाच त्या असंतोषाचा मूळ झरा आहे. या द्वेषाची होत असलेली वाढ ही या असंतोषाचें अतिशय ठळक अंग आहे, व त्यांतूनच सर्वांत मोठें संकट उत्पन्न होणार आहे.

‘ बंदोबस्त बहोत अच्छा है ’ असें ह्मणणाऱ्या अधिकारी वर्गाकडून कबूल करण्यांत येत आहे त्यापेक्षां या संकटाचें स्वरूप जास्त घोटाळ्याचें व काळजी उत्पन्न करण्यासारखें आहे, असें जरी मला वाटतें, तरी निराश होण्याचें कांहीं कारण मला दिसत नाहीं. मात्र, अद्यापहि हिंदुस्थानांत इंग्लिशसत्तेचा पाया

किती बळकट आहे, हें ओळखून शहाणपणानें व सहानुभूतीनें पण निश्चयपूर्वक व सुसंगतरीतीनें, त्या बलाचा राज्यकर्त्यांनीं उपयोग करून घेतला पाहिजे. असंतोषाचे विशेष भयंकर प्रकार वस्तुतः हिंदुलोकांबाहेर गेले नाहींत, आणि प्रचंड हिंदुसमाजांतही संख्येच्या मानानें अगदीं लहान असलेल्या वर्गांतच ते प्रकार आढळतात, हें प्रथमच नमूद करणें जरूर आहे. गेल्या थोड्या वर्षांतील राजकीय कटांत एकही मुसलमान सामील झाल्याचें दिसलें नाहीं; मात्र त्या कटांना कांहीं मुसलमान बळीच पडले आहेत. महत्वाचा असा एकहि मुसलमान राजद्रोही चळवळ्यांच्या वर्गांत सांपडलेला नाहीं. पूर्वींच्या कोणत्याही वेळेपक्षां हल्लीं अधिक पूर्णपणानें मुसलमानांनीं आपले हितसंबंध व आपल्या आकांक्षा ब्रिटिश सत्तेच्या चिरस्थायित्वाशीं आणि बळकटीशीं एकरूप केल्या आहेत. ‘ हिंदुस्थानांतील असंतोष ’ असा शब्दप्रयोग करणें देखील चूकच आहे. त्यामुळें हिंदुसमाजांतील जो एक अतिशय मोठा भाग अद्याप राजद्रोहाच्या संसर्गापासून दूर आहे त्याच्याविषयीं अगदीं अन्यायानें बोलल्याचा दोष येतो, हें कबूल करूनहि या असंतोषास ‘ हिंदु असंतोष ’ हें नांव देणें अधिक सयुक्तिक होईल, असें मला वाटतें. कारण या शद्बांनीं त्या असंतोषाच्या अंतस्थ कारणांचा बरोबर बोध होण्यासारखा आहे. राजद्रोहाचा स्पर्श न झालेल्या व या शद्बयोजनेनें ज्यांच्याविषयीं अन्याय होईल, अशा हिंदुसमाजाच्या मोठ्या भागांत बहुतेक राजेरजवाडे आणि पिढीजाद जमीनदार यांचा समावेश होतो; त्याचप्रमाणें हिंदी लोकांत ज्यांची संख्या सर्वांपेक्षां मोठी आहे तो शेतकरी वर्ग याच राजनिष्ठ भागांत मोडतो. कांहीं थोडे अपवादभूत प्रकार वजा केले म्हणजे बाकी बहुतेक राजकीय

अत्याचार हिंदुस्थानच्या तीन भागांतच घडून आले आहेत; देशाचे इतर विस्तृत भाग असंतोषापासून पूर्णपणें मुक्त आहेत. हे तीन भाग ह्मणजे मुंबईइलाख्याचा बराच हिसा व मध्यप्रांतांतील कांहीं जिल्हे यांनीं बनलेला महाराष्ट्र देश, पूर्वबंगालच्या नव्या प्रांतासह बंगालदेश आणि पंजाब, हेच होत. यांतही असंतोष पिकविणाऱ्या भट्ट्या काय त्या मोठमोठ्या शहरांतच आहेत. त्यांचें खेडुत्यावर वजन बरेंच असलें तरी, हिंदुस्थानांतील शहरांत किंबहुना ५ हजारांहून जास्त वस्तीच्या गांवांत राहणाऱ्यांचें एकंदर वस्तीशीं प्रमाण एक दशांशसुद्धां नाहीं, हें विसरतां कामा नये. इंग्लंडची एक तृतीयांश वस्ती एक लक्षाहून जास्त वस्तीच्या शहरांत राहिली असून, हिंदुस्थानच्या ३० कोटींपैकीं ७० लक्ष लोकच काय ते इतक्या मोठ्या वस्तीच्या २८ शहरांत रहात आहेत.

हिंदुस्थान ह्मणजे अनेक वर्ण आणि जाति यांचा एक विचित्र समुदाय आहे आणि त्यामुळें ‘ राष्ट्र ’ हा शब्द ‘ हिंदुस्थान ’ या शब्दाचा अगदीं विरोधी भाव दाखविणारा आहे, ही गोष्ट बाजूला ठेविली तरी, हिंदुस्थानच्या लोकवस्तीच्या एक अल्पांशांतच पसरलेल्या चळवळीस ‘ राष्ट्रीय ’ चळवळ ह्मणवून घेण्याचा कांहीं अधिकार नाहीं, हें निर्विवाद आहे. परंतु त्या चळवळीच्या बुडाशीं असलेल्या शक्तीचें महत्व कमी लेखणें, हेंही फार मूर्खपणाचें आहे, कारण त्या शक्ती एकवटणारें आणि जिव्हाळ्याचें एक बंधन त्या चळवळीच्या मुळाशीं आहे. त्या शक्ती ह्मणजे हिंदुधर्माच्या प्रबळ शक्तीच होत. मनुष्यजातीच्या इतिहासांत ज्यापेक्षां जास्त कसदार व स्थिर अशी सामाजिक व धार्मिक व्यवस्था कोठेंही आढळत नाहीं अशा व्यवस्थेस मूलभूत अशा त्या

शक्ती आहेत. कोणत्याही सामाजिक वर्गभेदाहून अधिक कडक अशा जातिभेदाच्या पायावर रचिलेल्या या समाजव्यवस्थेमुळें, गेल्या तीन हजार वर्षांत, वरिष्ठ जातींना आणि विशेषतः सर्वांत उच्च अशा ब्राह्मणांना सर्व जगांत अपूर्व असें सामाजिक वर्चस्व प्राप्त झालेलें आहे. तसेंच, जरी या वरिष्ठ जातींनीं हिंदुधर्मावर कडकपणानें अमल चालविला आहे तरी, त्यांनीं स्वतःपुर्ता पुरेसा सौम्यपणा व चिकाटी धारण करून, पूर्वार्जित थोरपणास आणि महत्वाकांक्षांस बाध न आणितां, बदलणाऱ्या परिस्थितीशीं स्वतःचें बस्तान विलक्षण यशस्वीपणानें त्यांनीं जुळवून घेतलें आहे. ह्मणूनच या वरिष्ठ प्रतीच्या हिंदूंतच इंग्रजी शिक्षणाचा गेल्या ७५ वर्षांत फैलाव झाला व त्यांनींच त्याचा आनंदानें स्वीकार केला; सरकारच्या प्रत्येक खात्यांतील एतद्देशीय नोकरांत बहुतेक याच जातींचा भरणा झाला आहे; ज्यांच्या हातीं लोकमत आणि तरुण पिढीच्या मनोवृत्ती तयार करून त्यास मार्ग दाखविण्याची सत्ता असते अशीं वर्तमानपत्रें, शाळा वगैरे साधनें ज्यांच्या हातीं आहेत, ते पांढरपेशे वर्ग याच जातींनीं व्यापिले आहेत. याच वर्गामध्यें ब्रिटिश सत्तेच्या वर्चस्वाविरुद्ध बंड करण्याची प्रवृत्ति सर्वांशीं आढळतें, हीच गोष्ट हिंदुस्तानांतील अस्वस्थतेसंबंधानें महत्वाची आणि विचार करण्याजोगी आहे.

## भाग २ रा.

# वर्तमानपत्रें व वक्ते यांचें स्वराज्य.

हिंदुस्थानांतील अस्वस्थतेस कोणत्या मार्गांनीं उत्तेजित करण्यांत आलें आहे, व त्या अस्वस्थतेच्या प्रवर्तकांचे मानसिक विचार काय आहेत हें सांगण्यापूर्वीं त्या अस्वस्थतेच्या चळवळीचें राजकीय ध्येय कोणतें आहे हें सांगणें इष्ट आहे. हें सांगण्यास एक मोठी अडचण ही आहे कीं, हिंदी मुत्सद्यांचीं भाषणें अतिशय संदिग्ध शद्बांत केलेलीं असतात. तथापि त्यांचा एक मोठा भाग आपले राजकीय हेतु अथवा ते साध्य करण्याचे उपाय लपवीत नाहीं हें कबूल केलें पाहिजे. त्यांचीं मतें उघडउघड क्रांतिपक्षाचीं आहेत. शक्य होईल तेव्हां बंड करून व तोंपर्यंत खून, डायनामाईटचे अपघात, दरवडे व चोंहोकडच्या अराजकांना प्रिय असलेल्या इतर भीतिजनक उपायांनीं, कार्य करून घ्यावें, असें ते प्रतिपादन करितात. परंतु हा भाग फारसा मोठा नाहीं, आणि तरुण लोकांच्या कोंवळ्या मनास मोह पाडण्याची जी त्यांत घातुक शक्ति आहे, ती सोडून दिली असतां, या पक्षाचें तितकें भयहि नाहीं. परंतु दुसरा एक पुष्कळच मोठा 'जहाल' पक्ष असून, त्याचें ब्रिटिश राज्याशीं पराकाष्ठेचें वैर आहे; परंतु स्वहिताच्या दीर्घदृष्टीनें किंवा 'नेमस्त' पक्षास अवेळीं भिववून त्याची सहानुभूति गमावण्याच्या भयानें तो पूर्ण स्वातंत्र्य उघडपणें मागण्यास कचरतो. राजकीय गुन्ह्यांचा ह्या पक्षांचे लोक निषेध करितात; पण ते गुन्हे होण्यास योग्य वातावरण उत्पन्न करण्याला ते मदत करितात. खरी अडचण या पक्षापासून आहे.

ही अडचण आणखी मोठी वाटण्याचें कारण असें आहे कीं, देशांत स्वस्थता व सुव्यवस्था राखणें व परशत्रूंपासून लोकांचें संरक्षण करणें, ह्या गोष्टी इंग्रजी राज्याखेरिज संभवनीय नाहींत. ह्मणून, हिंदुस्थानास पूर्ण स्वातंत्र्य मिळून वरील गोष्टी त्याच्या त्याला करितां येतील, ही गोष्ट घडून येण्यास किती काळ लागेल ह्याची गणति सुद्धां करितां येत नाहीं. वास्तविक 'नेमस्त' पक्षाची अशी पक्की समजूत आहे. परंतु ह्या गोष्टीची कबुली एकदांच कायमपणें देऊन टाकून, आपल्या 'जहाल' मतांच्या देशबांधवांपासून राजकीय बाबतींत फारकत करून घेण्यास 'नेमस्त' पक्षाची तयारी नाहीं. ह्याचा परिणाम असा झाला आहे कीं, हिंदुस्थानास अमुक राजकीय हक्क इतक्या काळांत व अशा रीतीनें मिळाले पाहिजेत असें स्पष्टपणानें न ह्मणतां, ह्या सर्व गोष्टींत संदिग्धता ठेवून, उभयपक्षांस मान्य आहे अशी एखादी मागणी आपल्या राजकीय ध्येयांत समाविष्ट करून, ज्याप्रमाणें प्रत्येक पक्षाच्या आकांक्षा व उद्देश असतील, त्याप्रमाणें अमुक काळांत व अमक्या तऱ्हेनें ती गोष्ट साध्य झाली पाहिजे, असें आपापल्या सोईप्रमाणें ह्मणतां यावें, अशी दोन्ही बाजूची इच्छा दिसते. 'स्वराज्य' ह्या शद्बानें दोनहि पक्षांस ही इष्ट गोष्ट प्राप्त झाली आहे, असें दिसतें. ह्या शद्बाचा सौम्य अर्थ 'वसाहतींतील स्वराज्य' असा करितां येत असल्यामुळें, हिंदुस्थानचें 'एक राष्ट्र' बनवूं पाहणाऱ्या लोकांच्या राजकीय आकांक्षाबद्दल इंग्रज लोकांना भीति वाटेनाशी होते, हा 'स्वराज्य' शब्दाचा आणखी एक फायदा आहे. विशेषतः, आंत खोल दृष्टि न घालतां वरच्यावर पाहून, समाधानपावणाऱ्या किंवा 'उदार' पक्षाच्या विकारवश सभासदांना प्रिय असलेल्या नुसत्या पोकळ

शब्दांनीं फसून जाणाऱ्या इंग्रज लोकांची सहानुभूति हिंदी राष्ट्रीय पक्षास मिळत असते. निदान ' स्वराज्य ' अथवा ' वसाहतींतील ' लोकांना असलेलें राजकीय स्वांतत्र्य मिळाल्यानें ' राष्ट्रीय ' पक्षाचें समाधान होईल, असें सांगण्यांत येत असतें. ह्मणून, वरील पक्षाच्या मताप्रमाणें ह्या शद्बांचा बरोबर काय अर्थ आहे, हें पाहिलें पाहिजे. सुदैवानें, ह्या गोष्टीचा शहानिशा करण्यास आमच्यापाशीं कांहीं निर्विवाद माहिती आहे, ती एका ' जहाल ' पुढाऱ्याच्या भाषणांतून मिळविली आहे. ह्या गृहस्थाचा ' क्रांतिवादी ' पक्षांत समावेश होत नाहीं, तरी १९०७ सालीं त्यांचा संबंध असलेल्या एका राजद्रोही पत्रावरील फौजदारी खटल्यांत साक्ष देण्याचें नाकारिल्यावरून ते फौजदारी कायद्याच्या तडाक्यांत आले होते. मि० बिपिनचंद्र पाल हे उच्च वर्णाचे हिंदु असून, त्यांची बुद्धिमत्ता व सदाचरण वाखाणण्यासारखें आहे. त्यांस पाश्चात्य पद्धतीचें शिक्षण मिळालें आहे इतकेंच नाहीं, तर यूरोप व अमेरिका खंडांत त्यांनीं पुष्कळ प्रवास केला असून, कलकत्त्यास असतांना आपण आपल्या घरीं ( देशांत ) आहों असें त्यांना वाटतें, तसेंच बहुतेक लंडन शहरांतहि वाटतें. तीन चार वर्षांपूर्वीं ' नूतन उत्साह ' ह्या विषयावर मद्रास इलाख्यांत त्यांनीं व्याख्यानें दिलीं असून, त्याच्या आवृत्त्यांवर आवृत्त्या निघाल्या आहेत. ह्या व्याख्यानांत ' जहालपक्षाच्या ' मतांचें अत्यंत अधिकारयुक्त वाणीनें प्रतिपादन झालें आहे, असें मानतां येईल. ह्या व्याख्यानांतील मध्यवर्ती मुख्य कल्पना, ' नेमस्त ' पक्षाचे वयोवृद्ध व ज्ञानवृद्ध पुढारी दादाभाई नवरोजी शेट ह्यांनीं कलकत्त्याच्या राष्ट्रीय सभेंत अध्यक्ष नात्यानें जें भाषण केलें होतें, त्यांतूनच बिपिन-

बाबूंनीं घेतली होती. ह्या गोष्टीमुळें वरील व्याख्यानास विशेष प्रकारचें महत्त्व येतें. ग्रेटब्रिटन व आयर्लंडमध्यें किंवा इंग्रज लोकांच्या वसाहतींमध्यें, ज्याप्रकारचें 'स्वराज्य' आहे, त्याप्रकारचें 'स्वराज्य' हिंदुस्थानास मिळणें ह्मणजे त्याला सर्व राजकीय हक्क मिळणें, असें दादाभाईशेटनीं ह्मटलें होतें. किती 'स्वराज्य'—ह्मणजे 'राजकीय स्वातंत्र्य'— दंगाधोपा न करितां शांततेच्या उपायांनीं मिळवितां येईल व त्याचा शेवट कसा होईल, ह्या गोष्टीची बरोबर कल्पना आणून देण्याचें काम बिपिनबाबूशिवाय कोणीं केलें नाहीं. सांप्रत हिंदुस्थानाला इंग्लंडच्या तंत्रानें वागावें लागतें. अशा प्रकारच्या परतंत्रतेंत हिंदुस्थानाला राजकीय हक्क मिळत जाऊन शेवटीं 'स्वराज्याची' प्राप्ति होईल, असें मानणें हा केवळ भ्रम आहे, अशी बिपिनबाबूंनीं आपल्या व्याख्यानाची प्रस्तावना केली. हिंदुस्थानच्या कायदेकाउन्सिलांची सुधारणा करून, जे नवीन हक्क इंग्लंडनें त्याला दिले आहेत, त्यांबद्दल 'जहालपक्षा'स आनंद न होतां, उलट तिरस्कार वाटेल, ह्या गोष्टीचें स्वप्न पूर्वींच पडलें होतें. व तें मि. बिपिनचंद्र पालाच्या उद्गारांवरूनच होतें. हे उद्गार असेः—

तुह्मांला कोठें एखादी हायकोर्ट जज्जाची जागा मिळेल, तर कोठें कायदे करणाऱ्या काउन्सिलची सभासदी मिळेल; कदाचित् गव्हरनराची किंवा गव्हरनरजनरलाची काउन्सिलदारी मिळेल. कां तुह्मांला कायदेकाउन्सिलांची वाढ होऊन अधिक जागा मिळावयास पाहिजेत? कां 'हाऊस आफ कामन्स' मध्यें तुमच्या वतीनें कांहीं थोडे हिंदी लोक सभासद असावयास पाहिजेत? किंवा वरिष्ठ प्रतीच्या सनदी नोकरींत पुष्कळ हिंदी लोकांचा समावेश व्हावा असें तुह्मांस वाटतें? समजा, ५०, १००, २०० किंवा ३०० हिंदीलोक वरील नोकरींत शिरले; पण त्यामुळें तें आपलें राज्य होईल काय?... ... .. ... ... सनदी नोकर सर्व हिंदी झाले तरी त्यांना हुकुमांची अम्मलबजावणीच करीत

राहिलें पाहिजे. राजधोरण ठरविणें किंवा त्याला वळण देणें हें काम त्यांच्या हातीं नसणार. पावसाची एखादी सर आली ह्मणून पावसाळा लागला, असें ह्मणतां येणार नाहीं. इंग्रजसरकारच्या राज्यांत एक, १०० अथवा १००० सिविलियन झाले, तरी राज्य आमचें होणार नाहीं. राज्यव्यवस्था पूर्वापार चालत आलेली असते; तिचे ठराविक कायदेकानू असतात, राज्यकारभाराचीं धोरणें असतात. ह्मणून, प्रत्येक सनदी नोकरास– मग तो गोरा असो वा काळा असो, ह्या सर्व गोष्टी हुकमाप्रमाणें मुकाट्यानें कराव्या लागतात. अतएव, जोंपर्यंत राज्यव्यवस्थेंतील परंपरा मोडली नाहीं, कायदेकानू बदलले नाहींत, राजधोरणें सर्वस्वी पालटलीं नाहींत, तोंपर्यंत, युरोपिअन लोकांच्या ऐवजीं हिंदी लोक आले ह्मणून ह्या देशांत 'स्वराज्य झालें' असें कदापिहि ह्मणतां येणार नाहीं.

आतां हें 'स्वराज्य' इंग्रजसरकारापासून मिळावयाचें नाहीं, व तें देऊं लागल्यास घ्यावयाचेंहि नाहीं, असें बिपिनबाबूंचें मत आहे:—

सरकार आज मजकडें आलें, व ' हें स्वराज्य घ्या, ' असें ह्मणूं लागलें, तर मी ह्मणेन कीं, आपल्या औदार्याबद्दल मी आभारी आहें. परंतु जें मला मनगटाच्या जोरावर मिळवितां येत नाहीं, तें मला नको आहे... ... ... ... आम्ही देशांत चळवळी करूं; लोकांची साधनसामग्री एकत्र करूं; राष्ट्राच्या सामर्थ्यास व्यवस्थित रूप देऊं; व समाजाची स्वातंत्र्यप्रीति वृद्धिंगत करूं. आणि मग ह्या सर्व गोष्टींचा असा परिणाम होईल कीं, जें कोणी राष्ट्र आमच्याशीं विरोध करूं पाहील, त्याला दांतीं तृण धरून आम्हांस शरण येणें भागच पडेल. अशी आमच्या कामाची दिशा आहे, हें लक्ष्यांत ठेवा.

स्वराज्याची प्राप्ति ' झालीच पाहिजे ' ह्मणून कोणते मार्ग स्वीकारावयाचे, ह्या बद्दलचे पालबाबूंचे विचार त्यांनीं इतक्याच स्पष्टपणानें सांगितले आहेत. सांपत्तिक बाबतींतील त्यांचा मार्ग ह्मटला ह्मणजे, ' स्वदेशीव्रत ' पतकरून– ह्मणजे देशी उद्योगधंद्यांस उत्तेजन देऊन– परदेशी मालावर बहिष्कार घातला, ह्मणजे विलायतेचा व्यापार बुडवून टाकितां येईल; आणि राजकीय बाबतींतील उपाय ह्मणजे, सरकारी नोकरीस बहिष्कार घालून निःशस्त्र प्रतिकाराची कांस धरावयाची.

लोक विचारतात कीं, तुह्माला सरकारच्या यच्चयावत् नोकरीवर बहिष्कार घालतां येईल काय? पण आह्मी ह्मणतों, असें करावयाचें आहे कोणास? सरकारची अथवा येथील युरोपिअनांची नोकरी करण्यास एकहि हिंदी मनुष्य मिळणार नाहीं, असें ह्मणतो कोण? नोकरी करण्यास अगदीं माणसें न मिळूं देणें ही गोष्ट अशक्य असली, तरी देशाचा राज्यकारभार चालविणें अशक्य करण्याचें सामर्थ्य आमच्या आंगीं आहे. राज्यकारभारास अडथळा आणण्याचे अनेक मार्ग आहेत. सर्व दुय्यम प्रतीच्या माजिस्ट्रेटांनीं नोकरी करीत नाहीं, असें ह्मणण्याची आवश्यकता नाहीं. एकानें राजीनामा दिला तर त्याच्या जागेवर दुसरा येणार नाहीं, असा प्रकार मुळींच नाहीं. पण देशामध्यें बहिष्काराचें तत्व लोकांच्या मनावर पूर्णपणें बिंबलें, ह्मणजे सरकारी कचेऱ्यांतहि त्याचा प्रसार हळूं हळूं होईल; आणि मग सबंद कचेरीची कचेरी हरताळ पाडूं लागेल. अशा प्रकारानें राज्यकारभार अजीबात बंद पडेल, असें नाहीं; पण त्यांत अनंत घोंटाळे उत्पन्न होतील; आणि असे घोंटाळे सर्व ठिकाणीं माजूं लागले, ह्मणजे राज्यकारभार खोळंबून राहील: पुढें चालवितां येणार नाहीं. अर्थात् राज्यकारभार चालविणें अशक्य झालें आहे, असें ह्मणावें लागेल. कारण, सरकारची इज्जत ही मुख्य गोष्ट आहे; व बहिष्काररूपी कुठारानें तिचें मूळच छेदून जाईल. ... ... ... सरकारी नोकरींतील प्रत्येक हिंदी गृहस्थास नागरिकत्वाच्या पदापासून आह्मी भ्रष्ट करूं शकूं, ह्मणजे लोकांनीं त्याच्याशीं सहवास करूं नये व त्याला पतित समजावा, अशी व्यवस्था आह्मांस करितां येईल ... ... ... ... ... ... डाक्टर, मुनसफ, मामलेदार, शिरस्तेदार ह्मणून कोणास समाजांत मान मिळणार नाहीं. ... ... ... ... आपल्या घरीं येणाराचें आगत स्वागत केलेंच पाहिजे, असा कांहीं कायदा नाहीं, किंवा तसा कायदा करितांहि येणार नाहीं. एखाद्या हिंगजिरें विकणाऱ्या दुकानदारास 'या बसा' ह्मणून जसें आपण ह्मणूं, तसें मामलेदाराला किंवा मुनसफाला ह्मणण्याचें कारण नाहीं. आपली मुलगी एखाद्या भिकाऱ्याला देईन, पण मामलेदाराच्या मुलाला देणार नाहीं, असें म्हणणें कायदेशीर आहे; व त्याबद्दल कोणी कोणास प्रतिबंध करूं शकत नाहीं.

निःशस्त्र प्रतिकार कायदेशीर आहे, असें विलायतेंत समजतात. तत्वतः तो ह्या देशांतहि कायदेशीर आहे; व हा मार्ग गैरकायदा आहे असें सरकार पुढें ठरवील, तर ती गोष्ट मनुष्यप्राण्याच्या स्वभावसिद्ध हक्कास बाध आणणारी आहे,

असें समजलें जाईल. आणि त्याचा परिणामहि भयंकर झाल्यावांचून राहणार नाहीं. ‘स्वराज्य’ प्राप्त करून घेण्याकरितां, कांहीं गोष्टी आपण करितां कामा नये; व हा उद्देश बहिष्कारमात्रच्या उपयोगानें साधारण आहे, असें मला वाटतें. तसेंच, स्वराज्यासाठीं कांहीं गोष्टी केल्याच पाहिजेत. असें न केलें, तर बहिष्काराची फलप्राप्ति जें ‘स्वराज्य’ त्याचा लाभ होणार नाहीं. खेडीं, तालुके व जिल्हे, यांना व्यवस्थित रूप दिलें, तर स्वराज्य प्राप्त करून घेणारास ज्या प्रकारचें शिक्षण मिळालें पाहिजे, तसें आपणांस मिळेल. सार्वजनिक कामें करण्यासाठीं लागणाऱ्या संस्थारूपी यंत्रें उभीं करून, तीं हल्लींच्या सरकारी कारभाराच्या यंत्रांच्या बरोबरीनें, परंतु त्यांपासून अगदीं स्वतंत्र रीतीनें, चालविणें, ही आपल्या कामाची दिशा असूं द्या... ... ... ... ... ... ... परमेश्वरी इच्छा असेल तर मग आम्हांस पुष्कळ गोष्टींवर स्वामित्व प्राप्त होईल. असा आमचा कार्यक्रम आहे.

आतां, हा कार्यभाग यशस्वी झाला, तरी ज्या प्रकारच्या पूर्ण ‘स्वराज्याची’ त्यांना अपेक्षा आहे तसें ‘स्वराज्य’ प्राप्त होण्यास, हिंदुस्थानचा इंग्लंडशीं असलेला सध्यांचा संबंध मुळांतच आडकाठी आणणारा आहे, असें मि० पाल स्वतः होऊन कबूल करितात.

इंग्लंडच्या साम्राज्याचा एक घटकभाग राहून, हिंदुस्थानास खरोखरच ‘स्वराज्य’ उपभोगण्यास सांपडेल, ही गोष्ट संभवनीय आहे काय? ह्याचा काय अर्थ होईल? ह्याचा अर्थ असा कीं, एकतर आम्हांस खरें खरें ‘स्वराज्य’ लाभणार नाहीं; किंवा इंग्लंडाचें वर्चस्व निव्वळ नांवाचें राहील. पोकळ स्वराज्यानें आमचें समाधान होईल काय? जर नाहीं, तर पोकळ स्वामित्वानें इंग्लंडचें तरी कसें व्हावें? कांहीं झालें तरी, नामधारी स्वामित्वानें इंग्लंडचें समाधान होणार नाहीं; आणि आम्ही तर स्वराज्याच्या नुसत्या सोंगाला कधींहि भुलून जाणार नाहीं. अशा परिस्थितींत हिंदुस्थानावर इंग्लंडचें स्वामित्व व हिंदुस्थानांत आमचें स्वराज्य, ह्या दोन गोष्टींचा मेळ मुळींच बसत नाहीं, हें अगदीं उघड आहे. आम्हांला स्वराज्य दिल्यावर, हिंदुस्थानांतच काय तर खुद्द ब्रिटिश साम्राज्यांत इंग्लंडाला कोणतें स्थान मिळेल? स्वतःवर पाहिजे ते कर बसविणें, जमाखर्चावर पूर्ण ताबा असणें, आपल्या व्यापाराच्या संरक्षणासाठीं

परदेशी मालावर जबर जकात बसवून तो माल आपल्या देशांत कमी येईल अशी व्यवस्था करणें, हे हक्क स्वराज्याच्या अंगभूत आहेत. स्वतःवर वाटतील ते कर बसविण्याचा हक्क प्राप्त होताच आम्ही काय करूं? औद्योगिक बहिष्काराच्या विकट मार्गानें मग आम्ही प्रयत्न करीत बसणार नाहीं; तर इतर राष्ट्रांनीं जें केलें आहे, तेंच आम्ही करूं. लीडसमधून येणाऱ्या प्रत्येक चाकूसुरीवर व मांचेस्टरहून येणाऱ्या प्रत्येक तसू कापडावर आम्ही अशी जबर जकात बसवूं कीं, तो माल इकडे येण्याचा बंदच पडेल. एकहि ब्रिटिश मनुष्याला आम्ही आमच्या देशांत येऊं देणार नाहीं. हिंदुस्थानांतील कच्चा माल पक्का करण्याकरितां हल्लीं जें ब्रिटिश भांडवल गुंतलें आहे, तें आम्ही काढून टाकूं. हिंदुस्थानांतील खनिज संपत्ति बाहेर काढून तिचा ओघ आपल्या जन्मभूमीकडे आतांप्रमाणें एकाहि इंग्रजास नेण्याची परवानगी आम्ही देणार नाहीं. परदेशी भांडवलाची आम्हांस जरूर पडेल. पण तें मिळविण्यासाठीं रशिया जपान अमेरिका इत्यादि राष्ट्राप्रमाणें सर्व जगाच्या उघड्या बाजारांत आम्ही जाऊं, व हिंदीराष्ट्राच्या पतीवर तें मिळवूं. आमच्या देशांत स्वराज्य असून त्याचा अंतर्भाव इंग्रजी साम्राज्यांत होत असला, तथापि आतांप्रमाणें मग इंग्लंडच्याच व्यापारास उत्तेजन मिळणार नाहीं. आपल्या व्यापाराच्या सोईसाठीं पाहिजे तर इंग्लंडनें आम्हांशीं सवलतीच्या जकातींचा करार करावा, एवढाच इंग्लंडच्या साम्राज्याचा अर्थ होईल. हिंदुस्थानांत व्यापार करण्यास मोकळीक हवी असेल, तर आम्ही सांगूं त्या शर्ती कबूल करून, आमच्या बाजारांत माल आणणें इंग्लंडला भाग पडेल. आणि कांहीं काळानें आमच्या उद्योगधंद्यांची थोडीशी वाढ झाली, म्हणजे आमच्या व्यापारासाठीं सर्व साम्राज्यांत 'मुक्तद्वार' ठेवावें लागेल. आणि मग, ज्या भरतखंडांत अपार नैसर्गिक संपत्ति भरली आहे व ज्यांत कोट्यवधि लोकांची वस्ती असून, सर्व जगांत कोठें सांपडणार नाहीं अशा प्रकारची निर्व्यसनता व साधी राहणी ज्या ठिकाणीं आढळून येते, त्या अवाढव्य देशाशीं, मूठभर लोकवस्तीच्या चिमुकल्या इंग्लंडदेशाला, तो कितीहि संपन्न असला म्हणून, रास्तपणानें टक्कर मारतां येईल, असें आपणांस वाटतें काय?

आस्ट्रेलिया, कानडा किंवा इंग्लंड यांना आज साम्राज्यांत जसें स्वातंत्र्य आहे, तसेंच आम्हां तीस कोटी लोकांना मिळालें, तर तें साम्राज्य इंग्लंडचें असें राहणारच नाहीं, तर हिंदुस्थानचें होऊन जाईल; आणि मग आम्हां उभयतांच्या

स्नेहसंबंधांत विषमता येईल. साम्राज्यांत राहूनच आम्हांस खरोखर स्वराज्य प्राप्त झालें तर, हा स्नेहसंबंध म्हणजे वस्तुतः पुढें भविष्यकाळीं ब्रिटिशलोकांशीं सलोख्याचें किंवा त्यांच्याशीं विरुद्धपणाचें जें साम्राज्य होणार आहे, त्यांत समाईक भागीदारपणाचा संबंध आमच्याकडे येणार आहे. अगदीं स्वतंत्र राष्ट्र अथवा साम्राज्यांतील सह--भागीदार अशा नात्यानें आमच्याशीं वागण्याची पाळी जेदिवशीं इंग्लंडला येईल, तेदिवशीं आम्हांला बरोबरीचा भागीदार समजण्यापेक्षां, जपानदेशाप्रमाणें स्वतंत्र दोस्तदेश समजणें इंग्लंडला पतकरेल. कारण, अशा सरकतीच्या बादशाहींत हिंदुस्थानच मुख्य वाटेकरी होऊन बसेल. म्हणून हिंदुस्थानाला स्वराज्य प्राप्त झाल्यावर, त्यानें आपल्या साम्राज्यांत एक मुख्य आणि अत्यंत महत्त्वाचा भाग होऊन रहावें, असें कोणाहि समंजस इंग्रज मनुष्यास विचारांतीं वाटणार नाहीं; मग तो इंग्रज मनुष्य मुत्सद्दी असो किंवा पत्रकर्ता असो. आणि म्हणूनच लार्ड मोर्ले साहेब म्हणतात कीं, हिंदुस्थान ग्रेटब्रिटनच्या ताब्यात राहील तोंपर्यंत तेथें एकतंत्री राज्य असून, सर्व सत्ता एका माणसाच्या हातीं ठेविली पाहिजे. यास्तव, मला असें दिसतें कीं, मानवीस्वभाव, इंग्रजलोकांच्या विशेष गुणदोषांचा आपणास आजपर्यंत जो कांहीं अनुभव आला आहे तो, व येथें आणि इतर ठिकाणीं इंग्रजलोकांनीं ज्या कांहीं गोष्टी केल्या आहेत त्यांचा इतिहास, ह्या सर्वांचें सूक्ष्म रीतीनें अवलोकन केलें तर, साम्राज्यांतर्गत मिश्र स्वराज्यापेक्षां आम्ही म्हणतों त्याप्रकारचें निर्भेळ स्वराज्य प्राप्त होणें, व्यावहारिकदृष्ट्या सोपें आहे.

जहाल मुत्सद्यांच्या मतें ‘ वसाहतीचें स्वराज्य ’ ह्या शब्दांचा जो अर्थ आहे त्याचा खुलासा इतक्या स्पष्टपणें व पूर्णपणें इतरत्र आढळत नाहीं. ह्मणून मि. पाल यांच्या व्याख्यानांतून लांब लांब उतारे मीं घेतले आहेत. स्वराज्याचे अखेर परिणाम काय होतील, ह्याची फोड करण्याच्या कामीं त्यांनीं जो कोटिक्रम लढविला आहे, तो अगदीं गार करून सोडणारा नाहीं, असें कोणासहि ह्मणतां येणार नाहीं; आणि आपले विचार अगदीं निर्भयपणानें प्रसिद्ध केल्याबद्दल प्रत्येक इंग्रजानें पालबाबूंचे आभार मानले पाहिजेत. ‘ वसाहतीचें स्वराज्य ’ ह्मणून जें ध्येय हिंदी लोकांनीं आपल्यापुढें

ठेविलें आहे, त्याचा गूढार्थ उकलण्याची इच्छा कांहीं इंग्रजलोकांस नसते. ह्याचें कारण, त्यांचे जे पूर्वग्रह झालेले असतात, त्यामुळें ह्या वरील ध्येयांत कांहीं गूढ नाहीं, असेंच त्यांना वाटतें. ह्मणून मि. पाल यानें ‘ स्वराज्य ’ शद्बाच्या केलेल्या अर्थाकडे कोणी बोट दाखविल्यास, अशा प्रकारच्या सहानुभूतीनें प्रेरित झालेल्या इंग्रजलोकांस तें आवडत नाहीं; व आपल्या पक्षातर्फे बोलण्यास त्याला अधिकार नाहीं, असें चांगल्या तऱ्हेनें दाखवितां यावें, ह्मणून त्याची अब्रू देखील घेण्यास ते मागें पुढें पाहत नाहींत. परंतु, मि. पालच्या मार्गानें जाण्यास धोका आहे अशी ‘ नेमस्त ’ पक्षांतील पुष्कळांची जरी समजूत आहे तरी, त्याचें धोरण आह्मांस मुळींच कबूल नाहीं, असें उघडपणें ह्मणण्याचें धैर्य फारच थोड्या नेमस्तांत असून, क्रांतिवादी पक्षाला तर आपले हेतु साधण्याकरितां, ह्याहीपेक्षां जवळचा मार्ग पाहिजे आहे, ही गोष्ट वरील इंग्रजलोकांस विसरून जातां येत नाहीं. ‘ स्वराज्या ’ चें ध्येय पतकरून, आपल्यांत एकी आहे, ह्या गोष्टीचें सोंग हिंदुस्थानांतील ‘ राष्ट्रीय सभे ’ ला कसें तरी आणतां आलें आहे.

‘स्वराज्य’, ‘स्वदेशी’ व अशाच दुसऱ्या राष्ट्रीय पक्षाच्या रणगर्जनांचा अर्थ काय असावा, ह्याबद्दल कोणास अझूनहि शंका असेल तर तिचें निराकरण होण्यास, राष्ट्रीय पक्षाकडील वर्तमान पत्रांतील लेख साधनीभूत होतात. हिंदुस्थानांत इंग्रजीराज्य कायम राहण्याच्या प्रश्नासंबंधानें मि. पाल यांचे विचार कितीहि विरुद्ध असले तरी, दंगाधोपा करण्याविषयीं त्यानीं कधीं प्रोत्साहन दिलेलें नाहीं, किंवा कडक भाषा वापरून इंग्रजलोकांची निंदाहि केलेली नाहीं. ‘क्रांतिवादी’ असोत किंवा

नुसते 'जहाल' असोत, हिंदी राजकारणी पुरुष व्याख्यानापेक्षां वर्तमानपत्रांत आपलें मनोगत उघडपणें सांगत असतात. श्रोतृसमुदायापेक्षां वाचकवर्गाला पसंत पडतील असे लेख वर्तमानपत्रद्वारा लोकांपुढें मांडण्याची हिंदी राजकारणी पुरुषांची रीत आहे.

हा जो अनिष्ट प्रकार हिंदुस्थानांत चालू आहे त्यास थोडे दिवसांपूर्वीं केलेल्या वर्तमानपत्रांच्या नवीन कायद्यामुळें— उशिरानें कां होईना पण— कांहीं आळा बसला आहे. पण ह्या अनिष्ट प्रकारांत खरोखर धोका किती आहे, ह्याची कल्पना विलायतेंतील लोकांस आणून देऊन, त्यांच्या अंतःकरणांत प्रकाश पाडण्याची खटपट कोणीं केली नसल्यामुळें, पुष्कळ इंग्रज गृहस्थांस अद्यापि बाह्यतः तरी, असें वाटत आहे कीं, ह्या मुद्रणस्वांतत्र्याच्या नवीन कायद्यामुळें लोकांवर जुलूम होत आहे; किंवा निदान सरकारी अधिकाऱ्यांस वर्तमानपत्रांत येणारी टीका सहन होत नसल्याकारणानें, त्यांच्या मुरवतीखातर हा कायदा पास करून, त्यांची मर्जी खुष राखण्याचा प्रयत्न करण्यांत आला आहे. वर्तमानपत्रांत होणारी टीका क्वचित्प्रसंगीं अतिशयोक्तीची व कडक असली, तथापि ती फायदेशीर आहे, ह्यांत संशय नाहीं, असेंहि त्या लोकांस वाटत असतें. आतां पुढें, वर्तमानपत्रांचा नवीन कायदा होण्यापूर्वीं देशी वर्तमानपत्रांतले जे उतारे दिले आहेत त्यांवरून, 'जसें बांबगोळ्यामध्यें तसेंच शाईत व लेखणींत पिक्रिक आसिड घालतां येतें;' आणि पुनः 'हे कडक लेख ह्मणजे केवळ फेंस आहे, असें ह्मणतात,' ह्या लार्ड मोर्लेंच्या वचनांचा अर्थ समजण्यास सुलभ पडतें. होय, तो फेंस आहे; परंतु त्या फेंसांत रक्तपाताची छटा आहे. खून करण्यास उघड उघड प्रोत्साहन दिलें नसलें, किंवा बंड करण्यास प्रत्यक्ष

उपदेश केला नसला तरी देखील, अर्वाचीन हिंदुस्थानांतील बुद्धिमान् व ज्ञानवान् लोकांच्या तर्फे बोलण्याचा आपल्यास अधिकार आहे, असें जे हिंदी लोक समजतात त्यांच्याकडून, विषारी लेखांच्या द्वारें लोकांचीं मनें कलुषित करण्याचा क्रम गेलीं बरींच वर्षें अगदीं पद्धतशीरपणानें व मोठ्या नेटानें कसा चालला आहे, हें वरील उताऱ्यांवरून दिसून येतें. त्याचप्रमाणें, कपटानें हिंदुधर्मशास्त्रांचे आधार देऊन, हिंदु देवदेवतांच्या नांवांचा दुरुपयोग करून, व प्रत्येक इंग्रजी गोष्टीची जाणून बुजून निंदा करून हिंदुस्थानांत अस्वस्थता माजविण्याचा जो दुःखदायक उद्योग चालला आहे, त्याचें यथार्थ स्वरूप कळून येण्यास, वरील लेख चांगलेच कारणीभूत होतात. मि. पाल यांच्या लेखांत इंग्रजाविषयीं द्वेष पूर्णपणें भरलेला असतो. तथापि, त्यांत जी गंभीर विचारपद्धति दिसून येते तिच्या ऐवजीं, वरील उताऱ्यांत पौराणिक कल्पनांचा सुकाळ असून, त्याच्या जोडीला शिवीगाळ आणि नालस्ती ह्यांची रेलचेल मात्र आढळून येते.

'स्वराज्य'– ह्मणजे हिंदुस्थानाला पूर्ण स्वातंत्र्य किंवा निदान वसाहतींतील स्वराज्य– प्राप्त करून घेण्यासाठीं हपापलेल्या लोकांच्या अंगीं जो द्वेष बाणलेला असतो तो दाखविणारे कांहीं मासलेवाईक उतारे प्रथम देतों. 'हिंदी स्वराज्य' अगदीं उघडपणें ह्मणतें:––

"इंग्रजलोक! इंग्रजलोक ह्मणजे कोण? ते हल्लीं ह्या देशाचे राज्यकर्ते आहेत. पण ते आमचे राज्यकर्ते कसे बनले? आमच्या गळ्यास पारतंत्र्याचा फांस घालून, आमच्या प्राचीन ज्ञानाचा आम्हांस विसर पाडून, आह्मांस पापकर्मे आचरावयास लावून, हत्यारांच्या उपयोगाविषयीं आह्मांस अज्ञानांत ठेवून... ... ... ... अरेरे! भोळे बिचारे आमचे लोक! इंग्रजलोकांच्या शिकवणीमुळें आमच्या घरांत व्यभिचार शिरला असून, आमच्या स्त्रियांचें

पाऊल आडमार्गांत पडूं लागलें आहे... ... . .... अरेरे! भरतखंडाच्या ह्या सुवर्णभूमींतील सर्व वीर नष्ट झाले काय? स्वकर्तव्य विसरून व यातना सहन करून हळूं हळूं मृत्युमुखीं पडण्याचें पतकरून, देशाचा धडधडींत डोळ्यासमोर चाललेला नाश मुकाट्यानें पाहत राहणारे सर्व भ्याड, भितरे लोक पुरुषत्वहीन होऊन बसले आहेत काय? अहो हिंदलोकांनो! तुमचा जन्म वीरकुलांत झालेला आहे! तुह्मी इंग्रजांना इतकें कां भितां? ते कांहीं देव नव्हेत; तर आह्मांसारखींच माणसें आहेत; किंबहुना तुमच्या सीतेप्रमाणें सौंदर्यवान् स्त्रीवर बलात्कार करणारे राक्षस आहेत. तुह्मांमध्यें जर एखादा "राम" असेल तर त्यानें जाऊन आपली "सीता" परत आणावी. देशमाताकी जय! असा सिंहनाद करून, स्वदेशाचा झेंडा उभारा. सत्याचा उद्धार करून हिंदुस्थानचें कल्याण करा.

कलकत्त्याचें युगांतर पत्र असें प्रतिपादन करितें कीं, हिंदुस्थानच्या दृष्टीनें राजद्रोह ह्या शद्बास मुळीं अर्थच नाहीं.

इंग्रजांचें जूं झुगारून देऊन स्वतंत्र होण्याची प्रेरणा जर सर्व राष्ट्राला झाली तर, ईश्वराच्या आणि न्यायाच्या दृष्टीनें कोणाचा दावा वाजवी दिसेल? इंग्रजांचा कीं हिंदी लोकांचा? आपल्या सर्व संकटांचें निवारण होण्यास स्वातंत्र्यरूपी त्रैलोक्यचिंतामणि मिळाला पाहिजे, असें प्रत्येक हिंदी मनुष्यास वाटूं लागलें आहे. ह्मणून, आपला हेतु साध्य करून घेण्यासाठीं त्याला रक्ताच्या समुद्रांतून पोहून जावें लागलें तरी तो जाईल. हिंदुस्थानावरील इंग्रजीसत्ता ह्मणजे निव्वळ थोतांड आहे. हें थोतांड हिंदी लोक आपल्या उराशीं बाळगतात. ह्मणूनच त्यांच्यावर आज महत्संकटें आलेलीं असून, तीं त्यांना सोसावीं लागत आहेत. असत्याचा नाश करून सत्याचा जय होऊं द्या असा उपदेश प्राचीन काळीं ऋषी करीत असत. आणि अन्यायाच्या पायावर उभारलेलें हें परकीयांचें राज्य ह्मणजे एक मोठें कापट्य आहे. त्याचा नायनाट करून, खरें स्वदेशी राज्य स्थापन केलें पाहिजे, सत्याचा जय असो!

हिंदुलोकांची वर्षप्रतिप्रदा ही "परकीयांच्या शापापासून मुक्तता करण्याकरितां" येत आहे, असें समजून "गुजराथ" पत्र ह्मणतें:—

हे श्रेष्ठ आर्यभू! तूं जी इतकी बलाढ्य होतीस ती आतां एखाद्या पिंज-

त्यांत घातलेल्या पक्ष्याप्रमाणें झाली आहेस. तुझे पराक्रमी पुत्र जे **सत्य** आणि **प्रेम** ते मृत झाले काय? तुझी कन्या जी **लक्ष्मी** तिनें समुद्रांत उडी घेतली काय? अथवा धूर्त लबाडांनीं आणि राक्षसांनीं लुटल्यामुळें, तूं दुःखसागरांत बुडून गेली आहेस काय? ( 'राक्षस' हा शब्द "राष्ट्रीय" पक्षाकडून नेहमी इंग्रजांस लावण्यांत येत असतो. )

"शक्तिकर्त्ता" उघडपणें ह्मणतोः—

स्वातंत्र्यप्राप्तीकरितां जो उद्योग चालू आहे त्यास हातभार लावणारांस, **अराजक क्रांतिवादी** अथवा **राजद्रोही** अशीं कोणतींहि नांवें द्या; त्यांचा अपमान करून त्यांस चिरडून टाकण्याचा कितीहि प्रयत्न करा; कितीहि देशभक्त कारागृहांत मरोत किंवा हद्दपार होवोत; तथापि, सर्व वातावरणांत खेळणारी स्फूर्ति कदापिहि दबली जाणार नाहीं. कारण, ती इतकी प्रबळ आणि स्वाभाविक आहे कीं, तिचें चालकत्व खरोखरच परमेश्वराच्या हातीं असलें पाहिजे.

पुढील उतारा पुण्याच्या 'काळ' पत्रांतून घेतला आहेः—

" आह्मी आर्यलोक ह्मणजे कांहीं मेंढरें नव्हेत. आमचा स्वदेश आहे; स्वधर्म आहे; आमच्यांत वीर, मुत्सद्दी व योद्धे आहेत. इंग्रजांच्या सहवासानें ते आह्मांस मिळालेले नाहींत. आह्मांस ह्या कांहीं नवीन गोष्टी नाहींत. आजच्या काळांत आपल्या धाडसाबद्दल व विद्याचारसंपन्नतेबद्दल जे लोक बढाई मारीत आहेत, त्यांचे पूर्वज ओंगळवाण्या रानटी स्थितींत होते,—किंबहुना ह्याहि काळाच्या अनेक शतकें पूर्वी—तेव्हां आमचें बुद्धिवैभव विशाल असून, सर्व सद्गुण आह्मांमध्यें नांदत होते. या आमच्या प्राचीन पुण्यभूमीस तिचें पूर्वपद खास मिळेल, व आपल्या आंगच्या तेजानें, ती संपत्ति, कलाकौशल्य आणि शांतता यांचें आणखी एकदां वसतिस्थान होईल. अमुक एक आपलें कर्तव्य आहे, असें एकदां ठरलें ह्मणजे त्याच्यासाठीं आपले प्राण खर्ची घातले पाहिजेत, अशी पवित्र भावना सार्वत्रिक होऊं लागली आहे. आमच्यांतील शूर वीरांना निर्दयपणें कारागृहांत घालून त्यांचे अस्थिपंजर बनवितात, तरी असे वीरपुरुष होऊं लागले आहेत. आर्यमातेच्या सेवेसाठीं स्वतःस वाहून घेऊं या भावभक्तीनें वेडा झालेल्या मनुष्यास आपल्या हेतूच्या सिद्धीसाठीं वाटेल त करितां येतें. त्याच्या अंगीं भीमाची शक्ति येईल. मृत पतीच्या चितेवर जशी एखादी स्त्री आपणास जाळून घेते, त्याप्रमाणेंच, देशमातेकरितां आपण आपल्या प्राणांची आहुति देऊं चला.

कलकत्त्याचें "धर्म" पत्र विशेषेंकरून ह्या चळवळीच्या धार्मिक बाजूवर जोर देत असतें:—

धर्मोपदेश करण्याच्या कामीं आपण गुंतलों आहों; आणि आमच्या धर्माचें हें मुख्य अंग आहे असें समजून, ह्या चळवळींत आह्मी आपलें सर्व सामर्थ्य घालींत असतों. ... ... ... ... आरंभीं आरंभीं, ह्या चळवळींत पाश्चात्यांच्या राजकीय कल्पनाचें प्राधान्य होतें. परंतु सांप्रत आर्यलोकांच्या वैभवाविषयीं चांगलीच जाणीव उत्पन्न झाली असून, आपल्या मातृभूमीविषयीं उत्कट प्रेम व आदरभाव दिसून येऊं लागला आहे. त्यामुळें, आरंभाच्या चळवळीचें रूपांतर होऊन, तिच्यांत धार्मिक गोष्टींचा विशेष अंतर्भाव झाला आहे. राजकारणाचा धर्मांत समावेश होतो. पण तें आर्यपध्दतीनें व आर्यधर्माच्या आज्ञेनुसार करीत गेलें पाहिजे.

बंगालप्रांतांत अघोरी शक्तिपूजेचे अनेक मार्ग आहेत; पण विशेषेंकरून 'काली' आणि 'दुर्गा' ह्या नांवांनीं त्या शक्तीची पूजाअर्चा केली जाते; व ह्या पूजेचा तेथें राजकीय अस्वस्थतेशीं जसा निकट संबंध आहे, तसा साऱ्या हिंदुस्थानांत इतर कोठें आढळून येत नाहीं. ह्याच कारणामुळें, बंगालच्या वर्तमानपत्रांत तिची करुणा वारंवार भाकण्यांत येत असते. दुर्गापूजेचा दिवस जवळ आल्याबद्दल आनंदित होऊन, 'डाका' ग्याझेटनें पुढील उद्गार काढले आहेत:—

हिंदी देशबांधवहो! झोंपी जाऊन स्वस्थ पडण्यास आतां वेळ उरला नाहीं. पहा, माताजी येत आहेत. हे माते? तूं आमचें सर्वस्वी कल्याण करणारी आहेस. आपल्या पतित बालकांकडे दृष्टि फेंक. माते, सांप्रत तुझीं बालकें रोगग्रस्त असून दुःखानें अगदीं पिडून गेलीं आहेत. हे त्रिविधतापहारिणी श्यामा! आह्मांस दुःखापासून मुक्त कर. असुरमर्दिनी माते! तूं ये, आणि बंगालदेशच्या द्वारांशीं दृश्यमान हो!

दुर्गा—उत्सवामध्यें शक्तिपूजेंतील अघोरी व बहुधा भयंकर आणि बीभत्स अशा प्रकारांस नेहमीं प्राधान्य दिलेलें असतें

ह्या उत्सवासंबंधानें बारिसालच्या **हितैषी** पत्रांत देखील उल्लेख आला आहे, तो असाः—

शक्तिपूजेपासून आह्मांस कोणता धडा मिळाला आहे? मागें पुढें ही महापूजा इष्टफल देणारच. ह्या मातृपूजेचें खरें महत्व हिंदु लोकांस कळूं लागेल तेव्हां ते कुंभकर्णी झोंपेंतून जागे होतील, व क्षितिजावर जागृतीच्या मंगल अरुणोदयाचा प्रकाश पडेल. ह्या मातृपूजेपासून तुह्मांला मोठें सामर्थ्य प्राप्त करून घेतलें पाहिजे. महामातेच्या डाव्या बाजूस यशदात्या गणेशाची स्थापना केलेली आहे. मग यशःप्राप्तीबद्दल निराश कां होतां? देवसेनेचा मुख्य नायक जो कार्तिकी त्याच्याकडे पाहा. त्याची स्थापना मातेच्या उजव्या बाजूस केलेली आहे. तुमच्या मुख्य कार्याच्या सिद्धीस विघ्न करणाऱ्या दुष्ट राक्षसांविरुद्ध तुमचें साह्य करण्यास, आपलें धनुष्य सज्ज करून तो येत आहे; आणि ज्या अर्थी त्यानें शस्त्र उचललें आहे, या अर्थी आतां त्याचें निवारण कोणास करितां येणार आहे?

**खुलनावासी** पत्र जणुं कांहीं काव्यस्फूर्तीनें बोलत आहे, तें असेंः—

“ माते दुर्गे! कोणत्या पातकामुळें तुझ्या पुत्रांचा उत्साह नष्ट झाला आहे, व अन्यायानें त्यांचीं हृदयें विदीर्ण होऊन गेलीं आहेत? राक्षसांचें वर्चस्व असून, त्यांच्याकडून ईश्वरभक्तीचा सतत पराजय होत आहे. राक्षसांना पादाक्रांत करणाऱ्या माते, तूं जागी हो! अन्नाच्या दुर्मिळतेमुळें तुझे निराश्रित पुत्र रोडावून गेले असून राक्षसांशीं झुंझण्यामुळें थकून गेले आहेत. अशा स्थितींत त्यांच्यावर ज्या पद्धतीनें राज्य होत आहे, तिच्या भयानें त्यांची गाळण उडून गेली आहे. दुष्काळ, प्लेग व रोगराई यांचा मोठा सुळसुळाट झाला असून, दुष्टांस जयश्री माळ घालति आहे. देवी, दुर्गे, जागी हो! तुझ्या धनुष्यांतून विद्युत्पात होत आहे, तुझ्या भ्रूक्षेपामुळें सर्व जग थरथर कांपत आहे, व तुझ्या चरणपातामुळें सर्व विश्व कंपायमान होत आहे, अशा स्वरूपांत मी तुजला पहात आहें. राक्षसांची अंतःकरणें ग्रासून टाकणारी रक्ताची नदी वाहूं दे.”

दुर्गादेवीपुढें घेतलेली स्वदेशीची शपथ मोडल्याबद्दल हिंदु-लोकांचें **कल्याणी** पत्र कान उपटीत आहे, तें असेंः—

"स्वदेशीव्रत पाळण्याबद्दल तुह्मी नानाप्रकारच्या आणाशपथा घेतल्या आहेत. तरी, जनावरांचें रक्त व चरबी यांनीं दूषित असलेली परदेशी साखर, मीठ व कापड तुह्मी अझूनहि घेत असतां. तुह्मी मातेची शपथ घेतां; आणि नंतर तिची आज्ञा मोडून तिचीं मंदिरें भ्रष्ट करितां. बंगालच्या पूजेचा स्वीकार करण्यास यंदा ती आली नाहीं, ह्याचें कारण तुमचीं पापें, ही गोष्ट तुह्मांस माहीत आहे काय? वास्तविक ती दुःखाचे मोठमोठाले सुसकारे टाकीत आहे, व यामुळें तुह्मांवर एक प्रलयकाळचें वादळ उठणार आहे. आपल्या देशाचा विध्वंस होऊं नये अशी तुमची इच्छा असेल तर, मातेला दिलेलीं वचनें पाळा."

दुसऱ्या प्रांतांतहि लोकप्रिय देवतांचे अशाच प्रकारें साह्य मागितलें जातें. ईश्वरावर भरंवसा ठेवून, सत्याचा पक्ष घेतल्याबद्दल प्रल्हादाला ठार मारण्याचा प्रयत्न करणाऱ्या हिरण्यकश्यपूचा विष्णूनें वध केला, ही पौराणिक कथा घेऊन, लाहोरच्या **बेदारी** पत्रानें, ब्रिटिश मुत्सदी व अँग्लो-इंडियन अधिकारी यांची दुष्ट हिरण्यकश्यपूशीं, व हिंदी लोकांची प्रल्हादाशीं, तुलना केली आहे. ब्रिटिश मुत्सदी व परदेशांतील त्यांचे प्रतिनिधी, हे स्वातंत्र्य व न्याय यांचे शत्रु आणि गुलामगिरी व जुलूम यांचे वाली आहेत, त्याअर्थी ग्रेट ब्रिटनचा विनाशकाळ जवळ येऊन ठेपला आहे; आणि मग हिंदुस्थानदेश आपल्या पुत्रांच्या ताब्यांत येणार आहे.

फिरोझपुरच्या **प्रेम** पत्राच्या मतानें, मि. केर हार्डीला हिंदु देवतांमध्यें देखील स्थान दिलें पाहिजे. एका स्वतंत्र व सुखसमाधानांत असलेल्या देशांत, एका सभेला आपण हजर आहों, असें ह्या पत्राच्या संपादकाला स्वप्न पडलें. ह्या स्वप्नांतील सभेस दुसरे कांहीं हिंदी लोक हजर असून, त्यांपैकीं एकानें कविता ह्मटल्या. त्यांमध्यें हिंदुस्थानच्या शोचनीय स्थितीचें असें वर्णन केलें होतें कीं, एका काळीं हिंदुस्थान देश ह्मणजे पृथ्वीवरील स्वर्गच होता;

परंतु हलीं परकी लोकांच्या सत्तेमुळें तो केवळ नरक होऊन गेला आहे, वगैरे वगैरे. हिंदुस्थानाबद्दल परमेश्वराचा धांवा केल्यानंतर कांहीं देवदूत तेथें आले; व त्यांपैकीं एकानें अशी शपथ घेतली कीं, हिंदुस्थानचीं संकटें निवारण करण्याकरितां मी हरप्रयत्न करीन. तपासाअंतीं ह्या संपादकास कळून आलें कीं, ही स्वप्नभूमि ह्मणजे इंग्लंड हेंच असून, हिंदी वक्ता ह्मणजे मि. बिपिनचंद्र पाल व देवदूत ह्मणजे मि. केर हार्डी होय!

हिंदु लेखकांचें एक आवडतें हत्यार ह्मणजे हलकटपणानें शिवीगाळ व नालस्ती करणें हें आहे. ह्याचा मासला लाहोरच्या **सहाय्यक** पत्रांत चांगला सांपडतो. १९०९ सालीं **मलेरिया** तापाविषयीं ऊहापोह करण्याकरितां जी परिषद् भरली होती, तिला अनुलक्षून वरील पत्र ह्मणतें:—

" दुष्काळग्रस्त लोकांच्या यातना असह्य झाल्या ह्मणजेच फक्त रिलीफ कामें सुरू करण्यांत येतात; व त्यांवर एखाद्या लठ्ठ पगाराच्या इंग्रजाची नेमणूक होते. ह्मणजे, जमलेला निम्मा पैसा, कीं ज्यांतून शेंकडों गरीबगुरिबांचीं पोटें भरलीं असतीं, इतका तोच गिळंकृत करून बसतो! सर्व देश व्यापून टाकणाऱ्या मलेरिया तापासंबंधी चाललेल्या चौकशीचें बहुतकरून असेंच व्हावयाचें आहे. प्लेगप्रमाणेंच हा ताप दारिद्र्य व तज्जन्य शारीरिक दुर्बळता यामुळें उत्पन्न झाला आहे, हें प्रत्येक हिंदी मनुष्यास माहीत आहे. पण प्लेगचें कारण शोधून काढण्यासाठीं सरकारी अधिकाऱ्यांना जशी उंदीरमामांकडे धांव घ्यावी लागली, त्याचप्रमाणें ह्या तापाच्या कारणासाठीं चिलटदादांकडे जावें लागलें. या जंतूंचा नाश करण्याकरितां नानाप्रकारचीं औषधें व यंत्रें शोधून काढण्यांत आलीं आहेत; डाक्टरलोकांची नेमणूक झाली आहे, व पुस्तकें लिहिण्याबद्दल बक्षिसें देण्यांत आलीं आहेत. अशा रीतीनें इंग्रज दुकानदार वगैरे लोकांच्या खिशांत कोट्यावधि रुपये जाऊन पडले आहेत. सध्यां कोयनेलाचा अनुभव पाहण्यांत येत असून, लाखों रुपयांचें कोयनेल हिंदी लोक विकत घेत आहेत, व याप्रमाणें इंग्रज कारखानदारांचा फायदा होत आहे. शिवाय सिमल्याच्या थंड हवेंत बसून चौकशी करण्याकरितां एक कमिशन लवकरच

नेमण्यांत येणार आहे. ह्या कमिशनमधली मंडळी मेजवान्या झोडतील, नाच तमाशे करतील व ब्रांडीचीं गलासें उडवितील; व अशा रीतीनें लाखों रुपयांचा चुराडा करून गरीब रयतेच्या पदरास चांगलाच खार लावतील. आणि शेवटीं कोयनेल किंवा दुसऱ्या औषधांचा व्यापार वाढविण्याची शक्कल काढतील.

राणीपूरचा वार्तावाह लिहितो कीं, तेथील दवाखान्यांत कांहीं शस्त्रक्रियेमुळें एक रोगी दोन तासांत मरण पावला, व एक गरोदर बाई अशाच कारणानें मृत्यु पावली. ह्यावर मोठ्या भिडस्तपणानें हें पत्र असा टोमणा मारितें कीं, "तेथील मुख्य डाक्टरानें आतां आपला पगार वाढवून घ्यावा." इंग्रजलोक बुद्धिपुरःसर हिंदुस्थानची लोकसंख्या कमी करूं इच्छित आहेत, ही कल्पना लोकांत मोठ्या परिश्रमानें पसरविण्यांत येत आहे. "जगांतील अत्यंत संपन्न देशांपैकीं एक हिंदुस्थान असतां, तेथील लोकांची अन्नान्नदशा करण्यांत" इंग्रजांनीं जें "औदार्य" दाखविलें आहे त्यावद्दल, व "एतद्देशीय लोकांना भुकेनें मारून चुन्या विटांच्या रिकाम्या इमारतींवर राज्य करूं इच्छिणाऱ्या इंग्रजांच्या शहाणपणाची" जंगासियाल पत्र अशाप्रकारें थट्टा करित आहे.

सर डब्ल्यू कर्झन वायली यांच्या विधवा स्त्रीस पेनशन दिल्याचें ऐकून, दिलीचें "आकाश" पत्र असें विचारित आहे कीं, "यापुढें इंग्रजलोकांना मान वरती करून पाहतां येईल काय? त्यांच्या विधवांचें देखील पोषण हिंदुस्थानच करित आहे. ज्या देशांतील विधवांना दुसरा देश पोसतो, त्यानें आपल्या सार्वभौमराज्याचा व स्वाभिमानाचा डौल कधींहि मिरवूं नये.

धिंग्र्याचा धिक्कार करणाऱ्या एका पंजाब कायदे काउन्सिलच्या मुसलमान सभासदाच्या भाषणाचा आधार देऊन, दुसरें

एक पंजाबी पत्र उपरोधिक रीतीनें ह्मणतें कीं, " ज्याअर्थी इंग्रज व इतर गौरकाय युरोपियन नेटिवांचे दररोज खून करित आहेत, त्याअर्थी ते अधमाधम असले पाहिजेत."

न्यायाधीश— विशेषतः हिंदी न्यायाधीश— आपलें कर्तव्य निष्ठापूर्वक बजावूं लागले, तर त्यांच्यावर राष्ट्रीय वर्तमानपत्रकारांकडून जसा गहजब होतो, तसा दुसऱ्या कोणत्याहि सरकारी अधिकाऱ्यांवर होत नाहीं. न्यायमूर्ति दावर ह्या पारशी न्यायाधिशानें टिळकाला शिक्षा दिली. त्यासंबंधानें **केसरी** पत्र लिहितें कीं, "बाहेरील गोष्टींचा काळजीपूर्वक विचार करून, त्यांनीं काय शिक्षा द्यावयाची, हें अगोदरच मनांत ठरवून ठेविलें होतें." आणि कीलोत्पाटीव वानराप्रमाणें, त्यांनीं स्वतःस सर्व जगाच्या उपहासास पात्र करून घेतलें आहे." **केसरी** तर टिळकाचेंच पत्र असून, त्यांत आलेल्या दोन लेखांबद्दलच त्याला शिक्षा झाली होती. पण पुण्याचें दुसरें एक पत्र **काळ** यांत देखील असें छापलें होतें कीं, ह्या कज्ज्यांतील सर्व गोष्टी पूर्वीं ठरवून ठेवल्याप्रमाणेंच होत होत्या. "टिळकांना कायद्याप्रमाणें शिक्षा झाली ह्या ह्मणण्यांत काय जीव आहे? ह्या खटल्यांत न्याय झाला नाहीं, तर न्यायाचा फार्स झाला." हें पत्र आणखी असेंहि ह्मणतें कीं, "इंग्रजी न्यायकोर्टानें टिळकांना शिक्षा केली ह्मणून त्यांस हिंदु लोकांनीं दोषी ठरवावयाचें असेल, तर रोमन न्यायाधिशांनीं येशूख्रिस्ताला सुळावर चढविलें ह्मणून ख्रिस्ती लोकांसहि त्याचा त्याग करावा लागेल." एका परिटानें श्रीरामचंद्राची निंदा केली ह्मणून रामायणामध्यें त्याचें नांव अजरामर होऊन बसलें आहे, ही कथा सांगून, **कर्नाटक वैभव** ह्मणतें कीं, स्ट्राची ( ज्यांनीं १८९७ सालीं टिळकास शिक्षा दिली होती ते )

व दावर यांचीं नांवें हिंदुस्थानच्या इतिहासांत निरंतर राहतील.

प्रत्येक पत्रांतून मीं एकेकच उतारा घेतला आहे. नाहीं तर, ह्या व आणखी दुसऱ्या पत्रांतून वरील प्रकारचे उतारे इतके घेतां आले असते कीं, त्यांची संख्या अत्यंत मोठी होऊन, वाचकांस अगदीं वीट आला असता. हिंदुस्थानांतील लोकांस छापलेल्या मजकुराबद्दल विलक्षण आदर वाटतो, व त्याच्या खरे-पणाबद्दल त्यांचा विश्वास असतो. तसेंच, वाचकवर्गापैकीं जितके अधिक लोक अज्ञानी, तितकें पत्रकर्त्यांचें अधिक वजन असतें. आणि एखाद्या पत्राचा उन्मत्तपणा व पचकळपणा जितका अधिक असेल, त्या मानानें आपणास सुशिक्षित ह्मणविणाऱ्या लोकांमध्यें देखील अशा खोडसाळ पत्राचे वर्गणीदार अधिक असतात. अशी ज्या ठिकाणीं वस्तुस्थिति आहे, तेथें लेखनस्वातंत्र्याचा खरा अर्थ काय होतो, हें ध्यानांत येण्यास वर दिलेले उतारे पुरेसे होतील. हीं पत्रें अप्रसिद्ध आहेत, असा मुळींच प्रकार नाहीं; आणि **काळ, हिंदस्वराज्य** व विशेषेंकरून **युगांतर,** ह्या पत्रांचा खप अपूर्व होत होता. एका काळीं तर **युगांतर** पत्राचें बंगालप्रांतांत विलक्षण प्राबल्य वाढलें होतें. फौजदारी कायद्याच्या तडाक्यांत सांपडल्यामुळें, अथवा नव्या प्रेस आक्टामुळें वरील प्रकारचीं कांहीं पत्रें बंद पडलीं ह्याबद्दल, स्वातंत्र्याचा अगदीं निःसीम भक्त अशा, कोणातरी इंग्रज गृहस्थास वाईट वाटेल काय? अशा वर्तमानपत्रांमुळें झालेलें नुकसान अद्यापि कायम असून, तें सहजीं भरून निघणारें नाहीं. यावर कित्येकांकडून असें उत्तर येत असतें कीं, "अँग्लो--इंडियन पत्रांकडें जरा नजर टाका. त्यांतहि एतद्देशीय लोकांवर तिरस्कारयुक्त लेख येत असून, त्यांची अग-ळीक करण्यांत येते, व जातीजातींत द्वेष वाढविण्याचाहि प्रयत्न

सतत होत असतो." कांहीं थोड्या अँग्लो--इंडियन पत्रांत क्वचित् प्रसंगीं अयोग्य भाषा वापरली जाते व लोकांचीं मनें दुखविण्यांत येतात, ही गोष्ट नाकबूल करण्याचें मला कारण नाहीं. तथापि अशा तऱ्हेचा सामान्य आरोप अँग्लो--इंडियन पत्रांवर करणें निव्वळ वेडेपणा आहे. देशी भाषेंतील अत्यंत लोकप्रिय पत्रांतूनच नव्हें, तर हिंदी लोकांनीं चालविलेल्या व त्यांच्या मालकीच्या कांहीं इंग्रजी पत्रांतूनसुद्धां, जातिद्वेषाला व दंगाधोप्याला प्रोत्साहन देण्याचें काम जसें अव्याहत चालू असतें, त्याप्रमाणें थोडातरी प्रकार अँग्लो--इंडियन पत्रांत असतो, असें उतारे देऊन दाखविण्याचें काम त्यांच्या अत्यंत अनिष्टचिंतक टीकाकारांस देखील करण्याची पंचाईत पडेल.

हिंदुस्थानांतील 'जहालपक्षाची' मजल कोठवर जाते, हें मीं दिलेल्या देशी वर्तमान पत्रांतील उताऱ्यांवरूनसुद्धां लक्ष्यांत येणार नाहीं. लोकांत अस्वस्थता उत्पन्न करण्याकरितां जे लेख उघडरीतीनें प्रसिद्ध केले आहेत, त्यांचा फक्त मासला वरील उताऱ्यांत दिसून येतो. पण, परदेशांतून चोरून लपून हिंदुस्थानांत आणलेलें व गुप्तरीतीनें लोकांत पसरविलेलें वाङ्मय निराळेंच असून, त्याचा विषारीपणा ह्याहिपेक्षां अधिक आहे.

## भाग ३ रा.

# हिंदुधर्माचें पुनरुज्जीवन.

तीस वर्षांपूर्वी मी हिंदुस्थानांत आलें होतों, त्यावेळीं पाश्चिमात्य (इंग्रजी) पद्धतीचें शिक्षण मिळालेल्या तरुण हिंदुलोकांमध्यें, 'कोणीहि राजा असो, आपण पूर्णपणें राजनिष्ठ असलें पाहिजे' अशा प्रकारची भावना निदान त्यांच्या मनांत तरी असे. इंग्रज लोकांनीं पश्चिमेकडून (यूरोपांतून) आणलेल्या ज्ञानामृताचें आकंठ पान करण्यांत ही मंडळी गुंग होऊन गेली होती. कित्येकांनीं इंग्रजी भाषेंतील ग्रंथांवर–विशेषतः काव्य-ग्रंथांवर--मोठ्या उत्साहानें झोड उठविली होती. वर्डस्वर्थ, ब्राउनिंग इत्यादि नामांकित इंग्रजी कवींच्या काव्यांची चर्चा करण्याकरितां मंडळ्या स्थापन करण्यांत आल्या होत्या. इंग्लंडच्या इतिहासावर व्यासंग करून, मिल्टन, बर्क, जान स्टुअर्ट मिल वगैरे विद्वानांच्या ग्रंथांवरून आपलीं राजकीय मतें बनविण्याचा क्रम चालू होता. तसेंच, क्यांट, स्लेजेल, हरबर्ट स्पेन्सर, डारविन इत्यादि तत्वज्ञानांच्या ग्रंथांवर अगदीं लुब्ध होऊन जाऊन, त्यांचें शिष्यत्व पतकरलेलेहि कांहीं तरुण गृहस्थ होते. सारांश, त्या काळच्या सुशिक्षित तरुण हिंदु मंडळीच्या मनाचा कल कसाहि असला, तरी त्यांच्यांपैकीं पुष्कळच लोकांनां इंग्रज लोकांच्या कल्पना पसंत असून, त्यांबद्दल त्यांच्या ठिकाणीं आदरबुद्धि वसत होती. आपल्या वाडवडिलांपासून फार दिवस चालत आलेल्या जुन्या धर्मसमजुती आणि चालीरीती

सर्वस्वी—आणि पुष्कळवेळां तर फारच घाईघाईनें, दूरवर विचार न करितां—सोडून देण्यास, किंवा मनांतल्या मनांत तुच्छ मानण्यास त्यांची तयारी नसली, तरी इंग्रजी विद्येच्या संस्कारामुळें ज्या गोष्टी चांगल्या वाटूं लागल्या होत्या, त्यांच्याशीं आपल्या जुन्या गोष्टींची सांगड कशी घालतां येईल, व ह्यासाठीं त्यांत काय काय फेरफार केले पाहिजेत, ह्या गोष्टीचा त्यांच्या मनाला मोठा चटका लागून गेला होता, ह्याबद्दल शंका नाहीं. पुष्कळ वेळां त्यांना इंग्रज लोकांचा राग आला असेल; तथापि इंग्रज लोकांविषयीं त्यांच्या ठिकाणीं आदरबुद्धि वसत असून, मोठें कौतुकहि वाटत होतें. 'आपण प्रत्येक बाबतींत हिंदी लोकांपेक्षां श्रेष्ठ आहों' असा इंग्रजलोकांस गर्व असे, व त्याबद्दल त्यांना संताप येई. तथापि, असा गर्व वाहण्यास इंग्रजांना जागा आहे, ही गोष्ट कबूल करण्यास त्यांच्या मनाची तयारी असे. गेल्या शतकाच्या पहिल्या पन्नास वर्षांत केरी, डफ वगैरे सारख्या नामांकित मिशनऱ्यांनीं अत्यंत उच्च हिंदुजातींतील कित्येक मोठ्या लोकांस ख्रिस्ती धर्माची दीक्षा दिली होती. ह्या मिशनरी लोकांच्या परिश्रमामुळें हिंदुलोकांत प्रथमतः जो कांहीं उत्साह उत्पन्न झाला होता, तो आतां हळूं हळूं थंडावूं लागला होता. तथापि, जरी ख्रिस्तीधर्माचीं तत्वें मान्य करण्याकडे सुशिक्षित हिंदुलोकांच्या मनाची प्रवृत्ति कमी कमी होऊं लागली होती, तरी पाश्चिमात्यांची नीतिमत्ता वरच्या दरजाची आहे असें, कबूल करण्यास अद्यापिहि ते लोक तयार होते. बंगाल्यांतील ब्रह्मसमाज, मुंबईचा प्रार्थनासमाज, मद्रासइलाख्यासुद्धां सर्व हिंदुस्थानभर ज्यारीनें सुरू असलेली सामाजिक सुधारणेची चळवळ व हिंदुसमाजास काळिमा लावणाऱ्या रानटी चालीरीती व भोळ्या धर्मस-

जुती यांस फांटा देऊन, त्याला उज्ज्वलरूप देण्यासाठीं चालू केलेल्या वरच्या प्रकरच्या आणखी इतर चळवळी, ह्यांवरूनच पाश्चिमात्य लोकांच्या नीतितत्वांचा पगडा हिंदुलोकांच्या मनावर पूर्णपणें बसला होता, ह्या गोष्टीची साक्ष पटते. राजा राममोहनराय, किंवा जुन्या मतांस अधिक चिकटून राहूं पाहणारे डा० टागोर, ह्यांची योग्यता बाबू केशव चंद्रसेनांच्या ठिकाणीं जरी कदाचित् नसली, तरी ह्या सर्वांच्या कल्पना एकच होत्या. हिंदु आणि ख्रिस्ती अशा दोन्ही धर्मांमधील अत्युत्तम तत्वांचा ज्यामध्यें समावेश आहे असा एक नवीन धर्म किंवा पंथ काढून, हिंदुलोकांचें हिंदुत्व न जाऊं देतां, त्यांची सर्वतोपरि सुधारणा कशी करितां येईल, हे विचार बाबू केशव चंद्रसेनांच्या डोक्यांत रात्रंदिवस घोळत असत.

त्याचप्रमाणें, नवीन सुशिक्षित लोकांनीं ‘ हिंदुस्थानची राजकीय परिषद् ’ ( न्याशनल कांग्रेस ) ह्मणून एक संस्था स्थापन करून, सौम्य प्रकारच्या ( नेमस्त ) राजकीय चळवळी चालू केल्या होत्या, त्यावरून त्यांना इंग्रजलोकांचें राज्य हिंदुस्थानांत नको होतें, किंवा इंग्रजी राज्यामुळें झालेले मोठमोठे फायदे त्यांना कबूल नव्हते, असें ह्मणतां येत नाहीं. आणि, पाश्चात्य लोकांच्या विद्याचारसंपन्नतेबद्दल ( संस्कृतीबद्दल ) त्यांना खरोखर मनापासून आनंद व आश्चर्य वाटत असे. कारण, इंग्रजी राज्यामुळें हिंदुस्थानचे लोक विद्याचारसंपन्न होऊं लागून, त्यांना सुखसंपत्तीचीं साधनें ओघानें प्राप्त होत होतीं; व त्याच ओघानें, जे नवीन राजकीय हक्क ते आपल्या राज्यकर्त्यांपासून मागत होते, ते आपणांस मिळाले पाहिजेत, असें त्यांस वाटत होतें. इंग्रज लोकांना चंबुगवाळ्यासुद्धां हिंदुस्थानांतून पिटाळून लावून, स्वराज्याचा झेंडा फडकवण्या-

साठीं जी भयंकर स्वरूपाची राजकीय चळवळ अलीकडे सुरू झाली आहे, तिच्या पुरस्कर्त्यांना, हिंदुस्थानच्या लोकांचे इंग्रजी राज्यापासून फायदे झाले आहेत, ही गोष्ट मुळींच कबूल नाहीं इतकेंच नाहीं, तर ज्या विद्याचारसंपन्नतेमुळें इंग्रजलोक आज हिंदुस्थानचें राज्य करित आहेत, तिचा श्रेष्ठपणाहि मान्य नाहीं. स्वराज्यासाठीं हपापलेल्या ह्या लोकांनीं असा अजब शोध लाविला आहे कीं, इंग्रजलोकांच्या राज्यतृष्णेस हिंदुस्थानदेश बळी पडून, त्याच्या सर्व सुखाची व ऐश्वर्याची राखरांगोळी होऊन जाण्यापूर्वीं, येथें रामराज्य सुरू असून, धनधान्याची समृद्धि होती, व तो सद्‌गुणांचें केवळ माहेरघर होता. आज मितीला देखील निःसंशय असे पुष्कळ थोर हिंदुलोक आहेत कीं, त्यांना इंग्रज लोकांपासून जें शिक्षण मिळालें आहे, त्याची खरी खुबी कळून आल्याकारणानें, त्या शिक्षणाचा त्यांच्या मनावर बराच चांगला परिणाम झाला आहे. त्यामुळें, ‘ स्वातंत्र्य ’ आणि ‘ स्वराज्य ’ ह्या गोष्टींबद्दल इंग्रज लोकांच्या ज्या कल्पना असतात व ज्यांबद्दल त्यांना मोठा अभिमान वाटत असतो, तशाच कल्पना वरील सुशिक्षित हिंदुलोकांच्या असून, तशाच प्रकारचा अभिमान ह्यांनाहि अगदीं मनापासून वाटत असतो; आणि इंग्रज राज्यकर्त्यांनीं एतद्देशीय लोकांवर फक्त अधिक विश्वास ठेवून, राज्यकारभारांत त्यांचा अधिक समावेश केला, तर हिंदुस्थानचा राज्यकारभार इंग्लंडांत प्रचलित असलेल्या राज्यपद्धतीवर बऱ्याच अंशानें चालवितां येईल, असें त्यांना प्रामाणिकपणें वाटतें. परंतु, अशा मताची मंडळी सांप्रत जुन्या पिढींतील सुशिक्षितांतच मुख्यतः आढळून येते.

हिंदुलोकांच्या धर्मकल्पना व त्या समाजांत रूढ असलेल्या

चालीरीती मिळून जी गोळाबेरिज होते, त्यास आपण सोईसाठीं 'हिंदुधर्म' असें नांव देतों. ह्या हिंदुधर्माचें अगदीं वरवर अवलोकन केलें, तरी त्यांतील तत्वज्ञानाच्या अमर्याद भराऱ्यांत उदात्त कल्पना दिसून येत नाहींत, अथवा त्यांच्या धर्मशास्त्रानें घालून दिलेल्या ज्ञातिनिर्बंधांच्या पायावर रचल्या गेलेल्या विलक्षण घोंटाळ्याच्या इमारतींत आश्चर्य वाटण्यासारखा खंबीरपणा दिसून येत नाहीं, असें कोणासहि ह्मणतां येणार नाहीं. अति-गहन आत्मवाद व अगदीं कनिष्ठप्रतीचा देहात्मवाद, सर्वसंग-परित्याग व विषयलोलुपता, आत्मा आणि परमात्मा ह्यांची एकरूपता मानण्यांत दाखविलेली विलक्षण प्रौढी आणि मनुष्य-प्राण्याचा ईश्वराचे ठिकाणीं व ईश्वराचा मनुष्यप्राण्याचे ठिकाणीं होणारा लय, ह्या परस्परविरोधी गोष्टींचा हिंदुधर्मांत केलेला मिलाफ पाहिला; तसेंच, संसारसागर दुःखमय असून ती एक माया आहे; व ह्या दुःखांतून सुटण्याचा एकच मार्ग ह्मटला ह्मणजे सर्व जग हा मिथ्या पसारा आहे असें मानून, मोक्षप्राप्तीच्या मार्गानें जन्ममरणाचा फेरा चुकवावा, अशा प्रकारच्या मनुष्यत्वाची हानि करणाऱ्या व त्यास निराशावादी बनविणाऱ्या कल्पना पाहिल्या, ह्मणजे ह्या गौडबंगालाचा उमज पडणें कल्पनातीत आहे, असें वाटूं लागतें. हिंदुधर्मांतील जातिनिर्बंधांचा कडकपणा पाहून जसा मनाला तिटकारा येतो, तसाच बहुधा त्याचीं पुराणें वाचून येतो. हिंदुधर्मानें आपल्यांतील कोट्यवधि लोकांना इतक्या नीच स्थितीस आणून पोहोंचविलें आहे कीं, त्या हतभागी लोकांच्या स्पर्शानेंच नव्हे, तर त्यांच्या सावलीनेंहि, उंच जातींत जन्म पावल्यामुळेंच केवळ श्रेष्ठ ठरूं पाहणाऱ्या लोकांस विटाळ होतो. तथापि, पृथ्वीवरील मानवी जातीच्या बऱ्याच लोकांचे धार्मिक

व सामाजिक आचारविचार, तीन हजार वर्षांपेक्षांहि अधिक काळ, ह्या धर्माप्रमाणें चालत आले असून, त्यांच्या ऐहिक व पारलौकिक गरजा भागत आल्या आहेत, ही गोष्ट लक्ष्यांत ठेविली पाहिजे. हल्लींचा हिंदुधर्म ह्मटला ह्मणजे, अति प्राचीन काळीं ह्या देशांत जी विद्याचारसंपन्नता नांदत होती, तिचाच अवशेष आहे; आणि ह्मणूनच, त्यास ते लोक अगदीं हृदयाशीं धरून राहूं पाहतात, व ह्यांत कांहीं आश्चर्य नाहीं. त्याचप्रमाणें, समाजास व्यवस्थित स्वरूप दिलें असतां व आधिभौतिक शास्त्रांच्या ( रसायन, पदार्थविज्ञान, इंद्रियविज्ञान, भूगर्भ, जीवन इत्यादि शास्त्रें ) शोधांचा फायदा घेतला असतां, समाजाच्या अंगीं जें सामर्थ्य उत्पन्न होतें त्याच्या जोरावर अभ्युदय पावणारी अशी परकी लोकांची विद्याचारसंपन्नता एतद्देशीयांच्या नजरेसमोर येतांच, त्यांच्या मनावर एकदम धक्का बसल्यासारखा जो परिणाम झाला होता व परकीयांच्या प्रत्येक गोष्टीबद्दल चमत्कार वाटूं लागला होता, ती स्थिति बदलूं लागल्याबरोबर प्रतिक्रिया सुरू होऊन, लोकमताच्या प्रवाहाचा ओघ उलट दिशेनें वाहूं लागला, ह्यांतहि कांहीं नवल नाहीं. शिवाय दुसरी गोष्ट अशी आहे कीं, इंग्रज लोकांचें हिंदुस्थानांतील राज्य, त्यामुळें येथील बेबंदशाहीचा झालेला नायनाट, जिकडे तिकडे दिसून येणारी व्यवस्था, व त्यामुळें रयतेच्या जिवास आणि मालमत्तेस आलेला सुरक्षितपणा इत्यादि गोष्टींचा नवीनपणा हळूं हळूं निघून गेल्यावर, ज्या लोकांना पूर्वीच्या एतद्देशीय राज्यपद्धतीच्या दुःखाची आणि त्रासाची कल्पना होण्यासारखी नव्हती, त्यांस इंग्रजी अमलांतील निर्बंधामुळें संताप उत्पन्न होऊं लागावा, हें अपरिहार्य होतें. तथापि, लोकमताचा ओघ अशा रीतीनें

उलटून, गोष्टी ह्या थरास आल्या, हें पाहून धैर्य खचतें व मन भीतीनें ग्रासून जातें. कारण, हिंदुस्थानांतील इंग्रजांचें राज्य व तें चालविण्याच्या रीती ह्यांबद्दल तरुण हिंदुलोकांना अत्यंत विषाद वाटत असून, त्याचीं पाळेंमुळें त्यांच्या हृदयांत खोल गेलीं आहेत इतकेंच नाहीं, तर पाश्चिमात्य लोकांच्या विद्याचारामुळें हिंदुस्थानावर जे कांहीं परिणाम झाले आहेत, त्या सर्वांबद्दल त्यांना अत्यंत वाईट वाटत आहे; आणि ह्मणूनच हिंदुलोकांच्या मूळधर्मकल्पना व चालींरीती ह्यांचें पुनरुज्जीवन करण्याचा--ह्मणजे त्या चांगल्या आहेत असें ठरवून, पुनरपि हिंदुसमाजांत त्या चालू करण्याचा--उद्योग, सध्यांच्या राजकीय स्थितीबद्दल लोकांत असंतुष्टपणा पसरविण्याच्या चळवळीबरोबरच सुरू आहे.

तीस वर्षांपूर्वीं अशी स्थिति होती कीं, कांहीं चालींरीती वाईट आहेत असें सुशिक्षित हिंदुलोकांनीं प्रांजलपणें कबूल केलें नाहीं, तरी त्या चांगल्या आहेत, असें ठरविणें त्यांना जड जाई; परंतु त्याच गोष्टी 'उत्तम' आहेत, असें ह्मणण्यांत आतां लोकांची फारच उत्कंठा दिसून येते. हिंदुधर्मांतिल असंख्यात देवच्या रूपानें त्यांतील सनातन तत्वें दर्शविण्याचा एक मार्ग आहे, असें प्रतिपादन करण्यांत येत असतें इतकेंच नाहीं, तर हिंदुधर्मांतील देव व देवता ह्यांच्या ठिकाणीं पुनः पवित्रता स्थापन करण्यांत येत आहे, ह्मणजे त्यांचें प्राचीन माहात्म्य लोकांनीं पुनः मान्य करावें, अशा प्रकारचे प्रयत्न होत आहेत. ब्रह्मसमाजाच्या हातून अझूनहि कांहीं चांगलें काम होत आहे. परंतु त्याचा जोम दिवसेंदिवस कमी होत चालला आहे. ह्या संस्थेच्या द्वारें प्रसिद्ध होणारा ग्रंथसंग्रह जरी अद्यापि बराच मोठा आहे, तरी सभासदांची संख्या एकसारखी कमी होऊं लागल्याकारणानें,

त्याला क्षयाची भावना झाली आहे, असें ह्मणावें लागतें. प्रार्थनासमाज तर मरणाच्या दारींच बसलेला आहे. लोकांची हल्लींची प्रवृत्ति ह्मटली ह्मणजे धार्मिक पुनरुज्जीवनें करण्याकडे असून, त्यांमध्यें प्राणिहत्येची अत्यंत आवड असणाऱ्या व जगाचा संहार करण्याचें काम हातीं घेणाऱ्या **कालीमातेची** पूजा, अथवा हिंदुस्थानांतील परकी मुसलमानी राजांचा गर्व परिहार करणाऱ्या **शिवाजीमहाराजाचा** उत्सव, अशा गोष्टींना विशेष महत्त्व दिलें जातें. पंजाब व अयोध्याप्रांत इकडे आर्यसमाजाच्या मतांचा प्रसार होत आहे, हें तरी जुन्या हिंदुधर्माविरुद्ध एक प्रकारचें बंडच आहे. परंतु दुसऱ्या बाजूनें पाहतां, पाश्चिमात्य शिक्षणामुळें हिंदुसमाजांत घुसूं पाहणाऱ्या नवीन धर्मकल्पनांवरहि आर्यसमाजाची करडी नजर आहे. कारण, ह्या 'समाजाचा' मूळस्थापक जो दयानंद सरस्वती त्याच्या मतांस अनुसरून, आर्यसमाज दुसऱ्या धर्मांतील लोकांस आपल्या धर्मांत आणण्याचा प्रयत्न करितो. दयानंदाच्या मतें, 'वेद' हे सर्व प्रकारच्या मानवी व दैवी ज्ञानाचें मूळस्थान आहेत; आणि ह्मणून आर्य ह्मणजे हिंदुधर्म, सर्वांहून श्रेष्ठ आहे. वेदांततत्वज्ञानाच्या महतीविषयीं पुष्कळ युरोपिअन पंडितांचा चांगला ग्रह आहे, तसाच उपनिषदांतील सूक्ष्म सौंदर्याविषयींहि आहे. वेदामध्यें बीजरूपानें असणारें ज्ञान उपनिषदांत प्रगट करून दाखविलें आहे. उपनिषदांचे कर्ते निरनिराळे ऋषी असल्याकारणानें, वेदांतर्गत एकच ज्ञान भिन्न भिन्न रूपानें जगापुढें मांडण्यांत आलें आहे; व पुष्कळ वेळां त्यामध्यें परस्पर विरोधहि दिसून येतो. हिंदुलोकांची स्वाभाविक प्रवृत्ति ह्मटली ह्मणजे भिन्न भिन्न विचारसरणींतून आपल्या मनाला जें चांगलें दिसेल तें घ्यावयाचें. त्यामुळें, एकाच वेदावरून जरी

अनेक उपनिषदें झालीं आहेत, तरी त्यांपासून त्यांच्या मनाचें समाधान होतें, व अशीं भिन्न मतें होण्यांत कांहीं विपरीत आहे, असें त्यांस वाटत नाहीं. पण वेदांत सांगितलेलीं नीतितत्वें पूर्णत्वास गेलेलीं आहेत, इतकें ह्मणण्यानें आर्यसमाजवाल्यांचें समाधान होत नाहीं. 'हिंदु' हा शब्द परक्या भाषेंतील आहे असें समजून, तो सोडून देऊन, त्याऐवजीं 'आर्य' हा शब्द घेतला आहे; आणि पाश्चिमात्य लोकांच्या विद्याचारापेक्षां आर्यलोकांचे मूळचे विद्याचार श्रेष्ठप्रतीचे होते, हें सिद्ध करण्याकरितां, नवीन अस्तित्वांत आलेलें शास्त्रीय ज्ञान—बिनतारेनें निरोप पाठविण्याची व विमानें उडविण्याची विद्यादेखील—वेदामध्यें बीजरूपानें वसत आहे, असा विलक्षण शोध लागल्याबद्दल मोठ्या कंठरवानें सांगण्यांत येत असतें!

ब्रिटिश पार्लमेंटमधले थोडेसे सभासद व हिंदुस्थानच्या लोकांना सहानुभूति दाखविणारे कांहीं युरोपिअन व अमेरिकन लोक, ह्यांच्याकडून हिंदुस्थानांतील राजकीय चळवळीस मोठें उत्तेजन मिळालें आहे. त्याचप्रमाणें, ह्या हिंदुधर्माच्या पुनरुज्जीवनास बहुतेक युरोपिअन व अमेरिकन लोकांचें प्रोत्साहन आहे. किंबहुना कांहीं अंशीं ह्याच लोकांच्या उठावणीवरून ही धर्मजागृति हिंदुस्थानांत झाली आहे. म्याक्सम्युलर, डयुश अशासारख्या इंग्रज व जर्मन पंडितांचे लेख, सुशिक्षित हिंदुलोकांचें लक्ष आपल्या प्राचीन ग्रंथांकडे व धर्मपद्धतींकडे वेधण्यास पुष्कळ अंशीं कारणीभूत झाले इतकेंच नव्हें, तर युरोपिअन लोकांनीं वादविवादात्मक पद्धतीनें लिहिलेल्या लहान लहान पुस्तकांच्याच साहाय्यानें, ख्रिस्ती लोकांच्या संघट्टनामुळें हिंदुसमाजावर जो कांहीं परिणाम झाला होता, तो हाणून पाडण्याचा प्रयत्न हिंदुधर्माचें पुनरुज्जीवन

करूं पाहणाऱ्या पुढाऱ्यांस सहज करितां आला. ह्या गोष्टींचा उपक्रम मद्रासच्या 'हिंदु-ट्रॅक्ट सोसायटीनें' सन १८८७ सालीं केला, तो असा कीं, मुख्यतः मद्रासइलाख्यांत ज्या ख्रिस्ती मिशनऱ्यांनीं पाश्चिमात्य शिक्षणाचा पाया घातला होता, त्यांच्याच विरुद्ध धर्माच्या नांवाखालीं लोकांस उठविण्याचा प्रयत्न सुरू केला. ब्राडला व त्याच्या मताच्या आणखी दुसऱ्या, पण कमी योग्यतेच्या, ग्रंथकारांच्या पुस्तकांचें भाषांतर एतद्देशीय भाषांतून करण्याविषयीं जिकडे तिकडे उत्सुकता दिसूं लागली; व 'ब्रह्मचर्यापासून तोटे' अशा पुस्तकांवर लोकाच्या उड्या पडूं लागल्या. कारण, वरील पुस्तकांत ख्रिस्तीधर्मशास्त्राचीच नव्हे, तर ख्रिस्तीलोकांच्या नीतिमत्तेचीहि फटफजेती उडवून, उपहास केलेला आहे. माडेम ब्ल्याव्हाटस्की व कर्नल आल्काट ह्या उभयतांनीं हिंदुस्थानांत 'थिआसफी' आणली, त्यामुळें हिंदुधर्माच्या पुनरुज्जीवनास आणखी प्रोत्साहन मिळालें. वास्तविक पाहतां, मिसेस बिझांटनें हिंदुधर्माच्या पुनरुज्जीवनास जितकें व्यवस्थित रूप आणिलें आहे व त्याची बळकटी जशी वाढविली आहे, तसें एकाहि हिंदूच्या हातून झालें नाहीं. श्रीकाशीक्षेत्रीं 'सेंट्रल हिंदुकॉलेज' व मद्रासेजवळ 'आडिआर' येथें थिआसफीचें मुख्य ठिकाण अशा संस्था स्थापन करून, ज्या विद्याचारसंपन्नतेबद्दल (संस्कृतीबद्दल) पाश्चात्य लोकांना एवढा मोठा अभिमान वाटतो, तिच्यापेक्षां हिंदुधर्म सर्वतोपरि श्रेष्ठ असल्याबद्दल आपली पूर्ण खात्री आहे, असें सर्व जगास बिझांटबाई अगदीं उघडपणें सांगत आहे. बिझांटबाईसारखी मोठी नामांकित व वक्तृत्वसंपन्न युरोपिअन विदुषी हिंदुलोकांस असें सांगत आहे कीं, 'केवल ज्ञानाच्या (सर्वांत श्रेष्ठ असणाऱ्या ज्ञानाच्या) किल्ल्या नेहमींच तुमच्या हातांत होत्या

व सध्यांहि आहेत. तुमचे देव, तुमचें तत्वज्ञान व तुमची नीतिमत्ता वरच्या प्रतीची असून, पाश्चिमात्य लोकांना अशा प्रकारच्या उच्च कल्पनांची आजपर्यंत गंधवार्ताहि नव्हती.' तेव्हां, आम्हां इंग्रजलोकांच्या विद्याचाराबद्दल आतां हिंदुलोकांस आदर वाटेनासा झाला आहे, ह्यांत काय आश्चर्य? युरोपिअन लोकांकडूनच अशा प्रकारचें अत्यंत श्रेष्ठस्थान हिंदुधर्मास मिळून त्याची थोरवी वाढविण्यांत आल्यावर, आपली पुरातन पद्धति, ह्मणजे स्वधर्माचें संरक्षण करित राहून, अन्यधर्मी लोकांस आपल्या धर्मांत न घेण्याची वहिवाट सोडून, हिंदुलोकांनीं युरोप अमेरिकेमध्यें गाढ अज्ञानांधकारांत चांचपडणाऱ्या लोकांस हिंदुधर्माचीं तत्वें शिकवून, त्यांच्या ठिकाणीं दिव्यदृष्टि आणून, त्यांचा उद्धार करण्याच्या सद्धेतूनें आपले उपदेशक पाठवावे, ह्यांत तरी काय नवल? शिकागोच्या धर्मपरिषदेस स्वामी विवेकानंदास पाठविलें होतें, ह्यावरूनच हिंदुधर्माच्या पुनरुज्जीवनाचें नवीन धोरण कळून येतें. हिंदुधर्माच्या इतिहासांतहि ही गोष्ट अत्यंत महत्त्वाची व विशेष लक्ष्यांत ठेवण्यासारखी समजली जाईल. पण, स्वामीमहाराजांनीं परत स्वदेशीं येतांना, विजयचिन्ह ह्मणून आपल्याबरोबर तिकडून जी निवडक शिष्यमंडळी आणली व त्यांच्या ठिकाणीं जी उत्सुकता दिसली, त्यामुळें स्वधर्माचा सर्वत्र प्रसार कारण्याच्या ह्या नवीन चळवळीस जास्तच महत्व आलें.

वास्तविक पाहतां, हिंदुधर्म जसा 'अनंत' आहे, तसेंच हिंदुधर्माचें पुनरुज्जीवन 'अनंत' स्वरूपानें अवतरूं लागलें आहे. परंतु, अत्यंत महत्वाची ह्मणून जी गोष्ट आह्मी सदैव लक्ष्यांत ठेविली पाहिजे ती अशी कीं, ज्या ज्या ठिकाणीं राजकीय चळवळीस अत्यंत उग्र स्वरूप येतें, त्या त्या ठिकाणीं ह्या पुनरुज्जीवना-

च्या चळवळींतहि अत्यंत उच्छृंखलपणा नजरेस पडतो. लोकांना प्रिय असणाऱ्या मुख्य मुख्य देवांपैकीं कोणा एकास आपलें 'दैवत' करून, त्याच्या प्रसादानें आपल्या प्राणघातकी राजकीय चळवळी यशस्वी करण्याचा प्रयत्न 'गुप्त मंडळ्या' करित असतात. 'गंगोदक' किंवा 'तुळशीपत्र' हातांत घेऊन, अथवा बळी दिलेल्या प्राण्यांच्या रक्तानें तुष्ट होणाऱ्या 'महादेवीच्या' समोर उभे राहून, शपथ घेण्याची राजकीय गुप्तमंडळ्यांतील लोकांची रीत असते. अशा 'मंडळ्यांत' नवीन लोकांस घेण्याच्या वेळीं मंत्रतंत्र, जादुटोणा, गंडेदोरे, अंगाराधुपारा, ताईत, आणाशपथा इत्यादि गोष्टींस फारच महत्त्व दिलें जातें. कित्येक ठिकाणीं शक्तिपूजेचें बंड माजून, त्यांतील गलिच्छ व अंगावर कांटा आणणारे भयंकर प्रकार लोकप्रिय होऊं लागले आहेत. नाशिक येथील कलेक्टर मि० ज्याकसन यांचा खून करण्याच्या उद्देशानें, ज्या ब्राह्मणांच्या मुलांनीं आणि तरुण मंडळींनीं गुप्त कट केला होता, त्यांचा दुष्टपणा व नीचपणा पाहिला म्हणजे क्रांतिकारक (इंग्रजीराज्य उलथून पाडण्यासाठीं केलेल्या) चळवळी करणाऱ्या हिंदुलोकांचीं डोकीं कशीं बिघडून गेलीं आहेत, ह्याचा उत्तम मासला दृष्टीस पडतो. अशा प्रकारची दुष्ट प्रवृत्ति साऱ्याच हिंदुलोकांत दिसून येते असें म्हणण्यापेक्षां, कांहीं थोड्या बहकलेल्या राजकीय चळवळ करणारांत मात्र ती फारच दिसून येतें, असें म्हटलें पाहिजे. आतां, सर्वच राजकीय चळवळे अशा नीच वृत्तीचे असतात असें नाहीं. कित्येकांची भिस्त भगवद्गीतेसारख्या धर्मग्रंथावर असून, त्या आधारावर हे लोक फंदफितूर पसरविण्याचें काम करित असतात. अशा लोकांस क्रांतिकारक चळवळी करण्यास धर्मग्रंथांत आधार न मिळता, तर इतर कोणत्याहि गुन्ह्या-

प्रमाणेंच, राजकीय गुन्हे करण्यास ते कधींहि तयार झाले नसते. हिंदुधर्माच्या साऱ्या ग्रंथांत भगवद्गीतेसारखा सुंदर ग्रंथ नाहीं. आध्यात्मिक विषयांचा विचार करणाऱ्या सुज्ञ लोकांस ह्या ग्रंथापासून जसें समाधान होतें, तसें इतर ग्रंथांपासून होत नाहीं. परंतु अशा तत्वज्ञानात्मक बहुमोल ग्रंथांतील शब्दांची, वाक्यांची अथवा विचारांची विलक्षण ओढाताण करून, हिंदुधर्मासाठीं खुनासारखे गुन्हे करण्यास धर्माची, ह्मणजे प्रत्यक्ष ईश्वराची, आज्ञा आहे, असें राज्यक्रांति घडवून आणण्यासाठीं वेडावून गेलेल्या हिंदुलोकांनीं ठरवून टाकिलें आहे; व त्याप्रमाणें लोकांस त्यांचा उपदेशहि असतो. आतां, राजकीय बाबतींत **जहाल** असणारे लोकच फक्त हिंदुलोकांच्या धार्मिक मनोवृत्तीचा फायदा घेतात, असें नाहीं. हिंदुधर्माच्या उद्धारासाठीं ज्या धार्मिक व सामाजिक चळवळी सध्यां चालू आहेत, त्यांतील सूक्ष्म भेद सांगणें जितकें दुर्घट आहे, तितकेंच **नेमस्त, जहाल, क्रांतिवादी** इत्यादि पक्षांतील बारीक बारीक भेद बरोबर रीतीनें सांगणें बहुधा दुरापास्त आहे. मात्र, कलकत्यास बाबु सुरेंद्रनाथासारख्या, आपणांस **नेमस्त** ह्मणविणाऱ्या, बंगाली राष्ट्राच्या पुढाऱ्यांनीं, जगाचा संहार करण्याच्या कामावर नेमलेल्या **कालीमातेच्या** देवळांतील पटांगणांत, त्या भयंकर मूर्तीसमोर, **वंगभंगा**विरुद्ध गवगवा करण्याकरितां हजारों लोकांच्या जाहिरसभांत आवेशाचीं भाषणें करून, आपल्या अनुयायांस **स्वदेशीच्या** शपथा दिल्या आहेत. त्याचप्रमाणें, महाराष्ट्रांतील हिंदुलोकांची गणपतीच्या ठिकाणीं बहुधा जी भक्ति असते तिचा फायदा घेऊन, गणपतिउत्सवाची नवीन टूम काढून, लोकांत इंग्रजी राज्याविषयीं असंतोष फैलावण्याचा जो उद्योग झाला, तोहि ध्यानांत ठेवण्यासारखा आहे.

हिंदुधर्माचें महत्त्व वाढून, पाश्चिमात्य लोकांच्या विद्याचारांबद्दल वाईट ग्रह करण्याविषयींच्या चळवळीबरोबरच, इंग्रज लोकांविषयीं असलेल्या द्वेषबुद्धीनें प्रेरित होऊन, त्यांच्या हरएक गोष्टीची हेटाळणी करण्याचा उद्योग सुरू झाला. इंग्रज ह्मटला ह्मणजे त्याचा जन्म केवळ गरीब लोकांचें रक्त शोषण करून, त्यांच्यावर जुलूमजबरी करण्याकरितांच झाला आहे, असें भासविण्याचा प्रयत्न होऊं लागला; त्याच्या स्वतःच्या नेकीबद्दल शंका येऊन, त्याची थट्टा होऊं लागली; त्याच्या राज्यपद्धतीचा रोंख जाणून बुजून लोकांना दारिद्य आणण्याकडे, किंबहुना हिंदुस्थानची लोकसंख्याहि कमी करण्याकडे, आहे, असें प्रतिपादन करण्यांत येऊं लागलें; त्याच्या सामाजिक चालीरीतींत नीतिभ्रष्टता असल्यामुळें तो आचारभ्रष्ट असून, त्याच्या स्त्रियाहि अगदीं स्वेच्छाचारी असतात, असे दोषारोप होऊं लागले. हिंदुस्थानांत सर्वत्र अस्वस्थता उत्पन्न करण्याकरितां लेखनद्वारां जे प्रयत्न चालू आहेत, त्यांत हिंदुधर्मांतील ग्रंथ व देवदेवता ह्यांचा उपयोग केला जातो. तसेंच, लोकांच्या धर्मसमजुतींचा फायदा घेऊन, जातीजातींत द्वेषभाव वाढविण्याची शक्य तेवढी खटपट सुरू आहे. ह्या दोन मार्गांनीं जें कार्य साधत आहे, तेंच इंग्रजलोकांची वरच्याप्रमाणें हरएक बाबतींत अगदीं पद्धतशीरपणानें नालस्ती करून कमी साधतें, असें ह्मणतां येत नाहीं. हिंदुस्थानांत 'एकराष्ट्रीयत्वाची' जी लाट उसळली आहे; तिची सारी भिस्त 'स्वदेशी' आणि 'स्वराज्य' ह्या गोष्टींवर आहे. तथापि वसुलाच्या, किंबहुना राजकीय बाबतींत, हिंदुस्थानास पूर्ण स्वातंत्र्य असलें पाहिजे, ह्या ह्मणण्याच्या फार पलीकडे सदरहु चळवळीचा अंतस्थ हेतु आहे, तो असा कीं, ह्या देशांत परकी

लोकांनीं जे विचाराचार आणिले आहेत त्यांचा बीमोड करून, धार्मिक, सामाजिक, बौद्धिक व नैतिक गोष्टींत ह्या देशाला त्याचें पुरातन स्वरूप प्राप्त करून द्यावयाचें. ह्या नवीन चळवळीच्या पुरस्कर्त्यां-पैकीं कांहीं लोकांच्या सरळपणाबद्दल शंका घेतांच यावयाची नाहीं. अरविंद घोषासारख्या लोकांस पक्कें वाटत असतें कीं, हिंदुस्थानांतील सर्व लोक मनानें आपल्या बाजूचे आहेत; न्यायनीति आपल्या बाजूला आहे; निसर्ग (स्वाभाविक परिस्थिति) आपल्या बाजूचा आहे; प्रत्यक्ष ईश्वरीसूत्र आपल्या बाजूचें असल्यावर, मग त्या ठिकाणीं मानवी कायदेकानूचा काय पाड आहे? सारांश, आम्हीं जें कांहीं आरंभलें आहे, त्यास सर्वप्रकारची अनुकूलता आहे.

सांप्रत हिंदुस्थानांत अशा प्रकारची स्थिति आहे; व तिचा मोठ्या गंभीरपणानें विचार केला पाहिजे. हा अर्धवट शिकलेल्या लोकांचा कांहीतरी मूर्खपणा आहे, हें एक खुळ आहे, असें म्हणून, त्यास तुच्छ मानून, गोष्ट सोडून देतां यावयाची नाहीं. अथवा, पूर्वेकडील (आशिया खंडांतील) लोकांच्या अगदीं अंगीं खिळलेल्या नीचपणाचें व कृतघ्नतेचें हें आणखी एक उदाहरण आहे असा स्वतःकडे साधुपणा घेऊन, वरील प्रश्नाची उडवाउडव करून परिणाम लागावयाचा नाहीं. बुद्धिवैभव आणि नीतिमत्ता ह्या गोष्टींत ज्या लोकांची योग्यता लहान नाहीं, अशा लोकांच्या अंतर्यामामध्यें जी खळबळ मोठ्या जोरानें चालू आहे, तिचें स्वरूप वर सांगितल्याप्रमाणें बाहेर प्रगट झालेलें आहे, ह्यांत बिलकुल संशय नाहीं. आतां, आरंभीं ह्या खळबळीमुळें जरी पुष्कळसा मळ वर उठून आला आहे, तरी त्याखालीं कांहीं उत्कृष्ट गोष्टी चमकत असून, कालांतरानें त्यांना शुद्ध, स्वच्छ स्वरूप प्राप्त होऊन, त्या पृष्ठभागावर तरंगत येतील. आम्हा इंग्रज

लोकांचें राज्य व विद्याचारसंपन्नता ह्यांचा जय व्हावयाचा असेल, तर आपल्या शिरावरील जबाबदारीचा आपणांस विसर पडतां कामा नये. त्याचप्रमाणें, आह्मीं येथें येऊन ज्या गोष्टींचा उपक्रम केला, त्यांचा हा परिणाम आहे, ह्याहि गोष्टीची विस्मृति होऊं नये. हिंदुस्थानच्या कित्येक प्रदेशांत अस्वस्थता माजविण्याच्या कामीं ब्राह्मणीधर्मानें जसा पुढाकार घेतला आहे, तसा इतर ठिकाणीं नाहीं. व ह्या गोष्टींचीं साधारपणें जीं कारणें आहेत, तीं शोधण्यास फार लांब जाण्याची जरूरी नाहीं. ज्या ज्या ठिकाणीं ब्राह्मणीधर्माची चळवळ मोठ्या नेटानें सुरू आहे, त्या त्या ठिकाणीं, पाश्चिमात्य लोकांच्या सहवासामुळें इकडे आलेल्या प्रत्येक गोष्टीचा बींमोड करण्याच्या हेतूनें, देशांत अस्वस्थता उत्पन्न करणाऱ्या बाजूचाच इतर गोष्टींपेक्षां अधिक पगडा दिसून येतो. इंग्रजी विद्येमुळें ज्यांचीं मनें सुसंस्कृत झालीं आहेत, असे कांहीं हिंदुलोक अगदीं मनःपूर्वक आपल्या कर्तव्यास जागून, हिंदी आणि युरोपिअन विद्याचारसंपन्नतांमध्यें जें अंतर आहे, तें भरून काढण्याचा प्रयत्न मोठ्या आस्थेनें व धैर्यानें अद्यापिहि करित आहेत. तथापि, ब्राह्मणधर्माची मूळची रचनाच अशी आहे कीं, ज्या विद्याचारसंपन्नतेमुळें इंग्रज लोकांचें राज्य हिंदुस्थानांत आहे, तिचें आणि ब्राह्मणधर्माचें 'अहिनकुलवत्' सख्य असावयाचें. ह्याचा अर्थ असा कीं, ह्या दोन गोष्टी अगदीं परस्परविरोधी असल्यामुळें, त्या एकत्र नांदणें शक्यच नाहीं. अतिप्राचीन काळापासून ब्राह्मणीधर्माचें हिंदुसमाजावर पूर्ण वर्चस्व आहे; ह्मणजे, ज्ञातिनिर्बंधाची पद्धत सर्व हिंदुलोकांना पूर्णपणें मान्य आहे. आणि हिंदुस्थानांतील सर्व धर्मांच्या पंथांच्या व जातींच्या लोकांचें मिळून एक मोठें राष्ट्र आहे, असा भ्रम

बाळगणाऱ्या लोकांच्या मतें, ह्या वर सांगितलेल्या सामाजिक वर्चस्वाचा उपयोग हिंदुस्थानच्या अभ्युदयासाठींच झालेला आहे. अशा लोकांपैकीं एकजण ह्मणतो कीं, " विदेशी लोकांच्या शेंकडों वर्षांच्या जुलुमामुळें हिंदुमातेचा अस्थिपंजर झाला आहे; तरी अद्यापि तिच्या अंगांत मूळचा जोम कायमच आहे. कारण कीं, तिच्या ठिकाणची आपली निष्ठा ब्राह्मण लोकांनीं कधींहि रतिभरदेखील ढळूं दिलेली नाहीं. हिंदुमातेनें अनेक राजकीय व सामाजिक क्रांत्या पाहिल्या आहेत; दुष्काळ व रोगराईमुळें तिची शोभा नष्ट झाली आहे; परंतु कालचक्राच्या फेऱ्यामुळें तिच्यावर आलेल्या सर्व संकटाच्या वेळीं ब्राह्मणांनीं तिचें साहाय्य केलें आहे; ब्राह्मणांमुळेंच ती वैभवाच्या उच्च शिखरावर जाऊन बसली होती; आणि ब्राह्मणांच्याच हातून यज्ञयागादि रूपानें तिची जी सेवा होत आहे, त्यामुळें तिच्या पुत्रांच्या हतवीर्य झालेल्या अंतःकरणांत आशेचा अंकुर उत्पन्न होऊन, त्यांना धैर्य येतें."

हिंदुलोकांत धर्मगुरूचें काम ब्राह्मण जातीकडे आहे. ह्या लोकांना आपल्या कुलीनत्वाचा अत्यंत अभिमान असून, आपल्या जातींत अन्य कोणाचा बिलकूल प्रवेश होऊं देत नाहींत; व अशी तऱ्हा साऱ्या दुनयेंत दुसऱ्या कोठेंहि आढळण्यांत येत नाहीं. ह्याचें कारण, आपल्या जातीची (ब्राह्मणांची) उत्पत्ति प्रत्यक्ष परमेश्वराच्या मुखापासून झाली, अशी त्यांची समजूत आहे. ख्रिस्तीलोकांच्या जुन्या करारांत सांगितलेले 'लिव्हाइट' खेरीज करून, ब्राह्मणजातीला जितके अधिकार आहेत, तितके जगांत दुसऱ्या कोणालाहि नाहींत. एखादा महान् पराक्रमी चक्रवर्ती राजा ह्मणेल कीं, मी कोणाला ब्राह्मण करीन, किंवा एखाद्याचें

ब्राह्मणत्व हिराऊन घेईन, तर ही गोष्ट कालत्रयींहि होणार नाहीं. बुद्धिवैभव कितीहि विशाल असो; कितीहि मोठालीं कामें हातून घडोत; प्रत्यक्ष सद्‌गुणांचा पुतळा असो; तरी कोणाहि ब्राह्मणेतरास ब्राह्मण होतां येत नाहीं. प्राचीनकाळीं हिंदुधर्मांतील ज्ञातिनिर्बंध आतांइतके कडक नसले पाहिजेत. नाहींतर, आर्यब्राह्मणांखेरीज मद्रासइलाखा, कर्नाटक वगैरे भागांत जे पुष्कळ द्रविडी (पंचद्रविड) ब्राह्मण आहेत, ते दिसले नसते. हल्लीं मात्र स्थिती अशी आहे कीं, इतर जातींत जन्म पावलेल्या कोणाहि माणसास 'ब्राह्मण' करून घेण्याचें सामर्थ्य ब्राह्मणजातींतहि राहिलें नाहीं. पण कोणीं ब्राह्मणानें निर्विकल्प अशा ज्ञातिनिर्बंधांस सोडून वागणूक केली, तर त्याला ज्ञातिबहिष्कृत करण्याचा अधिकार त्याच्या ज्ञातिबांधवांस आहे; आणि बहिष्कार पडलेल्या मनुष्याच्या हातून घडलेल्या अपराधाची प्रायश्चित्तानें शुद्धि होण्यासारखी नसली, किंवा प्रायश्चितानें शुद्धि होण्यासारखी असूनहि त्याला पावन करून परत जातींत घेतलें नसलें; तर तो आणि त्याचे वंशज पतित होऊन, ब्राह्मणत्वास कायमचे मुकतात. अगदीं वेदकाळापासून ह्या पृथ्वीवर आपलें अस्तित्व आहे, ही गोष्ट सिद्ध करण्याची ब्राह्मणांस अडचण पडली, तरी ईश्वर आणि मनुष्यप्राणी, ह्यांच्यामध्यें मध्यस्थी (दलाली) करण्याचा अधिकार फक्त आपणांसच आहे, हा हक्क शाबित होऊन त्याप्रमाणें अंमलबजावणी होऊं लागल्यास, आज दोनहजार वर्षांपेक्षांहि अधिक काळ लोटला आहे. हिंदुधर्मांतील सर्व विधि ज्या प्राचीन भाषेंतून—संस्कृतांतून—चालतात, तिचा मक्ता ब्राह्मणांच्या हातीं राहिल्यामुळें, संस्कृतभाषा मृत होऊन गेल्यानंतर—ह्मणजे ती प्रचारांतून नाहींशी झाल्यानंतर—पुष्कळ काळपर्यंत सर्व विद्येचें भांडार

ब्राह्मणांच्या ताब्यांत राहिलें. युरोपच्या मध्ययुगांत ( लुथरनें रोमन क्याथालिक धर्मगुरूंच्या, ह्मणजे पोपच्या, साम्राज्याविरुद्ध बंड करण्यापूर्वीं ) ल्याटीनभाषेंतून सर्व धर्मविधि होत असल्या कारणानें, ख्रिस्ती धर्मोपदेशकांचें फारच प्रस्थ वाढलें होतें, त्याचप्रमाणें हिंदुराजांच्या दरबारांत राजकीय, धार्मिक व सामाजिक बाबतींत सल्लामसलत देण्याचें काम ब्राह्मणांकडेच असे. हल्लीं देखील अशी स्थिति आहे कीं, धर्मग्रंथाचा अर्थ फक्त ब्राह्मणानांच लावतां येतो; देवळांतील देवांजवळ त्यांनाच जातां येतें; आणि कोणा ब्राह्मणेतर हिंदूस देवाची पूजाअर्चा करणें असल्यास, त्यानें आपलें मनोगत ब्राह्मणांस सांगितलें पाहिजे; आणि मग अशा तऱ्हेचे धर्मविधि करविण्याइतका मनुष्यपणा त्याच्या अंगीं आहे, व त्याच्यासाठीं देवाची पूजाअर्चा, अभिषेक, जप, नैवेद्य वगैरे करणें आपणांस अनुचित नाहीं, असें वाटलें, तरच ब्राह्मण त्या ब्राह्मणेतराचें धर्मकृत्य करण्यास तयार होतो.

ब्राह्मणजात अस्तित्वांत आल्यापासून जो मोठा काल लोटला आहे त्यांत, त्यांच्या त्यांच्यांत हळूं हळूं भेद पडत जाऊन, आतां ब्राह्मण ह्मणविणाऱ्यांच्या असंख्य जाती व पोटजाती झाल्या आहेत. पिढ्यानुपिढ्या ब्राह्मणांची संख्या मोठ्या झपाट्यानें वाढत असल्याकारणानें, सर्व हिंदूंचे धर्मगुरु ह्मणून जो एकच धंदा त्यांच्या हातीं होता, त्यापेक्षां हलक्या धंद्यांत पोट भरण्याकरितां त्यांना शिरणें भाग पडलें. सध्यां हिंदुस्थानांत एक कोटी चाळीस लक्षांहून अधिक ब्राह्मण आहेत; व त्यांपैकीं पुष्कळांस शेतीभाती, शिपाईगिरी व उदीमव्यापार, अशा धंद्यांत पडावें लागलें आहे. मनुस्मृतीवरून असें दिसतें कीं, त्या काळींसुद्धां कांहीं विशेष परिस्थितींत असले धंदे करून, निर्वाह करण्याची ब्राह्मणांस परवानगी

होती. निदान त्यांत दोष मानला जात नसे. तथापि, ब्राह्मणाचा कितीहि हलका धंदा असो, इतर हिंदूंपेक्षां त्याची योग्यता फार मोठी समजली जाते, ही गोष्ट निर्विवाद आहे. ‘ ब्राह्मण सर्वांत श्रेष्ठ आहे ’ ( वर्णानां ब्राह्मणो गुरुः ), हें तत्व ब्राह्मण-मनुष्य कधींहि विसरत नाहीं, किंवा कोणास विसरूं देत नाहीं; मग त्याच्या ठिकाणीं खऱ्या ब्राह्मणाच्या गुणांच्या नांवानें आंवळ्याएवढें पूज्य असलें— ह्मणजे तो आडनांवाचा ब्राह्मण असला— तरी चालतें. ‘ जरी ब्राह्मण झाला भ्रष्ट ॥ तरी तो तिन्ही लोकीं श्रेष्ठ ’ अशा तऱ्हेची आत्मप्रौढी त्याच्या ठिकाणीं असते. आतां येथें सांगितलें पाहिजे कीं, कित्येक गृहस्थांमध्यें खरें ब्राह्मण्य बरेंच असल्याकारणानें, त्यांची योग्यता आणि अधिकार खरोखरीच मोठा असतो. ब्राह्मणीधर्मव्यवस्थेमुळें हिंदुसमाजाचा फायदा झाला आहे, किंवा नुकसान झालें आहे, ह्या गोष्टीची चर्चा करण्याचें माझें काम नाहीं. तथापि, सांप्रत ब्राह्मणीधर्माचा पाश्चिमात्य विद्याचारसंपन्नतेशीं कितीहि विरोध असला, तरी हिंदुस्थानांत विशालबुद्धीचे व उच्चशीलाचे लोक निर्माण झाले होते, व सध्यांहि होत आहेत, ही गोष्ट नाकारणें वाजवी होणार नाहीं. असें जर नसतें, तर हिंदुस्थानांत आज शेंकडों वर्षें ज्या क्रांत्या होत आहेत, व हिंदुधर्मावर जीं संकटें येत आहेत, त्यांच्या तडाक्यांतून त्याचा बचाव झाला नसता.

हिंदुधर्मावरील बौद्धधर्माची पांचशें वर्षांची सरशी, व मुसलमान लोकांच्या झालेल्या स्वाऱ्यांवर स्वाऱ्या, ह्यांच्यायोगानेंसुद्धां ब्राह्मणीधर्माचें वर्चस्व नष्ट झालें नाहीं. त्याचप्रमाणें, इंग्रजलोकांच्या राज्यामुळेंहि त्यांची सत्ता मोडली नाहीं. हिंदुसमाजाच्या रचनेसारखी रचना पृथ्वीवर दुसऱ्या कोणत्याहि ठिकाणीं आढळून

येत नाहीं. ही व्यवस्था कायम राहण्यासाठीं ज्या गोष्टी अत्यावश्यक आहेत, त्या जशाच्या तशा टिकविण्याच्या कामीं ब्राह्मणलोक यत्किंचित्देखील माघार घेत नाहींत. परंतु, हिंदुसमाजाची रचनाच अशी आहे कीं, नवीन नवीन आचारविचारांप्रमाणें त्याचें स्वरूप हळूं हळूं पालटलेंच पाहिजे. ह्मणून, देशकालवर्तमानास अनुसरून, हिंदुसमाजाच्या व्यवस्थेंत कांहीं नरमपणा आला पाहिजे, ही गोष्ट ब्राह्मणांच्या लक्ष्यांत आली आहे इतकेंच नाहीं, तर बदलत जाणाऱ्या परिस्थितीप्रमाणें वाहत्या वाऱ्यास पाठ देऊन, धर्मसंबंधी गौण गोष्टींत आग्रह सोडून, आपला वर्तनक्रम बदलण्यास ते चुकत नाहींत. हिंदुस्थानांत इंग्रजी राज्याची स्थापना झाल्यावर, आपल्या नवीन यजमानांस काय पाहिजे तें पाहून, त्यांच्या गरजा भागविण्यासाठीं, ब्राह्मणांनीं प्रथमपासूनच विलक्षण चलाखी दाखविली. गेल्या शतकाच्या पहिल्या पन्नास वर्षांत, हिंदुस्थानांत पाश्चिमात्य शिक्षणपद्धतीचा पाया घालतांच, ह्या नवीन तऱ्हेच्या शिक्षणामुळें हिंदुसमाजांतील आपल्या वर्चस्वास बळकटी येईल, ह्या गोष्टींची ओळख इतर जातींच्या लोकांपेक्षां ब्राह्मणांनाच लवकर पटली. ह्या देशांत पाश्चिमात्य शिक्षण सुरू करण्याचा मुख्य उद्देश, राज्यकारभारांतील निरनिराळ्या खात्यांतील दुय्यम प्रतीच्या जागांकरिता पुरेशी एतद्देशीय तरुण मंडळी इंग्रजी शिकवून तयार करावयाची, असा होता. ह्या गोष्टीचा ब्राह्मणांनीं पुरा फायदा घेतला; आणि हिंदुविद्येचें सर्व भांडार शेंकडों वर्षें त्यांच्याच हातीं असून, त्याचा ते उपभोग घेत आले, त्याचप्रमाणें, थोडक्याच काळांत त्यांनीं इंग्रजी विद्या देखील सर्वस्वी आपलीशी केली. इंग्रजी राज्याच्या प्राणप्रतिष्ठेनंतर, ह्या देशाचा कारभार सुयंत्र चालविण्यासाठीं, मोठमोठीं खातीं

अस्तित्वांत आलीं; देशभाषेच्या ऐवजीं इंग्रजी भाषा सर्वत्र दरबारीभाषा ठरली; न्यायखात्याची पुनर्घटना होऊन, इंग्रजी तऱ्हेवर अदालतींत न्यायमनसुबीचें काम चालूं लागलें; वकिली, वैद्यकीसारखे उदार धंदे आणि छापखाने यांची वाढ झाली; आणि ह्या सर्व गोष्टींचा फायदा केवळ ब्राह्मणांनींच घेतल्यामुळें, समाजांतील आपलें वजन वाढविण्यास त्यांना एकसारखे नवीन नवीन मार्ग सांपडत गेले. आणि खेरिज, इंग्रजी राज्याबरोबर जे नवीन विद्याचार ह्या देशांत आले होते, त्यांची ज्यांना गंधवार्ताहि नव्हती, अशा हिंदुलोकांवरील ब्राह्मणांचें वर्चस्व परंपरागत जुन्या मार्गांनीं कायम राखिलें जातच होतें.

अशी जरी स्थिती होती, तरी पाश्चात्यांच्या आचारविचारांचा प्रसार लोकांत होऊं लागल्याबरोबर, हिंदुसमाजावरील ब्राह्मणांची पकड कांहीं अंशीं तरी ढिली पडली. कारण, ब्राह्मणांचें वर्चस्व ह्मटलें ह्मणजे, मुख्यतः अतिप्राचीन काळापासून चालत आलेल्या रूढीच्या जोरावर कायतें आहे; व पाश्चिमात्य लोकांच्या आचारविचारांचा शिरकाव समाजांत एकदां झाला, ह्मणजे ब्राह्मणांचें वजन हटकून कमी पडूं लागावयाचेंच. एतद्देशीय लोकांच्या धर्मसमजुती व चालीरीती ह्यांबद्दल आदरबुद्धि—कित्येक कळकळीच्या इंग्रजांच्या मतें फाजिल आदरबुद्धि—बाळगावयाची, असा इंग्रज लोकांचा निश्चय होता, तरी पाश्चिमात्य विद्याचारांच्या प्रभावामुळें हिंदुधर्मांतील कित्येक संस्कारांवर, प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षरीतीनें, विपरीत परिणाम होण्याचें चुकलें नाहीं. धर्मसंबंधी गौण बाबतींतील जातिनिर्बंधांचा कडकपणा कमी करणें उचित आहे, असें ब्राह्मण लोकांच्या तात्काळ लक्ष्यांत आलें. उदाहरणार्थ, हिंदूंच्या तरुण मुलांस विद्यार्जनासाठीं काळें पाणी ओलांडून, जात

बिघडल्याशिवाय युरोपमध्यें जाण्याची सवड, अथवा देशांतल्या देशांत आगगाडींतून, किंवा नदींतील गलबतांतून, प्रवास करितांना अस्पृश्य लोकांचा ( महारमांगादिकांचा ) विटाळ न होणें, अशा प्रकारच्या सुधारणा करणें भागच पडलें. प्रथम प्रथम, प्रायश्चित केल्याशिवाय चालत नसे; परंतु पुढें हळूं हळूं हाहि कडकपणा मोडून, आतां केवळ प्रायश्चित घेण्याचें सोंग होत असतें. बालपणीं होणारीं लग्नें व अगदीं लहान वयाच्या विधवांचें केशवपन, इत्यादि फार दिवसांच्या चालीरितीसंबंधानें सुधारणा करण्याची चळवळ सुरू झाली, तेव्हांमात्र जुन्या धर्माभिमानी लोकांकडून बराच अडथळा होऊं लागला. नवीन आचारविचारांच्या प्रभावामुळें प्रथमतः ब्राह्मणजातींतच सामाजिक व धार्मिक सुधारणा करण्यासाठीं चळवळी सुरू होऊन, त्यांचा प्रसार होऊं लागला. कित्येकांनीं आपल्या वाडवडिलांचा धर्म उघडपणें सोडून दिला; व पुष्कळ लोक आपलीं धर्मपुस्तकें धुंडाळून, त्यांतून आधार काढून, पाश्चिमात्य लोकांच्या कल्पनांशीं जुळेल, अशा रीतीनें स्मृतींचा अर्थ करूं लागले. एका काळीं तर असें वाटूं लागलें होतें कीं, महाराष्ट्रांत रानडे व बंगाल्यांत टागोर, ह्यांच्या सारख्यांचें अनुकरण करून, ब्राह्मण लोक आपणहोऊन हिंदुधर्मांतील हानिकारक धर्मसमजुतींस अजीबात फांटा देऊन, पाश्चिमात्य तत्वज्ञान व नीतिशास्त्र ह्यांच्या पायावर, हिंदुधर्माची पुनर्घटना करण्याच्या कामीं पुढाकार घेतील. परंतु, बहुजनसमाजाचा धर्मभोळेपणा व जुन्या शास्त्रास चिकटून राहणाऱ्या लोकांचा हटवादीपणा, ह्या दुहेरी माऱ्यापुढें धर्मसुधारणेच्यानें टिकाव धरवला नाहीं. शिवाय, नेहमीं असें होई कीं, जुनी रीत सोडून देऊन, इंग्रजी तऱ्हेचें शिक्षण मिळवूनसुद्धां

लोकांस ह्यांच्या इच्छेप्रमाणें यशःप्राप्ति होत नसे, किंबहुना पोट भरण्याची देखील मारामारी पडे; आणि मग अशा लोकांस, निराशा झाल्यामुळें त्वेष येऊन, ते धर्मसुधारणेच्या मार्गांत विघ्न आणींत. ब्राह्मणज्ञातींतील, अपवादादाखल होऊन गेलेले व अझूनहि असलेले, उदार अंतःकरणाचे लोक वगळले, ह्मणजे पाश्चिमात्य लोकांच्या विद्याचारसंपन्नतेच्या ओघास ब्राह्मण-जातीकडूनच फार मोठा अडथळा होत आहे. अलीकडे, हिंदु-धर्माचें सामाजिक व धार्मिक पुनरुज्जीवन करण्यासाठीं ज्या खटपटी चालू आहेत, त्यांत सुशिक्षित ब्राह्मणांचें अंग फार असून, त्याबरोबरच ज्या राजकीय चळवळी सुरू आहेत, त्यांत देखील त्यांचें अंग कमी आहे, असें नाहीं. मग, ह्या चळवळी **क्रांतिवाद्यांच्या** असोत, **नेमस्तांच्या** असोत, अथवा **जहालांच्या** असोत.

## भाग ४ था.

# ब्राह्मणीधर्म आणि महाराष्ट्रांतील असंतोष.

हिंदुस्थानांतील इंग्रजलोकांचें राज्य हें पाश्चिमात्य विद्याचार-संपन्नतेचें प्रतिबिंब आहे. ह्याचा अर्थ असा कीं, इंग्रजलोकांनीं येथें ज्या ज्या गोष्टी सुरू केल्या आहेत, त्यांवरून पाश्चात्यांच्या संस्कृतीचें रूप कळून येतें. ह्या संस्कृतीचा व ब्राह्मणीधर्माच्या मुख्य धोरणाचा मुळांतच वैरभाव आहे; ह्मणजे, ह्या दोन गोष्टी अगदीं परस्परविरोधी आहेत. तथापि, ह्या वैराग्नीच्या ज्वाळाची प्रखरता, सर्वदां किंवा सर्वत्र, सारखीच असणें संभवनीय नाहीं. कारण, हिंदुस्थानांतील कोणत्याहि संस्थेची वाढ सर्व ठिकाणीं सारख्या स्वरूपाची होत नाहीं; व हाच नियम ब्राह्मणीधर्मालाहि लागू पडतो. परंतु, महाराष्ट्रांतील (दक्षिणेंतील) ब्राह्मणी-धर्मांत जितका जहालपणा आहे, व दोन हात करण्यास त्याची जितकी तयारी आहे, तशी स्थिति हिंदुस्थानांत इतरत्र आढळून येत नाहीं. ह्याचें मुख्य कारण बहुधा असें असावें कीं, महारा-ष्ट्रांतील ब्राह्मणांच्या हातीं सर्व सत्ता असून, त्यांना राज्यसुखाचा लाभ पूर्णपणें होत होता, ह्या गोष्टीस अझून फारशीं वर्षें झालीं नाहींत. धर्मगुरु, उपाध्याय वगैरे लोक ज्या जातींतील असतात, त्याच जातीच्या हातीं सर्व राज्यसत्ता असण्याचा योग, दक्षिणेंत अठराव्या शतकांत आला होता; व अशा प्रकारच्या राज्यकार-

भाराचें मुख्य ठिकाण पुणेंशहर होतें. त्यामुळें, आध्यात्मिक व व्यावहारिक बाबतींतील सर्व अधिकाराच्या दोऱ्या, पेशव्यांच्या गादीच्या आड उभे राहून, ब्राह्मणांस खेंचावयास सांपडत असत. अशा रीतीनें समाजावर सर्व प्रकारचा अधिकार गाजविण्यास सांपडलेल्या दिवसांची आठवण लवकर बुजत नाहीं; आणि, हिंदुस्थानासारख्या प्राचीन व पुराणप्रिय देशांत तर अशा गोष्टींचें विस्मरण होण्यास फारच काळ जावा लागतो. कसेंहि असो; परंतु दक्षिणेंतील ब्राह्मणांपैकीं एका जातीच्या लोकांचातरी असा पक्का निश्चय झाला होता कीं, आपल्या भरभराटीच्या दिवसांची आठवण कधींहि जाऊं द्यावयाची नाहीं.

चित्पावनब्राह्मणांसारखें सामर्थ्य व कर्तबगारी, दक्षिणेंतील दुसऱ्या कोणत्याहि ब्राह्मणजातींत दिसून येत नाहीं. स्कंदपुराणांतील सह्याद्रिखंडामध्यें, चित्पावनब्राह्मणांच्या उत्पत्तीची चमत्कारिक कथा दिली आहे, ती अशी कीं, श्रीविष्णूचा सहावा अवतार जो ‘ परशुराम ’ त्याच्या हातून मातृहत्या, क्षत्रियवध वगैरेसारखीं महान् महान् पातकें घडलीं होतीं; ह्मणून, त्याच्या पितरांच्या श्राद्धाला कोणी ब्राह्मण येईनात. त्यामुळें परशुरामाला राग आला; आणि, त्यानें समुद्रांतून किनाऱ्यावर वाहून आलेल्या म्लेंच्छांच्या चवदा प्रेतांस चितेवर ठेवून अग्नि दिला; व अशा रीतीनें त्या प्रेतांस पावन करून घेतल्यावर, त्यांना जिवंत केलें व ब्राह्मणत्व दिलें. ‘ चितेपासून पावन ’ ह्मणून ‘ चित्पावन ’ असें नांव देऊन, त्यांना राहण्यास स्थान नसल्याकारणानें, बाण मारून समुद्र मागें हटविला; आणि अशा रीतीनें जो प्रदेश उत्पन्न झाला, त्याला ‘ कोंकण ’ असें नांव देऊन, तेथें ह्या नूतन ब्राह्मणांची स्थापना केली. चित्पावन

ब्राह्मणांचीं चवदा गोत्रें असून, तीं, परशुरामानें जिवंत करून ब्राह्मणत्व दिलेल्या चवदा म्लेंच्छांवरून आहेत, असें त्यांचें ह्मणणें आहे. पण, कित्येक लोकांचा असा तर्क आहे कीं, चित्पावन ब्राह्मणांचे हे चवदा मूळपुरुष, युरोपांतील नारवेदेशचे रांकट लोक असावेत; आणि, त्यांचीं गलबतें समुद्रांत बुडाल्यामुळें, ते वाहत वाहत येऊन, ज्याला हल्लीं मुंबईइलाखा ह्मणतात, त्या प्रांताच्या पश्चिमेकडील वालुकामय किनाऱ्यावर लागले असावेत. आतां, चित्पावनांची उत्पत्ति कशीहि असो; परंतु, त्यांचे ते चमत्कारिक दिसणारे घारे डोळे, तो स्वच्छ चरमी–कागदा–सारखा भुरा रंग व तोंडावर दिसणारी ती हुशारी, ह्या गोष्टींवरून पश्चिमेकडील ( युरोपिअन ) लोकांचें धाडस व पूर्वेकडील ( एशिआटिक ) लोकांचा कावा, ह्या दोन्ही गुणांची साक्ष पटते. तथापि, सुमारें दोनशें वर्षांपूर्वीं, बाळाजी विश्वनाथ ह्या नांवाच्या चित्पावनब्राह्मणाचा शिरकाव शाहूराजाच्या दरबारांत हळूं हळूं होऊन, त्याला पेशवाईचें पद मिळेपर्यंत, हिंदुस्थानच्या इतिहासांत चित्पावनांचें नांव मुळींच ऐकूं येत नव्हतें. बाळाजी विश्वनाथानें शाहूमहाराजावर आपलें इतकें वजन बसविलें होतें कीं, त्याच्यामागून पेशवाईचीं वस्त्रें त्याचा मुलगा जो बाजीराव त्यास मिळालीं. पहिला बाजीराव पेशवा मोठा पराक्रमी पुरुष असून, त्यानें मराठ्यांचा झेंडा दिल्लीपर्यंत लाविला. बाजीरावाच्या पश्चात् त्याचा मुलगा दुसरा बाळाजी (नानासाहेब) ह्यांस पेशवाई मिळाली इतकेंच नाहीं, तर शाहूच्या निधनानंतर, राजवाड्यांत मोठ्या धाडसाचें कारस्थान करून– ह्मणजे बुद्धिभ्रष्ट झालेला शाहूराजा आसन्नमरणस्थितींत असतांना मिळविलेल्या, किंवा अगदींच बनावट, अशा सनदेच्या

आधारावर सातारचें राज्य घशांत टाकण्याचा कावा सिद्धीस जाण्यास अडचण पडूं नये ह्मणून, शाहूची हयात राणी सकवारबाई हिला, तिच्या अगदीं इच्छेविरुध्द सती जाणें भाग पाडण्याकरितां, तिच्या आप्तसोयऱ्यांस वश करून घेण्यासाठीं कपटव्यूह रचून —दुसऱ्या बाळाजी पेशव्यानें शिवाजीच्या वंशजांस केवळ नामधारी राजे बनवून, मराठी राज्यांतील सर्व सत्ता अगदीं उघडपणें बळकाविली. पानिपतच्या लढाईंत मराठ्यांचा अगदीं मोड झाला, त्याच्या दुःखानें बाळाजीचा अंत झाला; आणि पेशवाई पुढें जरी बाळाजीच्या घराण्यांतच राहिली, व त्याचा मुलगा माधवराव ह्याच्या कारकिर्दींत मराठ्यांनीं तरवार गाजवून पानिपतचा कलंक थोडासा धुवून काढिला, तरी पहिल्या माधवरावापुढचे सर्व पेशवे, आपल्या कारभाऱ्यांच्या हातांतलीं बाहुलीं असत. नानाफडणविसाकडे कारभार असतांना तर ह्या गोष्टीचा कळसच झाला. नानाफडणवीस चित्पावन होता; आणि, त्याच्याच कारकिर्दींत त्याच्या जातभाईंच्या हातीं राज्यांतील सर्व मोठमोठे अधिकार जाऊन, 'मराठीराज्य' ह्मणजे 'चित्पावनी राज्य' अशी खरोखर स्थिति झाली. ह्या वेळीं हिंदुस्थानांतील मोंगलबादशाही अगदींच डबघाईस आली होती. ह्मणून, मुसलमानी सत्ता झुगारून देऊन, त्याऐवजीं चित्पावन ब्राह्मणांचें साम्राज्य स्थापन करण्याची महत्त्वाकांक्षा त्यांनीं धरिली, ह्यांत कांहींच वावगें नव्हतें; व ही त्यांची इच्छा सफलहि झाली असती. परंतु, इंग्रजलोकांनीं मध्यें येऊन, त्यांचे सर्व बेत शेवटीं ढांसळून पाडिले, व चित्पावनांच्या साम्राज्याऐवजीं हिंदुस्थानांत इंग्रजाचें साम्राज्य स्थापन झालें. परंतु, इंग्रजी राज्यामुळें चित्पावनांचें सामर्थ्य नष्ट झालें नाहीं. नवीन परिस्थितीप्रमाणें आपल्या आचारविचारांत

त्यांनीं झटकन् बदल केला; व विशेषेंकरून पाश्चिमात्य शिक्षणापासून होणारे फायदे मिळविले. त्यांच्या अंगीं राज्यकारभाराचीं कामें करण्याची योग्यता मोठी आहे, ही गोष्ट कबूल करणें राज्यकर्त्यांस भाग पडलें. त्यामुळें, नानाफडणविसाच्या अमदानींत चित्पावनांची जशी चलती होती, तशीच आजमितीलाहि आहे. ह्मणजे, आजदेखील प्रत्येक सरकारी कचेरींत व खात्यांत चित्पावन कामदारांची व कारकुनांची गर्दी आहे. त्यांच्यांत न्यायाधिशीचें काम करणारे लोक आहेत; वकिलीच्या धंद्यांतहि पुढाकार त्यांच्याकडेच आहे; शाळामास्तर तेच आहेत; देशी छापखाने त्यांच्याच लोकांच्या हातांत असून, वर्तमानपत्रें तेच चालवितात; आणि मुंबईइलाख्यांत ( पश्चिम हिंदुस्थानांत ) अलीकडच्या काळांत जे नामांकित भाषाविषयक ग्रंथ व नाटकग्रंथ निर्माण झाले आहेत, त्यांपैकीं बहुतेक ह्याच लोकांनीं लिहिले असून, राजकीय विषयांतहि त्यांनींच अग्रस्थान पटकाविलें आहे. १९०१ सालीं झालेल्या खानेसुमारीवरून असें दिसतें कीं, मुंबईइलाख्यांत ज्या उच्चप्रतीच्या सरकारी जागा एतद्देशीय लोकांस दिल्या आहेत, त्यांपैकीं हिंदूंस २६६, पारशांस ८६ आणि मुसलमानांस २३, ह्याप्रमाणें मिळालेल्या आहेत. मुंबईइलख्यांत ब्राह्मणांची संख्या एकंदर हिंदूंच्या $\frac{1}{14}$ पेक्षांहि कमी असतां, हिंदुलोकांना एकंदर मिळालेल्या सरकारी जागांपैकीं शेंकडा ७२ पेक्षांहि अधिक जागा ब्राह्मणांनीं पटकाविल्या आहेत. आतां, सर्वच ब्राह्मण चित्पावन आहेत, असें नाहीं; परंतु, सरकारी नोकरींत चित्पावनांचा फारच मोठा भरणा असून, इतर ब्राह्मणांवर त्यांचें जें वर्चस्व आहे, त्याविरुद्ध कोणी एक अक्षरहि बोलत नाहीं. दुसरी एक गोष्ट अशी कीं, हिंदुस्थानच्या

इतर भागांत दक्षिणेंतील चित्पावन गेल्या कारणानें, तिकडेहि त्यांचें वजन वस्तुतः बसलें आहे. त्याचप्रमाणें, ज्या एतद्देशीय संस्थानिकांनीं आपणांस हुशार कामगार मिळावे ह्मणून, कांहीं मोठमोठ्या अधिकारांच्या जागा चित्पावनांस दिल्या आहेत, त्यांच्या संस्थानांतहि त्यांचें वर्चस्व आहे. हल्लींच्या काळांत, हिंदुस्थानांत एतद्देशियांमध्यें जे कांहीं अत्यंत विद्वान्, थोर मनाचे व सुधारणाप्रिय लोक आढळतात, त्यांपैकीं बरेच चित्पावन असून, पुष्कळांनीं इंग्रजी राज्याची नोकरी मोठ्या इमानें इतबारें व निष्ठापूर्वक केली आहे, ह्यांत बिलकूल संशय नाहीं. परंतु असे थोडे लोक वगळले ह्मणजे, बाकी जो मोठा समाज राहतो, त्या लोकांच्या मनांत इंग्रजांच्या राज्याविषयीं जो कांहीं द्वेष आहे, तो, पेशवाई बुडल्यापासून जरी आज जवळ जवळ शंभर वर्षें होत आलीं आहेत, तरी जशाचा तसा कायम आहे; व कधींतरी हिंदुस्थानांतील इंग्रजी राज्य उलथून पडून, पेशवाईप्रमाणें पुनः आपल्या हातीं सर्व सत्ता येईल, ह्या आशेचा झरा त्यांच्या अंतःकरणांत निरंतर वाहत आहे. सत्तावन सालच्या शिपायांच्या बंडांतील मुख्य नायक जो नानासाहेब, हा चित्पावन होता. त्यानें व त्याच्या अनुयायांनीं जीं अनन्वित कृत्यें केलीं, अथवा ७९ सालीं पुणेंप्रांतांत मांगरामोशी जमवून, वासुदेव बळवंत फडके ह्या चित्पावन ब्राह्मणानें जे दरोडे घातले, इतक्या लांबच्या गोष्टी सोडून दिल्या, तरी इंग्रजलोक व त्यांचें हिंदुस्थानांतील राज्य, ह्याबद्दल अत्यंत द्वेषमूलक असे लेख मुख्यतः चित्पावन ब्राह्मणांनीं चालविलेल्या पुण्यांतील वर्तमानपत्रांतच प्रथम येऊं लागले; व अशा रीतीनें विष ओतून, लोकांचीं मनें बिघडविण्याच्या प्रयत्नास

आळा घालण्याकरितां, ७९ सालीं वर्तमानपत्रांच्या मुसकुटदाबीचा कायदा करणें हिंदुस्थानसरकारास भाग पडलें. हा कायदा कां करावा लागत आहे, ह्याचीं कारणें सांगतांना, पुण्यांतील देशी वर्तमानपत्रांतीलच बरेचसे उतारे काउन्सिलांत वाचून दाखविण्यांत आले होते. कांहीं वर्षांपूर्वी ह्याच पुण्यामध्यें, एका तरुण चित्पावन ब्राह्मणानें दोघा इंग्रजी अंमलदारांचा खून करून, राजकीय खून करण्याकडे लोकांची प्रत्यक्ष प्रवृत्ति करणाऱ्या व इंग्रजी राज्याविरुद्ध असलेल्या एका नवीन चळवळीचा आरंभ झाला आहे, असें सर्वांच्या निदर्शनास आणून दिलें. १९०९ सालच्या दिसेंबर महिन्यांत, नाशकास दुसऱ्या एका चित्पावनानें ज्याक्सन-साहेबाचा खून केला. ह्या खुनी पोरास मदत करणारे, एक खेरिज करून, सर्वच चित्पावन ब्राह्मण होते. व त्यानंतर, इंग्रजीराज्य उलथून पाडण्याचा जो एक मोठा कट नाशकास उघडकीस आला, त्यामधील बहुतेक सर्व आरोपीत ह्याच जातीचे होते.

आतां, वीस पंचवीस वर्षांपूर्वींहि, ज्यांची कशानेंहि समजूत होणार नाहीं अशी जहाल मंडळी होती, व लोकांत असंतोष उत्पन्न करण्याकडे त्यांच्या मनाचा कल होता, ह्या गोष्टी खऱ्या आहेत. तथापि, दक्षिणी ब्राह्मणांमधील कांहीं विद्वान् लोक सदांसर्वदां इंग्रजी राज्याची महती गात व त्या लोकांची थुंकी झेलीत बसत, असें नाहीं. पण, त्यांची अशी पक्की समजूत होती कीं, आपलें पहिलें कर्तव्य, विदेशी राज्यकर्त्यांविरुद्ध लोकांचीं मनें चिथावून देण्याचें नाहीं; तर, राज्यकर्त्यांचे कांहींहि दोष असले, तरी ज्या विद्याचारसंपन्नतेमुळें त्यांना हिंदुस्थानचें राज्य प्राप्त झालें आहे, व जिचें प्रतिबिंब त्यांच्या राज्यकार-

भारांत व्यक्त होत आहे, अशा विद्याचारसंपन्नतेचा हिंदुसमाजांत अधिक प्रसार होईल, अशा गोष्टी प्रथमतः केल्या पाहिजेत. अशा सुधारणाप्रिय लोकांमध्यें कै० महादेव गोविंद रानडे यांची प्रमुखत्वानें गणना केली पाहिजे. परंतु, ह्या लोकांच्या उलट-पक्षामध्यें बाळ गंगाधर टिळकाचें प्रस्थ फार असून, तो अगदीं निराळ्या प्रकारचा मनुष्य होता. इंग्रजी राज्याविरुद्ध असंतोष माजविण्याच्या कामाचा उपक्रम करणाऱ्या अत्यंत भयंकर लोकां-मध्यें त्याची गणना आहे. एका ब्राह्मण गृहस्थानें मला असें सांगितलें कीं, हिंदुस्थानांतील लोकांचीं मनें बिघडत जाऊन, सर्वत्र अस्व-स्थता कशी उत्पन्न झाली, ह्या प्रश्नाचा उलगडा करावयाचा असेल, तर प्रथमतः टिळकाचा आजपर्यंतचा वर्तनक्रम पाहिला पाहिजे. ह्मणजे, रानड्यांवर टिळकानें हल्ला कसा सुरू केला; जुन्या धर्माच्या कडकडित अभिमान्यांस त्यानें कसें बगलेंत मारिलें; गणपति–उत्सव सुरू करून, लोकांच्या धर्मभोळेपणाचा कसा फायदा घेतला; गोरक्षणाची चळवळ करून जातीजातींत (युरोपिअन, मुसलमान हिंदु वगैरे) कसें वैमनस्य माजविलें; शिवाजी–उत्सव काढून, मराठे लोकांचीं मनें आपल्यास अनुकूल करून घेण्याचा कसा प्रयत्न केला; शाळेंत जाणारीं कोंवळीं मुलें व प्रौढ विद्यार्थी ह्यांच्या हूडपणाचा व अपक्व बुद्धीचा फायदा घेऊन, त्यांच्याकडून अनन्वित कृत्यें कशीं करविलीं; तालिमखाने, आखाडे वगैरे कां काढिले; शारीरिक शिक्षणावर विशेष जोर कां दिला; तसेंच देशी छापखाने व वर्तमानपत्रें ह्यांचा ताबा आपल्या हातांत घेऊन, लोकांकडून मारामारी, दंगेधोपे वगैरे करून, सरकारास घाबरवून टाकण्याकरितां, त्यांना प्रवृत्त करण्याच्या उद्देशानें उद्ध-टपणाचे लेख लिहिण्याचा कसा उपक्रम केला; वगैरे गोष्टींचा

विचार केला ह्मणजे, हिंदुस्थानांत अस्वस्थता पसरविण्याकरितां, मोठ्या व्यवस्थित स्वरूपाची जी मोहीम महाराष्ट्रांत टिळकानें सुरू केली, व जिचें अनुकरण हिंदुस्थानच्या इतर भागांत झालें, तिची वाढ कशी व कोणत्या धोरणानें होत गेली, ह्याचें यथार्थ ज्ञान होतें. ही माहिती फार किमतीची आहे. कारण, हिंदुस्थानांतील अस्वस्थतेच्या जनकत्वाचा मान जर कोणास द्यावयाचा असेल, तर तो बाळ गंगाधर टिळकासच दिला पाहिजे. गेल्या शतकाच्या शेंवटच्या वीस पंचवीस वर्षांपूर्वीं, टिळकानें महाराष्ट्रांत आपली मोहीम सुरू केली होती, तरी तिचा इतिहास अद्यापिहि मनन करण्यासारखा आहे. वास्तविक पाहतां, ह्या विषयाकडे जितकें लक्ष द्यावयास पाहिजे होतें, तितकें कोणीं दिलेलें नाहीं. हा इतिहास पाहिला असतां, हिंदुस्थानांतील अस्वस्थता ह्मणजे, मांचुरिआमध्यें जपानाला रशियावर जय प्राप्त झाला त्याचा केवळ प्रतिध्वनि आहे, ह्या ह्मणण्याचा पोकळपणा तेव्हांच उघडकीस येतो. त्याचप्रमाणें, हिंदुस्थानांतील असंतोषमूलक राजकीय चळवळी, व सामाजिक आणि धार्मिक गोष्टींतील सुधारणेस विरोध करण्याकरितां उत्पन्न केलेल्या चळवळी, ह्यांचा अगदीं निकट संबंध आहे, ही गोष्ट स्पष्टपणें दिसून येते. आपले उद्देश सिद्धीस नेण्याकरितां टिळकानें जे मार्ग स्वीकारले, व त्यांपासून जी फलप्राप्ति झाली, त्या सर्व गोष्टींची अगदीं हुबेहुब नक्कल इतर ठिकाणीं अस्वस्थता उत्पन्न करणारांनीं उतरली आहे. सन १८८०–८२ सालांपासून टिळक सार्वजनिक कामांत पडूं लागला. त्यावेळीं महाराष्ट्रांतील ब्राह्मणांत दोन पक्ष होते. त्यांपैकीं एकापक्षाचा पुढारीपणा माधवराव रानड्यांकडे असून, त्यांत त्या काळचे थोडेसे थोर थोर विद्वान् लोकच कायते होते. इंग्रजराज्यकर्त्यांवर

टीका करणें, अथवा कायदेशीर पद्धतीनें राजकीय सुधारणा घडवून आणणें, ह्या गोष्टी करण्याचें वरील मंडळीनें सोडलें होतें, असें नाहीं. परंतु, सर्व धर्मांच्या व जातींच्या हिंदीलोकांनीं सामाजिक सुधारणा हातीं घेऊन, पाश्चिमात्य लोकांच्या रीतीरिवाजांशीं आपल्या चालीरीती जितक्या मिळत्या होतील, तितक्या करण्याचा प्रथम उद्योग करावयास पाहिजे, असें त्यांचें मत होतें. टिळक चित्पावन ब्राह्मण असून, मोठा विद्वान् होता. मुंबईविश्वविद्यालयाचा एल् एल् बी, असून तो बीएच्या परीक्षेंत पहिल्या वर्गांत आला होता. परंतु इंग्रजीराज्याशीं वैर करण्याचें चित्पावनी ब्रीद त्यानें पूर्णपणें उचललें होतें. त्याचा स्वभावच असा होता कीं, त्याला कोणाचा किंचित्हि दाब खपत नसे. त्याचप्रमाणें, त्याच्या अंगीं महत्त्वाकांक्षा असून, समाजांत रानड्यांना जो मोठा मान असे, त्याबद्दल टिळकाला फारच मत्सर वाटे. रानड्यांचें बुद्धिवैभव जसें फार विशाल होतें, त्याचप्रमाणें समाजांत त्यांचा दर्जा मोठा असून, शीलहि अत्युत्तम होतें. शिक्षणप्रसाराच्या बाबतींत आरंभीं रानडे व टिळक हे एका दिलानें काम करीत असत. परंतु, पुढें त्यांचा बेबनाव होऊन, सुधारणेला विरोध करणाऱ्या प्रतिगामी लोकांच्या कंपूस टिळक मिळाला. पुण्याची 'सार्वजनिक सभा' व 'डेक्कन एज्युकेशन सोसायटी,' ह्या संस्था कोणाच्या हातांत असाव्या, ह्याबद्दल प्रथमतः मारामारी सुरू झाली. ह्या दोन्ही संस्था प्रगतीच्या मार्गानें जाणाऱ्या ( सुधारणाप्रिय ) असून, त्यांत बहुतेक ब्राह्मणच होते; तथापि कांहीं थोडे मुसलमान व ब्राह्मणेतरहि होते. टिळकानें वर्तमानपत्राचा धंदा पतकरला होता; व सन १८८१ सालीं इंग्लंडांत लिबरलपक्षाच्या हातीं राज्यकारभार आल्यावर, त्यांनीं हिंदुस्थानांतील वर्तमानपत्राविषयींचा कायदा

काढून टाकला. त्यामुळें, इंग्रजीराज्याविषयीं व इंग्रजलोकांविषयीं भलभलतीं विधानें करून, हिंदी लोकांचीं मनें त्यांच्याविरुद्ध चिथाविण्याच्या प्रयत्नांस जो आळा बसला होता, तो निघून गेल्यामुळें, इंग्रजलोकांविषयीं द्वेषभाव वाढविण्याचें काम पुनरपि जोरानें सुरू झालें; व त्यांत टिळकानें अग्रेसरत्व मिळविलें. प्रथमारंभीं त्यानें रानड्यांवर हत्यार धरलें; परंतु तेथें त्याची डाळ शिजली नाहीं. आणि, टिळकाच्या ह्मणण्याप्रमाणें **डेक्कन ऐज्युकेशन सोसायटीनें** वागण्याचें कबूल न केल्याकारणानें—ह्मणजे रानड्यांचें धोरण त्या संस्थेनें स्वीकारल्यामुळें—सोसायटीस कायमचा रामराम ठोकून, टिळकास घरीं बसावें लागलें.

परंतु, असा अपजय पदरीं घेऊन, टिळकाला फार दिवस बसावें लागलें नाहीं. हिंदुलोकांतील बालविवाहाच्या चालीमुळें होणारे दुष्परिणाम कमी करण्याच्या हेतूनें, सन १८९० सालीं 'संमतिवयाच्या' कायद्यांतील दुरुस्तीचा मसुदा काउन्सिलांत आल्याबरोबर, टिळकाला चांगलीच संधी मिळाली. ह्या सुमारास, टिळकानें स्वीकारिलेल्या धोरणाचा व त्याच्या काम करण्याच्या पद्धतीचा रानड्यांस अगदीं वीट येऊन, त्यांनीं कंटाळून सार्वजनिक कामांतील पुढारीपणा सोडून दिला. परंतु, डा० भांडारकर, कै० तेलंग, कै० नूलकर, मि० चंदावरकर (आतां सर झालेले व नामदार) व दुसरी धैर्याची सुधारणावादी मंडळी, ह्यांनीं पुढाकार घेऊन, रानड्यांचें व्रत पुढें चालविलें. ह्या मंडळींत राहून, जुन्या धर्माच्या दुराभिमान्यांविरुद्ध लढण्यास, मि० गोखले (आतां नामदार) यांची नेहमीं तयारी असे. संमतिवयाच्या नवीन कायद्यास अनुकूल असणाऱ्या ह्या वरील मंडळीविरूद्ध टिळकानें, मोठें काहूर उठवून, लोकांमध्यें त्यांच्याविषयीं फारच गैरसमज

उत्पन्न केला. ह्याच सुमारास 'केसरी' पत्राची सर्व मालकी टिळकाकडे आली. त्यांत लेख खरडून, टिळकानें सर्व जगास सांगितलें कीं, जो कोणी ह्या नवीन कायद्यास आपली अनुमति देईल, तो 'कुऱ्हाडीचा दांडा गोत्यास काळ' होऊन हिंदुधर्माशीं द्रोह करित आहे, असें समजलें जाईल. ह्या गोष्टीमुळें जुन्या धर्माच्या अभिमान्यांमध्यें टिळकाचा मोठा गौरव होऊन, सर्व जुना सुधारणाविरोधी समाज त्याच्या हातांत आला. ह्यापूर्वी टिळकानें वेदांतविषयावर, आपलें मत ह्मणून, जें कांहीं लिहिलें होतें, त्यावरून जुने धर्माभिमानी लोकांत त्याच्याविषयीं भीति होती; पण ती आतां नाहींशी झाली. जुन्या लोकांचें पुढारीपण नातुबंधूंकडे होतें; व त्यांच्या साहाय्यानें, नेमस्तपक्षाच्या लोकांस न जुमानतां, आपलीं जहाल मतें टिळकानें शाळेंतील लहान मुलें व कालेजांतील प्रौढ विद्यार्थी ह्यांच्यांत पसरविलीं. शरीरसामर्थ्य वाढवून दंगाधोपा करण्यास शिकलें नाहीं, तर आपल्या जुन्या संस्थांचा हळूं हळूं होत जाणारा नाश पाहून, मनगटांत जोर नसल्यामुळें, जागच्याजागीं हळहळत बसण्याची पाळी सर्व हिंदुलोकांस येईल. ह्मणून, टिळकानें जागजागीं तालीमखाने व शरीरसामर्थ्य वाढविण्याचे आखाडे काढून, त्यांत कुस्ती, दांडपट्टा वगैरे मर्दानी खेळ सुरू करून, तरुण पिढींत लढवय्येपणा आणण्याचा प्रयत्न चालू केला. महाराष्ट्रांतील ब्राह्मणांचा प्रबल मनोविकार ह्मणजे, इंग्रजलोकांविषयीं द्वेष होय. त्याचप्रमाणें मुसलमानलोक परधर्मी असून ते आपल्यापेक्षां निराळे आहेत, ह्मणून त्यांच्याविषयीं एकंदर मराठेलोकांच्या मनांत मुख्यतः द्वेषबुद्धि वसत असते. ह्याचें कारण, कांहीं अंशीं मुसलमानी अमदानींत पूर्वी त्यांना त्रास झाला होता, असें असावें. ह्यांत

संशय नाहीं. सन १८९३ सालीं मुंबईतील हिंदुमुसलमानांतील तंटा फार विकोपास जाऊन, मोठे दंगे झाले. त्यामुळें, हिंदूंच्या मनांत मुसलमानांविषयीं तेढ पडली तिचा फायदा घेऊन, आपल्या राजकीय चळवळींचें क्षेत्र विस्तृत करण्यास टिळकास आपोआप संधि मिळाली. मोठमोठ्या सभा भरवून, ‘ मुसलमान हे हिंदुधर्माचे कट्टे शत्रु आहेत, अशा आशयाचीं जोराचीं भाषणें करून, टिळक गप्प बसला असें नाहीं; तर ‘ गोरक्षण–मंडळ्या ’ स्थापन करून, मुसलमानास खिजविण्याचा प्रयत्न त्यानें सुरू केला. युरोपिअन लोकांप्रमाणेंच गोमांस खाण्यास मुसलमानांस हरकत नाहीं, हें सांगणें नकोच. त्यावेळीं, अशा गोष्टी करून मुसलमानांस न चिडविण्याविषवीं उदार मनाच्या हिंदुलोकांनीं टिळकास पुष्कळ सांगून पाहिलें; परंतु त्याचा कांहींएक उपयोग झाला नाहीं. उपड्या घड्यावरील पाण्याप्रमाणें त्यांचा शद्ब तर फुकट गेलाच; पण त्यांचें समाजांत जें कांहीं थोडेंसें वजन शिल्लक राहिलें होतें, तेंहि नाहींसें करण्यास मात्र टिळकास फांवलें. मुसलमानांच्या मशिदीजवळ वाद्यें वाजवूं दिल्यानें दंगेधोपे होऊन प्रसंगीं खून पडतात; ह्मणून, मशिदी-समोरून वाजतगाजत जातांना हिंदुलोकांनीं आपलीं वाद्यें बंद ठेवावीं, असें सरकारानें ठरविलें होतें. अशा प्रकारचे निर्बंध करून, लोकांच्या हक्कांवर सरकारानें गदा आणिली आहे, अशी ओरड टिळकानें सुरू केली इतकेंच नाहीं, तर सार्वजनिक सभेनें हें ‘ राष्ट्रीय ’ काम हातीं घेऊन, हिंदुलोकांना नापसंत असलेले निर्बंध काढून टाकण्याविषयीं सरकारास अर्ज करावा, असा आग्रह धरिला. सार्वजनिक सभेंतील नेमस्त पक्षाचे लोक असें धोरण पतकरण्यास कबूल नव्हते. परंतु, लोकांचा गवगवा

व वर्तमानपत्रांत येणारे टिळकाचे कडक लेख, ह्यांस घाबरून जाऊन, शेवटीं टिळकाचे ह्मणण्यास त्यांनीं रुकार दिला. सार्वजनिक सभेंतील मुसलमान सभासद व इतर थोडेसे लोक ह्यांस, ' सभेनें ' असा अर्ज सरकारास करावा, ही गोष्ट मान्य नसल्यामुळें, त्यांनीं राजीनामे दिले. अशारीतीनें ' सभेचें ' स्वामित्व, सर्वस्वी नाहीं तरी बरेंचसें, टिळकाच्या हातीं आलें; व त्याला योग्य दिसेल तें धोरण ' सभेकडून ' स्वीकारलें जाऊं लागलें. गांवांतील उनाड पोरें, आचारी पाणके, भटभिक्षुक व दुसरे असेच उडाणटप्पु लोक धरून आणून, सभेच्या जागीं मोठी गर्दी जमवून, त्यांच्याकडून आरडाओरडा व प्रसंगीं दंगाधोपा करवून, प्रतिपक्षाचा पाडाव करण्याची कला टिळकास जशी साधली होती, तशी दुसऱ्या कोणास नव्हती.

त्याचवेळीं, इंग्रजी राज्य व इंग्रजलोक ह्यांच्या विषयीं द्वेष उत्पन्न करणाऱ्या टिळकाच्या चळवळीस एकसारखें अधिकाधिक उग्र स्वरूप येत गेलें. हिंदूंतील सुधारक पक्ष व मुसलमान लोक हे सरकारचे हस्तक असून, हिंदुधर्म रसातळास नेण्याकरितां सरकारच्या ज्या कांहीं गुप्त खटपटी चालू आहेत, त्या सिद्धीस नेण्याच्या कामीं ह्या लोकांचा सरकारास नेहमीं फार उपयोग होतो अशा तऱ्हेचीं विधानें करून, त्यांच्याविषयीं लोकमत खवळून जावें ह्मणून, टिळकाचा सारखा प्रयत्न चालू होता. आपल्या राजकीय चळवळीस धर्माचा पाठिंबा असला ह्मणजे चांगलें, ह्या उद्देशानें, हिंदुस्थानांतील अत्यंत लोकप्रिय देव जो गणपति, तो आपल्या सर्व चळवळीचें अधिदैवत करण्याची क्लृप्ति टिळकानें लढविली. वस्तुतः गणपति हा हिंदुलोकांचा विद्याधिपति असून ग्रंथांच्या पहिल्या पानावर त्याचें चित्र घालण्यानें त्यांना मोठा आनंद

हातो. खेड्यांत किंवा हमरस्त्याच्या बाजूला, दगडास शेंदूर फांसून कसातरी आकार आणलेल्या गणपतींचें देऊळ नाहीं, अशी गोष्ट सहसा व्हावयाची नाहीं. गणपती–उत्सवाची नवीन टूम काढून, 'गणेश–मंडळ्या' स्थापन करून, व तरुण तालीमबाज मंडळीचे 'मेळे' तयार करून, लोकांवर आपली छाप बसविण्याची युक्ति टिळकानें काढिली, ती अद्वितीय होती. ह्या गणपती–उत्सवामुळें नाटकें, कथा, पुराणें, व्याख्यानें, मेळ्यांचीं पदें वगैरे गोष्टी करावयास सांपडून, त्यांत महाभारतादिग्रंथांतील पौराणिक गोष्टी अशा चतुराईनें गोंविल्या होत्या कीं, त्यामुळें 'म्लेंच्छांविषयीं (ह्यांत मुसलमानांप्रमाणें युरोपिअनलोकांचाहि समावेश होतो) ह्मणजे परकीयांविषयीं, लोकांची द्वेषबुद्धि हटकून वाढावी. त्याचप्रमाणें, ह्या उत्सवांच्या वेळीं ज्या अंदाधुंदीच्या मिरवणुकी निघत असत व मोठी दंगल माजून जाई, त्यांत मुसलमानलोक व बंदोबस्त ठेवणारे पोलिस लोक यांच्याशीं हातघाईचा प्रसंग यावा, अशा तऱ्हेची योजना मुद्दाम केलेली असे. दंगाधोपा होऊन फौजदारी खटले चालले, ह्मणजे पुनः सरकाराविरुद्ध गवगवा करण्याची व लोकांची मनें क्षुब्द होतील अशा प्रकारचीं भाषणें न्यायाच्या कोर्टांत करण्याची, नवीन संधि टिळकास मिळत असे. तात्पर्य, गणपती–उत्सवामुळें टिळकाच्या चळवळींचें क्षेत्र फारच विस्तृत झालें.

तथापि, मराठे मंडळीस आपल्या बाजूला आणण्याचें काम टिळकास अद्यापि करावयाचें होतें. ह्मणून, ज्या **शिवाजीनें** मुसलमानलोकांचा पराभव करून, महाराष्ट्रांत हिंदुपादशाहीची स्थापना केली, त्याचा जन्म एका मराठ्या सरदाराच्या कुलांत झाला असल्याकारणानें, त्याच्या पराक्रमाचे पोवाडे गाऊन,

शिपाईबाण्याचे जे ' मराठे लोक ' त्यांच्या मनांत इंग्रजीराज्याविषयीं असलेलें प्रेम नाहींसें करून, त्यांना आपल्या बाजूला वळवून आणण्याच्या उद्योगास टिळक लागला. सह्याद्रीच्या उंच उंच डोंगरांवर, अवघड जागीं, शिवाजीनें बांधलेले किल्ले महाराष्ट्रांतील लोकांच्या अद्यापि नजरेसमोर असून, शिवाजीनें केलेल्या पराक्रमांचाहि विसर त्यांना झालेला नाहीं. महाबळेश्वराखालीं प्रतापगडाजवळ, दोन्ही सैन्यांच्यामध्यें शिवाजीनें भेटीच्या प्रसंगीं, अफझुलखान नामक मुसलमानसरदाराच्या पोटांत वाघनखें खुपसून त्याचा प्राण घेतला; व नंतर, शिवाजीच्या लपून बसलेल्या सैन्यानें झाडींतून बाहेर पडून, मुसलमानी लष्कराचा अगदीं धुव्वा उडऊन दिला; व हें ठिकाण अद्यापि दाखविण्यांत येत असतें. वास्तविक पाहतां, शिवाजीच्या पराक्रमांची जरी लोकांना आठवण आहे, तरी आतां तसा काळ येणें बहुतेक अशक्य आहे. थोड्या वर्षांपूर्वींच, एक इंग्रजगृहस्थ रायगडीं गेला होता. तेथें त्यानें शिवाजीची समाधि अगदीं मोडकळीस आलेल्या स्थितींत पाहिली. ह्मणून, ती हकीकत त्यानें एका स्थानिक वृत्तपत्रांत दिली; व महाराष्ट्रांतील लोकांस आपल्या राष्ट्रीय महात्म्याविषयीं योग्य तो अभिमान नसल्यामुळेंच त्या समाधीची अशी शोचनीय स्थिति आहे, अशी त्यानें टीकाहि केली होती. कांहीं लोकांचा असा तर्क आहे कीं, ही हकीकत वाचूनच टिळकाच्या मनांत प्रथमतः कल्पना आली कीं, शिवाजी–उत्सव सुरू करून, त्याचा फायदा राजकीय चळवळीस करून घ्यावा. आरंभीं आरंभीं पेशवाईचे गोडवे गाऊन, लोकांमध्यें जागृति करण्याकडेच त्याचा सारा भर होता. परंतु, ब्राह्मणेतर मराठ्यांना पेशवाईंत फार हाल सोसावे लागले होते, व त्यांचें सारें वैभव पेशव्यांनीं हिरावून घेतलें

होतें. त्यामुळें, पेशवाईची थोरवी गाइल्यानें मराठ्यांस आनंद न वाटून ते आपणास मिळणार नाहींत, ही गोष्ट टिळकाच्या लक्षांत आली असावी. कसेंहि असो; परंतु, टिळकानें शिवाजीला पुढें आणून, मोठी 'राष्ट्रीय' धामधूम सुरू केली; व सन १८९५ सालीं, महाराष्ट्रांत जेथें जेथें ब्राह्मणांचें वजन असून त्यांच्या खटपटी चालू होत्या, अशा सर्व मुख्य ठिकाणीं शिवाजीच्या जन्मदिवसानिमित्य उत्सव करण्यांत आले. ह्यांपैकीं मुख्य उत्सव रायगडीं खुद्द टिळकाच्या अध्यक्षतेखालीं साजरा करण्यांत आला. रायगडासच शिवाजीमहाराजांना राज्याभिषेक झाला होता. ह्या उत्सवाचा काय हेतु होता व त्यापासून काय अर्थ निघतो, ह्या प्रश्नांचा उलगडा खालीं दिलेल्या उताऱ्यावरून होईल, असें वाटतें. हा उतारा ह्मणजे, वरील प्रसंगीं टिळकाच्या एका पट्टशिष्यानें (हा शिष्य पुढें एका अमंगळ कृत्यामुळें प्रसिद्धीस आला) एक श्लोक आयत्यावेळीं रचून जमलेल्या लोकांपुढें ह्मटला, त्याचा गद्यार्थ आहे.

"साहसाचीं कृत्यें करण्याच्या कामीं आपण शिवाजीसारखी जलदी करूं चला. आपल्या ढालतरवारी घ्या, ह्मणजे आपण शत्रूंचीं असंख्य डोकीं उडवूं. ऐका! राष्ट्रीय युद्ध करण्याकरितां आपण आपला जीव धोक्यांत घातला पाहिजे; तरी आपल्या शत्रूंचा रक्तपात आपण खात्रीनें करूं."

शिवाजीच्या राज्याभिषेकाच्या दिवसाबद्दल उत्सव झाले, त्यावेळीं प्रथमतः राजकीय कारणासाठीं खून करणें हा हक्क—नव्हें कर्तव्यकर्म—आहे, असें उघडपणें प्रतिपादन करण्यांत आलें. ह्याप्रसंगीं टिळक अध्यक्ष असतां, एका ब्राह्मण प्रोफेसरानें उठून, शिवाजीनें केलेल्या रक्तपाताच्या कृत्याचें सार्वजनिक रीतीनें समर्थन केलें, तें असें:—

"मुसलमान बादशाहास लवून मुजरा करूं नकोस, अशी ईश्वरी प्रेरणा

ज्याला नऊ वर्षांचा असतांनाच झाली होती, त्याला ‘ खुनी ’ ह्मणण्याची कोणाची छाती आहे? वरिष्ठप्रतीचें कर्तव्य बजावण्यासाठीं कनिष्ठप्रतीच्या कर्तव्याकडे दुर्लक्ष केलें, ह्मणून शिवाजीला दोष देण्याची कोणाची हिम्मत आहे? अफझुलखानाच्या वधापेक्षां पांच नाहीं पन्नासपट मोठे गुन्हे शिवाजीनें केले असते, तरी मी स्वतः त्याच्या मूर्तीपुढें एकदां नाहीं पण शंभर वेळां साष्टांग नमस्कार घालण्यास तयार झालों असतों. ... ... ... ... ... हा आजचा देखावा पाहून प्रत्येक हिंदूस,- प्रत्येक मराठ्यास,-आनंद झालाच पाहिजे. कारण, आपण सर्वच आपलें गेलेलें स्वातंत्र्य पुनः मिळविण्याच्या प्रयत्नांत आहों; व आपण सर्वांनीं एकजुटीनें काम केलें, तर आपल्या मानेवरचें जूं फेंकून देतां येईल.”

टिळकाचे स्वतःचे उद्गार ह्याहिपेक्षां स्पष्ट होते, ते असेः—

“ अफझुलखानाच्या वधाबद्दल ह्यापुढें भवति नभवति करित बसण्यांत अर्थ नाहीं. अशी कल्पना करा कीं, शिवाजीनें अगोदरपासून बेत करून त्याचा खून केला. पण हें कृत्य चांगलें कीं वाईट? पिनलकोड, मनुस्मृति किंवा युरोप–एशियामधलें नीतिशास्त्र, ह्यांच्या आधारानें वरील प्रश्नाचा निकाल केव्हांहि लावावयाचा नाहीं. समाजांत जे कायदे चालू असतात, ते तुह्मां–आह्मांसारख्या साधारण माणसांस लागू असतात. जसें ऋषींचें मूळ शोधून काढूं नये, तसेंच महाराजावर दोषारोप करूं नये. नेहमींच्या व्यवहारांतील नीतितत्वें मोठ्या मनुष्यांस बंधनकारक होत नाहींत. मोठ्या मनुष्यांच्या पायांपर्यंत अशा नीतितत्वांचा प्रवेश होत नाहीं. अफझुलखानाला मारण्यांत शिवाजीनें कांहीं पातक केलें कीं काय, ह्या प्रश्नाचें उत्तर महाभारतांतच आहे. भगवत् गीतेमध्यें श्रीकृष्णभगवान् सांगतात कीं, आपल्या गुरूंस किंवा आप्तांस मारण्यास हरकत नाहीं; आणि निष्कामबुद्धीनें कर्म केल्यास कोणताच दोष लागत नाहीं. आपलें स्वतःचें पोट भरण्याकरितां शिवाजीनें कोणतेंच कृत्य केलें नाहीं. दुसऱ्यांच्या कल्याणाकरितां त्यानें अफझुलखानास मारिलें, ह्मणून तो स्तुतीस पात्र आहे. आपल्या घरांत चोर शिरले व त्यांस बाहेर घालवून देण्याचें सामर्थ्य आपल्या अंगीं नसलें, तर त्यांना आंत कोंडून जिवंत जाळून टाकण्यास मागें पुढें कां पाहावें? परमेश्वरानें म्लेंच्छांस हिंदुस्थानच्या राज्याचा कांहीं ताम्रपट करून दिलेला नाहीं. आपल्या जन्मभूमींतून त्यांना घालवून देण्याचा प्रयत्न शिवाजीनें केला. परंतु त्याच्या हृदयाला लोभ कधींहि

शिवला नाहीं. कूपमंडुकाप्रमाणें आपली दृष्टि आकुंचित करूं नका. पिनल कोडाची मर्यादा सोडून भगवद्गीतेंत सांगितलेल्या उच्च वातावरणांत शिरा; व तेथून थोर महात्म्यांच्या कृत्यांचा विचार करा."

अशा प्रकारचें भाषण व उत्सव करून, शिवाजी हा 'ईश्वरी अंश' होता, असें ठरविण्याचें काम टिळकानें आपल्या अंगावर घेतल्यामुळें, 'राष्ट्रानें ठरविलेला पुढारी' हा मान त्यालाच मिळाला. ईश्वरप्रणीत हिंदुधर्मावर हल्ला करणाऱ्यांशीं लढून जय मिळविणारा त्याचा कैवारी; गणपती--उत्सवांतील मुख्य पुरोहित; नवीन राष्ट्रीयत्वाचा ईश्वरप्रेरित भविष्यवादी इत्यादि सर्व मान टिळकास मिळाले. शिवाजीउत्सवाच्या चळवळीमुळें लोकांत जागृति होऊन, दुष्ट म्लेंच्छांस हिंदुस्थानांतून हांकून लावून, महाराष्ट्राचें गतवैभव त्याला पुनः प्राप्त करून देतां येईल, असें टिळकास वाटत होतें. १८९५ सालीं, मुंबई--इलाख्यांतील मध्यभागातर्फे त्याला लोकांनीं काउन्सिलांत निवडून पाठविलें, तेव्हां त्याच्या निवडणुकीस सरकारनें मुकाट्यानें मंजुरी दिली. पण, ह्याहिपेक्षां विशेष ह्मणजे, काउन्सिलांत गेल्यावर सरकाराविषयीं भलभलत्या कंड्या पिकपिणें व त्यांचा उपमर्द होईल अशा रीतीची भाषा वापरणें, वगैरे उद्धटपणाचीं कृत्यें अव्याहत चाललीं होतीं; व त्याबद्दल त्याला कोणी एका शब्दानेंहि विचारित नव्हते. ह्यावरून, सरकार टिळकाला भितें असा लोकांचा समज झाला होता. टिळकाचा क्रम सारखा सुरू असून, लोकप्रियता मिळविण्याविषयीं तो वाटेल तें करण्यास तयार असे. आपल्या पक्षाच्या लोकांस मदत करणें, त्यांना सल्लामसलत देणें, वगैरे गोष्टी करून तो लोकांस खुष ठेवी; व अशा लोकांची त्याच्या घरीं नेहमीं गर्दी असें. सार्वजनिक सभेचीं सर्व सूत्रें त्याच्या हातीं असून, पुण्याच्या म्युनिसिपालिटींतलीं सर्व कामें त्याच्या तंत्रानें चालत असत. भाषणें करून व वर्तमानपत्रांत

लेख लिहून, खाजगीरीतीनें व सार्वजनिकरीत्या, सुशिक्षित व अशिक्षित लोकांचा—विशेषतः अपक्व बुद्धीच्या उत्साही तरुण मंडळीचा—गैरसमज करून, त्यांचीं मनें खवळून टाकावीं, असा टिळकाचा वर्तनक्रम असे. १८९६ सालच्या अखेरीस दक्षिणेंत दुष्काळ पडण्याची भीति होती. भुकेनें व्याकूळ झालेल्या लोकांची दंगेधोपे करण्याकडे साहाजिकच प्रवृत्ति असते. अशा स्थितींत सरकारास सारा न देण्याविषयींची चळवळ टिळकानें सुरू केली. जमिनीचा सारा देऊं नका, असा लोकांस प्रत्यक्ष उपदेश होतांहोईलतों न करितां, टिळकाच्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणें, ह्याहि मोहिमेची मांडणी मोठ्या कुशलतेनें करण्यांत आली होती. ज्या ठिकाणीं ठरीव प्रमाणापेक्षां कमी पीक आलें असेल, तेथें यंदा सारा वसूल करावयाचा नाहीं असा सरकारचा इरादा आहे, असें लोकांस सांगण्याकरितां टिळकाचे बगलबच्चे गांवोगांव हिंडून सभा भरवूं लागले. आणि ह्या गोष्टीवर रयतेचा सहजच विश्वास बसला; व हप्ता भरण्याची वेळ आली, तेव्हां 'आह्मी वसूल देत नाहीं,' असें लोक ह्मणूं लागले. ह्या सर्व खटपटीमुळें सरकारास फार त्रास झाला. मुंबईंतील राणीच्या पुतळ्यास डांबर फांसणें, चर्चमिशन—हॉलला आग लावण्याचा प्रयत्न करणें, टिळकाच्या कंपूंत न शिरणाऱ्या नेमस्त हिंदुलोकांना चोप देणें, इत्यादि अनिष्ट गोष्टींना मोठा ऊत आला होता. आणि, प्लेग आला तेव्हांपासून तर जास्तच वाईट प्रकार होऊं लागले. प्लेगचा प्रसार होऊं नये ह्मणून, घरांची तपासणी करणें, दूषित घरें रोगजंतुनाशक द्रव्यांच्या पाण्यानें धुणें, ब्राह्मणजातीचे असले तरी प्लेगचे रोगी जबरीनें काढून नेणें, इत्यादि गोष्टी सरकारानें आरंभीं सुरू केल्या होत्या. त्यामुळें, एतद्देशीय

लोकांच्या चालीरीती व समजुती ह्यांस निःसंशय धक्का बसल्या कारणानें ते लोक चिडून गेले. ह्या प्रसंगाचा फायदा घेऊन, गुप्तरीतीनें आंतून चळवळ करून व वर्तमानपत्रांत उघडपणें कडक लेख लिहून, लोकांचा क्रोधाग्नि भडकविण्याची खटपट जितकी करितां येईल, तितकी टिळकानें केली. लोकांनीं दंगाधोपा करण्यास प्रवृत्त व्हावें ह्या उद्देशानें, शिवाजीचा उपदेशह्मणून, ‘ केसरींत ’ लेख येऊं लागले. ह्याचा परिणाम व्हावयाचा तो झालाच. १८९७ च्या जून महिन्याच्या २७ व्या तारखेस, ख्रिस्तवासी विक्टोरिआ महाराणीच्या डायमंड ज्युबेली निमित्य, पुण्यास गणेशखिंडीमध्यें उत्सव होता. तिकडून परत येत असतां, पुण्याच्या प्लेगकमेटीचे अध्यक्ष मि० ऱ्यांड व कामिसारिएट खात्यामधील ले० ऐयर्स्ट, ह्या दोघांचा खून, दामोदर चाफेकर नांवाच्या एका तरुण चित्पावन ब्राह्मणानें बंदुकीनें केला. ह्या गुन्ह्याचा व टिळकाचा कांहीं प्रत्यक्ष संबंध दिसून आला नाहीं. परंतु, गेल्याच्या मागील दिसेंबरांत नाशकास ज्याकसनसाहेबाचा खून करणाऱ्याप्रमाणेंच, मि० ऱ्यांड व ले० ऐयर्स्ट ह्यांचा खून करणाऱ्यानें उघडपणें कबुली दिली कीं, टिळकाच्या वर्तमानपत्रांतील लेख वाचूनच हे खून करण्याकडे माझी प्रवृत्ति झाली. रायगडच्या शिवाजी–उत्सवाच्या वेळीं एक श्लोक रचून ह्मटल्याबद्दल मागें सांगण्यांत आलें आहे, तो श्लोक ह्याच दामोदर चाफेकरानें ह्मटला होता. टिळकाच्या शिकवणीप्रमाणें ज्यानें फक्त कृति केली, त्या खुनी मनुष्यास फांशीची शिक्षा झाली. परंतु टिळकासमात्र, त्यानें ह्या खुनापूर्वीं कांहीं दिवस प्रसिद्ध केलेल्या एका राजद्रोही लेखाबद्दल, थोड्या मुदतीची कैदेची शिक्षा झाली; व ह्याहि शिक्षेची मुदत पुरी

होण्यापूर्वींच, 'पुढें चांगली वर्तणूक ठेवीन,' अशा अर्थाचा करार त्यानें लिहून दिल्यामुळें, कारागृहांतून त्याची सुटका करण्यांत आली. परंतु, हा करार टिळकानें फार दिवस पाळला नाहीं.

अशा रीतीनें हिंदुस्थानांत अस्वस्थता उत्पन्न करण्याकरितां सुरू केलेली पहिली मोहीम संपली. ह्याच उद्देशानें इतर ठिकाणीं ज्या चळवळी पुढें चालू झाल्या, त्या करण्याची प्रेरणा महाराष्ट्रांतल्या मोहिमेपासूनच मिळाली होती; व तिचीच हुबेहुब नक्कल बारीकसारीक गोष्टींतदेखील करण्यांत आली.

पुण्याच्या खुनांची वार्ता कानीं पडतांच, हिंदुस्थानांतील सर्व ठिकाणच्या लोकांच्या अंगावर कांटा उभा राहिला; आणि, इंग्लंडमध्यें देखील कांहीं थोडा वेळ गडबड उडाली. ह्या गोष्टी पुढें कोणत्या थरावर जातील, ह्याची सरकाराला अगदींच कल्पना नव्हती, असें नाहीं. परंतु, अशा प्रसंगीं कसें वागलें पाहिजे, ह्याबद्दल सरकारास आपलें धोरण ठरवितां येईना; आणि, वरील इतिहासाची पुनरावृत्ति मोठ्या प्रमाणावर होईपर्यंत--ह्मणजे पांच पन्नास राजकीय खून होऊन, राज्यक्रांतीचे अनेक कट उघडकीस येईपर्यंत--फौजदारी कायद्यांतील वर्तमानपत्रें व छापखानें ह्या संबंधाच्या एक दोन कलमांत कांहीं किरकोळ दुरुस्ती करण्यापलीकडे, सरकारानें कांहींच केलें नाहीं. शिक्षेची मुदत पुरी होण्यापूर्वींच, सरकारानें मोठें मन करून, टिळकाची मुक्तता केली. परंतु, हा एक टिळकाचा जयच झाला, असें महाराष्ट्रांतील लोकांस वाटलें. टिळकानें राष्ट्रहितासाठीं हालअपेष्टा सोसल्या, ह्मणून तो राष्ट्रीय 'महापुरुष' आहे, असा त्याच्या अनुयायांकडून त्याचा मोठा गौरव झाला. चांगल्या हवेच्या ठिकाणीं कांहीं दिवस राहून विश्रांति घेतल्यावर, केसरी--पत्राचीं सूत्रें टिळकानें

पुनः आपल्या हातीं घेतलीं. टिळक कारागृहांत असतांना, त्याचे चित्पावन साथीदार, राजश्री केळकर व खाडिलकर, ह्यांनीं केसरीपत्राचें धोरण यत्किंचित् न बदलतां, टिळकाप्रमाणेंच जहाल लेख लिहिण्याचा सपाटा लाविला होता. सन १९०० सालीं, रायगडास शिवाजीच्या जन्मदिवसाचा उत्सव मोठ्या थाटानें करण्यांत आला; त्यावरून, टिळकानें आपल्या चळवळीचें धुरीणत्व पुनः हातीं घेतलें, असें सर्व जगास कळून चुकलें. महाराष्ट्रांतील ह्या दुसऱ्या चळवळीचा इतिहास क्रमशः देण्याचें कारण दिसत नाहीं. गणपति—उत्सव, शिवाजी—उत्सव, तालीमबाजांच्या टोळ्या, वगैरे गोष्टी अगदीं पूर्वींप्रमाणेंच असून, त्यांच्या मार्फत तोच उद्योग चालू होता. पुण्याचे श्री. बाबामहाराज हे टिळकाचे स्नेही असल्यामुळें, आपल्या मृत्युपत्राची व्यवस्था लावण्यास नेमलेल्या मंडळींत त्यांनीं टिळकाचें नांव घातलें होतें. बाबामहाराजाची विधवा स्त्री ताई—महाराज, हिच्या मांडीवर दत्तक देण्यासंबंधाच्या बाबतींत भानगड होऊन, दिवाणीकोर्टापर्यंत मजल गेली. त्यांत बनावट कागद करणें, खोटी साक्ष देणें, पैशाची अफरातफर करणें, वगैरे गोष्टीबद्दल टिळकावर फौजदारी काम चाललें. दत्तकाचा खटला तीनचार वर्षें चालला होता, त्यांत टिळकाचा बराच वेळ गेला. शेवटीं, हा त्रासदायक दावा पुष्कळ दिवस चालल्यावर, अव्वलकोर्टानें टिळकासारखा निकाल दिला. ह्या विजयामुळें टिळकाचें महत्त्व अधिकच वाढलें. ह्या दत्तकाच्या कामीं पुढें हायकोर्टांत अपील होऊन, खालच्या कोर्टाचा ठराव फिरला; आणि, टिळकानें पुढें केलेला दत्तक बेकायदेशीर ठरला. परंतु, पहिला निकाल होण्याबरोबरच स्वाभाविकपणें टिळकाविषयीं जिकडे तिकडे—राजकीय बाबतींत त्याच्या

उलट असणाऱ्या लोकांत देखील—सहानुभूति उत्पन्न झाली. वर सांगितल्याप्रमाणें फौजदारी कायद्याच्या कचाटींत असतांनाही, वर्तमानपत्रद्वारा, अथवा त्याच्या हातांत असलेल्या अनेक संस्थेच्या-मार्फत, राजकीय खटपटी करून, इंग्रजांविषयीं लोकांचीं मनें कलुषित करण्याच्या कामांत, टिळकाकडून थोडीदेखील ढिलाई झाली नाहीं.

दुसरी गोष्ट अशी कीं, पुण्याच्या आणि महाराष्ट्राच्या पलीकडेहि टिळकाचें वजन झपाट्यानें वाढत चाललें. पहिल्या पासूनच हिंदुस्थानच्या राष्ट्रीय परिषदेंत त्याचें अंग होतें; व महाराष्ट्रांतील स्थांडिंग कमेटीचा तो सेक्रेटरी होता. कांग्रेसचें काम करित असल्या करणानें, इतर प्रांतांतल्या राजकारणी मंडळीशीं त्याचा परिचय झाला होता; व, थोडक्याशा कारणानें ज्यांची चित्तवृत्ति उचंबळून जाते अशा बंगाली लोकांवर, टिळ-काच्या मतांचा व प्रत्यक्ष कृतीचा जितका परिणाम झाला, तितका दुसऱ्या कोणांवर झाला नाहीं. त्याच्या अंगीं बंगाल्यांप्रमाणें खणखणीत वक्तृत्वहि नसे; व राष्ट्रीय परिषदेच्या वार्षिक बैठकीच्या प्रसंगीं तो वक्ताह्मणूनहि लोकांपुढें फारसा येत नसे. तथापि, अनुकूल–प्रतिकूल गोष्टींचा पूर्ण विचार करून प्रसंगीं शक्कल लढविण्याची कला, कधींहि न ढळणारी उत्साहवृत्ति व दुसऱ्यावर छाप ठेवण्याची विद्या, ह्या गोष्टी टिळकाच्या अंगीं असल्याकारणानें, तो बंगाल्यांच्या गळ्यांतला केवळ ताईत होऊन राहिला होता. १९०५ सालीं काशीस व १९०६ सालीं कलकत्त्यास कांग्रेस भरली, त्या वेळीं बंगालच्या फाळणीसंबं-धानें मोठी चळवळ चालली होती. ह्या दोनहि बैठकांच्या वेळीं, उघड उघड पुढें न येतां, आंतून कारस्थानें करून, टिळकानें

आपणास पाहिजे होते, तसे ठराव सभेंत पास करून घेतले. ह्मणजे, सदरहु दोन्ही प्रसंगीं टिळक हा कांग्रेसचा मुख्य चालक असून, सर्व लोक त्याच्या हातांतलीं बाहुलीं होतीं, असें ह्मटलें तरी चालेल. इंग्रजी राज्याविरुद्ध चळवळ करण्यांस, **स्वदेशी** ह्या औद्योगिक अस्त्राचा फार चांगला उपयोग होईल, असें ह्मणणाऱ्यांपैकीं तो एक होता; व **बहिष्कार**रूपी मात्रेचा उपयोग केला असतां, त्यापासून जी गडबड उडेल व जो धुम्माकूळ माजेल, त्याचा फायदा घेऊन, लोकांत पूर्वींपेक्षां अधिक असंतोष पसरविण्यास सांपडेल, असें त्याला वाटलें. बंगालसंबंधानें ह्मणाल तर, टिळकाच्या **केसरीच्या** धोरणानें आपलें धोरण ठेवणाऱ्या जहाल पत्रकारांनीं आपलें काम पूर्वींच करून टाकिलें होतें; व बिपिनचंद्रपाल आणि अरविंद घोष अशासारख्या लोकांपासून आपणास मोठें साहाय्य होईल, अशी टिळकाची पूर्ण खात्री होती. पाल व घोष ह्यांचीं सामाजिक व धार्मिक मतें पुष्कळ अंशीं टिळकाच्या मतांशीं जुळतीं नव्हतीं, तरी राजकीय गोष्टींत ते त्याचें शिष्यत्व पतकरण्यास अगदीं एका पायावर तयार होते. सुरेंद्रनाथ बानरजीचा व टिळकाचा पुढें बेबनाव झाला; परंतु प्रथमतः त्यानें आपला कार्यक्रम महाराष्ट्राच्या पुढाऱ्याच्या धोरणाबरहुकूमच बहुतेक आंखला होता. महाराष्ट्रांतील शिवाजी–उत्सव बंगाल्यांत सुरू करण्यासारखी सर्वस्वी अनुचित गोष्ट बानरजीनें केली इतकेंच नाहीं, तर केवळ टिळकाचा कित्ता गिरवून, जगाचा अंत करणारी महाभयंकर जी **कालीमाता** तिला **स्वदेशी, बहिष्कार,** इत्यादि चळवळीचें मुख्य दैवत करून, तिच्या प्रसादानें कार्यभाग उरकण्याची क्लृप्ति त्यानेंच काढली. तसेंच, शाळेंतील मुलें व

प्रौढ विद्यार्थी ह्यांचे मर्दानीखेळाचे आखाडे काढून, त्यांच्या साहाय्यानें राजकीय चळवळी करण्याच्या कामीं त्यानें टिळकाचेंच अनुकरण केलें. ह्या वेळीं टिळकाचा असा बेत होता कीं, बंगालच्या लोकांनीं राजकीय चळवळी करण्याचा जो नवीन मार्ग स्वीकारिला आहे, तो कांग्रेसला—ह्मणजे हिंदुस्थानच्या लोकांच्या प्रतिनिधींच्या सभेला—पसंत पडला, ह्मणजे त्याला साऱ्या हिंदुस्थानची पसंती आहे, असें समजलें जाईल. एतद्देशीय उद्योगधंद्यांस उत्तेजन मिळावेंह्मणून **स्वदेशी**--चळवळ केल्यास, ती अगदीं कायदेशीर आहे. ह्या दृष्टीनें **स्वदेशी**-व्रताचा अंगीकार करणें व बंगाली लोकांना विकाररहित सहानुभूति दाखविणें, इतक्याच गोष्टी कांग्रेसनें कराव्या, असा बंगाल्याबाहेरील हिंदीलोकांच्या मनाचा कल होता. १९०५ सालच्या बनारसच्या बैठकीमध्यें ठराव करून, राजकीय बहिष्कारास फक्त कांहीं अटीवर कांग्रेसनें आपली अनुमति दिली होती. परंतु, त्या ठरावाची अंमलबजावणी करतांना, जें दांडगाईचें व उच्छृंखलपणाचें वर्तन लोकांच्या हातून झालें, त्यामुळें, पुढल्या वर्षाच्या (१९०६) कलकत्त्याच्या बैठकींत बहिष्काराचा विषय हातीं घेऊन, कांग्रेसनें तत्संबंधाचें आपलें धोरण कोणत्याहि तऱ्हेनें ठरवून घेऊं नये, अशाकडे नेमस्त पक्षाची अधिकच प्रवृत्ति झाली. बंगाल्यांतील **जहाल**—पक्षाचा पुढारी बिपिनचंद्र पाल असून, कलकत्त्याच्या कांग्रेसचें अध्यक्षस्थान टिळकास द्यावें, अशी उठावणी त्यानें केली. ह्या खटपटीमुळें कांग्रेस मोडून जाण्याचा प्रसंग अगदीं येऊन ठेपला होता. परंतु, तडजोड निघून, तो प्रसंग मोठ्या प्रयासानें टळला. सर फेरोझशहा मेथा नांवाचे एक थोर पारशी पुढारी मुंबईस असतात. इंग्लंडांत विद्याभ्यासाकरितां ते असतांना,

ग्ल्याडस्टन, ब्राइट, इत्यादि राजकारणी पुरुषांचीं व्याख्यानें ऐकून, उदारमतवादी पक्षाच्या राजकीय ध्येयांचा त्यांच्या मनावर परिणाम झाला होता. त्यामुळें, हिंदुस्थानांतील कांग्रेसच्या पक्षास ते सहजच येऊन मिळाले. कलकत्त्याच्या आणीबाणीच्या प्रसंगीं त्यानींच युक्ति लढवून तोड काढिली, ही गोष्ट सर्वांस कबूल असलीच पाहिजे. वक्तृत्वाच्या दृष्टीनें सर फेरोझशाहाची योग्यता कोणत्याहि बंगाली वक्त्यापेक्षां कमी नसून, चार लोक वागवून घेण्याची कला त्यांना उत्तम साधली आहे. धार्मिक व सामाजिक प्रश्नांच्या बाबतींत, मि० गोखल्यांचा टिळकाशीं जितक्या जोराचा विरोध होता, तितक्याच जोराचा सर फेरोझशाहाचा राजकीय बाबतींत त्याच्याशीं होता. सुरतेच्या कांग्रेसमध्यें मारामारी होऊन ती मोडून जाईपर्यंत, कांग्रेसमध्यें टिळकी मतांचा पूर्ण जय झाला नाहीं, ह्याचें श्रेय जसें मेथांस आहे, तसें दुसरे कोणास नाहीं. त्यांच्याच प्रयत्नामुळें कलकत्त्याच्या कांग्रेसचें अध्यक्षस्थान वयोवृद्ध व ज्ञानवृद्ध दादाभाई नवरोजीशेट यांस देण्यांत आलें. कांग्रेसचें जनकत्व बहुतेक दादाभाईकडे असून, अगदीं आरंभीं जे थोडे उदारमनस्क पारशी गृहस्थ त्यांचें साहाय्य करीत होते, त्यांच्या श्रमांमुळेंच कांग्रेसला चांगले दिवस आले होते. शिवाय, दादाभाईंच्या सुशीलपणामुळें व आचारशुद्धतेमुळें त्यांच्याविषयीं सर्व लोकांस मोठा आदर वाटत असे. त्यामुळें, त्यांच्या निवडणुकीविरुद्ध उघडपणें एक शब्द काढण्याची कोणाची हिंमत झाली नाहीं. पण, इतकेंहि करून शेंवटीं कांग्रेसमध्यें आलेल्या एका सूचनेवर टिळकानें उपसूचना आणून, ठराव पास करून घेतला. त्या ठरावांत **बहिष्कार** हा शब्द जरी घातला

नव्हता, तरी बहिष्काराच्या चळवळीस उत्तेजन देण्याचें धोरण कांग्रेसनें स्वीकारिलें, असा त्याचा अर्थ होता. परंतु, इतक्यानें जहालपक्षाचें समाधान झालें नाहीं; व आपलें ह्मणणें सर्वस्वी सिद्धीस गेलें नाहीं, ह्याबद्दल त्यांना बरेंच वैषम्य वाटलें. शिवाय, पुढल्या वर्षीं नेमस्त पक्षाची मंडळी आणखीहि माघार घेण्याच्या विचारांत आहे, असा त्यांना संशय आला. नेमस्तांचा असा कांहीं बेत असल्यास तो हाणून पाडण्याकरितां, सुरतेची कांग्रेस भरण्यापूर्वींच, अरविंद घोषाच्या अध्यक्षतेखालीं **राष्ट्रीय** पक्षाची ह्मणून एक परिषद् टिळकानें भरविली. ह्या सभेंत असें ठरलें कीं, कलकत्त्याच्या बैठकींत कांग्रेसनें जे ठराव पास केले आहेत, ते जशाचेतसे पुढल्या–ह्मणजे सुरतेच्या–बैठकींत पास केले जातील अशा आशयाचा करार नेमस्त पक्षानें जहालपक्षाशीं केल्याशिवाय, अध्यक्षाची निवडणूक होऊं द्यावयाचीच नाहीं. परंतु, हा टिळकाचा कावा पूर्णपणें साधला नाहीं. सुरतेच्या कांग्रेसमध्यें पहिल्याच दिवशीं गोंधळ माजून, जहालपक्षाच्या लोकांनीं सुरेंद्रनाथास देखील बोलूं दिलें नाहीं ह्या एकाच गोष्टीवरून, टिळक व त्याचे तरुण बंगाली अनुयायी आणि बंगालचा जुना कसलेला पुढारी सुरेंद्रबाबु, ह्यांमध्यें व्यक्तिविषयक द्वेष किती वाढला होता, हें स्पष्ट दिसतें. दुसऱ्या दिवशीं तर अधिकच गडबड उडाली; आणि एकमेकांचीं डोकीं फोडण्यापर्यंत मजल गेल्यावर, कांग्रेसचीं दोन शकलें झालीं तीं पुनः कधींहि जुळावयाचीं नाहींत; व त्यामुळें जें कांग्रेसचें वजन कमी झालें, तें अझूनहि तिला पुनः प्राप्त झालें नाहीं.

तथापि, महाराष्ट्रांत किंवा महाराष्ट्राच्या बाहेर, ह्या वेळीं **जहाल** पक्षामध्यें टिळकाचें जेवढें वजन बसलें, तेवढें पूर्वीं

कधींहि नव्हतें. महाराष्ट्रांत त्याच्या सर्व चळवळी पूर्वींप्रमाणें चालू होत्या इतकेंच नाहीं, तर त्यांचें क्षेत्रहि वाढलें होतें. दुसऱ्या एका चित्पावनब्राह्मणानें चालविलेलें **काळ** पत्र व पुण्याचें (?) **राष्ट्रमत** ह्या दोन्ही पत्रांनीं टिळकाच्या स्वतःच्या **केसरी** पत्रावरहि ताण करून सोडली. त्याशिवाय पुष्कळ लहान लहान गांवीं **केसरीची** 'री' ओढणारीं अनेक चिटोरीं अस्तित्वांत आलीं. **राष्ट्रीय** शाळा स्थापन करण्याची एक नवीनच टूम ह्या वेळीं काढण्यांत आली. सरकारच्या अगदीं मदतीशिवाय ह्या शाळा चालवावयाच्या, असा जहालपक्षाचा इरादा असल्यामुळें, त्या शाळांवर सरकारची मुळींच देखरेख असणार नाहीं, आणि जहालपक्षास पाहिजे त्या तऱ्हेचें—ह्मणजे राजद्रोह फैलावण्यासारखें शिक्षण, कांहीं अडथळा न येतां देतां येईल, अशी ह्या चळवळीच्या पुरस्कर्त्यांची उमेद होती. तिगस्त सालीं, मध्यप्रांतांत ज्या शाळा बंद करण्यांत आल्या, त्या अशा प्रकारच्या होत्या. पुण्याजवळच्या तळेगांवींहि अशीच एक शाळा होती, ती गुदस्त सालीं बंद केली. गेल्या वर्षांत हिंदुस्थानांत—विशेषतः खुद्द मुंबईत कापसाच्या गिरण्यांची संख्या पुष्कळ वाढली आहे. त्यामुळें, जागजागीं गिरण्यांतील मजुरांचे मोठमोठे जमाव होऊन राहिलेले आहेत. एका जागीं हजारों मजूर जमून राहण्यासारखी परिस्थिती पूर्वीं हिंदुस्थानांत कधींच नव्हती; व असे अशिक्षित लोक राजकारणामध्यें मुळींच दिसत नसत. परंतु, ही स्थिती पालटल्या कारणानें, टिळकाला त्या लोकांशीं संबंध ठेवून, त्यांच्या जमावाचा फायदा घेण्यास आयतेंच फावलें. एकट्या मुंबईशहरांतच सुमारें शंभर सूत काढण्याच्या व कापड विणण्याच्या गिरण्या असून, त्यांत एक लाखापेक्षांहि अधिक मजूर काम करित असतात.

हे लोक बहुधा मुंबईशहराच्या उत्तर भागांत जमावानें राहतात. मोठमोठ्या चाळींतून गर्दी करून हे लोक राहत असल्याकारणानें चळवळी करण्याच्या कामांत तरबेज झालेल्या लोकांस, अशा अशिक्षित व अज्ञानी लोकांच्या घोळक्यांस भलत्या सलत्या गोष्टी शिकवून, आपल्या बाजूस वळविण्यास चांगलीच संधि मिळते. टिळकाचे दूत बहुतकरून दक्षिणी ब्राह्मण असत; व गिरणींतल्या मजूरांत कुणबी, मराठे असून, शिवाय अस्पृश्य मानलेले लोकहि असतात. तेव्हां, अशा लोकांत जाऊन, मिळून मिसळून वागल्यामुळें, टिळकाच्या मंडळीचें प्रस्थ बरेंच वाढलें, व आपलें अतिदुष्टपणाचें काम करण्यास त्यांना चांगलेंच फांवलें. टिळकप्रभृति लोकांची नेहमींची तऱ्हा ह्मणजे, राजकीय चळवळीची परोपकाराच्या कृत्यांशीं उत्तम प्रकारची सांगड घांलून द्यावयाची; व हाच नियम गिरणींतील मजुरांत चालू केलेल्या चळवळीस लागू होता. हिंदुस्थानांतील मजुरांची स्थिति सर्वस्वी चांगलीच आहे, असें ह्मणतां येत नाहीं. त्यामुळें, टिळकाच्या पक्षांतील कांहीं लोकांस, आपल्या गरीब देशबंधूंची खरोखरच दया येऊन, त्यांचीं दुःखें कमी करून ह्यांची स्थिति सुधारण्याची मनापासून इच्छा नव्हती, असें ह्मणणें वाजवी होणार नाहीं. मजुरांची स्थिति वाईट असण्याचें मुख्य कारण ह्मणजे, त्यांच्यांतील दारूचें व्यसन होय; आणि, आपल्या नेहमीच्या पद्धतीप्रमाणें, प्रत्येक गोष्टीस नसतें स्वरूप देऊन जातिद्वेष वाढविण्याच्या कामीं, मद्यपाननिषेधाच्या चळवळीचा दुरुपयोग टिळकानें केला नसता, तर गिरणींतील मजुरांस ह्या दुष्ट व्यसनापासून सोडविण्याकरितां, जो उद्योग त्यानें केला, त्याबद्दल त्याचा मोठा गौरव झाला असता.

त्याचे मूळचे हेतु उत्तम असतील. परंतु, त्याच्या मनांत इंग्रजाविषयींच्या द्वेषबुद्धीचें जणुं कांहीं साम्राज्य असल्याकारणानें इतर मनोविकारास तेथें जागाच नव्हती. गिरणींतील मजुरांसाठीं आपण जें कांहीं करित आहों, तें केवळ परोपकार बुद्धीनें करित आहों, असें टिळकानें भासविल्यामुळें, फसून जाऊन, कायद्याला भिऊन वागणारे पुष्कळ लोक त्याच्या मताचे होऊन, त्याच्या मतलबाप्रमाणें वागण्यास तयार झाले. टिळकानें ह्या लोकांना अशी भुरळ पाडली नसती ह्मणजे परोपकाराचें सोंग न आणतां, आपल्या राजकीय चळवळींचा मुख्य हेतु लोकांस उघडपणें सांगितला असता—तर ह्या वरील लोकांनीं त्याच्या ह्मणण्याप्रमाणें कधींहि केलें नसतें. आपल्या मतांचा प्रसार करण्याच्या कामीं खर्च करण्याकरितां टिळकाजवळ पैशाचा मोठा संग्रह असला पाहिजे. त्याला आपखुषीनें पैशाची चांगली मदत करणारे लोक निःसंशय थोडे नसले पाहिजेत. तथापि, जे लोक अशी मदत करण्यास कांकूं करित होते, किंवा मुळींच तयार नव्हते, त्यांच्यावर वर्तमानपत्रांतून चरचरीत लेख लिहून व त्यांना वळणीवर आणून, आपल्या फंडास मदत देण्यास लावण्याची विद्या टिळकाला पुरी अवगत होती. त्याचप्रमाणें, टिळकानें स्थापन केलेल्या तालिमबाज लोकांच्या मंडळ्यांनींहि दरोडे घालून, स्वराज्याचा खजिना गडगंज करण्याचा मार्ग स्वीकारला होता. मि. गोखल्यांची नीतिमत्ता व बुद्धिवैभव मोठें होतें; तथापि टिळकाच्या लोकप्रियतेस महाराष्ट्रांत जी भरती आली, तिच्या लोंढ्यापुढें त्यांचेंहि कांहीं चाललें नाहीं. आणि, ह्या ओघासरसें आपण वाहून जाऊं व आपला मागमूसहि राहणार नाहीं, ह्या भीतीमुळें, नेमस्तपक्षाच्या पुष्कळ लोकांप्र-

माणें, आपल्या मनाला बरोबर वाटत नसतांहि मि. गोखल्यांना टिळकाच्या ह्मणण्यास पुष्कळवेळां रुकार द्यावा लागला असावा. ब्यारिस्टर, वकील, शाळामास्तर, प्रोफेसर, सरकारी कचेऱ्यांतील कारकून इत्यादि प्रकारचे लोक टिळकाचे चेले होऊन राहिले होते. ह्मणजे, सुशिक्षित ह्मणविणाऱ्या लोकांपैकीं पुष्कळ लोक टिळकपक्षाचे होते; व ते बहुधा ब्राह्मणजातीचे असत. टिळकाचीं मतें शहरांतल्या तेलीतांबोळी लोकांत पसरूं लागलीं इतकेंच नाहीं, तर खेड्यापाड्यांतील शेतकरी लोकांतहि—निदान पाटिल कुलकर्ण्यांतहि--त्यांचा फैलाव होऊं लागला.

पण, इतक्यानेंच संपलें नाहीं. पूर्वीं सांगितल्याप्रमाणें राष्ट्रीय परिषदेशीं टिळकाचा संबंध आल्यामुळें, महाराष्ट्राखेरिज इतर ठिकाणींहि त्याचें लोकांवर फार वजन बसलें. टिळकाचें घर ह्मणजे इंग्रजाविषयीं अप्रीति झालेल्या हिंदुस्थानच्या सर्व ठिकाणच्या लोकांचें यात्रा करण्याचें एक स्थळच झालें होतें. अगदीं कनिष्ठ स्थितीस पोंहोचलेल्या ( महार, मांग इत्यादि ) लोकांविषयीं टिळकाचीं मतें थोडीं उदार असून तीं तो कधीं कधीं बोलूनहि दाखवीत असे; तरी देखील तो ‘ ब्राह्मणांत ब्राह्मण ’ व ‘ धर्माचा केवळ आधारस्तंभ ’ असा मानला जाई. पाश्चिमात्य व पौर्वात्य तत्वज्ञानांत तो फार प्रवीण आहे, अशी त्याची मोठी ख्याति होती. प्रतिपक्षाच्या अंतःकरणास झोंबेल, अशी भाषासरणी, व अश्रांत श्रम करण्याचें सामर्थ्य, हे गुण त्याच्या ठिकाणीं असून, आपल्या परोपकाराच्या कृत्यांनीं लोकांस दिपवून टाकण्याची हातोटी त्याला उत्तम साधली होती. त्याच्याकडे येण्यास श्रीमंतास व गरीबास सारखीच मोकळीक असे. खरा दयाभूतपणाहि त्याच्या अंगी पुष्कळ वेळां

दिसून येई. शरीरानें मोठा धिप्पाड किंवा देखणा नसतांहि ज्यांचा त्याच्याशीं सहवास घडे, त्यांच्यापैकीं पुष्कळ लोक--विशेषतः तरुण मंडळी--त्याच्यावर अगदीं मोहून जाऊन, त्याचे अंकित होऊन रहात. ह्या सर्व गोष्टींमुळें क्रांतिकारक चळवळीचें सुकाणूं हातीं धरण्यास, टिळकाइतकी योग्यता दुसऱ्या कोणत्याहि हिंदी राजकारणी मनुष्यांत नव्हती.

टिळकानें हिंदुलोकांपुढें दोन गोष्टी ठेविल्या. त्यांपैकीं पहिली ही कीं, हिंदुस्थानांत—मुख्यतः मराठ्यांची जन्मभूमि जो महाराष्ट्र देश त्यांत—हिंदुराजाचा अंमल असला, ह्मणजे लोकांना जसें सुख लागतें, व त्यांची जशी भरभराट असते, तशी स्थिति परकी राक्षसांच्या अंमलांत असणें, ही गोष्ट कधीं भूतकाळीं झाली नाहीं, व भविष्यकाळीं होणें नाहीं; आणि, पाश्चिमात्य देशांतील शास्त्रीय शोध हिंदुस्थानांत आणून, त्याचा कांहीं फायदा करण्याचें काम इंग्रजी राज्यामुळें एकेकाळीं झालें असलें, तरी येथील लोकांची जी संपत्ति त्यांनीं हरण करून नेली आहे, व येथील सामाजिक व धार्मिक संस्थांना जो धक्का बसला आहे, त्यामुळें एतद्देशीयांचें व्यावहारिक व नैतिक नुकसान फारच झालें आहे. दुसरी गोष्ट अशी कीं, इंग्रजलोकांपाशीं जी कांहीं साध्य करून घेण्यासारखी विद्या होती, ती सारी ब्राह्मणांस प्राप्त झाली आहे. ह्मणून, जर पुनः ब्राह्मणांच्या हातीं सत्ता आली, तर जिकडे तिकडे **रामराज्य** सुरू होऊन, देव आणि मनुष्यें ह्यांचें कल्याण होईल. आतां, हिंदुस्थानांतील इंग्रजी-राज्य उलथून पाडतां येईल, ह्या गोष्टीवर खुद्द टिळकाचा विश्वास क्वचितच असेल, असें वाटतें. परंतु, ज्या हिंदी लोकांना टिळकाची पुरी माहिती होती, त्यांनींच मला सांगितलें आहे कीं,

इंग्रज लोकांना भीति वाटेल अशा रीतीनें एकसारखी चळवळ करीत राहिलें, ह्मणजे निरुपाय होऊन किंवा कंटाळून जाऊन, शेवटल्या दोन पेशव्यांप्रमाणें, सर्व सत्ता हळू हळू ते ब्राह्मणांच्या हातीं देतील, व आपण केवळ नांवाचे राज्यकर्ते होऊन राहतील, अशी टिळकास खरोखरींच मोठी उमेद होती. टिळकपक्षाच्या एका पत्रानें धडकून लिहिलें आहे कीं, "इंग्रजलोक सर्व सत्ता आमच्या हातीं देऊन, आपण केवळ नामधारी राजे होतील, तर अजूनहि त्यांचा व आमचा समेट होईल."

अशा प्रकारची स्थिति असतां, बंगाल्यांतील मुझफरपुर येथें बांबगोळा पडून, मिसेस व मिस केनडी ह्या दोन युरोपिअन बायांचा खून झाला, त्यासंबंधानें केसरींत टीका करतांना, लोकांच्या मनांत इंग्रजी राज्याविषयीं संताप उत्पन्न होईल, अशा प्रकारचे लेख लिहिल्याबद्दल, तारीख २४ जून १९०८ रोजीं टिळकास मुंबईमध्यें पकडण्यांत आलें. बंगाल्यांत पुढें जे अनेक राजकीय गुन्हे झाले, त्यांपैकीं हा पहिला गुन्हा होता. वरील अत्याचारामुळें प्रथमतः लोकांत जी गडबड उडाली तिच्या सपाट्यांत नव्हे, तर ह्या गोष्टीला कांहीं आठवडे झाल्यानंतर, त्यावर केसरींत जी टीका आली होती तिच्याबद्दल, टिळकाची चौकशी करणाऱ्या न्यायमूर्ति दावर ह्या पारशी न्यायाधिशानें टिळकास शिक्षा देतांना उद्गार काढले कीं, ह्या लेखांमध्यें राजद्रोह अगदीं ओतप्रोत भरला आहे. लोकांनीं दंगेधोपे करण्यास उद्युक्त व्हावें, असें त्यांस सांगण्यांत आलें आहे. ह्यांमध्यें खुनासारख्या गुन्ह्याविषयीं पसंती दर्शविली आहे. बांबगोळयाच्या साहाय्यानें खून करण्यासारख्या नामर्दपणाच्या राक्षसी गुन्ह्यास तुझी (टिळकाची) पसंती आहे इतकेंच नाहीं, तर हिंदुस्थानांत

बांबगोळ्याचें आगमन झालें आहे, तें ह्या देशाच्या हिताकरितां आहे, ह्मणून तुला मोठा आनंद झाला आहे. ह्या लेखांमध्यें टिळकानें बांबगोळ्याची वाखाणणी केली होती, ती अशी कीं, ती एक जादू आहे; तें एक चेटक आहे; तो एक ताईत आहे. केसरीला मोठ्या हर्षाच्या गुदगुल्या होऊन त्यानें लिहिलें कीं, पोलीसखातें डोळ्यांत तेल घालून बसलें, किंवा गुप्त पोलिसाच्या झुंडीच्या झुंडी नेमल्यातरी आधिभौतिक शास्त्रांतील ह्या साध्या खेळाच्या वस्तु बंद करितां येणार नाहींत. अशा प्रकारची प्रवृत्ति लोकांत उत्पन्न झाली आहे ही गोष्ट कांहीं चांगली नव्हे, असें ह्मणण्याचा जरी टिळकानें मोठा आंव घातला, तरी ह्या सर्व गोष्टींचें खापर त्यानें सरकारच्या डोक्यावर फोडलें, तें असें कीं, "स्वराज्याचे हक्क मिळविण्याची आवश्यकता ज्यांना वाटत आहे, अशा हजारों बुद्धिमान् लोकांची निराशा होईल, असें धोरण सरकारनें पतकरलें आहे." आपल्यावरील खटल्याच्या वेळीं, टिळक चार दिवस—२१॥ तास—सारखा बोलत होता. परंतु, शेवटीं ज्युरीनें त्याला दोषी ठरविलें; व जज्जानें सहा वर्षांची हद्दपारीची शिक्षा सांगितली. पण, त्याचें वय व शरीरप्रकृती ह्या गोष्टी लक्ष्यांत घेऊन, त्याला ब्रह्मदेशांत मंडाले शहरीं साध्या कैदेंत ठेविलें आहे. वास्तविक स्थिति किती धोक्याची आहे, ह्या गोष्टीची बरोबर कल्पना विलायतसरकार अथवा हिंदुस्थानसरकार ह्यांस कोणासच नव्हती, अशा वेळीं टिळकासारख्या लोकप्रिय व वजनदार पुढाऱ्यावर फौजदारी खटला करणें हें निःसंशय मोठें अवघड काम होतें; आणि, सर जार्ज क्लार्कसाहेब व त्यांचे काउन्सिलदार खंबीरमनाचे नसते, तर टिळकावर खटला करण्याची जबाबदारी मुंबईसरकारानें आपल्या अंगावर

घेतली नसती. ह्या खटल्यानंतर मोठमोठाले दंगे झाले. टिळकाला पकडल्याबरोबर, त्याच्या पक्षाच्या लोकांनीं गिरणींतल्या मजुरांमध्यें अशा कंड्या पिकविल्या कीं, टिळकानें कामकऱ्यांचा पक्ष घेऊन, त्यांना चांगली मजुरी मिळावीह्मणून प्रयत्न केल्यामुळें, त्याला तुरुंगांत घातलें आहे. हायकोर्टांत चौकशी चालू असतां, टिळकाचे कित्येक साह्यकारी उघडपणें असें बोलले ह्मणतात कीं, " टिळकाला जितक्या वर्षांची शिक्षा होईल, तितके दिवस रक्तपात होईल ;" आणि खरोखरीच असें झालें कीं, टिळकाला सहा वर्षांची शिक्षा झाली ; आणि दंगाहि सहाच दिवस चालू होता. कित्येक प्रसंगीं दंग्याला फारच भयंकर स्वरूप आलें होतें. युरोपिअन पोलिसांना पुष्कळ वेळां रिव्हालवरांचा उपयोग करावा लागला ; त्याचप्रमाणें, लष्करी लोकांसहि स्वरक्षणासाठीं बंदुका झाडाव्या लागल्या. परंतु, रक्तपात जितका कमी होईल, तितका करण्याविषयीं अधिकाऱ्यांचे कडक हुकूम होते. पोलिस व लष्करीलोकांनीं आपलीं मनें अगदीं आवरून धरल्यामुळें, अपघात फारच कमी झाले ; व शहरांत राहणाऱ्या युरोपिअन लोकांवर दंगेखोरांनीं आपला राग काढिला नाहीं. तथापि, गिरणींतील उर्मट मजुरांमध्येंच केवळ नव्हें, तर मुंबईंतील हलक्या लोकांमध्यें टिळकाचें वजन किती वाढलें होतें, व बेकायदेशीर गोष्टी करण्याकडे त्या वजनाचा कसा दुरुपयोग होत होता, हें वरील दंग्यास जें उग्र स्वरूप प्राप्त झालें, त्यावरून स्पष्ट दिसलें. " टिळकावर आलेल्या संकटामुळें आपणांस दुःख होत आहे " हें दाखविण्याकरितां, मुंबईशहराच्या अगदीं मध्यवस्तींतील कांहीं हिंदुलोकांनीं आपलीं दुकानें बंद केलीं होतीं. मुंबईचे भाटे, वाणी हे लोक शांतताप्रिय असून

थोडेसे भितरेहि असतात, असें त्या वेळेपर्यंत समजलें जात असे. पण, कापडमार्किटांत कामावर असलेल्या भाटे-वाणी लोकांनीं एक दिवस फार मोठा दंगा केला. मुंबईस ही जी गडबड झाली ती, लोकांना एकदम चीड आल्यामुळें आपोआप खास झाली नाहीं; तर, मोठ्या काळजीपूर्वक पूर्णविचारानें जुळवाजुळव करून, कोणीतरी त्या गोष्टी घडवून आणल्या, असेंच दिसतें. तथापि, प्रसंगाप्रमाणें सहानुभूति व दृढनिश्चय दाखवून मोठ्या शहाणपणानें वागल्यामुळें, सर जार्ज क्लार्कसाहेबाविषयीं बहुतेक लोकांस मोठा आदर वाटूं लागला. अशा प्रसंगीं नेमस्त पक्षाकडून आळस न होतां, सरकारास अपेक्षित साहाय्य व्हावयास पाहिजे होतें. परंतु, तसें साहाय्य जरी त्यांच्याकडून मिळालें नाहीं, तरी मनांतल्यामनांत सरकारचें कृत्य पसंत पडलें नाहीं, किंवा त्याबद्दल आनंद झाला नाहीं, असे त्यांच्यांत कोणी असतीलसें वाटत नाहीं. ह्या खटल्याचा परिणाम फार झाला; व तो कायमचा राहिला. कारण, टिळक गुन्हेगार ठरून त्याला सजा झाल्यामुळें, निदान महाराष्ट्रांतल्या राजद्रोही चळवळीस तरी बराच—कदाचित् कधींहि बसला नव्हता इतका मोठा—धक्का बसला. टिळकास कारागृहवास प्राप्त झाल्यानंतर कांहीं महिन्यांनीं, जहालपक्षाचें वर्तमानपत्र **राष्ट्रमत** ह्यांत त्या वर्षांतील एकंदर गोष्टींचा आढावा दाखविला होता. त्यांत असें म्हटलें होतें कीं, "टिळकासारख्या महापुरुषाचा एकदम लोप झाल्याकारणानें, महाराष्ट्रांतील सर्व लोक भयभीत झाले आहेत, व इतर लोकनायकांचें धैर्य गळून गेलें आहे."

टिळकाची हिंदुस्थानाबाहेर रवानगी झाली, तरीदेखील महाराष्ट्रांतील चळवळ मोडली नाहीं. कारण, ज्या नवीन

पिढीला शिकवून त्यानें तयार केली होती, तीमध्यें त्याचे स्वतःचे गुण उतरले होते. टिळकास ब्रह्मदेशांत पाठवून दिल्यावर, एका वर्षापेक्षां अधिक काळ लोटल्यानंतर, त्यानें लावलेल्या विषवृक्षास कडु फळें आलीं. ह्मणजे, त्याच्या शिकवणीचा दुष्ट परिणाम, नाशिकचे कलेक्टर मि० ज्याकसन यांच्या खुनाच्या रूपानें दृग्गोचर झाला. हिंदुस्थानामध्यें आजपर्यंत राजकीय स्वरूपाचे पुष्कळ गुन्हे घडले. परंतु, ह्या खुनामुळें एतद्देशीय लोकांचा जितका दुर्लौकिक झाला, व त्यांच्या राज्यकारस्थानाचा हेतु जसा बाहेर पडला, तसें दुसऱ्या कोणत्याहि गुन्ह्यानें झालें नाहीं. ज्याकसनसाहेब एका मोठ्या जिल्ह्याचा मुख्य अधिकारी असून, सलगीचे लोक त्याला **पंडित** ह्मणत. हा साहेब मोठा विद्वान् असून, संस्कृतादि प्राच्यभाषांचें ज्ञान संपादन करण्यांत तो गढून गेलेला असे; आणि, इकडील लोकांच्या आचार--विचारांविषयीं जशी त्याला पूर्ण माहिती होती, तशीच त्यांबद्दल त्याला अगदीं खऱ्या अंतःकरणापासून सहानुभूतिहि असे. एतद्देशीय लोकांविषयीं त्याला इतकें प्रेम वाटत असे कीं, त्यामुळें कदाचित् त्यांचे दोषहि त्याला दिसत नसत; आणि सत्तावन सालच्या बंडांत जे युरोपिअन प्रथम प्राणास मुकले, त्यांचा जसा एतद्देशीय लोकांच्या राजनिष्ठेबद्दल पूर्ण भरंवसा होता, तसाच अगदीं—एखाद्या मुलासारखा—ज्याकसनसाहेबाचा होता; व तो शेवटपर्यंत होता. मरणाच्या अगदीं थोडे दिवस पूर्वीं, ज्याकसनसाहेबानें असें बोलून दाखविलें होतें कीं, नाशकामधील असंतुष्टपणा अगदीं नाहींसा झाला असून, मला कोठेंहि व केव्हांहि जाण्यांत यत्किंचित् धोका दिसत नाहीं. साधारणपणें सर्व लोक त्याला मान देत असत, व पुष्कळ लोकांचें प्रेम त्याच्यावर

होतें, ह्याबद्दल शंका नाहीं. आणि, त्याची बदली मुंबईस लवकरच होणार ही बातमी बाहेर पडतांच, नाशीकच्या लोकांनीं खासगी व सार्वजनिक रीतीनें ज्या पानसुपाऱ्या केल्या व मेजवान्या दिल्या, त्यांवरून त्यांना खरोखरच मनापासून त्याच्या वियोगाबद्दल दुःख वाटत होतें, ही गोष्ट सिद्ध होते. खुनाची तारीख २१ दिसेंबर तिच्या दोनच दिवस आधीं, मुनिसिपालिटीनें नाशीकच्या लोकांतर्फे निरोप देण्याकरितां समारंभ केला होता. त्या वेळीं एक मराठी कविता ह्मणण्यांत आली, तींत त्याच्या शांतवृत्तीचा व सौजन्याचा विशेषरीतीनें उल्लेख केला होता.

अशा मनुष्याचा मुद्दाम खून करून, इंग्रजीराज्यांतील जुलुमाचा निषेध करण्याचा मार्ग महाराष्ट्रांतील **राष्ट्रीय** पक्षाच्या माथेफिरू कैवाऱ्यांनीं केला, तेव्हां काय ह्मणावें? हा गुन्हा करण्याचे बेत पक्क्या निर्दयपणानें चालले होते, ही गोष्ट, खरा खुनी त्याचे साथीदार व मदतगार, ह्यांच्या चौकशीच्या वेळीं चांगलीच दिसून आली. खून केव्हां व कसा करावा, ह्याबद्दलचीं खलबतें, खुनी मनुष्य व त्याचे साथीदार, ह्यांच्यामध्यें सपटेंबर महिन्यापासून अनेक वेळां झालीं होतीं. हें काम वारंवार लांबणीवर टाकण्यांत येई. कारण, औरंगाबादच्या ज्या पाजी पोरानें हें नीच काम करण्याचा स्वतःहोऊन पतकर घेतला होता, त्याला हत्यारें वगैरे देऊन सज्ज करण्यास त्याचे नाशीकचे साथीदार तयार होते; पण, आपल्या अंगावर कांहीं येईल, ह्या भीतीनें प्रत्यक्ष मदत करण्यास ते कचरत असत. तो पोरगा कोणत्याहि इंग्रजमाणसास ठार मारण्यास तयार होता. परंतु, ज्या मनुष्याचा चांगुलपणा सर्वांमुखीं होता, त्याच्यावरच हात उचलणें वाजवी होईल किंवा नाहीं, ह्याबद्दल त्याचेंच मन साशंक होतें. पण,

ज्याकसनसाहेब केवळ दांभिक आहे, अशी खात्री त्याच्या साथीदारांनीं करून दिल्यामुळें, त्याच्या सर्व शंकांचें निरसन झालें. ज्याकसनसाहेब आतां लवकरच मुंबईस जाणार, ही बातमी पसरल्याबरोबर, आपले दुष्ट बेत सिद्धीस नेण्याच्या तयारीस कटवाले ताबडतोब लागले. खुनी पोराला जें पिस्तूल दिलें होतें, त्यानें नेम मारण्याचा अभ्यास तो काळजीपूर्वक करूं लागला. नाशीकशहरांतील नाटकगृहांत ज्याकसनसाहेबाला पानसुपारी होती, त्याठिकाणीं त्याचा खून करण्याचें ठरलें होतें. पण, पहिला प्रयत्न फुकट गेला, तरीदेखील नाटकगृहांतून त्यानें जिवंत जाऊं नये, अशी तजवीज करून ठेविली होती. अनंत लक्ष्मण कान्हेरे नांवाच्या चित्पावनब्राह्मणाच्या पोरानें, ज्याकसनसाहेब नाटकगृहांत शिरत असतां त्याला गांठून, प्रथमतः त्याच्या पाठींत पिस्तूल झाडलें; आणि, तो पाठीमागें वळूं लागला, त्याबरोबर बाकीच्या गोळ्या त्याच्या अंगावर सोडल्या. ज्याकसनच्या बरोबर दोन इंग्लिश बायका व त्याच्या हाताखालील एक मदतनीस अशी मंडळी होती, त्यांच्या पुढ्यांत तो मरून पडला. ह्या तरुण सिव्हिलियनास हिंदुस्थानांत येऊन कायतो एकच महिना झाला होता; तरी, नोकरींत शिरल्याबरोबरच हा जो घोर प्रसंग त्याच्यावर आला, त्यास न डगमगतां त्यानें तोंड दिलें. हा सर्व प्रकार एका क्षणांत घडून आला. डेप्युटी कलेकटर मि० पळशीकर हे मि० ज्याकसनच्या मदतीस धांवून आले. पण, खुनी मनुष्याला पाडून, त्याच्या हातांतील दुसरें पिस्तूल हिसकावून घेण्यापलीकडे, त्यांना कांहीं करितां आलें नाहीं. त्यानंतर, मि० पळशीकरांच्याच प्रसंगावधानामुळें रेलवेस्टेशनावर ताबडतोब वरदी पोहोंचून, कांहीं साथीदारांस पळून जातां आलें

नाहीं. ह्याच साथीदारांचे कबुलीजबाब पुढें खटल्याच्या वेळीं चांगले उपयोगी पडून, न्यायाच्या कामास फार मदत झाली.

मुंबईच्या हायकोर्टापुढल्या चौकशींत पुराव्यादाखल ज्या गोष्टी बाहेर आल्या, त्याशिवाय ह्या गुन्ह्यांत अशा कांहीं विशेष गोष्टी दृष्टोत्पत्तीस आल्या कीं, तिकडे लक्ष पुरविलें असतां फायदाच होईल. असल्या गोष्टींशीं न्यायकोर्टाला कांहींच करावयाचें नव्हतें. ह्या गुन्ह्यांतील मुख्य खुनी मनुष्यच नव्हे, तर त्या कटांतील बहुतेक सर्व लोक चित्पावनजातीचे होते, हें विशेष लक्ष्यांत ठेवण्यासारखें आहे. त्याचप्रमाणें, आम्हीं इंग्रजलोकांनीं जें शिक्षण हिंदुस्थानमध्यें आपल्याबरोबर आणून इकडे सुरू केलें आहे, तें व हल्लींच्या राजकीय चळवळीच्या अगदीं मुळाशीं असणारें धार्मिक पुनरुज्जीवन, ह्या दोहोंचा एकाच वेळीं परिणाम होऊन, जीं कांहीं विलक्षण मतांची मंडळी निर्माण झाली आहे, त्यांपैकींच वरील गुन्हेगारलोक होते. हे लोक शारीरिकदृष्ट्या नसले, तरी नैतिकदृष्ट्या खास गुणभ्रष्ट असून, बहुतेकजण तर अगदीं उघडपणें नीचावस्थेला पोंहोचले होते. स्वतः खुनी मनुष्याचीतर ह्या बाबतींत अगदीं कमाल होती. मी नाशकास गेलों होतों, तेव्हां ह्या खुन्याला ज्या सरकारवाड्यांत ठेविलें होतें त्यासमोर हातपाय धुतांना पाहिलें. चार पोलिस शिपायांच्या ताब्यांत तो होता. परंतु, ह्याचें त्याला कांहींएक वाटत नव्हतें. अगदीं सावकाशपणानें स्नान वगैरे केल्यावर, संध्यावंदनादि कृत्यें करण्यास त्यानें प्रारंभ केला. ह्यावेळीं, त्याच्या मुद्रेवर एकप्रकारच्या समाधानाची छटा दिसत असून, परत तुरुंगांत जाण्यापूर्वीं, मोठ्या शांतपणानें तो आपल्या सभोंवती पाहत होता. चेहऱ्यावरून तो खुजा व बायक्या

दिसत असून, त्याच्या शरीराची वाढ अपुरी झालेली होती. त्याचें डोकें लहान, अरुंद व चिंचोळें असून, जाभाडें फारच पुढें आलेलीं होतीं. तथापि, त्यानें आपल्या कित्येक सोबत्यास—गैररीतीनें कां होईना—अगदीं मोहून टाकिलें होतें. ह्या गुन्हेगारांच्या इनसाफाच्यावेळीं हजर असलेल्या एका गृहस्थानें मला सांगितलें कीं, खटला चालू असतांना, खुनीपोराकडे पाहून डोळे मारणें, हावभाव करणें वगैरे गोष्टी अगदीं निर्लज्जपणानें चालल्या होत्या, त्यावरून आपल्या सोबत्यांस त्यानें विलक्षणरीतीनें भारून टाकिलें होतें, ह्याबद्दल संशय राहत नाहीं. आपली जात व कूळ ह्याबद्दलच्या खुळ्या अभिमानांत, मज्जातंतुविकार व शृंगारलालसा ह्या गोष्टींची भर पडल्यामुळें, वरच्या प्रकारची नैतिक भ्रष्टता आली होती. मेंदूचे विकार असले, ह्मणजे मनुष्याची दुष्कृत्याकडे स्वभावतःच प्रवृत्ति कशी असते, ह्याचा सर्व इतिहास धुंडाळून पाहिला, तरी असें उदाहरण क्वचित्च सांपडेल.

आतां, ह्या भिकार कळसुत्री बाहुल्या गुप्तरीतीनें कोण नाचवित होते? ह्या तरुण लोकांना आपोआप स्फूर्ति झाल्याकारणानें त्यांनीं हे उद्योग केले, असें खास ह्मणतां येणार नाहीं. तरमग, सूत्रें कोणीं हालविलीं असावीं? ज्या पिस्तुलानें खून करण्यांत आला तें, इंग्लंडमधील हिंदी राजद्रोही लोकांच्या पुढाऱ्यांनीं पाठविलेल्या पिस्तुलांपैकींच होतें, असें मानण्यास सबळ कारण आहे. सर कर्झन वायलीसाहेबाचा खून होईपर्यंत, हे मोहरके ‘ हायगेट ’—मधील प्रसिद्ध **इंडिआ—हाउसमध्यें** रहात असत. ह्या ठिकाणची सर्व व्यवस्था ज्या लोकांच्या हातांत होती, त्यांत प्रथमतः **श्यामजी कृष्णवर्मा** असे. विनायक सावरकर आणि दुसरे सुमारें पंचवीस हिंदुलोक ह्यांवर गुप्त कट

केल्याबद्दलच्या संबंधांत, निरनिराळ्या आरोपावरून सध्यां ( पुस्तक लिहिलें त्यावेळीं ) मुंबईच्या हायकोर्टीत खटला चालू आहे. त्यांत ज्या गोष्टी बाहेर पडतील, त्यांवरून नाशीकच्या खुनी माणसास खरोखर पिस्तूल कोठून व कसें मिळालें, व अशाच प्रकारचे आणखी मुद्दे, ह्यांवर चांगलाच प्रकाश पडेल, अशी अटकळ आहे. हा सावरकर इंडियाहाउसमधील लोकांच्या चांगल्या परिचयाचा असून, टिळकाच्या एका पत्राचा लंडन-येथील बातमीदार होता.

अशा प्रकारच्या विषवृक्षाची वाढ होण्यास नाशीकचें हवापाणी जसें अनुकूल होतें, तसें इतर ठिकाणचें निखालस नव्हतें. कारण, नाशीक ह्मणजे हिंदुस्थानांतलें साधारण गांव नव्हें; तर, हिंदुधर्माच्या मोठ्या बळकट किल्ल्यांपैकीं तें एक ठिकाण आहे. तेथील लोकवस्ती केवळ पंचवीस हजार आहे; परंतु, त्यापैकीं नऊ हजार ब्राह्मण आहेत. ब्राह्मणांत सुमारें हजार वस्ती चित्पावनांची व बाकीची देशस्थांची आहे. महाराष्ट्रांत धर्मगुरूंच्या ज्या जाती आहेत, त्यांपैकीं **देशस्थ** ही एक मोठी जात आहे. नाशीकशहर हिंदुलोकांचें एक विशेषप्रकारचें पवित्रस्थान आहे. ज्या गोदावरीनदीच्या पवित्रपणामुळें तिला **गंगा** ह्मणतात, ती ह्या शहरामधून वाहते. ह्या गंगेवर दुतर्फा घांट बांधलेले आहेत, त्याठिकाणीं भाविक लोक स्नान करितात. नाशकास प्राचीन देवालयें असून, असंख्य पवित्रस्थानें आहेत. त्यामुळें, हिंदुस्थानांतील सर्व ठिकाणचे लोक तेथें निरंतर यात्रेकरितां जात असतात. हिंदुस्थानांतील पुष्कळ राजेरजवाड्यांनीं आपलीं धर्मसंबंधी कृत्यें करण्याकरितां, त्याठिकाणीं उपाध्ये नेमून ठेविले आहेत. खेरिज, नाशकावर

पेशव्यांचें मोठें प्रेम असे; आणि, मराठी साम्राज्याच्या वैभवाची साक्ष देणाऱ्या गोष्टी, पुण्याच्या खालोखाल जशा तेथें आहेत, तशा महाराष्ट्रांत दुसरीकडे नाहींत. अगदीं मोडकळीस आलेल्या मोंगलपादशाहीचें उच्चाटन करून, त्या ठिकाणीं मराठेलोकांची सत्ता स्थापन करण्याचा उद्योग चालू असतां, इंग्रजांसारख्या अगदीं परकी लोकांनीं मध्येंच घुसून, त्यांच्या पुढचें भरलेलें पक्वान्नांचें ताट ओढून घेतलें, त्यामुळें त्यांच्या अंगाचा तीळपापड होऊन, द्वेषाग्नि आंतल्या आंत धुमसूं लागला असेल, ह्याबद्दल संशय नाहीं. तथापि, ज्याकसनसाहेबाचा खून झाल्यावर, साधारणतः लोकांची जी मनोवृत्ति दिसून आली, तिचा उलगडा वर सांगितलेल्या कारणांनीं होऊं शकत नाहीं. कारण, कोणींहि खून केला, तरी तें अधमपणाचें कृत्य आहे, असें हिंदुलोक समजतात. पण, जर कां ब्राह्मणानेंच असला गुन्हा केला, तर त्यांत विशेष अधमपणा आहे, असें लोक मानतात. तेव्हां, ह्या प्रसंगीं खून करणारास जातिबहिष्कृत न करितां, त्यानें जणुं काय "किल्ल्यावरील शत्रूचें निशाण खालीं पाडलें" अशा समजुतीनें, पुष्कळ ब्राह्मणलोक ह्या दुष्ट कर्माबद्दल मनांतल्या मनांत थोडेंबहुत भूषणच मानतात, हें कसें? वरील गुन्हा घडण्यापूर्वीं पुष्कळ दिवसांपासून खुनाची तयारी नाशकास चालली असतां, पोलिसखेरिज इतर कोणाकडूनहि ह्या गोष्टीची गंधवार्ता देखील ज्याकसनसाहेबांस कळूं नये, किंवा कोणीं एक अवाक्षरहि त्यांच्या कानावर घालूं नये, हें कसें झालें? पोलिसनें सावधपणानें राहण्याविषयीं सुचविलें असतांहि, डोळेझांक करून विश्वासानें वागण्याचा स्वभाव असल्यामुळें, तिकडे त्यांनीं शेवट-पर्यंत दुर्लक्ष केलें. खून झाल्यानंतर मृताविषयीं लोकांना खरो-

खरच फार वाईट वाटलें; व त्या दुष्कृत्याबद्दल मनाला वाटलेला तिरस्कार व्यक्त करण्याकरितां मोठीं वक्तृत्वपूर्ण व्याख्यानेंहि पुष्कळ झालीं. परंतु, "ज्या गुप्त कटामुळें नाशकासारख्या पुण्यभूमीचा दुर्लौकिक झाला," त्याच्या शाखांचा शोध लावण्याच्या कामीं सरकारी अधिकाऱ्यांस कोणाची उपयोगी पडण्यासारखी मदत झाली नाहीं, ह्याचें कारण काय?

ह्या सर्व गोष्टींमुळें कल्पनातरंगांस पुष्कळच जागा मिळते. परंतु, ज्याकसनचा खून करणारानें सत्याला स्मरून जी हकीकत सांगितली आहे, त्यावरून एका गोष्टीचा चांगला खुलासा होतो; व मग तेथें साशंकतेनें कल्पना करित बसण्याचें कारणच उरत नाहीं. "तूं ज्याकसनसाहेबाचा खून कां केलास?" ह्मणून कान्हेऱ्याला म्याजिस्त्रेटनें विचारिलें, तेव्हां त्यानें उत्तर दिलें तें असें:—

"केसरी, राष्ट्रमत, काळ व दुसरीं पत्रें, ह्यांत जुलूम झाल्याचीं पुष्कळ उदाहरणें मीं वाचलीं होतीं. मला वाटतें कीं, साहेबांना (इंग्रजांना) मारिलें असतां, आह्मां लोकांना न्याय मिळेल. मला स्वतःला कधीं अन्याय झालेला नाहीं, किंवा माझ्या माहितींपैकीं कोणासहि झाला नाहीं. ज्याकसनसाहेबाला मारल्याबद्दल मला आतां दुःख वाटतें. मीं विनाकारण एका चांगल्या माणसाचा खून केला."

ह्या कबुलीजबाबामध्यें जो भयंकर करुणरस भरला आहे, त्यापेक्षां आणखी स्पष्ट काय असणार? व मनाची खात्री दुसऱ्या कशानें पटेल? कान्हेऱ्यानें ज्या तीन पत्रांचीं नांवें घेतलीं, तीं पत्रें टिळकाच्या धोरणानेंच चालणारीं होतीं. कान्हेऱ्यानें जें माथेफिरूपणाचें कृत्य केलें, तें त्यानें आपल्या स्वतःच्या अनुभवावरून किंवा माहितीवरून केलें, असें मुळींच नाहीं; तर, टिळकी वर्तमानपत्रांनीं थेंब थेंब विष त्याच्या अंतः-

करणांत ओंतण्याचा जो क्रम सतत चालू ठेविला होता, त्यामुळें भडकून जाऊन खून करण्यास तो प्रवृत्त झाला. "एका चांगल्या माणसाचा कारणावांचून" खून कान्हेऱ्याच्या हातून झाला खरा; पण, खरी गुन्हेगारी टिळकाकडे येत नाहीं काय? १८९७ सालीं पुण्यास जे खून झाले होतें, त्यांचीच केवळ पुनरावृत्ति नाशकास झाली.

टिळकास शिक्षा झाल्यापासून, नाशीक येथील घोर कृत्याशिवाय, आणखी पुष्कळ गुन्हे घडले आहेत. त्यावरून, टिळकाच्या मतांचा प्रसार झाल्यामुळें लोकांचीं मनें बिघडून जाऊन, प्राणघातकी कृत्यें करण्याकडे त्यांची प्रवृत्ति कशी झाली होती, हें स्पष्ट दिसून येतें. १९०९ सालच्या नोवेंबर महिन्यांत, व्हाइसरायसाहेब व लेडी मिंटो ह्यांच्या स्वाऱ्या मुंबई---इलाख्यांत दौऱ्यावर निघाल्या असतां, अहमदाबादेस त्यांच्या गाडीवर बांबगोळा टाकण्यांत आला. आतां, सर्वांच्या सुदैवामुळें तो गोळा फुटून अनर्थ झाला नाहीं, ही गोष्ट खरी; तथापि, बांब फेंकणाराचा उद्देश पाहिला ह्मणजे, त्या गुन्ह्याचा भयंकरपणा कांहीं कमी होत नाहीं. आमच्या मतें, ह्या गुन्ह्याचें स्वरूप अमंगल होतें; कारण, राजाच्या प्रतिनिधीच्या शरीरास विशेष पवित्र मानण्याचा पूर्वापार प्रघात हिंदुलोकांत असतांहि, तिकडे दुर्लक्ष करून, असला प्राणघातकी प्रयत्न त्यांच्याकडून झाला.

आतां, मधून मधून राजकीय गुन्हे घडणार नाहींत, असें ह्मणतां येणार नाहीं; तथापि, टिळकाची उचलबांगडी झाल्यापासून, निदान महाराष्ट्रांतलि राजद्रोही चळवळीतरी तूर्त मागें पडल्या आहेत. हिंदुस्थानसरकारनें पतकरलेलें दृढनिश्चयाचें धोरण, प्रेसआक्टासारखे उच्छृंखलपणास आळा घालणारे कायदे,

व सद्यःस्थितीस योग्य अशा शहाणपणाच्या सुधारणा, इतक्या गोष्टी एकत्र झाल्यामुळें, फार फायदा झाला आहे. तथापि, टिळकावर खटला होऊन, त्याला बंदीवास घडल्यामुळें, इंग्रजी राज्याविषयीं अप्रीति उत्पन्न करणाऱ्या चळवळ्या लोकांचा मोठा कर्तृत्ववान् व साहसी पुढारी नष्ट झाला. न जाणे, महाराष्ट्रां-तीलच नव्हेत, तर साऱ्या हिंदुस्थानांतील भिन्न भिन्न स्वरूपाच्या, व कधीं कधींतर परस्परांविरुद्ध असणाऱ्या, राजद्रोही चळवळींचीं सूत्रें सर्वस्वी आपल्या हातांत आणून, त्यांना व्यवस्थित रूप देणें व त्यांच्याकडून एकजुटीनें काम करून घेणें, ह्या गोष्टी करण्याचें सामर्थ्य एकट्या टिळकामध्येंच असावें. परंतु, व्यवस्थित-पणा व एकी ह्या दोन गुणांची उणीव इकडील चळवळींत आहे, ही मोठ्या सुदैवाची गोष्ट आहे.

## भाग ९ वा.

# पुणें आणि कोल्हापुर

हिंदुस्थानांतील—निदान महाराष्ट्रांतील—अस्वथतेच्या मुळाशीं ब्राह्मणलोकांचा संबंध असून, तिचा उद्देश प्रत्येक पाश्चिमात्य गोष्टीस विरोध करण्याचा कसा आहे, ह्याचें यथार्थ ज्ञान, इंग्रजसरकारच्या प्रत्यक्ष अमलाखालीं असलेल्या प्रदेशांत होणें शक्य नाहीं. कारण, खालसा मुलखांत जी अस्वस्थता दिसून येते, ती, परकी लोकांच्या अमलाखालीं राहणें असह्य वाटल्यामुळें, व स्वदेशाभिमानाचें वारें अगांत शिरल्यामुळें, उत्पन्न झाली आहे, अशी बहुतकरून बतावणी करण्यास सांपडते. परंतु, तिचा खरोखर झोंक कोणीकडे आहे, हें समजण्याकरितां, पुण्याच्या दक्षिणेस शंभर मैलांवर असणाऱ्या एका देशी संस्थानांत आपणांस गेलें पाहिजे. मुंबईसरकारच्या देखरेखीखालीं जीं संस्थानें आहेत, त्या सर्वांमध्यें **कोल्हापुर** फार महत्त्वाचें आहे; आणि, हिंदुपदपादशाहीची स्थापना करणारे **शिवाजीमहाराज**, यांच्या सरळ वंशजांपैकींच आपण आहों, असें फक्त कोल्हापुरसंस्थानच्या मराठ्या अधिपतीसच कायतें ह्मणतां येतें. ह्याच शिवाजीमहाराजांच्या नांवानें संस्था काढून, व त्यांना आपल्या राजकीय चळवळींतील मुख्य ऐतिहासिक दैवताचा मान देऊन, टिळकानें अस्वस्थता माजविण्याचा उद्योग चालविला होता. कोल्हापुरचे महाराज **छत्रपति** असल्यामुळें, हिंदुस्थानांतील सर्व मराठे राजां-

मध्यें त्यांनाच अग्रस्थानाचा मान आहे. आणि, त्यांचा जन्म अशा थोर कुळांत झाला असल्यामुळें, त्यांच्या ठिकाणीं सर्वांचा पूज्यभाव असला पाहिजे, असें टिळक व त्याचे अनुयायी यांसहि वाटेल, असा कोणाचाहि साधारणपणें समज होईल. परंतु वस्तुस्थिति फारच निराळी होती. कोल्हापुरच्या महाराजांचीं मतें उदार असून, त्यांच्या आचरणांत विलक्षण साधेपणा दिसून येतो. आपल्या संस्थानच्या कारभारांत ते फारच लक्ष घालितात; व इतर कोणत्याहि देशी संस्थानिकानें आजपर्यंत हातीं घेतलें नाहीं, असें मोठें पाटबंधाऱ्याचें काम त्यांनीं सुरू केलें आहे. हें काम पुरें होण्यास संस्थानचा पुष्कळच पैसा खर्च होणार आहे. असें जरी आहे, तथापि टिळक व त्याची स्नेहीमंडळी यांच्या दृष्टीनें अक्षम्य, असे दोन अपराध महाराजांच्या हातून घडले. ह्मणजे, ब्राह्मणांच्या अंगीं असणाऱ्या असहिष्णुतेशीं त्यानीं विरोध मांडला; व ब्रिटिशराज्याशीं इमानानें वागून, सरकारचा त्यानीं स्नेह संपादन केला. ह्मणून, खालसा मुलखांत टिळकप्रभृति लोकांनीं जशा राजकीय चळवळी व गुप्त कारस्थानें सुरू केलीं होतीं, तोच क्रम त्यानीं शिवाजीमहाराजाच्या ह्या वंशजाविरुद्ध, खुद्द त्यांच्याच संस्थानांत चालू केला.

ही हकीकत मोठी विलक्षण व बोधप्रद आहे. कोल्हापुरचे बरेच राजे अल्पवयांत निवर्तल्यामुळें, तेथें पुष्कळ वर्षें अज्ञानातर्फे राज्यकारभार चालला होता. प्रस्तुतच्या महाराजांचे वडील चवथे शिवाजी यांना शेवटीं वेड लागून, त्याच्या भरांत त्यांचा अंत झाला. ह्या महाराजांच्या अज्ञानदशेंत संस्थानचा कारभार रत्नागिरीच्या एका चित्पावन ब्राह्मणाच्या हातीं होता. ह्या

कारभाऱ्याचें पुढें फारच प्रस्थ वाढलें, व अधिकाराचीं बहुतेक सर्व सूत्रें त्याच्या तंत्रानें हालूं लागलीं. ह्यानें संस्थानांतील मुख्य मुख्य जाग्यांवर आपल्या जातीचे लोक नेमले; व अशा रीतीनें आपल्या कारकिर्दींत, शंभरावर अधिक लोक सरकारी नोकरींत भरले. ह्या चित्पावनी अमलांत कोल्हापुरच्या खऱ्या प्रजेच्या हिताकडे कोणींच लक्ष दिलें नाहीं. पुण्याच्या शेवटल्या शेवटल्या ब्राह्मणी राजांच्या(?) कारकिर्दींत, सर्व महाराष्ट्रभर अशीच शोचनीय स्थिति झाली होती. लाडक्या जातींतील ( चित्पावन ) लोकांवर, नवीन नवीन हक्क, इनामें व जहागिरी, यांचा सारखा वर्षाव सुरू होता; व असाच प्रकार ह्या चित्पावनी कारकिर्दींत कोल्हापुरांत चालला होता. सन १८९४ सालीं, हल्लींच्या महाराजांच्या हातीं अधिकारसूत्रें आलीं. त्यानंतर, संस्थानांत अत्यंत जरुरीच्या सुधारणा करितां याव्या ह्मणून, महाराजानीं रावबहादूर **सबनीस** यांस आपले मुख्य **दिवाण** केलें. हे गृहस्थ जातीनें **कायस्थप्रभु** आहेत; ह्मणजे, ते एका ब्राह्मणेतर उच्च हिंदुजातीचे आहेत. **प्रभु**लोक बहुधा हिंदूंमधील नेमस्त सुधारणापक्षाचे असून, त्यांच्यामध्यें व ब्राह्मणांमध्यें आज कित्येक शतकें मोठी स्पर्धा लागून राहिली आहे. रा० ब० सबनिसांची नेमणूक झाल्यामुळें, **ब्राह्मणास अनिष्ट** अशा सुधारणा घडून येतील, असें चिन्ह दिसूं लागलें; व त्यामुळें त्यांना मोठा विषाद वाटला. पण शिवाय, प्रभुजातीचा **दिवाण** होणें, हीच गोष्ट कोल्हापुरच्या ब्राह्मणांना मुळीं फार अप्रिय होती. ब्राह्मण-मंडळींतील सर्वांत वजनदार गृहस्थ, रा. बळवंत नारायण जोशी सरन्यायाधीश, हे टिळकाचे एक जिवलग स्नेही होते. संस्थानांतील विश्वासाच्या जाग्यांवर काम करण्यास **लायक** असे

ब्राह्मणेतर लोक मिळाल्यास, त्यांची नेमणूक त्याठिकाणीं करण्या-बद्दलचा आपला हेतु महाराजांनीं जाहिर करून, कामाला योग्य करण्याकरितां, ब्राह्मणेतरांस शिक्षण देण्याची खरोखरच सुरवात केली, तेव्हांतर ब्राह्मणांची भीतीनें गाळण उडून गेली. आपल्या राजावर वचक बसविण्याच्या हेतूनें, अर्धवट धार्मिक व अर्धवट सामाजिक अशा, हिंदुधर्मसंस्थेंतील एका अत्यंत पराक्रमी अस्त्राचा प्रयोग करण्यास त्यांनीं आरंभ केला—ह्मणजे, महाराजांच्या क्षत्रियत्वाविषयीं शंका घेऊन, त्यांच्या कुटुंबांतील कित्येक धर्मविधि वेदमंत्रांनीं करण्याचें नाकारलें. वास्तविक पाहतां, महाराज खरे क्षत्रियकुलोत्पन्न आहेत; आणि, क्षत्रियवर्ण हा द्विजातीयापैकीं असून, त्याची योग्यता ब्राह्मणवर्णाच्या खालो-खाल आहे, व त्यास **वेदोक्ताचा** पूर्ण अधिकार आहे. पण, स्वपक्षांध दक्षिणी ब्राह्मण ह्मणतात कीं, ह्या कलियुगांत—अज्ञान-युगांत, अथवा कृष्णयुगांत–मुळीं क्षत्रियच नाहींत. कारण, जुन्या हिंदुधर्माप्रमाणें पाहूं गेलें, तर परकी लोकांच्या अमलाखालीं वीर–वर्गास समाजांत मुळीं जागाच नाहीं; आणि ह्मणून, 'ब्राह्मण' व चांडाळादि 'अस्पृश्य' ह्या दोन वर्गांत ज्या हिंदूंचा समावेश होत नाहीं, ते फारतर 'शूद्र'—स्वच्छ जात—ह्या वर्गांत येऊं शकतील. परंतु, ह्या हिंदूंना जानवें घालण्याचा अधिकार नाहीं. कारण, तो अधिकार फक्त उच्च जातीसाठींच राखून ठेविला आहे.

अशा रीतीनें मुख्यतः महाराजांचाच उपमर्द करण्याचा जरी रोंख होता, तरी ही गोष्ट सर्व कुलीन मराठे—लोकांना सारखीच अपमानास्पद वाटली. त्यामुळें, महाराजानीं आपलें ह्मणणें बिलकूल सोडलें नाहीं. ह्या प्रसंगीं कित्येक प्रगतिप्रिय ब्राह्मणांनीं, कोल्हापुर व पुणें येथील आपल्या जातभाईच्या दबकावणीस

भीक न घालतां, महाराजांचा पक्ष धरिला, हें त्यांस फार भूषणावह आहे. ह्या प्रश्नाचा निकाल लावण्याकरितां, संस्थानांतील दोन जज्ज ( हे दोघेहि ब्राह्मणच होते ) व राजोपाध्ये ( करवीर येथील राजघराण्याचे कुलोपाध्याय ) ह्या त्रिवर्गाची कमेटी नेमिली होती. त्यांपैकीं ह्या दोन जज्ज ब्राह्मणांनीं महाराजातर्फे मत दिलें असतांहि, सदर राजोपाध्ये यांनीं राजवाड्यांत स्वतः वैदिकमंत्रांनीं संस्कार करण्याचें नाकारिलें, तेव्हां ह्या वेदोक्ताच्या वादास तीव्र स्वरूप आलें. अशा प्रकारच्या धार्मिक बाबतींत शेवटचा निर्णय करण्याचा अधिकार संकेश्वरच्या **शंकराचार्यांस** आहे. ह्मणून, कायमच्या निकालाकरितां हा प्रश्न महाराजांनीं स्वामींकडे पाठविला; परंतु त्यायोगानें हें भांडण ज्यास्तच विकोपास गेलें. कारण, पुढें लवकरच, त्यावेळचे स्वामी समाधिस्थ झाल्यामुळें, रिकाम्या झालेल्या पीठावर बसण्याकरितां, महाराजांचा पक्ष धरलेल्या लोकांनीं एक, व टिळकप्रभृति लोकांनीं एक, असे दोन उमेदवार उभे केले. संकेश्वरच्या गादीबद्दल अद्यापि वाद चालूच आहे; आणि, पुणेकर ब्राह्मणांना हलींचे **शंकराचार्य** मुळींच मान्य नाहींत, व पुढें होतील, असेंहि दिसत नाहीं. कारण, ब्राह्मणहस्तें झालेल्या ज्याकसनसाहेबाच्या खुनाचा निषेध, 'ब्राह्मण' ह्या नात्यानें, उघडपणें करण्याचें धैर्य फक्त ह्याच स्वामींनीं दाखविलें आहे.

नाशिक येथील भयंकर दुःखकारक गोष्टीविषयीं लिहितांना, मीं पूर्वींच सांगितलें आहे कीं, कोणींजरी खून केला, तरी तें अघोर कर्म आहे, असें हिंदुलोक समजतात. परंतु असें अघोर कर्म ब्राह्मणाच्या हातून घडल्यास, त्यांत विशेषच दुष्टपणा आहे, असें मानतात. आणि ह्मणूनच, मीं पुष्कळ

ब्राह्मणांस विचारिलें कीं, त्या खुनी मनुष्यास ज्ञातिबहिष्कृत न ठेवितां, उलट पुष्कळ ब्राह्मणलोक त्याच्या नीचपणाच्या कृत्याबद्दल थोड्याफार गुप्तरीतीनें त्याची वाहवा करित असतात, हें कसें? राजकीय खून करणाऱ्या ब्राह्मणाच्या दुष्टपणाबद्दल, त्यांना सार्वजनिकरीत्या जातीबाहेर ठेविलें पाहिजे, असें कांहीं लोकांनीं मजपाशीं कबूल केलें आहे. तसेंच, जातींतील प्रमुख लोकांनीं ह्या प्रकारची चळवळ मुळींच केली नाहीं, ह्मणून कित्येकांनीं माझ्याजवळ खेद प्रदर्शित केला आहे. त्याशिवाय, कित्येकांचें असें ह्मणणें आहे कीं, जातिव्यवस्था अगदीं विस्कळित झाली असल्याकारणानें, सर्व जातीनें एकमतानें कोणतीहि गोष्ट करणें आतांच्या काळांत शक्य नाहीं. हिंदुधर्मशास्त्राच्या आधारानें धर्मविषयक प्रश्नांचा अखेरनिकाल देण्याची योग्यता ज्याची आहे, व ज्याला धर्मानें असा अधिकारहि दिला आहे, असा एक ब्राह्मण फक्त **कोल्हापुरांतच** असून, त्यानें ह्या बाबतींतलें आपलें खरें मत मोठ्या धैर्यानें जगापुढें ठेविलें. हा असा अद्वितीय ब्राह्मण कोण ह्मणाल तर, करवीरपीठाधीश्वर **श्रीशंकराचार्यच** होय. ह्या स्वामींनीं एक आज्ञापत्र काढून, "नाशीकक्षेत्रासारख्या पुण्यभूमींत" एका ब्राह्मणानें केलेल्या खुनाचा अत्यंत निषेध केला; व "मन्वादि स्मृतिकारांनीं मोठ्या जोरानें प्रतिपादन केलेल्या **अहिंसातत्वात्मक** ब्राह्मणी धर्मास ह्या खुनामुळें मोठा कलंक लागला आहे," असेंहि शंकराचार्यांनीं सदरहु आज्ञापत्रांत ह्मटलें आहे. शिवाय, ह्याच आज्ञापत्रांत ज्याकसनसाहेबाच्या अंगच्या अनेक गुणांबद्दल व गाढ विद्वत्तेबद्दल प्रशंसा केलेली आहे; व पवित्र धर्मशास्त्रांतील वचनें देऊन, असें सिद्ध केलें आहे कीं, "अशी हत्या ब्राह्मणाकडून घडली, हें फारच अनुचित कर्म

आहे. ह्मणून, त्याबद्दल विशेष तिरस्कार दाखविला पाहिजे. "
तसेंच, स्वामींनीं असेंहि दाखवून दिलें आहे कीं, अशा खुनी माणसांस मरणानंतर भयंकर यमयातना भोगाव्या लागतात. आणि, ह्या आज्ञापत्राच्या शेवटीं आपल्या अखिल शिष्यवृंदास स्वामींनीं अशी आज्ञा केली आहे कीं, " हें अघोर कृत्य करणाऱ्या नराधमांस, व अशा तऱ्हेचे राज्याविरुद्ध अपराध जे कोणी पुढें करतील त्यांस, ह्या पीठाकडून **धर्मबहिष्कृत** करण्यांत येत आहे. ह्मणून, अशा पातकी लोकांशीं ह्या पीठाच्या शिष्यवृंदानें कोणत्याहि प्रकारचा संबंध ठेवूं नये. "

कोल्हापुरांतील व इतर ठिकाणच्या पुष्कळ ब्राह्मणांवर ह्या आज्ञापत्राचा कांहीं परिणाम झाला, असें वाटत नाहीं. कारण, त्यांचें आपल्या महाराजाबरोबर असलेलें वैर बहुधा सारखें वाढतच गेलें, व त्याचें पर्यवसान बेकायदेशीरपणाचीं व दांडगाईचीं कृत्यें करण्यामध्यें, किंवा त्यांना प्रोत्साहन देण्यामध्यें झालें. फक्त धार्मिक बाबतींतच ब्राह्मणांचें महाराजाशीं वैषम्य होतें, असें नाहीं. सन १९०२ सालीं, महाराजांनीं असा हुकूम दिला कीं, संस्थानांतील निदान निम्यातरी सरकारी नोकरीच्या जागा ब्राह्मणेतरांतील लायक इसमांकरितां राखून ठेविल्या आहेत. हा हुकूम बाहेर पडतांच, ब्राह्मणांच्या तळव्याची आग मस्तकास जाऊन पोहोंचली, व ते महाराजावर दांतओंठ खाऊं लागले. पुण्याहून एकसारखें प्रोत्साहन मिळत गेल्याप्रमाणें, टिळकी वर्तमानपत्रांतून महाराजावर, अत्यंत निष्ठुरपणानें, मोठें काहूर उठविण्यांत आलें; व इंग्रजी राज्याविषयीं लोकांत अप्रीति उत्पन्न करण्याचा जसा क्रम चालला होता, तसाच महाराजांच्या राज्याविषयींहि सुरू झाला. ह्याच सुमारास पुण्यांत प्लेग

वाढल्यामुळें, तेथली पुष्कळ ब्राह्मणमंडळी कोल्हापुरांत येऊन राहिली; व त्यामुळें, येथल्या मूळच्या राजकीय चळवळीस अधिकच जोर आला. हे उपरी लोक मोठ्या उत्सुकतेनें स्थानिक राजकारणाच्या भांडणांत पडले; आणि, कोल्हापुरसंस्थानांत वेगडी **पार्लमेंटसभा** स्थापन करण्याइतका उद्धटपणा त्यांनीं दाखविला. परंतु, आपल्या संस्थानचें स्वामित्व आपल्याच हातांत ठेवण्याविषयीं महाराजांचा पक्का निश्चय होता, व राज्यकारभाराची सुधारणा करणें आणि ब्राह्मणेतर जातींत विद्याप्रसार करणें, हें जें महाराजाचें मुख्य धोरण होतें, तें निष्ठापूर्वक मोठ्या धैर्यानें सिद्धीस नेण्याच्या कामीं, संस्थानचे दिवाण मि० सबनीस यांचा महाराजांस फार उपयोग झाला. ब्राह्मणेतर लोक विद्यासंपन्न होऊन, सरकारी कामांत ब्राह्मणांशीं टक्कर देण्यास तयार झाल्याशिवाय, ब्राह्मणांचें वर्चस्व कायमपणें नाहींसें होणार नाहीं, ह्या गोष्टीची ओळख महाराजांस चांगली झाली आहे. ब्राह्मणेतर लोकांत महाराजां-विषयीं मोठी भक्ति आहे. कारण कीं, कोल्हापुरच्या चवथ्या शिवाजी महाराजांच्या (हल्लींच्या महाराजांच्या वडिलांच्या) कारकिर्दींत, संस्थानचा सर्व कारभार एका चित्पावन ब्राह्मणाच्या हातीं असून, तो ह्मणेल ती पूर्वदिशा होत असे; व ह्या कारभाऱ्यानें ब्राह्मणेतर लोकांस लोखंडाचे चणे खावयास लाविलें होतें. त्याचप्रमाणें, ह्या लोकांना पुण्यांतील ब्राह्मणशाईमुळें बऱ्याच वर्षांपूर्वीं अत्यंत त्रास झाला होता. त्यामुळें, त्यांना चित्पावन ब्राह्मणांच्या पराक्रमाचें विस्मरण झालेलें नाहीं. कोल्हापुरांतील एक अत्यंत मनोवेधक संस्था ह्मटली ह्मणजे, मराठे, मुसलमान, जैन वगैरे ब्राह्मणेतर जातींतील विद्यार्थ्यांकरितां मुद्दाम स्थापन केलेलें **वसतिगृह** होय. ह्यांत राहणारे विद्यार्थी **राजारामकॉलेज-**

मध्यें शिकत असतात. **शांतता** आणि **दंगाधोपा**, अथवा **शिस्त व बेशिस्त,** ह्या दोन परस्परविरुद्ध गोष्टींचा अवलंब करणाऱ्या पक्षांमध्यें, जसा पुण्यास झगडा सुरू आहे तसाच तो कोल्हापुरासहि असून, त्यांत शिक्षणावरील ताब्याचा संबंध प्रमुखत्वानें येतो. आणि, बेशिस्तीची कांस धरणाऱ्या पक्षांतील लोकांनीं, कोल्हापुरच्या विद्यार्थ्यांचीं मनें आपल्या बाजूला आणण्याकरितां फारच श्रम घेतले; व त्यामुळें, पुण्याप्रमाणेंच येथेंसुद्धां, गैरकायदा पुंडाईचें वर्तन करण्याची विद्यार्थ्यांमध्यें सुरवात झाली आहे.

कोल्हापुरांत पुण्याच्या धर्तीवर निघालेली अगदीं पहिली संस्था ह्मणजे **शिवाजी-क्लब** होय. आणि, टिळकानें स्थापन केलेल्या आणखी दुसऱ्या संस्था–ह्मणजे, तालिमबाजांच्या टोळ्या, गणपतींचे मेळे, गोरक्षण मंडळ्या वगैरे वगैरे,––ह्यांच्याच नमुन्यावर कोल्हापुरास संस्था निघून, त्यांची सांगड वरील शिवाजी क्लबाशीं घालून देण्यांत आली होती. हा **शिवाजी-क्लब** सन १९०० सालीं बंद करून टाकावा लागला. कारण, त्यावर्षीं **बीड** येथें झालेल्या दंग्यांत ह्यांतली बरीच मंडळी सामील असल्याचें आढळून आलें. ह्याच गांवीं एका तरुण ‘ देशाभिमान्यानें ’ स्वतःस प्रसिद्धपणें **राजा** असें ह्मणवून घेऊन, कांहीं हत्यारबंद लोकांचा जमाव केला होता; व हें बंड मोडण्यास पुढें सैन्याची मदत घ्यावी लागली. बीड येथील पुंडावा ह्मणजे खरोखर नवीन राजकीय चळवळीचा **ओनामाच** होय. ही नवीन चळवळ ह्मटली ह्मणजे, देशकार्याकरितां जें युद्ध करावें लागेल, त्याच्यासाठीं दरोडे वगैरे घालून पैसा जमवून ठेवावयाचा, अशी होती. कोल्हापुरांतील **शिवाजी-क्लब** मोडून काढल्यावर, त्यांतली बरीच प्रमुख मंडळी तेथून कांहीं दिवस अदृश्य झाली.

परंतु, अशा अज्ञातवासांत असतांना देखील, हिंदुस्थानच्या इतर भागांत शिवाजीक्लबाच्या धर्तीवर स्थापन झालेल्या **गुप्त संस्थांशीं** संबंध ठेवून, आपलीं कारस्थानें चालविण्याचा त्यांचा उद्योग सुरूच होता. ह्यानंतर तीन वर्षांनीं, **बेलापुर–स्वामी–क्लब** ह्या नांवानें जी संस्था अस्तित्वांत आली, तो वास्तविक **शिवाजी–क्लबाचा** दुसरा अवतार होता. बेलापुरच्या स्वर्गवासी स्वामींच्या खडावांचें पूजन करण्याचा ह्या मंडळीचा संप्रदाय असल्याकारणानें, ह्या लोकांनीं आपल्या टोळीला **बेलापुर–स्वामी–क्लब**, असें नांव ठेविलें होतें. परंतु, स्वामीच्या मठाचा उपयोग, राजद्रोही लोकांचीं खलबतें करण्याची, व गैरकायदा बिगरपरवाना जमविलेलीं हत्यारेंपात्यारें ठेवण्याची गुप्त जागा ह्मणून होत असे. त्यानंतर लवकरच, पुनः **राजकीय** दरोड्यांस सुरवात झाली; आणि, १९०५ सालींतर, कोल्हापुरशहरांत आणि त्याच्या आसपास घरफोड्या चोऱ्यांना केवळ ऊत येऊन, क्लबाजवळ कित्येक हजार रुपये व कांहीं थोडीं हत्यारें, असा सरंजाम जमला. शेवटीं, क्लबाचे सात सभासद पकडले गेले; व त्यांपैकीं कांहींजणांनीं अगदीं सर्व गोष्टींची कबुली दिली. ह्या आरोपितांपैकीं एक खेरिज करून बाकीचे सर्व ब्राह्मण होते, व मोठमोठे लोक त्यांचे आप्तसंबंधी होते. तथापि, ज्यांच्यावर पुराव्यानें गुन्हा शाबीत झाला होता, ते देखील फार कमी शिक्षेवर सुटले. आणि, ज्या चळवळीला कोल्हापुरांतील व बाहेरच्या वजनदार लोकांचें पाठबळ असल्याचें स्वच्छ दिसत होतें, ती चळवळ फक्त तात्पुरती थंडावली.

ह्या वर सांगितलेल्या चळवळीचे पुरस्कर्ते दरोडे घालूनच थांबले नाहींत. कांहींशा लष्करीधर्तीवर, टोळ्या माळावर जाऊन,

कवायती वगैरे गोष्टी पद्धतशीररीतीनें करूं लागल्या. अशा लष्करी पेशाच्या टोळ्यांचे फोटो सांपडले असून, त्यांमध्यें **टिळकहि** आहे. ह्यावरून काय बोध होतो, हें कोणास सांगितलें पाहिजे, असें नाहीं. ह्या फोटोंतील बऱ्याच इसमांना पुढें मोठ्या गुन्ह्यांबद्दल शिक्षा झाल्या. ह्या लोकांचें पुण्यांतील मंडळीबरोबर नेहमीं दळणवळण असे. आणि जेव्हां पुणेकर **जहाल** मंडळी बांब करण्याच्या कामांत प्रवीण, होऊं लागली, तेव्हां त्यांच्या नवशिक्या कंपूमध्यें कोल्हापुरची मंडळी प्रथम शिरली. महाराजांच्या कन्येच्या लग्नादिवशीं, ह्मणजे २१ मार्च १९०८ रोजीं, कोल्हापुरचे पोलिटिकल एजंट, कर्नल फेरिससाहेब, यांस मारण्याचा बेत होता; व त्याकरितां एक कट झाला होता, असें दिसतें. आतां, ह्या कटवाल्यांच्या उद्योगास यश येतें, तर खुद्द महाराज, त्यांच्या कुटुंबांतलीं माणसें व कर्नलफेरिससुद्धां पुष्कळ पाहुणेमंडळी, इतक्यांना बहुतकरून एकदम प्राणास मुकावें लागलें असतें. कारण, पुढें जो एक खटला चालला, त्यावेळीं असें दिसून आलें कीं, लग्नमंडपांत, किंवा महाराज, त्यांच्या कुटुंबांतलीं मंडळी, व कर्नल फेरिससुद्धां बडे बडे पाहुणे यांना बसण्याकरितां राजवाड्यापुढील पटांगणांत कठडे घालून जी जागा केली होती, त्यांत फेंकण्याकरितां ह्मणून एक बांबगोळा पुण्यास तयार होऊन, कोल्हापुरास पाठविण्यांत आला होता. पण, सुदैवानें हा बांब कोल्हापुरांत वेळेवर येऊन पोहोंचला नाहीं. पुढें ह्या बांबचा पत्ता लागला. वेळेवर बांब न मिळाल्यामुळें, कटवाल्यांना दुसऱ्या कमी प्रतीच्या हत्यारांकडे वळावें लागलें. हत्यारांच्या कायद्याबद्दल हिंदुस्थानच्या राष्ट्रीयपक्षाची मोठी ओरड आहे.

परंतु, त्याच्यामुळेंच कोल्हापुरच्या कटवाल्यांना हत्यारें मिळविणें फार कठीण झालें. तथापि, त्यांना थोडीशीं हत्यारें मिळालींच. आणि, तारीख १६ एप्रील सन १९०८ रोजीं, कर्नल फेरिस-साहेब कोल्हापुर कायमचें सोडून स्वदेशीं जाण्याकरितां निघाले, तेव्हां कांहीं कटवाले त्यांच्याबरोबरच आगगाडींतून गेले. आणि, मध्यंतरीं एका स्टेशनावर उतरून, त्यांनीं साहेबावर गोळी घालण्याचा प्रयत्न केला. परंतु सुदैवानें काडतूस उडालें नाहीं, व त्यांचा यत्न फुकट गेला. नंतर कांहीं दिवसांनीं, शाळा व इतर इमारती ह्यांच्या दरवाज्यांवर, बांब तयार करण्याच्या माहितीचे कागद प्रत्यक्ष चिकटविलेले दिसून आले. ह्यानंतर, कोल्हापुरच्या **प्रायव्हेट स्कुलामधून** कांहीं भयंकर रसायनद्रव्यें चोरीस गेलीं. शेवटीं, नऊ ब्राह्मण व एक ब्राह्मणेतर, अशा दहा तरुण मंडळीवर वरील गुन्ह्याबद्दल खटले करण्यांत आले. ह्या आरोपितांची चौकशी खालसामधून मुद्दाम मागून घेतलेल्या युरोपियन जज्जापुढें होऊन, त्यांच्यापैकीं आठजणांस शिक्षा झाल्या.

ह्या शिक्षा आणि टिळकाचा अधःपात ह्या दोन गोष्टींमुळें, कोल्हापुरसंस्थान व महाराष्ट्रांतील इतर ठिकाणें, येथील लोकांत अस्वस्थता उत्पन्न करणाऱ्या चळवळींचा जोर मोडला. कारण, तरुण पिढीच्या डोक्यांत राजकीय खुनांची कल्पना घालण्याचें काम, कोल्हापुरांत काय किंवा पुण्यांत काय, टिळकपक्षाच्या ब्राह्मणी वृत्तपत्रांनींच चालविलें होतें. कोल्हापुरांतील कट उघडकीस येण्याच्या अधल्या वर्षीं, आणि मुझफरपुर येथें नीचपणानें बांब उडविण्याचें अघोर कृत्य होऊन, मिस व मिसेस केनडी ह्या दोन युरोपियन स्त्रियांचे खून पडण्यापूर्वीं थोडे दिवस, कोल्हापुरांतील **विश्ववृत्त** नामक मासिकांत एक लेख आला

होता. सदर मासिकाचा संपादक विजापुरकर नांवाचा एक ब्राह्मण असून, सन १९०५ सालापर्यंत तो कोल्हापुरच्या राजाराम कॉलेजमध्यें संस्कृताचा अध्यापक होता. पण, पुढें त्याच्यावर खटला होऊन, त्याला शिक्षा झाली. "वैदिकप्रार्थनेची तेजस्विता" असा अर्थपूर्ण मथाळा त्या लेखाचा असून, त्यांत वेदांतील अनेक वचनें घेऊन, असें दाखविण्याचा प्रयत्न केला होता कीं, "परकी लोकांच्या" जुलुमाचा प्रतिकार करणें, हें प्रत्येकाचें कर्तव्य आहे. अशा लोकांस ठार मारण्यांत पाप नाहीं; आणि, क्षत्रिय व वैश्य आपलें कर्तव्य विसरून, अशा लोकांस जिवें मारण्यास पुढाकार घेत नसतील, तर ब्राह्मणांनीं शस्त्रग्रहण करून, धर्माचें रक्षण करावें. असे लोक समोर आले असतां, मागें पुढें न पाहतां त्यांची कत्तल करावी. अशी हत्या करणारास मुळींच पातक लागत नाहीं. हा उपदेश ह्मणजे, वैदिक शिक्षणावर निव्वळ तत्वज्ञानात्मक निबंध आहे, अशी समजूत होऊं नये, व "पुराणांतलीं वांगीं पुराणांतच राहूं नयेत" ह्मणून लेखकानें खबरदारी घेऊन, शेवटीं असें सांगितलें होतें कीं, हीं मतें नुसतीं पुस्तकांत राखून ठेवण्याचीं नाहींत. तर, अगदीं लहान मुलांना व स्तनपान करणाऱ्या अर्भकांनादेखील, त्यांचें बाळकडू दिलें पाहिजे.

ह्याप्रमाणें, प्रत्यक्ष ब्रिटिश अमलाखालीं असलेल्या दक्षिण प्रांताप्रमाणेंच, दक्षिणेंतील एका देशी संस्थानांतसुद्धां, ब्राह्मणांनीं आपल्या चळवळी एकाच धोरणानें व एकाच मार्गाचा अवलंब करून चालविल्या आहेत; व त्यांचा हेतु एकच असून, त्यांपासून सारखेच अनिष्ट परिणाम घडून येत आहेत. त्यांच्या चळवळींचीं रूपें वारंवार बदलतात, हें खरें आहे. तथापि,

सर्वांचा उद्देश ह्मटला ह्मणजे, ब्राह्मणांच्या **धार्मिक—राजकीय** सत्तेचें संरक्षण करावयाचें, किंवा तिची पुनः स्थापना करावयाची. मग, अशा सत्तेला कोणीं हिंदुराजानें विरोध केलेला असो, परकी राज्यकर्त्यांनीं असो, किंवा परकी लोकांच्या संस्कृतीमुळें झालेला असो.

## भाग ६ वा.

# विभागणीपूर्वी बंगालची स्थिति.

दक्षिणदेश व बंगालप्रांत ह्या दोहोंमध्यें सर्वतः मोठें अंतर आहे. मानवीवंश, भाषा, सामाजिक चालीरीती, नैसर्गिक देशस्थिति व मनुष्यस्थिति, इत्यादि बाबतींत हिंदुस्थानच्या निरनिराळ्या प्रांतांत जितका फरक दिसून येतो, तितका बहुधा युरोपखंडांतील निरनिराळ्या देशांतहि दिसून येत नाहीं. दक्षिणदेश व बंगालप्रांत यांत जितका फरक आहे, त्यापेक्षां अधिक दुसरीकडे कोठेंहि आढळून येत नाहीं. दक्षिणदेश समुद्राच्या सपाटीपासून सुमारें २००० फुटींच्या उंचीवर आहे. यांत पुष्कळ मोठाल्या खोल दऱ्या असून, त्यांतून नद्या वाहतात; व जागजागीं झाडझुडूप नसलेल्या उंच उंच डोंगरांच्या रांगा आहेत. अशा ह्या विस्तीर्ण मैदानांतील लोकांस पाण्यासाठीं सर्वस्वी नैऋत्येकडून येणाऱ्या पावसाळ्यावरच अवलंबून राहावें लागतें. पावसाळा खेरिज करून, बाकीचे आठ महिने येथें फार कडक उन्हाळा असतो; व जमीन उथळ असून, ती सर्व उन्हाळाभर तापून राहाते. आणि, पावसाळ्यांत जो कांहीं थोडाफार पाऊस पडेल, त्यानेंच फक्त जमीन भिजली जाते. बंगालप्रांताची जमीन गाळाचे थरावर थर बसून तयार झालेली आहे. तेथील हवा उष्ण व सर्द आहे. गंगा व ब्रह्मपुत्रा अशा-सारख्या महानद्यांचा उगम हिमालयांत असल्याकारणानें, तेथील

पाणी खालीं उतरून, बंगाल्यांतील जमिनीस सुपीकता आणितें. दक्षिणेंत लोकवस्ती विरळ आहे; व मोठाले जलमार्ग नाहींत. तसेंच, मोठीं शहरें थोडीं असून, त्यांमध्यें दळणवळणाच्या स्वाभाविक सोयीहि फार कमी आहेत. मोगल बादशाहीमुळें इकडे येऊन स्थाईक झालेले थोडेसे मुसलमान वगळले, ह्मणजे बाकीची वस्ती मराठा—हिंदूंची आहे. मराठे लोक शूर असून, शरीरानें जरी धिप्पाड नाहींत तरी मोठे काटक आहेत. ते आपल्या जुन्या चालीरीतीस व कुलपरंपरेस चिकटून राहणारे असून, त्यांच्या मराठी भाषेंत पुष्कळ लोकप्रिय ग्रंथ आहेत. शिवाय, महाराष्ट्राचा स्वतंत्र इतिहास असून, तो त्यांस सर्वथा भूषणावह असाच आहे. अगदीं अलीकडच्या काळा-पर्यंत महाराष्ट्रीयांचें नांव, हिंदुस्थानच्या इतिहासांत चांगलेंच गाजत होतें; व त्याबद्दलची जाणीव त्यांच्या ठिकाणीं अझूनहि दृष्टीस पडते. महाराष्ट्रांतील ब्राह्मणांच्या हातीं एका काळीं येथील राजसत्ता असून, अद्यापिहि त्यांच्या अंगीं राजकुलोत्पन्न लोकांच्या ठिकाणीं असणारी उपजत बुद्धि व आकांक्षा आहेत. शिवाय, त्यांची बुद्धि विशाल असून, कुशाग्र आहे. उलटपक्षीं, बंगालप्रांतांत वस्ती दाट असून, तिचा कांहीं भाग मोठमोठ्या जलमार्गांच्या कांठीं असणाऱ्या मोठमोठ्या शहरांतून व गांवांतून आढळून येतो. पण, बाकीचा भाग बहुतकरून सुपीक मैदानें व दुआब यांवर पसरून राहिला आहे. बंगाली लोक शीघ्रबुद्धीचे, कल्पनासृष्टींत भ्रमण करणारे व दिलदार असे आहेत. आणि, ऐतिहासिक दृष्ट्या विचार करितां, त्यांनीं कधीं राजसत्ता भोगलेली नाहीं; पण, उलट त्यांच्यावरच दुसऱ्यांनीं अशी सत्ता गाजविलेली आहे. अतिप्राचीन काळापासून अनेकवेळां हे लोक पादाक्रांत

झालेले आहेत. परंतु, त्यांच्या लवचीक व कांहींशा भेकड स्वभावावर या गोष्टीचा चिरस्थाई असा परिणाम बहुधा झालेला नाहीं. ग्रहणशक्ति, नव्या नव्या गोष्टींची आवड, शिकण्याची उत्सुकता, दृढ स्मरणशक्ति, उद्दाम कल्पनाशक्ति, सुगम वक्तृत्वाची देणगी, वगैरे गुण त्यांच्या अंगीं असतांहि, मनुष्यप्राण्यांवर सत्ता चालविण्याचा गुण त्यांच्या ठिकाणीं कधींहि दिसून आला नाहीं.

बंगालमधील अस्वस्थता व दक्षिणेमधील अस्वस्थता यांत बरेंच साम्य असून, या दोन प्रांतांतील पुढाऱ्यांत नेहमीं दळणवळण व सहकारित्व आहे, असें वर वर अवलोकन करणारास दिसलें, तरी, बंगालप्रांतांतील अस्वस्थतेंत वरील सर्व गुणभेद दृष्टोत्पत्तीस येतो. ह्याचा अर्थ असा कीं, दक्षिण व बंगाल ह्या प्रांतांतील लोकांत जसा भिन्नपणा आहे, तसाच त्यांच्या राजकीय चळवळींतहि आहे. भूगोलशास्त्राच्या दृष्टीनें पाहिलें नाहीं, तर ब्रिटिश राजसत्ता व पाश्चिमात्य विद्या या दोन गोष्टींमुळेंच वस्तुतः 'बंगाल' प्रांताचें नांव पुढें येतें. 'आमचें राष्ट्र आहे, असें जें आधुनिक बंगालीलोकांचें ह्मणणें आहे, त्यास इतिहासाचा आधार नाहीं. द्राविडी, मंगोली व आर्य वंशांतील लोकांपासून बंगालीलोक झाले आहेत; आणि, सर एच् रिसलेसाहेबांचें असें मत आहे कीं, येथील सुशिक्षितवर्गानें जी भाषा तयार केली आहे, ती ह्या प्रांतांतील पुष्कळ पोटभाषांपासूनच नाहीं, तर साधारण व्यवहारांत बोलण्यांत येणाऱ्या भाषेपासूनहि जशी भिन्न आहे, तसें साऱ्या हिंदुस्थानांत दुसरीकडे कोठें आढळून येत नाहीं. ग्रंथांत जी 'बंगाली' भाषा येते, ती देखील सर्वतोपरि येथील लोकांनीं तयार केलेली नाहीं. गेल्या शतकाच्या पूर्वार्धांत, **केरी**–सारख्या इंग्लिश मिशनरी लोकांनीं, कलकत्ता येथील

पंडितांच्या साह्यानें, मोठी मेहनत घेऊन, जी भाषा तयार केली, तीच मुख्यतः वरील ‘ ग्रंथभाषा ’ होय. आणि, ह्याच सामान्य भाषेच्या जोरावर, ‘ आपलें एकराष्ट्र आहे, ’ असें बंगालीलोक मुख्यतः प्रतिपादन करितं असतात. किंवा, अन्यरीतीनें ह्मणावयाचें ह्मणजे, ज्याला हे लोक ‘ शिक्षण ’ समजतात, त्यावरच केवळ त्यांचीं ही समजूत अवलंबून आहे. कारण, साक्षर ( लिहितां वाचतां येणाऱ्या ) लोकांचा बंगाल्यांत जसा भरणा आहे, तसा बहुधा इतर कोणत्याहि प्रांतांत नाहीं. बंगाल्यामध्यें ‘शिक्षण’ ही निखालस एक मोठी शक्ति आहे. येथें जातिभेद नाहींसा न होतां, आपल्या सर्व मुख्यांगांसह अद्यापि अभंग आहे. तथापि, शिक्षणामुळें कांहीं अंशीं जातिभेदाचें प्रस्थ कमी झालें आहे.

ऐतिहासिक काळांत तरी, बंगाली ब्राह्मणांचें राजकीयदृष्ट्या केव्हांहि प्राबल्य नव्हतें. अगदीं प्राचीनकाळीं, बंगाल्यांत हिंदुराजे राज्य करित असतांना, राज्यांतील अधिकाराच्या जागा पतकरून, आपला कमीपणा करून घेण्याकडे त्यांची प्रवृत्ति नसे. आणि, मुसलमानी अमदानींत तर अशी प्रवृत्ति फारच कमी असे. संस्कृतभाषा व हिंदुधर्मग्रंथ यांत प्रवीणता आली, ह्मणजे त्यांना पुरे होई; आणि, ह्याव्यतिरिक्त सर्व प्रकारचें ऐहिक ज्ञान, त्यांनीं ‘ कायस्थ ’ ह्मणजे ‘ लेखक ’ वर्गाकडे सोंपविलें होतें; व जातिभेदविषयक अशा कित्येक मोठ्या अडचणी असतांहि, परस्पर जातींत साधारणपणें जसा स्नेहसंबंध असतो, त्यापेक्षां पुष्कळच अधिक निकट संबंध ते कायस्थांबरोबर ठेवीत. इकडे अशी एक दंतकथा आहे कीं, नवव्या शतकांत पूर्वबंगालचा राजा **आदिसूर** यानें, अत्यंत पवित्र अशा हिंदुलोकांच्या क्षेत्रांतून, पांच उपाध्ये आपल्या राजधानींत आणिले होते. ह्या पांच ब्राह्मणांचे जे वंशज,

तेंच सध्यांचे बंगालमधील उच्च कुलांतील ब्राह्मण होत. आणि, या ब्राह्मणांनीं आपल्याबरोबर जे नोकरचाकर आणिले होते, त्यांच्या वंशांतील लोकांना अद्यापि बंगालच्या कायस्थांकडून उच्च-स्थान मिळतें. ह्या दोन्ही कुळांतील ब्राह्मण, आपला श्रेष्ठपणा राहावा व आपल्या कुलांत संकर होऊं नये ह्मणून, फार खबरदारी घेतात. ह्मणजे, आपलें 'कुलीनत्व' राखण्यासाठीं त्यांनीं लग्नसंबंधाविषयीं फार कडक व घोंटाळ्याचे निर्बंध करून ठेविले आहेत. कित्येकवेळां कुलीन लोकांचे लग्नसंबंध पाहिले, ह्मणजे मोठा किळस उत्पन्न होतो. सारांश, बंगालमध्यें **ब्राह्मण, कायस्थ** व **वैद्य** ह्या उच्च जातींचें वर्चस्व जसें आहे, तसें हिंदु-स्थानांत इतरत्र दिसून येत नाहीं. ह्या **वैद्य**जातीच्याच हातीं पूर्वीं हिंदुवैद्यक सर्वथैव असे. शिक्षणामुळें ह्या जाती एके ठिकाणीं आल्या आहेत; आणि, हें शिक्षणाचें बंधन, ब्रिटिशसत्तेच्या उदयानें व पाश्चिमात्य विद्येच्या प्रभावामुळें दृढ झालें आहे. आरंभीं, जे ब्रिटिश मिशनरी इकडे आले होते, त्यांनीं एतद्देशीय लोकांत विद्याप्रसार करण्याचे कामीं मोठें धाडस दाखविलें. त्यानंतर, डा० **डफ** नामक अत्यंत प्रसिद्ध ब्रिटिश मिशनरी, व सुधारणेच्छु ब्राह्मणांपैकीं अत्यंत विद्वान् व कळकळीचे **राममोहन-राय**, यांच्या प्रयत्नामुळें, सन १८३५ सालच्या मार्च महिन्याच्या ७ व्या तारखेस, जें इतिहासप्रसिद्ध विद्याविषयक सरकारी धोरण ठरलें, त्यामुळें, ह्या तिन्ही उच्च जातींतील पुष्कळ नामांकित मंडळी पुढें आली; व सरकारी नोकरी व उच्चप्रतीचे धंदे कर-ण्याकरितां लागणारें शिक्षण संपादन करून, आपल्या अंगीं पात्रता आणूं लागली. हिंदुस्थानांत इंग्रजांचें राज्य स्थापन झाल्यावर, त्यांनीं राज्यकारभारांत ज्या सुधारणा सुरू

केल्या, त्यांमुळें वरील प्रकारचे नवीन धंदे निर्माण झाले. ह्या उच्च जातींनींच प्रथमतः आघाडी मारली; आणि, नंतर जरी इतर जातींत शिक्षणप्रसार होऊं लागला, तरी सरकारी नोकरी, वकिली, वर्तमानपत्रें व छापखाने, मास्तर-गिरी, वगैरे सर्व उच्च धंदे वस्तुतः त्यांच्याच हातांत राहिले. 'हिंदुधर्माची सुधारणा केली पाहिजे,' वगैरे मतें हिंदुलोकांच्या मनांत येऊन, त्यांचा शिरकाव धर्मांत होत आहे असें दिसलें, तेव्हां **ब्रह्मसमाज व सामाजिक सुधारणा** ह्या चळवळींचे मुख्य पुढारी तेच लोक होते. हिंदुलोकांत रूढ असलेल्या बालविवाहाच्या चालीपासून होणारे अनर्थ कमी करण्याच्या हेतूनें, सन १८९१ सालीं 'संमतिवयाचा' कायदा पास करावा लागला. त्यावेळीं, ह्या बिलाविरुद्ध जी चळवळ झाली, ती, वस्तुतः पाश्चिमात्य विद्येच्या संस्कारामुळें, ज्या धार्मिक व सामाजिक सुधारणा कराव्या, असें लोकांस प्रथमतः वाटलें होतें, त्यांविरुद्ध लोकमताचा ओघ आतां वळला आहे, ह्या गोष्टींचें दृश्यरूप होतें. तेव्हांपासून, सुधारणा करण्याची प्रवृत्ति धार्मिक व सामाजिक गोष्टींतून निघून, राजकीय वातावरणांत शिरली; आणि, अशा चळवळींत पुढाकार घेऊन, त्यांना पाश्चिमात्य राजकीय चळवळींचा पेहराव चढविण्याची कला ह्याच लोकांना साधली. मुंबई-मुक्कामीं भरलेल्या पहिल्या कांग्रेसचें अध्यक्षस्थान, बंगालच्या नेमस्तपक्षामधील विद्वान् कायदेपंडित मि. डब्लु. सी. **बानरजी** यानीं स्वीकारिलें होतें. त्यावेळच्या त्यांच्या सुरवातीच्या भाषणांत जो नेमस्तपणा दिसून आला, तसा अद्यापिहि कोणीं दाखविला नाहीं. कांग्रेसची चळवळ प्रथमतः बंगाल्यांत सुरू न होतां मुंबईस झाली. तथापि, बंगाल्यांतील वावदुकांना लवकरच असें वाटूं लागलें कीं, हिंदु-

स्थानच्या इतिहासांत पूर्वीं कधीं न मिळालेला असा पुढाकार घेण्याचा मान, आतां बंगालच्या लोकांस प्राप्त झाला आहे.

बंगालीलोक स्वभावतःच कल्पनासृष्टींत वावरणारे असून, त्यांची ग्राहकशक्ति मोठी आहे. त्यामुळें, इंग्रजी आचारविचारांचें खरोखर त्यांनीं जसें ग्रहण केलें, तसें इतर हिंदी लोकांनीं केलें नाहीं. उदाहरणार्थ, कलकत्त्याच्या युनिव्हरसिटीचे व्हाइस चान्सेलर डा० **अशुतोष** मुकरजी, अथवा कायद्याच्या ज्ञानांत ज्यांच्यावर सरशी करतील, असे कायदेपंडित खुद्द इंग्लंडांतदेखील नसतील, असे डा० **राश-बिहारी** घोष, यांच्या मनाला पाश्चिमात्य विद्येमुळें आलेला खराखरा सुसंस्कृतपणा व त्यांची गाढ विद्वत्ता, ह्यांबद्दल कोणासच शंका घेतां येणार नाहीं. आणि, ज्यांच्या राजनिष्ठेबद्दल व कर्तृत्वाबद्दल मुळींच संशय नाहीं, असे जे पुष्कळ विद्वान् व सुशिक्षित बंगाली लोक सरकारी नोकरींत होऊन गेले, व सध्यांहि आहेत, त्यांच्यामध्यें डा० मुकरजी व डा० राशबिहारी घोष ह्यांच्यासारखेच पुष्कळ गृहस्थ आहेत, असें सहज दाखवितां येईल. इंग्रजी शिक्षणाच्या प्रसारामुळें, निदान बाहेरल्या गोष्टींत तरी, परधर्मसहिष्णुता आलेली आहे. आणि, लग्नसंबंधासारख्या अत्यंत महत्त्वाच्या बाबतींत जातिनिर्बंध अझूनहि फारच कडक आहेत, तरी साधारण नित्याच्या व्यवहारांत जसा लंडनमधला इंग्रजी समाज धर्माची विशेष परवा करित नाहीं, तसाच प्रकार कलकत्त्याच्या सुशिक्षित लोकांत आढळून येतो. महाराष्ट्रांत ब्राह्मणांचें वर्चस्व अगदीं अलीकडच्या काळापर्यंत असून, त्यांचें सामर्थ्यहि विशेष होतें. परंतु, असा प्रकार बंगाल्यांत नसल्यामुळें, इंग्रजी शिक्षणाचा दुसरा परिणाम असा झाला आहे कीं, तेथील राजकीय आकांक्षांत प्रजापक्षीय

धोरणाची छटा दिसून येते. त्यामुळें, त्यांच्या प्रयत्नांस ब्रिटिश र्‍याडिकलपक्षाची सहानुभूति मिळाली आहे. आणि, ही छटा जरी बहुतेक बाबतींत अगदीं अल्प आहे, तरी बंगाली लोकांत प्रसंगानुसार वागण्याचा गुण असल्यामुळें, त्यांनीं आपल्या राजकीय मतांस मोठ्या विलक्षण चातुर्यानें असें स्वरूप दिलें आहे कीं, त्यामुळें इंग्रजलोकांना त्यांचें धोरण पसंत पडतें. इंग्रजलोकांना कोणती गोष्ट कोणत्या स्वरूपांत चांगली आवडते, हें जाणण्याची कला बंगाली लोकांना स्वभावतःच अवगत आहे. सुशिक्षित बंगाली लोकांत खरोखर लोकहिताची कळकळ किती आहे, हें पाहूं गेल्यास, ती यत्किंचित्‌हि सांपडणें कठीण आहे. कारण, ज्या लोकसमुदायाचे आपण पुढारी आहों ह्मणून ते मोठा बहाणा करितात, त्यांच्यांत व ह्यांच्यांत सामाजिक दृष्ट्या महदंतर आहे. शिवाय, पुढारीपणाचा जो असा डौल मारण्यांत येतो त्याच्यांत कांहींतरी खरेपणा आहे, असें दुसर्‍यांस दाखविण्याची आपली इच्छा असली, तर हें अंतर कमी करण्याचे कांहीं प्रयत्न आपण केले पाहिजेत, असें त्यांच्यांतील अत्यंत सुज्ञ लोकांपैकीं फक्त थोड्यांसच कायतें वाटतें. १८३२ सालीं इंग्लंडमध्यें रिफार्मबिल पास झालें. त्यापूर्वी, तेथील मध्यम स्थितींतल्या लोकांस, बहुजनसमाजाची स्थिती सुधारून त्यांना संकटांतून मुक्त केलें पाहिजे, अशी कल्पनाहि नव्हती. ह्मणजे, वरच्या वर्गांतील मूठभर लोकांच्या हातीं सर्व सत्ता असून, त्यांच्या तंत्रानें राज्यकारभार चालत असे. ह्मणून, ह्या स्थितींतून अंशतः तरी आपली स्वतःची सुटका करून घेण्याची त्यांची इच्छा होती. असाच प्रकार बंगाल्यांत असल्यामुळें, येथील नेमस्त लोकांचे वरील इंग्रजलोकांशीं कांहीं साम्य

आहे. ह्या दृष्टीनें विचार करितां, पुष्कळ सुशिक्षित बंगाली लोकांस,—आणि विशेषतः जुन्या पिढींतील लोकांस,—असें खात्रीपूर्वक वाटत असतें कीं, "आह्मी राजकीय चळवळी करून, देशाच्या राज्यकारभारांत आपला हात अधिक शिरकावण्यास पाहत असतों, हें अगदीं वाजवी आहे." कारण, इंग्लंडचा इतिहास वाचून, ह्या लोकांच्या अशा कल्पना झाल्या आहेत कीं, अशा प्रकारचा उद्योग करणें ह्मणजे, खुद्द इंग्लंडांत नागरिकत्वाचीं व राजकीय चळवळीचीं जीं तत्वें अगदीं निर्दोष ठरलीं आहेत, त्यांच्याच अनुरोधानें इकडेहि चळवळी सुरू करून, त्यांच तत्वांना व्यावहारिक रूप द्यावयाचें. तथापि, अलीकडे लोकांमध्यें जी एक नवीन, व मुळांतच क्रांतिकारक अशी, प्रवृत्ति दिसून येते, तीमुळें ह्या वरील मतांच्या लोकांचें वजन समाजांतून झपाट्यानें कमी होऊं लागलें आहे. ह्या देशांत पाश्चिमात्य लोकांची जी सत्ता आहे, तिच्याविरुद्ध बंड करण्याची प्रवृत्ति ह्या नवीन पक्षांत दिसून येते इतकेंच नाहीं, तर पौर्वात्य देशांतहि कधीं दिसलें नाहीं, अशा प्रकारचे अत्यंत प्रतिगामी धोरण स्वीकारून, पुनरपि जुन्या राजपद्धतीकडे कांहीं अंशीं वळण्याची इच्छा ह्या नवीन पक्षांत दृष्टोत्पत्तीस येते. आणि, दुर्दैवाची गोष्ट ही कीं, तरुण सुशिक्षित मंडळी ह्या नवीन धोरणास बळी पडली आहे.

मुसलमान राजांच्या कारकीर्दींत बंगालीलोकांस जें कांहीं वजन होतें, तें त्यांना मिळणाऱ्या अगदीं कनिष्ठ प्रतीच्या शिक्षणामुळेंच होतें. आणि आतां, ब्रिटिश अमलाखालीं त्यांना जें उच्च प्रतीचें शिक्षण मिळूं लागलें आहे, त्याच्या जोरावर त्यांनीं आपलें वजन देशांत चांगल्या रीतीनें बसविलें आहे; व

अशा प्रकारें प्राप्त झालेल्या संधींचा त्यांनीं चांगला फायदा घेतला आहे. शिक्षणासारख्या वादग्रस्त विषयाचा विचार मी पुढें स्वतंत्रपणें करणार आहें. सध्यां इतकेंच सांगितलें ह्मणजे पुरे कीं, बंगाली-लोकांना मिळालेलें शिक्षण वरपंगी न होतां, त्यांच्या अंगांत भिनलें असतें; तसेंच, तें शिस्त आणि नीति यांस आतांप्रमाणें सोडून नसतें; व हिंदी लोकांच्या संसाराशीं त्याची खरीखरी सांगड असती, तर त्या शिक्षणाचे परिणाम फार निराळे झाले असते. पण, सांप्रत अशी स्थिति आहे कीं, इंग्रजी शिक्षण देण्याचें काम एतद्देशीय लोकांच्या हातीं जाऊं दिल्यामुळें, हिंदुस्थानांतील शाळा व कॉलेजें यांत ज्या प्रकारचें शिक्षण मिळतें, त्यामुळें त्याची योग्यता दिवसेंदिवस कमीच होत चालली आहे; मात्र, तेथून शिक्षण मिळवून बाहेर पडणारांची संख्या वाढत चालली आहे. आपल्या मुलाबाळांस उच्चप्रतीच्या मानलेल्या शिक्षणाचा लाभ, मिळावा ह्मणून, गरीब स्थितींतल्या पुष्कळ बंगाली लोकांचे आपल्या पोटाला चिमटा घेऊन केलेले प्रयत्न पाहिले, ह्मणजे पुष्कळ वेळां मनाला द्रव येतो. परंतु, अशा प्रकारचें शिक्षणाचें वेड जात्या कितीहि प्रशंसनीय असलें, तरी त्याचे परिणाम फारच अनर्थकारक झाले आहेत. अगदींच तुटपुंजे र–ट–क करितां येण्याइतकें—ज्ञान घेऊन, विद्यार्थ्यांचे थवेच्या-थवे, पोटाचा उद्योग करण्याकरितां, दरसाल बाहेर जगांत येत असतात; आणि, जगाला तर असल्या अर्ध्याकच्च्या शिकलेल्या पोरांचा उपयोग नसतो, किंवा फारच थोडा असतो. परीक्षेंत यश न मिळाल्यामुळें, किंवा परीक्षा पास होऊनहि, आपल्याला जी जागा मिळावी असें त्यांना वाटत होतें, ती न मिळाल्यामुळें, ह्या असल्या सुशिक्षितांचें तोंड आंबट होऊन जातें. शिवाय,

असल्या अर्धवट निरुपयोगी शिक्षणाच्या भानगडींत हीं मुलें पडलीं नसतीं, तर ज्या तऱ्हेचें काम त्यांना शिकविलें असतें, त्याचा तिटकारा असल्यामुळें, असे लोक हरएक प्रकारचें बंड करण्याकरितां अगदीं एका पायावर तयार झालेले असतात. अशा प्रकारची सामग्री मिळाल्यामुळें, राजकीय अस्वस्थतेच्या पुढाऱ्यांस आपला हेतु फारच चांगल्या रीतीनें साधतां आला आहे; आणि, अशा तऱ्हेच्या शिक्षणपद्धतींत स्वाभाविकपणेंच जो धोका असतो, त्याची ओळख जुन्या पिढींतील कांहीं विचारी बंगालीलोकांस अगदीं अलीकडेच होऊं लागली आहे. ह्या शिक्षण-पद्धतींतले मोठाले ठळक दोष काढून टाकण्याच्या उद्देशानें, १९०३ सालीं लॉर्ड कर्झनसाहेबानें 'युनिव्हरसिटी बिल' पुढें आणिलें; तेव्हां, शिक्षणामुळें बंगालप्रांताचें 'राष्ट्र' होत आहे ह्मणून, उच्चप्रतीच्या शिक्षणाची गळचेपी करण्याचा सरकारचा इरादा आहे, अशी ओरड सर्व बंगालभर मोठ्या जोरानें सुरू झाली. परंतु, पुढें ज्या गोष्टी घडून आल्या, त्यांवरून असें दिसून आलें कीं, ह्या कायद्याची त्यावेळीं फारच जरूर होती इतकेंच नाहीं, तर जें अरिष्ट टाळावें ह्मणून तो कायदा अस्तित्वांत आणला, त्यालाच फार उशीर झाला होता; व त्यामुळें इष्ट हेतु व्हावा तसा साध्य झाला नाहीं. शिवाय, ह्या कायद्याची मर्यादाहि वाजवीपेक्षां फारच संकुचित ठेवण्यांत आली होती. पुढें लवकरच, कलकत्ता–युनिव्हरसिटीच्या पद-वीदानसमारंभाच्यावेळीं, लॉर्ड कर्झनसाहेबानें जें सुप्रसिद्ध भाषण केलें, त्यामुळें, ह्या वरील कायद्यानें उत्पन्न केलेल्या काहुरास जास्तच जोर चढला. कारण, कोंवळ्या मनाच्या, व तत्काळ चित्तवृत्ति क्षुब्ध होऊन जाणाऱ्या बंगालीलोकांचा एकदम असा

ग्रह झाला कीं, आपल्या सर्वच ‘ राष्ट्रास ’ लाजेनें खालीं पाहावयास लावण्यासारखे दोषारोप सदरहु भाषणांत करण्यांत आले होते. अशा प्रकारचें जें वादळ उठलें, त्यावरून वातावरण क्षुब्ध होऊन त्यांत अत्यंत घातुक विद्युच्छक्ति कशी उत्पन्न होऊन राहिली होती, ह्या गोष्टीचा चांगलाच बोध होतो.

गेलीं कांहीं वर्षें, टिळक व कशानेंहि समजूत न होणारे असे त्याचे अनुयायी, ह्यांचें वजन बंगालीलोकांवर बसत चाललें होतें. आणि, त्याचा परिणाम तेथील वर्तमानपत्रांवर जसा फार लवकर झाला, तसा इतर गोष्टींत झाला नाहीं. हिंदीवृत्तपत्रांच्या संबंधाचा मोठा बोधप्रद इतिहास, ‘ कलकत्तारिव्ह्यु ’ नामक मासिकांतून सध्यां प्रसिद्ध होत आहे. ह्याचे लेखक मि० **सन्याल** हे चांगले विद्वान् हिंदीगृहस्थ असून, शिवाय त्यांस कांहीं अस्सल व आजपर्यंत प्रसिद्ध न झालेले कागदपत्र पाहण्याची संधि मिळाली आहे. ह्यांच्या विद्वत्ताप्रचुर लेखावरून असें दिसून येतें कीं, प्रत्यक्ष इंग्रजी शिक्षणाच्या योगानेंच बंगालमध्यें प्रथमतः हिंदी वर्तमानपत्रांचें बीं रुजलें; व सुशिक्षित बंगालीलोकांच्या विचारांत होणाऱ्या चलबिचली त्यांतून बरोबररीतीनें जगापुढें येऊं लागल्या. बंगाल्यांतील अत्यंत वजनदार पत्रांपैकीं बरींच पत्रें इंग्रजींतून निघत असत. पण, त्यांच्याबरोबरच, आणि बहुधा त्याच संपादकांकडून, लोकप्रिय वर्तमानपत्रेंहि देशीभाषेंतून काढलीं जात. बंगालच्या **जहाल** पत्रकारांपैकीं बाबू **बिपिनचंद्र** पाल व बाबू **अरविंद** घोष, हे जसे टिळकाच्या अंगच्या आकर्षण शक्तीला बळी पडले, तसे दुसरे कोणी पडले नाहींत. मि० पालचा ‘ **न्यु इंडिया**, ’ व मि० घोषचें ‘ **वंदेमातरम्**, ’ हीं दोन्हीं पत्रें इंग्रजींत निघत असत; व ह्या दोन पत्रांनीं मि०

सुरेंद्रनाथ बानरजीच्या ‘ **बंगाली** ’ पत्रास खोडसाळ लेख लिहिण्याच्या कामांत लवकरच मागें टाकिलें. कारण, पाश्चिमात्य लोकांच्या विद्याचारांमुळें हिंदुलोकांवर जे परिणाम झाले होते, त्यां विरुद्ध बंड करण्याची व हिंदुधर्म व त्यांतील समाजव्यवस्था कायम ठेवण्याची प्रवृत्ति मि० बानरजींमध्यें नव्हती, असें ह्मणतां येत नाहीं; तरी, राजकीय चळवळी व इंग्रजांच्या राज्यपद्धतीवर टीका, इतक्याच गोष्टी करण्याकडे प्रथमतः त्यानीं आपलें सर्व लक्ष दिलें होतें. हिंदुस्थानांतील ह्या नवीन राजकीय पक्षाच्या पुरस्कर्त्यांत बाबू अरविंद घोष हे प्रमुख आहेत, असें ह्मटलें तरी चलेल. आणि ह्या पक्षाचें इंग्रजलोकांच्या सत्तेशीं वैर आहे इतकेंच नाहीं, तर तिच्या अंगभूत असणाऱ्या सर्व गोष्टींशींहि आहे; व ह्या बाबतींतील आपलीं मतें तो पक्ष लपवून ठेवण्याचा प्रयत्नहि करित नाहीं. ‘हिंदुलोकांकरितांच हिंदुधर्म, ’ किंवा हे लोक ह्मणतात त्याप्रमाणें, ‘आर्यलोकांकरितां आर्यावर्त, ’ अशा प्रकारच्या रणगर्जना ह्या अर्धवेड्या माथेफिरूंच्या व अर्धकच्च्या देशाभिमान्यांच्या तोंडून ऐकूं येतात. ह्या लोकांचें **गुह्यज्ञान** अशा प्रकारचें आहे कीं, त्यामुळें हिंदुस्थानास कोणत्या प्रकारचें स्वातंत्र्य असलें पाहिजे, हें **भगवद्गीते**सारख्या पवित्र धर्मग्रंथांतून आधार घेऊन त्यांस ठरवितां येतें इतकेंच नाहीं, तर येथील परकीयांची सत्ता झुगारून देण्यासाठीं अत्यंत अघोर कर्में करावीं लागलीं, तरी त्यापासून पुण्याची जोड होते, अशींहि वचनें त्याच धर्मग्रंथांतून त्यांना काढितां येतात. ह्या ‘आर्य’ ह्मणविणारांच्या प्रतिक्रियात्मक चळवळीस, धर्मसंबंधी उत्साहाचा बराच पाठिंबा मिळाल्याकारणानें, जुन्या हिंदुधर्माचीसुद्धां सरशी झाली; आणि बहुजनसमाजाच्या धर्मभोळेपणाचें साह्य घेतलें ह्मणजे,

बंगालप्रांतांतदेखील ब्राह्मणी धर्माच्या अंगांत अद्यापि किती सामर्थ्य आहे, हें तात्काळ दाखवितां आलें. हें धर्मवेड कोणत्या नाहीं कोणत्यातरी रूपानें वणव्याप्रमाणें विद्यार्थ्यांतच शिरून राहिलें असें नाहीं, तर त्यानें शिक्षकवर्गासदेखील ग्रासून टाकिलें. कांहीं अंशीं, इंग्रजलोकांना मर्दानी खेळाची आवड असते तिचें अनुकरण करण्याच्या हेतूनें व कांहीं अंशीं, **बंगालीराष्ट्रावर** असलेलें नामर्दपणाचें लांछन धुवून काढण्याच्या वाजवी हेतूनें, शारीरिक शिक्षणाच्या शाळा बंगालमध्यें जागजागीं स्थापन करण्यांत आल्या; व त्यांतून तरुण मंडळीस ह्या प्रकारचें शिक्षण मिळत असे. पण, क्रांतिकारक विचारांची लाट उसळतांच, ह्या व्यायामशाळांचे मूळहेतु बाजूस राहून, महाराष्ट्रांतील टिळकाच्या चळवळींत तालिमबाजांच्या टोळ्यांचा जसा फायदा घेण्यांत आला होता, तसाच प्रकार बंगाल्यांतहि तात्काळ झाला. ह्मणजे, शारीरिक शिक्षणाच्या संस्था राजकीय संस्थांच्या वळणावर गेल्या. तरुणमंडळी आपणांस मागें ढकलून देतील कीं काय, ह्या भीतीनें जुन्या पिढींतील कांहीं लोकांनीं ह्या नवीन धोरणाचा अंगीकार केला; व **राष्ट्रीयसभेच्या** खटपटीनें ज्या राजकीय सुधारणा होतील अशी आशा होती, त्यांस विलंब लागल्याकारणानें, कित्येक लोकांचा खरोखरच धीर सुटला होता; आणि, समाजांत आपल्याबद्दल असणारा खराखुरा किंवा काल्पनिक अनादर, अथवा सरकारी नोकरी न मिळाल्याकारणानें उत्पन्न झालेली निराशा, ह्याबद्दल आलेला राग व्यक्त करण्याची अशी नामी संधी मिळाल्यामुळें, कांहीं थोड्या लोकांस मोठा आनंद झाला असावा.

तात्पर्य, राज्यकारभारांतील अडचणी मोडून सव्यवस्थितपण

येण्यासाठीं, प्रांतांची पुनः विभागणी करण्याच्या हेतूनें, '**बंगालची फाळणी**' ह्या नांवानें प्रसिद्धीस आलेला कायदा जेव्हां हिंदुस्थानसरकारानें पुढें आणिला, तेव्हां वर वर्णन केल्याप्रमाणें बंगाल्यांत लोकास्थिति होती, असें दिसतें.

## भाग ७ वा.

# बंगाल्यांतील वादळ.

बंगालप्रांताच्या फाळणीच्या बरेवाईटपणाबद्दल इतकी चर्चा होऊन गेली आहे कीं, तिचा आतां अगदीं वीट आला आहे. राज्यव्यवस्थेंत सुधारणा व्हावी, हा जो वरील फाळणीचा हेतु होता, त्या दृष्टीनें पाहिलें, तर आतां त्या गोष्टीची तरफदारी करण्याचें कारणच उरलें नाहीं. ज्याला खरोखर **बंगालदेश** ह्मणतात, तो प्रांत अद्यापिहि सर्वांत दाट वस्तीचा आहे; तथापि, वरील फाळणीमुळें तेथली राज्यव्यवस्था सुधारण्याचा निदान संभव तरी वाटूं लागला आहे. बंगालप्रांताचे पूर्वेकडील जिल्हे नवीन उत्पन्न केलेल्या प्रांतांत घातल्यापासून, तेथील लोकांचा फारच फायदा झाला आहे. अशी विभागणी होण्यापूर्वीं त्या जिल्ह्यांची हयगय झाल्यामुळें, तेथील लोकांची मोठी शोचनीय स्थिति असे. ह्या जिल्ह्यांत मुसलमानलोकांची वस्ती हिंदुलोकांच्यापेक्षांहि फार मोठी आहे. परंतु, फाळणीपूर्वीं बंगालप्रांताचा कारभार कलकत्त्याहून चालत असे, तेव्हांतर ह्या लोकांच्या हितसंबंधाकडे फारच थोडें लक्ष दिलें जाई. ह्मणून, ह्या फाळणीमुळें सदरहु मुसलमानलोकांस केवळ न्याय मिळाला आहे, असें ह्मटलें पाहिजे. ह्या फेरफारामुळें जर कदाचित् कोणाचें पैशाचें नुकसान किंवा गैरसोय खरोखरच झाली असेल, तर ती, पूर्वबंगालमधील सदां बाहेर राहणारे

जमीनदार, वकील, व सावकार, तसेंच कलकत्त्यांतील कांहीं हिंदी व इंग्रज व्यापारी, ह्यांची असावी. कारण, पूर्वबंगालची राजधानी डाक्का–शहर झाल्यामुळें, कलकत्त्यास राहणाऱ्या लोकांस आतां तिकडे जावें लागेल; आणि ह्मणूनच, ह्या लोकांना आपला तोटा झाला, असें वाटूं लागलें आहे. तथापि, हिंदुस्थानांत केवळ अश्रुतपूर्व अशा चळवळीस प्रारंभ करण्याविषयीं ह्या फाळणीनें लोकांस इशारा दिला. **फाळणी** हें चळवळीचें **कारण** होतें, असें न ह्मणतां, तो **इशारा** होता, असें मी मुद्दाम ह्मणतों. कांकीं, फाळणीमुळेंच लोकमत आपोआप क्षुब्ध होऊन गेलें असतें, तर खेड्यापाड्यांनीं जाऊन सरकारच्या हेतूबद्दल भलभलत्या कंड्या पिकवून, लोकांचा गैरसमज करण्याची ह्या चळवळीच्या पुढाऱ्यांस गरज नसती. बंगालच्या सुशिक्षित लोकांनीं कलकत्ताशहर बंगाली **राष्ट्राची** राजधानी ठरवून टाकिली होती. ह्या सुशिक्षित लोकांच्या मनांत असंतोषाग्नि धुमसत असून, राज्यकर्त्यांविषयीं अप्रीति व त्यांची हरएक गोष्ट हाणून पाडण्याची प्रवृत्ति त्यांच्या ठिकाणीं वसत होती. त्यामुळें, बंगालप्रांताची अशी विभागणी होतांच, ह्या सुशिक्षित लोकांच्या मनानें असें पक्कें घेतलें कीं, आपल्या वर्चस्वावर प्रत्यक्ष गदा घालण्याच्याच हेतूनें सरकारानें ही फाळणी केली असावी. एका कर्तृत्ववान् धुरंधर व्हाइसरायानें (लार्ड कर्झन) १९०४ सालीं **युनिव्हरसिटी आक्ट** पास करून घेऊन, उच्चप्रतीच्या शिक्षणावरील बंगाली लोकांचा ताबा बहुतेक संपुष्टांत आणिला, तो आपलें वजन कमी करण्याचा ‘ओनामा’ च होता, असें त्या लोकांचें ह्मणणें होतें. बंगाली **राष्ट्राचा मेंदु** ह्मणजे **कलकत्ताशहर**; आणि,

ह्या राष्ट्राचे असे दोन भाग करून, एकाची राजधानी कलकत्त्याहून दुसरीकडे नेणें ह्मणजे, बंगाली लोकांच्या सर्व चळवळी थंड पाडण्याचा हा पुढचा यत्न आहे, असें त्यांस वाटूं लागलें. ह्या प्रश्नाच्या केवळ राजकीय स्वरूपाकडेच **नेमस्तां**ची नजर जाती, तर त्यांनीं कांहीं हालचाल केली नसती. पण, ह्या वरील ओरडीचा त्यांच्याहि मनावर बराच परिणाम झाला; व कलकत्त्याच्या लोकमतानें फारच उचल खाल्ली. खुद्द कलकत्त्यास व इतर बाहेरील मुख्य मुख्य शहरांत, ह्या चळवळीचें **राक्षसी प्रदर्शन** होत असतांनाच, खेड्यापाड्यांतून भयंकर कंड्या उठविण्याचा प्रयत्न मोठ्या नेटानें चालला होता. बंगालमधील कायमधाऱ्याची पद्धत बंद करण्याची **फाळणी** ही पूर्वतयारी होय; आणि, एकदां कां ही पद्धत मोडली, ह्मणजे सरकार जबरदस्तीनें फाळा खूब वाढविणार आहे, वगैरे गप्पांचा जिकडे तिकडे सुकाळ झाला होता. नवीन प्रांत उत्पन्न करण्याचा हेतु कोणीं विचारला, तर ह्या लोकांकडून असें उत्तर मिळें कीं, आसामप्रांतांतील दूरच्या जंगलांत इंग्रजलोकांचे चहाचे मळे आहेत, तेथें आपखुषीनें कामास जाण्यास लोक कबूल नसतात. ह्मणून, इकडल्या प्रांतांतील लोकांस तिकडे सक्तीनें कामावर नेण्यास सुलभ पडावें, ह्या हेतूनें हा नवीन प्रांत अस्तित्वांत आणला आहे. कायमधाऱ्याच्या पद्धतीमुळें गबर झालेल्या जमिनदारांस, तसेंच ज्यांच्या नोकरीची धनाढ्य जमिनदारांस अत्यंत आवश्यकता आहे अशा भोळसर रयतेसहि घाबरवून सोडण्यास, वरील प्रकारच्या खोट्यानाट्या कंड्या चांगल्याच उपयोगी पडतील, अशी ह्या चळवळीच्या पुरस्कर्त्यांची अटकळ होती. इकडे मोठ्या गांवांतून लोकांस असें सांगण्यांत येई कीं, बंगालीलोकांचें **आदि-**

**दैवत** जी " रुद्रस्वरूपी देवता " **काली**, तिचा ह्या फाळणीमुळें मोठा अपमान झाला आहे. तसेंच, गांवांतील तेली-तांबोळी, सुतार-लोहार, वाणी उदमी, इत्यादि लोकांनीं फाळणीचा निषेध करण्यास उद्युक्त व्हावें ह्मणून, **वंदेमातरम्** व **स्वदेशी** ह्यांची सांगड घालून देण्यांत आली होती.

यापूर्वीं कांहीं दिवस, पाश्चात्यांच्या राजकीय सत्तेविरुद्ध बंड करण्याची प्रवृत्ति, सांपत्तिक गोष्टींतहि दिसून येऊं लागली होती. देशांतील उद्योग-धंद्यांना शहाणपणानें उत्तेजन देणें, ह्या अर्थीं **स्वदेशी**ची चळवळ अगदीं रास्त आहे; व हाच अर्थ घेतला तर, राजकारणांत सरकाराविरुद्ध हें सांपत्तिक शस्त्र मुख्यतः चालविणाऱ्या लोकांच्या पुष्कळपूर्वीं, खुद्द हिंदुस्थान—सरकारच **स्वदेशीव्रत** पाळूं लागलें होतें. पण, ह्या चळवळीला आतां फारच उग्र स्वरूप यावयाचें होतें. विलायती मालाची मागणी बंद करून, त्याऐवजीं लोक देशी माल वापरूं लागले, ह्मणजे ब्रिटिशलोकांच्या पाषाणहृदयावर आघात झालाच पाहिजे, असा ह्या **स्वदेशी**चा हेतु होता. बंगालच्या फाळणीविरुद्ध लोकमत आहे, असें दाखविण्याकरितां, कलकत्त्याच्या टाऊनहालमध्यें जी पहिली मोठी सभा झाली, त्यासमयीं, **राष्ट्रीय** सुतकाची खूण ह्मणून, भिंतींस काळ्या कापडाचे पडदे लावावयाचा बेत होता. पण, ह्या कामास विलायती कापडाशिवाय दुसरें कापड मिळत नाहीं, ह्मणून आह्मीं तो बेत रहित केला आहे, असें मोठ्या डौलानें सांगण्यांत आलें. ह्या दुःखकारक प्रसंगीं कोणत्याहि स्वाभिमानी बंगाल्यानें परदेशी कपडा वापरणें निषिद्ध मानण्यांत आलें होतें इतकेंच नाहीं, तर स्वकर्तव्याविषयीं अशा तऱ्हेची उच्च कल्पना डळमळणाऱ्या लोकांच्या मनांत यावी,

ह्मणून कांहीं उपाय शोधून काढणें जरूर होतें; व याचकरितां, बहिष्काराचा डंका वाजविण्यांत आला. अस्वस्थता उत्पन्न करण्याच्या उद्योगांत असलेल्या, महाराष्ट्र आणि बंगाल ह्या दोन्ही ठिकाणच्या लोकांत परस्पर-संबंध असून, त्यांचें सहकारित्व कसें होतें, हें चांगल्या रीतीनें कळून येण्यास, मि० सुरेंद्रनाथ बानरजी व टिळक ह्या उभयतांनीं कलकत्त्यास व पुण्यास एकसमयावच्छेदेंकरून बहिष्काराची चळवळ सुरू केली, ही गोष्ट पुराव्यादाखल उपयोगी पडते. बहिष्काराच्या चळवळीच्या अंगभूत असणाऱ्या दंगाधोप्याची व पुंडाईची कल्पना, मि० बानर्जीपेक्षां टिळकांना कदाचित् चांगली असावी. कारण, बहिष्काराच्या लगेढोलाकडे मुंबईच्या लोकांनीं जरी लक्ष दिलें नाहीं, तरी बंगालमध्यें ह्या बीरमंत्राचा परिणाम झाल्याशिवाय राहिला नाहीं. ही चळवळ कालीमातेच्या कृपाछत्राखालीं सुरू करण्यांत येऊन, कलकत्त्यांतील ह्या कालीदेवीच्या भव्य देवळाच्या पटांगणांत, व बाहेर ठिकाणीं तिच्या देवळांत, हजारों लोकांना बहिष्कारव्रत पाळण्याबद्दलच्या शपथा देण्यांत आल्या. सारांश, सर्व बंगालभर अशी शपथ घेण्याची व देण्याची सांथच आली होती. बहिष्कारवाद्यांनीं आपल्या चळवळीस धार्मिक रूप देण्याचा जो हा प्रयत्न केला, त्यावरून, देशी उद्योगधंद्यांना सांपत्तिकदृष्ट्या उत्तेजन देण्यापेक्षां त्यांचा हेतु किती भिन्न होता—ह्मणजे, ही चळवळ निरुपद्रवी नव्हती—असें दिसून येतें. 'हिंदुस्थानांतील धर्म' हें पुस्तक एम्. बार्थ नामक मोठ्या विद्वान् पंडितानें लिहिलेलें असून, त्याचें इंग्रजी भाषांतर ट्रूब्नरकंपनीनें छापून प्रसिद्ध केलें आहे. शक्तिपूजेचे तंत्र कशा प्रकारचें असतें, ही माहिती कोणास पाहिजे असल्यास, ती ह्या वरील पुस्तकांत सांपडेल,

असें मी सांगून ठेवितों. शक्तिपूजेची परमावधि अमर्याद अनाचारांमध्यें होते; व अशा व्यभिचारी कल्पनांचीं मूलकारणें कितीहि उदात्त असलीं, तथापि ही पूजा ह्मणजे चित्तविभ्रम झालेल्या व **गुह्यज्ञानाचा** अभ्यास करणाऱ्या लोकांच्या निरर्गलपणाचें एक उत्कृष्ट उदाहरण आहे. असें असूनहि, आपण हिंदुविद्येनें अलंकृत झालों असून, पाश्चिमात्य शिक्षणानेंहि आमचीं मनें सुसंस्कृत झालीं आहेत, अशी इंग्रजलोकांजवळ वागतांना घमेंड मारणारे, मि० **सुरेंद्रनाथ** बानरजीसारखे लोकसुद्धां, विलायती मालावरील बहिष्काराच्या चळवळीस जोर आणण्याकरितां, लोकांस प्रिय असलेल्या शक्तिपूजेचा फायदा घेण्यास कचरत नाहींत. स्वीकृत व्रतापासून कोणीं ढळूं नये ह्मणून, ह्या चळवळ्यांनीं एक हत्यार पाजळून तयार ठेविलें होतें; व त्याचा प्रसंगीं उपयोग करण्यास त्यांनीं कधीं हयगय केली नाहीं. महाराष्ट्रांत टिळकानें जसे तालीमबाजीचे आखाडे काढले होते, त्याच धोरणावर बंगालमध्यें, तरुण लोकांना शारीरिक शिक्षण व कवाईत वगैरे लष्करी शिक्षण देण्याकरितां, व्यायामशाळा व मंडळ्या स्थापन करण्यांत आल्या होत्या. ह्याच व्यायामशाळांचें व मंडळ्यांचें रूपांतर करून, **समिती** अथवा **राष्ट्रीयस्वयंसेवकांचे संघ** बनविण्यांत आले. आणि, सार्वजनिक सभांत पडण्यास व फाळणीविरुद्धच्या चळवळींत रस्त्यानें मिरवित जाण्यास विद्यार्थ्यांना व शाळेंतील पोरांना प्रथमपासूनच तयार केलें होतें. अशा बालचमूला व विद्यार्थिसेनेला बाजारांत ठिकठिकाणीं पहारे ठेवण्यास सांगून, लोकांना सक्तीनें बहिष्कारव्रत पाळण्यास लावण्याची कामगिरी त्यांच्यावर सोंपविली होती. बुद्धिवादानेंच फक्त लोकांचीं मनें वळविण्याचा मार्ग त्यांनीं स्वीकारला होता, असें नाहीं; तर, ह्या

थकला, ह्मणजे दंडुक्याचाहि उपयोग करण्यास ते मागेंपुढें पाहत नसत. आपल्या कार्यास मुसलमानांची सहानुभूति मिळविण्याकरितां, हिंदु–पुढाऱ्यांनीं भगीरथप्रयत्न केले; व त्यांत त्यांना अगदींच यश आलें नाहीं, असें ह्मणतां येत नाहीं. परंतु, पुढें लवकरच, फाळणी ह्मणजे काय व तिच्याविरुद्ध चळवळ कशाकरितां, ह्या गोष्टींचा मुसलमानांस उमज पडूं लागला. शिवाय, महाराष्ट्रांतूनच उसनी आणलेली दुसरी एक चळवळ ह्याच बहिष्कारचळवळींत सामील केली होती. तिच्यामुळें मुसलमानांचे डोळे जसे लक्ष उघडले, तसे दुसरे कशानें उघडले नसते. रामायणांत जसा **राम** तसा महाराष्ट्राच्या इतिहासांत **शिवाजी** असल्यामुळें, तेथील लोकांना त्याच्याबद्दल अत्यंत प्रेम वाटून, त्यांनीं त्याच्या नांवाचा जयजयकार करावा, व त्याचा राज्याभिषेकदिवस अथवा जन्मदिवस मोठ्या आनंदानें सणासारखा पाळावा, ह्यांत कांहीं नवल नाहीं. पण, इकडे बंगालकडे पाहावें तर, रडव्या मुलांना गप्प करण्याकरितां बागुलबोवासारखा शिवाजीच्या नांवाचा आज पिढ्यानुपिढ्या उपयोग आया करित आल्या आहेत; व लुटारू मराठ्या स्वारांच्या भाल्याच्या पाण्याची आठवण होतांच, बंगालीलोकांचें धाबें दणाणत असे, ह्या गोष्टीची साक्ष, कलकत्त्याचा **मराठा-खंदक** अद्यापिहि देत आहे. वस्तुस्थिती अशी असतां, बंगाल्यांनीं शिवाजीला आपला **राष्ट्रीयपुरुष** मानूं लागावें, हें एक अजब **गौडबंगालच** ह्मणावयाचें. बंगाली लोकांमध्यें शिवाजीविषयीं असें ऐतिहासिक प्रेम उत्पन्न करण्याकरितां, मि० सुरेंद्रबानर्जीला आपलें सर्व वजन खर्च करावें लागलें. मुसलमानांच्या राज्यलोभाला आळा घालून, त्यांचा गर्वपरिहार करणाऱ्या महाराष्ट्रांतील योद्ध्याचा गौरव करण्याकरितां

उत्पन्न केलेल्या चळवळीची बंगाल्यांतील राष्ट्रीय चळवळीशीं गांठ बांधून, त्यांचा एकजीव करून, नंतर मुसलमान लोकांना आपल्या बाजूला वळवून आणणें, ही गोष्ट असंभवनीय होती, ह्यांत शंका नाहीं. विशेषतः पूर्वबंगालमध्यें, हिंदुलोकांशीं ज्यांचे हितसंबंध बरेच निगडित झाले आहेत, असे कांहीं जमीनदार व वकीललोक वगळले, ह्मणजे बंगालच्या फाळणीमुळें एकंदर मुसलमानसमाजाचा सर्वतोपरि फायदाच झाला. कोणतेंहि नुकसान झालें नाहीं. मुसलमानांपैकीं जे व्यापारी होते, त्यांचें तर बहिष्कारापासून मोठें नुकसान होतें; आणि ह्मणून, हिंदुलोक अशा व्यापाऱ्यांवर बहिष्कार पाळण्याविषयीं सक्ती करूं लागले, ह्मणजे हातघाईचा प्रसंग येऊन, हिंदूंची कणीक चांगलीच तिंबली जात असे. याप्रमाणें दुसऱ्याला चावावयास जाणाराचाच उलट लचका निघाला, ह्मणजे सरकार जातीजातींत भांडणें लावून देतें, असा आक्रोश बंगाली पत्रें करूं लागत. देशांत शांतता राखणें, हें सरकारच्या अगदीं मुख्य कर्तव्यांपैकीं एक आहे. परंतु, अशा शांततेचा भंग होऊं नये, ह्मणून सरकारास योग्य ते उपाय योजावे लागले ह्मणजे, 'सरकार निर्दयपणानें दडपशाई करित आहे; सरकारचें वर्तन जुलमी खुनशीपणाचें आहे', वगैरे आरोप बंगाली पत्रांतून येऊं लागत. आणि, एखाद्या खालच्या दर्जाच्या कामदारानें, अतिबिकट प्रसंगीं, काम करण्याच्या पद्धतींत इतकीशी चूक केली, तर त्या गोष्टीचा विपर्यास करून, 'भयंकर अन्याय झाला,' असाहि गवगवा ह्याच पत्रांतून होत असे. राजकीय चळवळी करणाऱ्यांनीं शाळेंतील पोरांस दांडगाईचें वर्तन करण्यास शिकवून, भांडणाच्या अगदीं तोंडाशीं नेऊन ठेविलें होतें. अशा भरकटलेल्या पोरांस योग्य

त्या शिक्षा केल्या ह्मणजे, त्या गोष्टीचा फारच मोठा बाऊ करून दाखविण्यांत येई. राजकारणांत पडून पुढाकार घेणारे लोक मोठी दूरदृष्टि करून, बहुधा नेहमीं कलकत्त्यास राहात; व तेथून भपकेदार जंगीं व्याख्यानें झोडणें व लोकांस चिडविण्यासारखे कडक लेख लिहिणें, हीं कामें करीत. अथवा, राजरोसपणानें चालविलेल्या चळवळींमुळें कायद्याचें अतिक्रमण होणार नाहीं अशी खबरदारी घेऊन, वाजवीरीतीनें शिक्षा केलेल्या ह्या 'स्वदेशासाठीं हालअपेष्टा सोसणाऱ्या' तरुणमंडळीवर, आनंदप्रदर्शक तारा व पत्रें ह्यांचा सारखा वर्षाव करीत.

ह्या चळवळीच्या पुढाऱ्याजवळ **जोडगोळी** असून, तिचाहि ते चांगल्या प्रकारें उपयोग करीत. हिंदी राजकारणी पुरुष व इंग्लंडांतील राजकारणी लोकांचे कांहीं पक्ष, ह्यांमध्यें हल्लींप्रमाणें पूर्वीं कधींहि निकट संबंध नव्हता. लॉर्ड कर्झनसाहेबांचा मानभंग झाला; व त्यावेळचे स्टेटसेक्रेटरी मि० ब्राड्रिक यांनीं अत्यंत अविचारिपणानें बंगालच्या फाळणीबद्दल उल्लेख असलेला पत्रव्यवहार कर्झनसाहेबांच्या राजीनाम्यानंतर प्रसिद्ध केला. ह्यामुळें, प्रथमपासूनच फाळणीविरुद्धच्या चळवळीस मोठें उत्तेजन मिळालें. ह्या पत्रव्यवहारांतील ब्राड्रिकसाहेबाच्या कांहीं टीकेमुळें, बंगालच्या फाळणींत कर्झनसाहेबांनीं स्वतः किती भाग घेतला होता, ह्याबद्दल बंगालीलोकांच्या भलत्याच कल्पना होऊन बसल्या. आणि, कर्झनसाहेबांस खूष ठेवण्यासाठींच जर स्टेटसेक्रेटरीनें फाळणीस मंजुरी दिली होती, तर आतां वाटेंतून त्यांचा कांटा निघून गेल्यावर, सदरहु फाळणी रद्द करण्याकरितां स्टेटसेक्रेटरीचें मन सहजीं वळवितां येईल, असें बंगालीलोकांस वाटूं लागलें. 'ही तुमची आशा व्यर्थ आहे', असें ब्राड्रिकसाहेबानें लवकरच

त्यांच्या निदर्शनास आणून दिलें, हें खरें; पण, **कान्झरवेटिव** पक्ष अधिकारच्युत होऊन, **कामन्सच्या** सभेंत **लिबरल**पक्षाचें फारच मोठें **बहुमत** होऊन, त्याच्या हातीं कारभाराचीं सूत्रें आलीं. शिवाय, **लिबरल**पक्षाच्या बहुमतांत **राडिकल** सभासदांचा बराच भरणा असून, स्टेटसेक्रेटरीच्या जाग्यावर मि० जान **मोरले** ( आतां लॉर्ड )—सारखे उदारमताचे मुत्सद्दी आले. त्यामुळें, बंगाली लोकांच्या आशेला फिरून जोरांचे अंकुर फुटूं लागले. गेले बरेच दिवस, इंग्लंडांतील कित्येक वजनदार **राडिकल** पत्रांनीं, बंगाली पत्रांच्या पक्षास सामील होऊन, लॉर्ड कर्झन व त्यांनीं केलेलीं सर्व कामें, यांस अगदीं वाईट ठरविण्याचा एकसारखा प्रयत्न चालविला होता. त्यांतल्यात्यांत फाळणीवर तर ह्या सर्वांचा विशेषच कटाक्ष होता. शिवाय, विलायतेंतील राडिकलपक्षापैकीं पुष्कळ लोकांची बंगाली राजकारणी लोकांशीं सहानुभूति होती इतकेंच नाहीं, तर खुद्द पार्लमेंटांतील कांहीं थोड्या पण उत्साही सभासदांनीं आपणांस **हिंदुस्थानाचा पक्ष** अशी संज्ञा घेऊन, बंगाली चळवळ्यांस कायमचा पाठिंबा दिला आहे. आणि, हिंदुस्थानच्या **असंतुष्ट** लोकांतर्फे गाऱ्हाणीं मांडण्यास त्यांची नेहमीं तयारी असते. आपल्या देशबांधवांच्या ठिकाणीं—विशेषतः परमुलखांत स्वदेशाच्या सेवेस देह अर्पण केलेल्या आपल्या लोकांच्या ठिकाणीं—न्यायप्रीति वसत नाहीं, असें विधान करण्यांत ज्यांना मोठें भूषण वाटतें, अशा प्रकारच्या कळकळीचे, व आपणांस्वतःकडे मोठा साधुपणा घेणारे कांहीं गृहस्थ वरील **हिंदुस्थान**पक्षांत आहेत. **स्वातंत्र्य** ह्मणजे निव्वळ **बेबंदशाई**, असा प्रकार जेथें होता, तेथील लोकांच्या स्वातंत्र्यवाचक जुन्या शब्दांनीं व वचनांनीं ज्यांना भुरळ

पडे, असेहि कित्येक गृहस्थ **हिंदुस्थानपक्षांत** होते. तसेंच, त्यांत कांहीं पेनशन घेतलेले इंग्रजगृहस्थहि असत. परंतु, त्यांच्या भाषेंतील विलक्षण तीव्रपणामुळें, त्यांच्या मनांत निराशाजन्य संतापाचें ठाणें आहे, व ती निराशा स्वतःसंबंधाची आहे, हें तात्काळ बाहेर पडे. नाहींतर, ह्या पेनशनर अनुभवी लोकांच्या शब्दास मोठी किंमत आली असती. बंगाली पत्रांतून प्रसिद्ध झालेल्या निव्वळ गप्पा, अथवा फारच तिखटमीठ लावून वर्णन केलेल्या गोष्टी, यांच्या आधारावर स्टेटसेक्रेटरीला प्रश्नांवर प्रश्न विचारण्यांत येऊं लागले. आरंभीं, स्टेटसेक्रेटरीला वस्तुस्थितीचें आतांसारखें ज्ञान नसल्याकारणानें, असले सर्व प्रश्न चौकशीसाठीं हिंदुस्थानसरकाराकडे पाठविले पाहिजेत, असें त्यांना वाटे. ह्या प्रश्नांपैकीं बहुतेकांचा रोंख सर ब्यांफिल्ड फुलरसाहेबावर असे. हे साहेब नवीन अस्तित्वांत आणलेल्या पूर्वबंगालप्रांताचे पहिले लेफटनंट–गव्हरनर असल्यामुळें, त्यांच्या-वरच खोटे–नाटे आरोप करण्याचा व त्यांची मनसोक्त निंदा करण्याचा धूमधडाका लाविला होता. दंगेखोर मुलें व विद्यार्थी यांची वाईट खोड मोडण्याच्या हेतूनें ज्या शिक्षा फुलरसाहेबानीं केल्या, त्यासंबंधानें त्यांच्यावर शिव्याशापांची जशी लाखोली पडत होती, तशी दुसऱ्या कशाबद्दलहि नव्हती. हिंदी विद्यार्थी बरेच प्रौढ असतात; व बहुधा त्यांचीं लग्नेंहि झालेलीं असतात. परंतु, ही गोष्ट ब्रिटिशजनतेला मुळींच माहीत नाहीं. त्यामुळें, अल्पवयाच्या मुलांनीं अविचारानें कांहीं हूडपणा केला, तर तिकडे दुर्लक्ष न करितां, अधिकारी लोक निष्ठुरपणानें अल्लड-वृत्तीच्या कोंवळ्या मुलांस पोलिसकोर्टांत खेंचून आणितात, हा केवढा अन्याय आहे? अशा प्रकारचीं गाऱ्हाणीं गावून,

ब्रिटिश लोकांच्या उदार अंतःकरणांत पाझर फोडून, त्यांना गरीब मुलांचा कड घेण्यास लावणें फारच सोपें आहे. अशा प्रकारच्या पार्लमेंटांत विचारिलेल्या प्रत्येक प्रश्नाची प्रसिद्धि बंगाली पत्रांतून चांगल्या तऱ्हेनें होत असे. ह्याचा एकंदरींत असा परिणाम झाला कीं, गरीब, गांजलेल्या बंगालीलोकांच्या दुःस्थितीबद्दल ब्रिटिश पार्लमेंटला अत्यंत वाईट वाटत असून, बंगाल्यात घडणाऱ्या प्रत्येक गोष्टीबद्दल शहानिशा करून घेण्याची त्या सभेला अत्यंत उत्कंठा आहे, असा लोकांचा समज होऊन बसला.

तथापि, ह्या चळवळीचा पहिला जोर जाऊन, ती थंडावण्याची वेळ येऊन ठेपली होती. दिवस जात चालले होते; आणि, हिंदुस्थानांत नवे व्हाइसराय व विलायतेंत नवे स्टेट-सेक्रेटरी आले, तरी फाळणी वज्रलेप होऊन बसल्यासारखी दिसूं लागली. इंग्लंडचे **युवराज** व **युवराज्ञी** यांच्या आगमनामुळें कलकत्त्याच्या राजकीय पुढाऱ्यांच्या उच्छृंखलपणास कांहींसा—तात्पुरता कां होईना—आळा बसला. सिंहासनाधीश्वर राजाच्या घराण्याविषयीं हिंदुस्थानांतील लोकांत, पूर्वापार चालत आलेल्या समजुतीप्रमाणें, अद्यापिहि विलक्षण आदरबुद्धि वसत आहे. त्यामुळें, राजघराण्यांतील मोठीं माणसें त्यांच्यामध्यें येतांच, राजद्रोहात्मक चळवळी करून दंगाधोपा करण्यासहि प्रवृत्त होणाऱ्या लोकांचीं कारस्थानें जागच्या जागीं स्तब्ध झालीं. पश्चिमबंगालपेक्षां पूर्वबंगालमध्यें ह्या चळवळीस फारच उग्र स्वरूप आलें होतें. पण, तेथें भयंकर दुष्काळाचीं चिन्हें दिसूं लागतांच, लोकांचा बचाव करण्याकरितां ले० गव्हरनरसाहेबांनीं जो उत्साह दाखविला, व ह्या कामीं त्यांची जी निष्ठा दिसून

आली, त्यामुळें त्यांच्या शत्रूंपैकींहि पुष्कळांच्या मनांत त्यांच्याविषयीं आदर उत्पन्न झाला. आणि, तेथील लोकांच्या मनाची स्थिति बदलून, त्यांचा संताप कांहींसा शमूं लागत होता, इतक्यांत सर ब्यांफिल्ड फुलरसाहेबानें राजीनामा दिल्याची बातमी एकाएकीं प्रसिद्ध झाली; व ह्याचा परिणाम तात्काळ झाला. फुलरसाहेब व हिंदुस्थानसरकार यांच्यामध्यें ज्या गोष्टींसंबंधानें मतभेद होता, त्यांविषयीं पूर्णपणें पुष्कळ वेळां चर्चा झालेली आहे. ह्मणून, त्यानीं राजीनामा देण्याचें कारण काय, व तो व्हाइसरायसाहेबानीं ताबडतोब कां मंजूर केला, वगैरे प्रश्नांचा खल करण्याचें आज प्रयोजन नाहीं. फक्त, ह्या गोष्टीचा काय परिणाम झाला, एवढेंच मला सांगावयाचें आहे. मी ह्मणतों कीं, हा परिणाम ताबडतोब दृष्टीस येऊन, त्यापासून भयंकर नुकसान झालें. कारण, बंगाली पुढाऱ्यांचे हातपाय गळले होते; पण आतां, ही स्थिति जाऊन, त्यांना मोठें धैर्य आलें. फुलरसाहेब पदभ्रष्ट झाला, हा आपला व आपल्या वेस्टमिनिस्टर येथील साथीदारांचा पराक्रम आहे, असें ते ह्मणूं लागले. उलटपक्षीं, फुलरसाहेबाच्या काम करण्याच्या पद्धतीमुळें ही चळवळ जोरावली असून, त्यांना कामावरून दूर केल्यास त्या प्रांतांत शांतता स्थापन होईल--निदान सर अँड्रु फ्रेझरसाहेबाच्या सौम्य शासनपद्धतीमुळें पश्चिमबंगालमध्यें जशी अर्धवट शांतता आहे, तशीतरी पूर्वबंगालमध्यें होईल—अशी ज्यांची कल्पना होती, त्यांचा तो भ्रम मात्र ताबडतोब नाहींसा झाला. फुलरसाहेबानंतरच्या ले० गव्हरनराच्या वाटेस कांहीं काळपर्यंत कोणी गेला नाहीं. परंतु, फुलरसाहेबाच्या कधीं ध्यानींमनींहि आले नाहींत, असे कडक उपाय पूर्वबंगालच्या सरकारास

लवकरच योजावे लागले. तसेंच, पश्चिमबंगाल्यामध्यें आजपर्यंत ह्या चळवळीचें जें रूप होतें, तें बदलून जाऊन, लोकांच्या हातून दांडगाईचें वर्तन होऊं लागलें; व तिचा प्रसार सर्वत्र होऊन, तिचीं पाळेंमुळेंहि खोलवर गेलीं. स्वतः **नेमस्त** आहों, असा डौल जे जुने वहिवाटलेले पुढारी अद्यापि मारित होते, त्यांचें आतां कोणी ऐकेना; किंवा, आपण उठविलेल्या भुतांनींच मांत्रिकास गट्ट करून टाकावें, असा प्रसंग ह्या पुढाऱ्यांवर आला. त्यामुळें, मागें रेंगाळत न राहतां, त्यांना आपलें पाऊल झपाट्यानें उचलावें लागलें. पारिसमधील एका कम्युनिस्ट पक्षाच्या पुढाऱ्याला आपल्या लोकांच्या मागून, "मी त्यांचा पुढारी आहें, म्हणून मला त्यांच्या—मागून गेलेंच पाहिजे," असें ओरडत, पळत जावें लागलें होतें. फाळणीचा प्रश्न तर आतां मागेंच टाकण्यांत आला; व आजपर्यंत पांघरूण घालून कोणास संशय येणार नाहीं, अशा रीतीनें लपवून ठेवलेला वाघाचा बच्चा उघडपणें बाहेर काढण्यांत आला. म्हणजे, बंगालची विभागणी व्हावी किंवा न व्हावी, ही मुख्य तंट्याची बाब नव्हती; तर, बंगालप्रांतांत—किंबहुना हिंदुस्थानांतहि इतर कोठें—ब्रिटिश राजसत्ता असावी किंवा नसावी, ह्या आजपर्यंत गुप्त ठेवलेल्या प्रश्नावरच वादविवाद सुरू झाला.

आरंभीं बंगालमधील अस्वस्थतेची चळवळ—निदान बाहेरून दिसण्यांत तरी—मुख्यतः राजकीय स्वरूपाची होती; आणि, एकंदरींत तिच्यामध्यें ब्रिटिशराज्याविषयीं उघड द्वेष दृष्टोत्पत्तीस येत नव्हता. बंगालची फाळणी झाल्याबरोबर, ह्या निव्वळ राजकीय चळवळींत आणखी औद्योगिक चळवळींची भर पडली; आणि, जरी ह्यांनाच विशेष प्राधान्य देण्यांत आलें

नाहीं, तथापि ह्या भेसळीमुळें मूळच्या चळवळीच्या स्वरूपांत महदंतर पडलें. बंगालीलोकांची दंगाधोपा करण्याकडे व बेकायदेशीरपणाचें वर्तन करण्याकडे स्वभावतः प्रवृत्ति नाहीं, असा आजपर्यंत समज होता; पण, स्वदेशी—बहिष्काराच्या धामधुमीमुळें, हा समज साफ नाहींसा झाला. हें चळवळीचें स्वरूप फाळणीनंतर एक वर्षापेक्षां अधिक टिकलें नाहीं. कारण मोठ्या उतरणीला लागलेली गाडी घोड्यांस आवरेनाशी झाली, ह्मणजे जशी स्थिति होते, तशीच ही वरील चळवळ एकदां गैरकायदा वर्तनाच्या घसरतीला लागल्यावर, तिला फारच शीघ्रगतीनें बंडाव्याचें स्वरूप आलें; व ह्या अशा बंडखोरपणाचें क्षेत्रहि फार मोठें होऊन, त्यांत तो बद्धमूल होऊन बसला. ह्या नवीन चळवळीच्या रंगभूमीवर स्वदेशीचें पात्र नाचत होतें. परंतु त्याच्याकडे केवळ हलक्या प्रतीचें काम दिलें होतें. खुद्द महाराष्ट्रांत व महाराष्ट्राबाहेरील हिंदुस्थानच्या भागांत—जेथें जेथें टिळकाची पुरी छाप बसली होती, व त्याच्या सल्लामसलतीप्रमाणें लोक वागत असत तेथें तेथें—आपल्या कार्यक्रमांतील राजकीय चळवळीप्रमाणेंच, सामाजिक व धार्मिक चळवळींना **क्रांतिकारक** रूप देण्यासाठीं, टिळकानें कित्येक वर्षें आटोकाट मेहनत केली होती, असें मागें सांगण्यांत आलेंच आहे. व असेंच क्रांतिकारक स्वरूप आतां बंगालच्या चळवळीस मोठ्या झपाट्यानें येऊं लागलें. खोऱ्यानें जमीन तयार करण्याप्रमाणें, टिळकाच्या मुख्य बंगाली शिष्यवृन्दापैकीं दोघांनीं वृत्तपत्रांच्या द्वारें लोकांचीं मनें वरील प्रकारच्या चळवळीसाठीं अगदीं तयार करून ठेविलीं होतीं. ह्या जोडीमध्यें बिपिनचंद्रपाल असून, ह्यांच्या **स्वराज्याच्या** दांडग्या कल्पनेविषयीं, व तें साध्य करून घेण्याच्या मार्गांविषयीं

मागें सांगण्यांत आलेंच आहे. दुसरे पट्टशिष्य ह्मणजे बाबू अरविंद घोष होत. हिंदुस्थानांतील अस्वस्थतेमुळें ज्या कांहीं अत्यंत अलौकिक व्यक्ती पुढें आल्या, त्यांपैकीं ही एक आहे. यांचें शिक्षण इंग्लंडांत झालें होतें, तें असें कीं, हिंदुस्थानांत आल्यावर त्यांना बंगालीभाषेंत आपले विचार व्यक्त करितां येईनात. हे उच्चवर्णाचे हिंदु आहेत एवढेंच नव्हें, तर योगसाधनाच्या योगानें मनुष्याच्या अंगीं दैवी सामर्थ्य येतें, असें मानणाऱ्या **गुह्यवादी** हिंदूलोकांपैकीं ते आहेत. आणि, ज्या एका धार्मिक पुनरुज्जीवनाच्या चळवळीचें अध्वर्युत्व बाबू अरविंदाकडे आहे, त्याचा, त्वरित विकारवश होऊन जाणाऱ्या बंगाली तरुण मंडळीच्या मनावर विलक्षण पगडा बसला आहे. त्यांच्या नैतिक उपदेशांत भव्यपणाचा अभाव आहे, असें नाहीं. भगवद्गीतेंत श्रीकृष्णानें अर्जुनाला जो उपदेश केला आहे, त्याच्या पायावर मुख्यतः अरविंदांनीं आपलें नीतिशास्त्र रचिलें आहे. मिसेस बिझांटनें गीतेचें इंग्रजी भाषांतर करून, त्याला जी प्रस्तावना जोडली आहे, त्यांतून एक उतारा देतों, ह्मणजे ह्या नीत्युपदेशाचा हेतु जसा कळून येईल, तसा दुसऱ्या कशानेंहि येणार नाहीं. हा उतारा असाः—

"इंद्रियगोचर वस्तूंचा फक्त त्याग करून राहावयाचें, ही जी मुमुक्षूची कनिष्ठ प्रतीची अवस्था तींतून त्याला वर उचलून, ज्यांत मुळीं वासनाच नष्ट होऊन, योगी शांतपणानें निरंतर ध्यानस्थ असतो व त्याचें शरीर आणि मन मात्र संसारांतील कर्तव्यें बजावित असतें, अशा श्रेष्ठप्रतीच्या अवस्थेला त्याला नेण्याचा ह्याचा ( गीतेचा ) उद्देश आहे."

गीतेचा असा अर्थ केल्यामुळें, हिंदुलोकांच्या **सर्वसंगपरित्यागा**—विषयींच्या कल्पनेंत आतां विलक्षण फरक पडला

आहे. जुनी कल्पना ह्मटली ह्मणजे, सर्व ऐहिक गोष्टींपासून पूर्णपणें अलिप्त राहून, केवळ आपल्या आत्म्यास मुक्ति मिळविण्याचा उद्योग करावयाचा. परंतु, आतांच्या नवीन कल्पनेप्रमाणें ह्या **सर्वसंगपरित्यागांतून** समाजसेवा गळून जात नाहीं, तर उलट तिचा समावेश केला जातो. अशा प्रकारच्या क्रियाकारक स्वार्थत्यागाचा उपदेश केल्याबद्दल कोणी दोष देईल, असें वाटत नाहीं. पण, दुर्दैवाची गोष्ट ही आहे कीं, अशा स्वार्थत्यागांत अरविंद बाबू क्रांतिकारक चळवळी करण्याच्या प्रवृत्तीचा जो अंतर्भाव करितात, त्यामुळेंच त्यांच्या उपदेशावर बंगालच्या नव्या पिढींतील तरुण लोक अगदीं लुब्ध होऊन गेले आहेत. ब्रिटिशराज्य आणि पाश्चात्यांचे विद्याचार, यांमुळें हिंदुत्वाचा नाश होत आहे; आणि ह्मणूनच, ब्रिटिश राज्य व हे विद्याचार येथून साफ नाहींसे झाले पाहिजेत; आणि, हें साध्य करण्याकरितां प्रत्येक हिंदूनें कंबर बांधून कामास लागलें पाहिजे. व हा हेतु सिद्धीस नेण्याकरितां, दंगेधोपे, खून, वैगेरेसारखे अत्याचाराचे मार्ग स्वीकारणें न्याय्य आहे, असें मि० अरविंदाचें मत असल्याबद्दल त्यांच्यावर वाजवीरीतीनें दोषारोप करितां येणार नाहीं. कारण, जरी पुष्कळदां—एकदांतर माणिकतोळ्याच्या बांबगोळ्यासंबंधाच्या राजकीयगुन्ह्यांत सामिल असल्याबद्दल— त्यांची न्यायासनासमोर चौकशी झाली आहे, व सध्यां (पुस्तक लिहिलें तेव्हां) जरी ते वारंट चुकविण्याकरितां फरारी झाले आहेत, तरी अद्यापपर्यंत त्यांना कायद्यानें निर्दोषीच ठरविलें आहे. तथापि, अरविंदबाबूच्या उपदेशाच्या आधारावर, अत्यंत उलट्या काळजाचीं कृत्यें करून, आपला कार्यक्रम सिद्धीस नेण्याचा निश्चय त्यांच्या अनुयायिवर्गानें केला आहे,

ह्यांत तिळभर शंका नाहीं. अरविंदाचा भाऊ बरेंद्र घोष यानें चालविलेल्या एका वर्तमानपत्रांत ह्या वरील साहसी कार्यक्रमाचें उघडपणें प्रतिपादन करण्यांत, धर्मपिशा लोकांची उत्सुकता व कठोर तर्कशास्त्र दिसून येतें. ह्या पत्राची फाइल ह्मणजे, मनुष्यप्राण्यानें तयार केलेल्या अत्यंत मोलवान् व विलक्षण कागदपत्रांचा एक मासलाच आहे.

फाळणीनंतर लवकरच, राज्यक्रांतीचें उघडपणें मंडन करणारीं जीं **संध्या, नवशक्ति** व **युगांतर** अशीं तीन **बंगाली पत्रें** निघालीं, त्यांत शेवटच्यानें सर्वांहून अधिक व आश्चर्य वाटण्यासारखी लोकप्रियता संपादन केली. **नवशक्ति** पत्रामध्यें खुद्द अरविंदबाबू नेहमीं लिहित असत. अरविंदांचे बंधु **बरेंद्र**घोष व जगत्प्रसिद्ध स्वामी विवेकानंदांचे एकुलते एक बंधु **भूपेंद्रनाथ** दत्त ह्या उभयतांनीं मिळून, **युगांतर** पत्र १९०६ सालीं काढलें होतें. स्वामी विवेकानंदानीं यूरोप व अमेरिकेमध्यें प्रवास करून, तेथील लोकांस हिंदुधर्मातील तत्त्वज्ञानाचा उपदेश केला होता. सन १९०५ सालीं हे स्वामी अकालीं मरण पावले. तेव्हांपासून प्राचीन वैदिककाळच्या ऋषींहून ज्यांची योग्यता यत्किंचित् देखील कमी नाहीं असे अर्वाचीन काळचे ते ऋषी होते, असें समजून हिंदुलोक त्यांना पूज्य मानूं लागले आहेत. गायकवाडीमधील बडोदा कालेजांत अरविंद बाबू प्रोफेसर असतांना, त्यांच्याजवळ बरेंद्रानें इतिहास व राजनीति ह्या विषयांचा अभ्यास केला होता. प्रथमतः ह्यांचा हेतु एक धार्मिक संस्था काढण्याचा होता. पुढें ते **युगांतर**-पत्राचे संपादक असतांना, **राष्ट्रीय** शाळांतील मुलांसाठीं त्यांनीं एक **विद्यार्थिगृह** स्थापन केलें होतें. राजकीय कारणापेक्षां धार्मिक कारणासाठींच राज्य-

क्रांतीची आवश्यकता आहे, असें प्रतिपादन करण्यास **युगांतरानें** प्रारंभ केला. "हिंदुस्थानांत पुनरपि गीताकाल" या मथळ्या-खालीं लिहिलेल्या एका लेखांत **युगांतरानें** आपल्या मुख्य तत्वाचें येणेंप्रमाणें प्रतिपादन केलें आहे:—

भगवान् (गीतेंतील श्रीकृष्ण) ह्मणतात कीं, "हे भरतकुलभूषणा" जेव्हां जेव्हां धर्मग्लानि होऊन, अधर्माचा उत्कर्ष होतो, तेव्हां तेव्हां मी अवतार घेईन. शिष्टांचें संरक्षण, दुष्टांचा नाश व धर्माची संस्थापना करण्याकरितां मी युगायुगांतरीं जन्म घेईन.

कलियुगापूर्वीच्या द्वापारयुगांत दुर्योधनादि दुष्टबुद्धी व महापातकी लोकां-च्या हस्तें भरतखंडाच्या पुण्यभूमींत धर्मग्लानि होऊन, अधर्माचा उत्कर्ष होऊं लागला, तेव्हां परमेश्वरानें पुनः अवतार घेऊन, आपला परमप्रिय शिष्य जो अर्जुन त्यास स्वकर्तव्याविषयीं बोधामृत पाजून, त्याच्या हस्तें ह्या भरतखंडांत सद्धर्माचें साम्राज्य पुनः स्थापन केलें. सांप्रत, भरतखंडांत असद्धर्माचा उदय होत असून, सद्धर्म लयास जात आहे. मूठभर परदेशी चोर, हिंदुस्थानची संपत्ति लुटून, कोट्यवधि हिंदीलोकांना रसातळास नेऊन मिळवीत आहेत. त्यांच्या गुलामगिरीरूपी जात्यांत सांपडल्यामुळें, असंख्य लोकांच्या हाडांचा चूर होऊन जात आहे. 'परवशतेची तिखट सुरी' हिंदुस्थानच्या 'उरास' लागली असल्याकारणानें, ह्या मोठ्या हिंदी राष्ट्राची नैतिक, बौद्धिक व शारीरिक हानि करून, तसेंच त्याची संपत्ति, स्वावलंबन, इत्यादि अनेक गुणांचाहि नाश करून, त्याला भारवाहक पशूंच्या स्थितीला आणून पोहोंचविण्याकरितां, अथवा त्याचा सर्वस्वी नाश करण्याकरितां, अनंत प्रयत्न चालले आहेत. माझ्या देशबांधवांनो, तुमच्या मार्गांत अनेक अडचणी आहेत ह्मणून अधर्माशीं दोन हात करण्यास कां कचरता! हिंदीलोकांनो, तुह्मी भिऊं नका. आपल्या राज्यांत अधर्म होत आहे, हें पाहून परमेश्वर स्वस्थ बसणार नाहीं; तर तो आपलें वचन पाळील. त्याच्या शब्दावर दृढविश्वास ठेवून, त्याचें साह्य मागा; ह्मणजे तो अधर्माचा उच्छेद करण्याकरितां तुमच्यामध्यें अवतार घेईल. भीति सोडून द्या. "मनुष्याच्या अंतःकरणांत स्वर्गाची विद्युल्लता चमकूं लागली, ह्मणजे त्याच्या हातून अशक्य गोष्टीदेखील घडून येऊं लागतात."

कल्पनासृष्टींत संचार करून, ह्या लेखाचा उपसंहार

केला आहे तो असा:-- "सद्धर्माचें स्वतंत्र निशाण" फडफडत आहे; हिंदुस्थानच्या सद्‌गुणांचा उद्धार झाला आहे; प्लेग, दुष्काळ, इत्यादि संकटें देशबहिष्कृत झालीं आहेत; शास्त्रीय ज्ञानाच्या साह्यानें हिंदी उद्योगधंद्यांची पराकाष्ठेची वृद्धि झाली आहे; त्याचें सैन्य व आरमार सर्व जगभर फिरून, "अखिल मनुष्यजातीच्या कल्याणासाठीं हिंदी राष्ट्राच्या अपार शक्तीचा, ज्ञानाचा आणि नीतिमत्तेचा उपयोग करीत आहे," अशी सुस्थिति हिंदुस्थानास येणार आहे.

हिंदुस्थानास स्वातंत्र्य कोणत्या मार्गांनीं मिळवावयाचें, ह्याचें दिग्दर्शन **युगांतरानें** एका लेखमालेच्या द्वारें केलें आहे. गेल्या दहा वर्षांत टिळकानें महाराष्ट्रांत जे मार्ग स्वीकारले होते, त्यांचाच हा युक्तिवादात्मक अनुवाद होता; अधिक काहीं नाहीं. "शिष्टांचें रक्षण व दुष्टांचा नाश करण्याकरितां परमेश्वरानें घेतलेले **नृसिंह, वराह** आणि **कल्कि** हे अवतार ह्मणजेच (बंगालच्या) तरुण लोकांचें सैन्य होय." ह्या सैनिकांच्या हृदयांत प्रकाश पाडण्याच्याच हेतूनें वरील लेख लिहिण्यांत आले होते. हिंदु लोकांची अशी समजूत आहे कीं, "विष्णु कल्कि-अवतार घेऊन, हिंदुस्थानची परकी लोकांपासून मुक्तता करणार." गुलामगिरीचें जूं फेंकून द्यावयाचें असेल, तर प्रथमतः सुशिक्षित लोकांनीं गुलामगिरीचा द्वेष करण्यास शिकलें पाहिजे; ह्मणजे मग, खालचे लोक त्यांचा कित्ता लवकरच गिरवूं लागतील. "खालच्या वर्गांना कोणतेंहि कृत्य करण्यास प्रवृत्त करणें सोपें आहे. पण, सुशिक्षितांची अशी प्रवृत्ति दृढविश्वासावर अवलंबून असते." ह्मणून, गुलामगिरीच्या **विषारी** परिणामाबद्दल त्यांची वारंवार खात्री करून दिली पाहिजे; आणि, दास-

त्याविषयीं जें सृष्टिकर्माविरुद्ध प्रेम हल्लीं आमच्या लोकांत दिसून येतें, तें नाहींसें करण्याचा आपण नेहमीं प्रयत्न करीत राहिलें पाहिजे. स्वातंत्र्यप्राप्तीच्या आकांक्षेस दृढनिश्चयाचें रूप दिलें पाहिजे; आणि, बंगाली लोकांना जो उपजीविकेचा हटकून मोह पडतो, त्यापासून त्यांना निवृत्त करून स्वातंत्र्याच्या कार्याकडे वळविण्यासाठीं निरंतर टिकणाऱ्या दास्यविमोचनाचें चित्र त्यांच्या डोळ्यांपुढें सतत राहील, अशा प्रकारच्या कल्पना त्यांच्या डोक्यांत घालून त्यांना अगदीं वेडे करून सोडिलें पाहिजे. स्वातंत्र्य आणि राज्यक्रांति ह्यांच्या चर्चेनें भरलेलीं वर्तमानपत्रें; तसेंच, स्वातंत्र्यप्राप्तीकरितां ज्या हिंदी महापुरुषांनीं प्रयत्न केले त्यांच्या पराक्रमांचें वर्णन असलेलीं व अंतःकरणास अगदीं हलवून सोडणारीं गद्यपद्यात्मक नाटकें, व देशाभिमानयुक्त पोवाडे, इत्यादि साधनांनीं लोकमत बनविलें पाहिजे. महाराष्ट्रांत महात्मा शिवाजी स्वातंत्र्य मिळविण्याकारितां सिद्ध झाला, तेव्हां त्याच्या कामाला पोवाड्यांचेंच फार मोठें सहाय्य झालें. पण सर्वांत महत्त्वाचें काम ह्मटलें ह्मणजे स्वातंत्र्याकरितां मोठा स्वार्थत्याग करण्याची सामग्री जमविणें, हें होय. ज्याला इंग्रजी युद्धकलेंत **आसरा घेणें** ह्मणतात, त्या युक्तीची राजकीय खटपटींत नेहमीं फार गरज असते. आणि, ह्या प्रकारच्या युक्त्यांनीं शत्रूला नेहमीं गुंतवून ठेविलें पाहिजे. "आज **वंदेमातरम्** ची मिरवणूक, तर उद्यां कानफरन्स किंवा कांग्रेस; आणि परवां **स्वदेशी**वरील व्याख्यानांचा कडकडाट तर तेरवां दुसरेंच कांहीं." क्षुल्लक गोष्टींचा मोठा गवगवा केल्यानें फायदा होतो; पण, हें नेहमीं लक्ष्यांत ठेविलें पाहिजे कीं, हा आमचा खरा उद्योग नव्हे; तर ह्या गोष्टी किंचित् सहायभूत होणाऱ्या आहेत. आमचें

शिक्षण चालूं आहे तोंपर्यंत या गोष्टीमुळें शत्रु गुंतून राहील, व देश जागृत राहील. हें शिक्षण कोणतें ह्मणाल तर, आपला हेतु गुप्त ठेवण्याची शक्ति असलेल्या व पूर्णपणें आज्ञापालन करण्यास शिकलेल्या तरुण मंडळीच्या टोळ्या मोठ्या शहाणपणानें व गुप्तपणानें तयार करावयाच्या. "आपला हेतु सिद्धीस नेण्यास शरीरसामर्थ्य वाढविणें हा मुख्य उपाय आहे" हें प्रत्येक टोळीनें समजून असलें पाहिजे. प्रत्येक टोळीनें आपल्या जिल्ह्याच्या मुख्य ठिकाणीं प्रारंभ करून, तेथून आपल्या कामाचा प्रसार सर्व जिल्ह्यांत केला पाहिजे, व आपल्यासारख्या इतर टोळ्यांशीं संबंध ठेविला पाहिजे. हिंदुधर्माच्या **गुह्यवादी** पंथांतील लोकांत जी विषयलोलुपता असते, तिच्यावर **शक्तिपूजेचा** फारच मोठा परिणाम होऊन, ती त्यांना अत्यंत प्रिय वाटते. ह्मणून वरील टोळ्या **शक्ति**पूजेच्या मंत्रतंत्रांत चांगल्या निष्णात असल्या पाहि-जेत. ह्या टोळ्यांतील लोकांना शस्त्रें मिळवून देण्याचे अनेक मार्ग आहेत, आणि, ह्या बाबतींत "न्याय–अन्यायाचा विचारच कर्तव्य नाहीं. कारण कीं, प्रत्येक गोष्ट स्वातंत्र्यदेवतेच्या चरणीं अर्पण व्हावयाची आहे." गुप्त ठिकाणीं बांबगोळे तयार करितां येतील, व बंदुका परदेशांतून आणितां येतील. कारण, "पाश्चात्यलोक पैशासाठीं आपली जन्मभूमि विकण्यास तयार होतील. अथवा, देशी सैन्यांतील लोकांपासून हत्यारें मिळवितां येतील." "पोटाची खांच भरण्यासाठीं जरी त्यांनीं सरकारी नोकरी पतकरली आहे, तरी ते आपल्याच हाडामांसाचे आहेत." किंवा, इतर बलाढ्य राष्ट्रांपासून तीं गुप्तपणें कदाचित् मिळूं शकतील. ह्याचप्रमाणें पैसेसुद्धां गोळा करितां येतील. स्वदेशांत व अन्यत्र गुप्तपणें उपदेश करण्यासाठीं व इतर कामासाठीं पुष्कळ

द्रव्य पाहिजे. आपखुषीनें दिलेल्या देणग्या अथवा बळजबरीनें घेतलेला पैसा ह्या रूपानें सदरहु द्रव्य जमवितां येईल. समाजहितासाठींच द्रव्य पाहिजे असल्यामुळें, जोरजबरी करणें अगदीं वाजवी आहे. नेहमींच्या परिस्थितींत चोऱ्या व दरवडे गुन्हे आहेत. कारण, त्यांमुळें समाजाच्या सुरक्षितपणास बाध येतो. पण, मोठ्या लोककल्याणासाठीं असा बाध आणण्यांत पातक नाहीं, उलट पुण्यच आहे. अशा प्रसंगीं रक्तपात करणेंसुद्धां तितकेंच प्रशंसनीय आहे. इंग्रजांचा कायदा पशुशक्तीवरच अवलंबून आहे; आणि जर त्यापासून आपली सुटका करून घेण्यास आह्मांसही पशुशक्तीचाच उपयोग करावा लागला, तर तें वाजवीच होणार आहे. हें मत उगीच मोघम शब्दांत सांगितलेलें नाहीं:—

बंगाली **शक्तिपूजक** रक्तपात करण्यास कचरतील काय? ह्या देशांतील इंग्रजांची संख्या दीड लक्षाहून कांहीं अधिक नाहीं. आणि, प्रत्येक जिल्ह्यांत किती इंग्रज अधिकारी असतात? जर तुह्मी दृढनिश्चयाची कांस धराल, तर तुह्मांला एका दिवसांत इंग्रजी राज्याची समाप्ति करिता येईल. तुह्मी आपला जीव खर्चीं घाला; पण प्रथम एकाचा घ्या. रक्तपातावांचून तुह्मी आपल्या प्राणाचा स्वातंत्र्यदेवतेला बळी द्याल, तर शक्तिपूजेची पूर्तता होणार नाहीं, हें समजून असा.

राज्यक्रांतीची इच्छा करणाऱ्या हिंदुलोकांचीं अशीं मतें आहेत; व ह्यांच्या प्रसाराचें काम कांहीं अत्यंत सुशिक्षित बंगाली लोकांकडून मोठ्या नेटानें आज दोन वर्षें अव्याहत चालू आहे. शिवाय, लोकांच्या पवित्र धर्मसमजुतींपासून विशेष फायदा व्हावा, ह्मणून हीं वरील मतें लोकांपुढें मांडतांना जी भाषापद्धति वापरली जाते, तीहि मोठी लोकोत्तर असते. **युगांतरानें** पतकरलेले मार्ग ज्यांना खास पसंत नाहींत, अशा एका

विद्वान् हिंदुगृहस्थाचें एक पत्र मजपाशीं आहे, त्यांत असें लिहिलें आहे कीं, "ह्या लेखांसारखे लेख आजपर्यंत बंगाली भाषेंत कोणीं लिहिले नव्हते." "अंतःकरणांत जे विचार निरंतर घोळत असतात, तेच तोंडांतून बाहेर पडतात," ही ह्मण **युगांतराला** अगदीं शब्दशः लागू पडते. त्या लेखांची भाषा इतकी उदात्त, करुणरसप्रचुर व अंतःकरण हालवून सोडणारी होती कीं, त्यांचें बंगालींतून इंग्रजींत बरोबर भाषांतर करणें केवळ अशक्य आहे, असें सरकारी भांषातरकारानें हायकोर्टांत कबूल केलें. आणि, चमत्कार असा कीं, त्या लेखकांनीं लहानपणीं देशभाषेंत लिहिण्याचा कधींच अभ्यास केला नव्हता इतकेंच नाहीं, तर त्यांच्या भाषापद्धतींत स्पष्ट दिसून येणारें मिलटनकवींचें भाषागांभीर्य पाहून, त्यांचें शिक्षण इंग्रजी पद्धतीवर उत्तम प्रकारचें झालें होतें, अशी कोणाचीहि खात्री पटेल. ह्या पत्राचा खप ५० हजार प्रतींपेक्षांहि अधिक होऊं लागला होता; आणि, आजपर्यंत कोणत्याहि देशी पत्राचा असा विलक्षण प्रसार झाला नव्हता. केव्हां केव्हांतर त्यास इतकी मागणी येई कीं, एकेका अंकाची एकेक रुपयापर्यंत किंमत लोक देत असत. खरोखर ही मागणी इतकी मोठी होती कीं, ती भागविण्याकरितां त्या पत्रांतील राजद्रोहाचें पूर्ण मंडन करणारे अग्रलेख पुस्तकरूपानें निराळे छापण्यांत आले. ह्या पुस्तकाचें नांव 'मुक्ति कोन पाथे,–ह्मणजे मुक्ति कोणत्या मार्गानें मिळेल–असें होतें. लोकांच्या धार्मिक मनोवृत्ति व जातिविषयक द्वेष यांना उत्तेजित करणाऱ्या ह्या लेखांचें प्रतिबिंब बंगालप्रांतांतील पुष्कळच पत्रांतून दिसून येत होतें. परंतु, अत्यंत दुःखाची गोष्ट अशी कीं, एकाहि देशी पत्रानें— आपणास उघडपणें

**नेमस्त** ह्मणविणाऱ्यांनींसुद्धां— ह्या लेखांच्या उलट लिहिण्याचा प्रयत्न केला नाहीं, किंवा त्यांतील मजकूर अथवा भाषासरणी ह्याचाहि निषेध करण्याची कोणाची छाती झाली नाहीं. उलट, त्यांना आलेलें यश पाहून, त्यांचें अनुकरण करणारे पुष्कळ निघाले. इंग्लंडसारख्या देशांत—जेथें लोकसमुहांत राजकीय पक्ष व्यवस्थितरीतीनें उत्पन्न झालेले असतात तेथें—कोणत्याहि पक्षाच्या पत्रांनीं खोडसाळपणा केला, तर त्याचा प्रतिकार करण्याचीं साधनें दुसऱ्या पक्षाच्या हातीं असतात, ही गोष्ट, हिंदुस्थानांतील वर्तमानपत्रांच्या स्वातंत्र्याची सडकून तरफदारी करणारे इंग्रजलोक साफ विसरून जातात. हिंदुस्थानांत खरोखर इंग्लंडसारखी स्थिति नाहीं. तेथील लोकमत स्वयंभू नसल्याकारणानें, त्याचा योग्य परिणाम होत नाहीं. ज्या हिंदीलोकांचा इंग्रजी राज्यावरील विश्वास अझून अढळ आहे, त्यांचे प्रतिनिधी वर्तमानपत्रांच्या धंद्यांत नाहींत, अशी वस्तुस्थिति आहे. हिंदी वर्तमानपत्रें बहुधा विद्येंत पुढें असलेल्या लोकांच्या हातीं असून, त्यांतील पुष्कळ लोक दिवसेंदिवस अधिकाधिक राजद्रोही होत चालले आहेत, व बाकीचे थोडे लोक भ्याडपणामुळें राजद्रोहाच्या ओघास प्रतिबंध करूं शकत नाहींत. ह्या नव्या पंथाच्या जोराखालीं बंगालचा **नेमस्त** पक्ष दबून गेला असल्यास, त्यांत त्यांचा सर्वस्वी दोष आहे, असें ह्मणतां येत नाहीं. कारण, आगलावेपणास आळा घालण्याचा प्रयत्न सरकार करित नव्हतें; व जर तसा कांहीं प्रयत्न होत असला, तरी त्याचा मुळींच उपयोग होत नव्हता, हें आपण लक्ष्यांत ठेविलें पाहिजे. सरकारनें पुष्कळ पत्रांवर खटले केले, व **युगांतरांतील** विवक्षित लेखांबद्दल वारंवार काम चालविलें, तरी ह्या बाबतींत सरकारच्या हातीं जे

अधिकार होते, ते फार कमी असल्याकारणानें, त्यांच्या प्रयत्नांचा कांहींच उपयोग झाला नाहीं. आणि १९०८ सालीं जूनमध्यें हिंदीवर्तमानपत्रांचा नवीन कायदा पास होईपर्यंत, **युगांतर**–पत्र सरकारास बंद करून टाकितां आलें नाहीं. पण, इतक्या अवकाशांत **युगांतरानें** आपली कामगिरी करून, हिंदुस्थानच्या इतिहासांत आपलें नांव अजरामर करून ठेविलें आहे. लॉर्ड मिंटोसाहेबांच्या पहिल्या दोन वर्षांच्या कारभारांत विलक्षण नरमपणा होता. त्यामुळें, पुष्कळ निरपराधी लोकांस विनाकारण बळी पडावें लागलें.

अत्याचाराचे व दांडगाईचे प्रकार बंगालमध्यें १९०७ सालीं सुरू झाले; व गुन्ह्यांचें प्रमाण दिवसेंदिवस वाढतच चाललें. अशा प्रकारची स्थिति असतां, ता० ३० एप्रिल १९०८ रोजीं मुझफरपूर येथें, किंग्जफर्ड माजिस्ट्रेटच्या गाडीवर ह्मणून जो बांब टाकण्यांत आला, त्यानें मिसेस व मिस केनडी ह्या दोन युरोपियन स्त्रियांचा खून झाला, त्याबरोबर जशी चळवळ उडाली, तशी पूर्वीं कधींच उडाली नव्हती. हा बांब **खुदिराम** बोस नांवाच्या एका बंगाल्यानें उडविला; आणि, अर्वाचीन शास्त्रांतील ह्या प्राणघातकी शोधाचा हिंदी माणसानें उपयोग करण्याची ही अगदीं पहिलीच खेप होती. ह्मणून, ह्या अत्याचारामुळें फार मोठी धांदल उडाली. राजकीय चळवळीच्या ह्या असल्या स्वरूपाबद्दल निषेध करण्यास निदान नापसंती दर्शविण्यास बहुतेक बंगाली पत्रें तयार होतीं, हें खरें आहे; पण हा प्रकार निव्वळ वरकरणी असून, राष्ट्रीय आकांक्षांस परकी सरकारानें विरोध केल्यामुळें, अशा प्रकारचे अत्याचार करण्यास उतावळे देशभक्त प्रवृत्त झाले, ह्याचा दोष सरकारावरच आहे, असें ह्मणण्यांत

त्यांचें साधारणपणें एकमत होतें. खुनी माणसाबद्दल खरोखरच ज्या लोकांची सहानुभूति नव्हती, अशा पुष्कळ लोकांससुद्धां मनांतल्या मनांत असा अभिमान वाटला कीं, अशा प्रकारचें कृत्य करून आपला प्राण खर्ची घातल्याचें धाडस एका बंगाली माणसानेंच दाखविलें. निदान खुदीरामतरी **नरम काळजाचा** माणूस नव्हता. तुमच्यांत दृढनिश्चय नाहीं, असें **युगांतरांतील** लेखक आपल्या देशबांधवांस वारंवार टोंचून लिहीत, तो **दृढनिश्चय** निदान खुदीरामानें तरी दाखविला. त्यामुळें, बंगाली राष्ट्रीयपक्षाच्या दृष्टीनें खुदीराम हा देशहितासाठीं स्वार्थत्याग करणारा महापुरुष ठरून गेला. विद्यार्थ्यांनीं व इतर लोकांनीं त्याच्या सन्मानार्थ सुतक धरिलें, व २।३ दिवस शाळादेखील बंद ठेवण्यांत आल्या. त्याच्या फोटोंची विलक्षण विक्री झाली; व कांठांत खुदीरामाचें नांव घालून विणलेलीं धोतरें नेसण्यापर्यंत बंगाल्यांतील तरुण लोकांची हळूं हळूं मजल गेली.

खुद्द कलकत्त्यांत एकामागून एक असे बांब उडण्याचा सपाटा सुरू झाला; आणि शहराबाहेरील हद्दींतील एका बागेंत स्फोटक द्रव्यांपासून बांब तयार करण्याच्या कारखान्याचा तपास लागला. ह्या शेवटच्या खटल्यांतील माफीचा साक्षीदार **नरेंद्रनाथ** गोस्वामी यास अलीपुरच्या तुरुंगांत ठार करण्यांत आलें; तसेंच, कलकत्त्याच्या भररस्त्यांत एका पोलिस इनस्पेक्टराचा खून झाला. बंगालचे ले० गव्हरनर सर आंड्रु **फ्रेझर** यांचा जीव घेण्याचा चारवेळां प्रयत्न झाला. ह्यावरून, दिवसेंदिवस बळावत जाणाऱ्या राज्यक्रांतीच्या उत्पादकांवर, सामोपचाराचा कांहींच परिणाम झाला नाहीं, हें उघड दिसतें. प्रत्येक महिन्यास—आणि केव्हां केव्हांतर प्रत्येक आठवड्यास— कांहींतरी

अत्याचाराचा प्रकार घडूं लागला. परंतु, त्या सर्वांची संपूर्ण माहिती देण्याचें मला प्रयोजन दिसत नाहीं. गुन्ह्याचा तपास न लागूं देतां, शिक्षा चुकवावी, आणि ब्रिटिश राज्याची नोकरी करण्यास धजणाऱ्या हिंदीलोकांच्या हृदयांत भींति उत्पन्न करावी, असा दुहेरी हेतु पुष्कळ गुन्ह्यांचा होता, असें मुख्यतः दिसून येतें. १९०९ सालच्या फेब्रुवारी महिन्याच्या १० व्या तारखेस, मि० **अशुतोष विश्वास** ह्या वजनदार आणि सच्छील हिंदु पब्लिक प्रासिक्युटराचा अल्लीपुरच्या पोलिस कोर्टाबाहेर पिस्तुलानें खून करण्यांत आला. तसेंच, ह्या खुनानंतर सुमारें एक वर्षानें, पोलिस इनस्पेक्टर मि० **शमसूल अलम** ह्या, गुन्हेगारांचा तपास लावण्याच्या खात्यांतील, मुसलमान अंमलदाराचा खून खुद्द कलकत्त्याच्या हायकोर्टांत झाला. दोन्हीं बंगालप्रांतांत राजद्रोहास अगदीं पूर आला होता. आणि, शेतकरी लोक ह्या चळवळीपासून बहुतकरून अलिप्त असत किंवा त्याविषयीं बेफिकिर राहात, तरी लहानलहान गांवें व मोठमोठालीं खेडींसुद्धां राज्यक्रांतीच्या चळवळींत सामील करून घेण्याकरितां उपदेशक पाठविण्यांत आले नव्हते, असें नाहीं. उघडपणें बंड करण्याकडे लोकांची प्रवृत्ति व्हावी, ह्मणून जो प्रयत्न मोठ्या जोरानें आतां होऊं लागला, त्याच्या, **स्वदेशी व बहिष्कार** ह्या दोन्ही गोष्टी, केवळ अंगभूत होऊन राहिल्या. परंतु, जेथें **स्वराज्य** प्राप्तीची खरी जोत अद्याप प्रज्वलित झाली नव्हती, तेथें "लोकांमध्यें जागृति राखण्यास" त्यांचा उपयोग होत होता. सर्व प्रांतभर गुप्त मंडळ्यांचें जाळें पसरलें गेलें असून, त्यांतील लोक मोठ्या धाडसानें दरोडे वगैरे घालून, शत्रूशीं लढण्याकरितां लागणारी मुख्य सामग्री—ह्मणजे

पैसा—जमवित असत. शिवाय, अपरात्रीं येणाऱ्या दरोडेखोरांपासून आपलें संरक्षण करण्यास सरकार असमर्थ आहे, ह्याहि गोष्टीचा अनुभव भिऱ्या व क्रांतिकारक चळवळीस प्रतिकूळ असलेल्या लोकांस येऊन, त्यांना दहशत बसत असे. खरोखर, **युगांतराची** शिकवणी फळास आली; व ती इतकी कीं, कांहीं लोक प्राण देण्यास व घेण्यास तयार झाले. "बोले तैसा चाले" हें तत्व पुष्कळ बंगाली चळवळ्यांच्या हातून पाळलें जात नसे; परंतु **युगांतरां**-तील लेखक, "पुराणांतलीं वांगीं पुराणांत" न राहूं देतां, आपल्या बोलण्याप्रमाणें वागण्यास यत्किंचित्सुद्धां कचरत नसत, ही गोष्ट कबूल केलीच पाहिजे. ह्या—पैकीं बरीच मंडळी शेवटीं कायद्याच्या कचाटींत आली; आणि, माणिक-तोळा येथील बागेंतल्या बांब करण्याच्या कारखान्यांत सामिल असल्याबद्दल **बरेंद्रावर** खटला होऊन, त्याला फांशीची शिक्षा झाली होती; पण, पुढें त्याच्यावर दया करण्यांत आल्यामुळें तो फांसावर चढला नाहीं. त्याचा भाऊ जो अरविंद, त्यालाहि त्याच वेळीं पकडलें होतें. पण, त्याच्या सुदैवानें तो दोषमुक्त झाला. तथापि, **युगांतरानें** बजावलेली कामगिरी त्यानंतर जिवंत होती, व अझूनहि आहे.

अशा प्रकारच्या अत्याचारात्मक चळवळींसंबंधानें हिंदु-स्थानसरकार व इंग्लंडांतील प्रधानमंडळ, ह्या उभयतांनीं जें विलक्षण सहनशीलपणाचें धोरण फार वेळ ठेविलें होतें, त्याबद्दल त्यांच्यावर फार मोठी जबाबदारी येऊन पडली पाहिजे. हिंदु-स्थानसरकारच्या प्रत्यक्ष नजरेसमोर, कलकत्त्यास हा प्रकार सतत दोन वर्षें अगदीं निर्भयपणानें चालला होता. सरकारी अधिकाऱ्यांच्या जडपणाच्या मानानें अराजकांची धिटाई दर

महिन्यास वाढत चालली आहे, ही गोष्ट सरकारच्या दृष्टोत्पत्तीस येत असली पाहिजे. राजधानीच्या प्रांतांत पुष्कळ ठिकाणीं पुंडाईचें व धमकावणीचें राज्य झपाट्यानें वाढत आहे, ही गोष्ट सरकारच्या नजरेस आली असली पाहिजे. प्रचारांत असलेल्या न्याय करण्याच्या पद्धतीनें ह्या अरिष्टांचा बंदोबस्त होणार नाहीं, ह्याबद्दल सरकारची वारंवार खात्री करून देण्यांत आली होती. तथापि, असाधारण प्रसंग निवारण करण्यास असाधारण उपायांची योजना झाली पाहिजे, हें तत्व १९०८ पर्यंत सरकारानें मान्य केलें नाहीं; व तेव्हांदेखील तें मोठ्या दिरंगाईनें व नाखुषीनें मान्य केलें. अखेरीस, १९०८ सालीं **स्फोटक** द्रव्यांचा, संक्षिप्त चौकशीचा व **मुद्रणस्वातंत्र्याचा** असे कायदे करण्यांत आले. शिवाय, १९०९ सालच्या फेब्रुवारी महिन्यांत **छापखान्याचा** कायदा आणखी कडक करण्यांत आला. ह्या सर्व उपायांमुळें, गैरकायदा वर्तनाच्या शिमग्यास कांहींसा आळा बसला खरा. तथापि, हा सर्व प्रकार १९१० सालच्या आरंभीं आरंभीं थोड्याबहुत प्रमाणांत चाललाच होता. ह्या वर्षीं पास झालेल्या छापखान्यांसंबंधाच्या कायद्यामुळें पत्रकर्त्यांच्या विषारी शाईच्या प्रवाहास खराच अडथळा झाला; व त्याबरोबरच, ज्या राजद्रोहात्मक लेखांनीं तरुण बंगाली लोकांचीं डोकीं फिरून जाऊन, ते अत्यंत दुराचारी बनले होते, त्यांच्याहि ओघास प्रतिबंध झाला. परंतु, क्रांतिकारक मंडळ्यांच्या गुप्तरीतीनें चाललेल्या कामाची ज्यांना चांगली माहिती आहे, अशांपैकीं कित्येकांचें मत असें आहे कीं, १९०८ सालच्या अखेरीस नऊ प्रमुख बंगाली गृहस्थांस पकडून हद्दपार केल्यामुळें, चळवळ्या लोकांचीं

डोकीं जशीं तात्काळ ठिकाणावर आलीं तशीं वरील कायद्यापैकीं कशानेंहि आलीं नाहींत. ब्रिटिश लोकांचा इतिहास व मनुष्याच्या स्वातंत्र्याविषयींच्या त्यांच्या कल्पना ह्या दृष्टीनें पाहूं गेल्यास, हद्दपारीचा उपाय त्यांना पसंत पडणार नाहीं, हें मी जाणून आहे. तशांत, दुर्दैवानें ह्या नऊजणांपैकीं दोन गृहस्थ असे होते कीं, त्यांनीं **अनुशीलन** समितीसारखी भयंकर संस्था काढून, तिला द्रव्यद्वारा मदत केली होती व तिची सर्व व्यवस्था लाविली होती. ह्मणून, ह्या संस्थेंतील लोकांनीं जीं कृत्यें केलीं, त्यांबद्दल वरील गृहस्थांच्या शिरावर जबाबदारी बसते, असें जरी कोणाचें मत असलें, तरी त्यांच्याकडे निःसंशय कांहीं अपराध नव्हता, असें पुढें दिसून आलें. तें कसेंहि असो; पण, ज्या राजद्रोही चळवळ्यांचें काम अतिशय गुप्तपणानें चाललें असल्यामुळें अत्यंत भयंकर असतें, व वयोवृद्धपणामुळें व थोरपणामुळें ज्यांच्यावरील जबाबदारी तशीच मोठी असते, अशा लोकांवर हद्दपारीच्या उपायामुळें चांगलाच वचक बसला. मात्र, अशा औषधाचा उपयोग अगदीं आणीबाणीच्या प्रसंगीं करावयाचा असून, हद्दपार केलेल्या लोकांना अनिश्चित काळपर्यंत अटकेंत ठेवतां येत नाहीं. ह्या हद्दपारीच्या लोकांस गेल्या हिंवाळ्यांत सरकारानें भलत्याच वेळीं सोडून दिलें; पण, त्यांच्या मुक्ततेचीं जीं कारणें सांगण्यांत आलीं, तीं तर विशेषच अयोग्य होतीं, असें मोठ्या दुःखानें ह्मणावें लागतें. शिवाय, ह्या नऊजणांपैकीं एकास—ह्मणजे डाक्का शहरच्या पुलिन बिहारी दासास— पुनः अटक करावी लागली व सध्यां (पुस्तक लिहिलें त्यावेळीं) डाक्क्यास त्याच्यावर एका अत्यंत भयंकर कटांत सामील असल्याबद्दल खटला सुरू आहे.

तथापि, ह्या लोकांना सोडून देण्यापासून फायदा आहे, असें जें लॉर्ड मिंटो साहेबांस वाटलें, तें आतांपर्यंतच्या अनुभवावरून बरोबर होतें, असें ह्मटलें पाहिजे.

अझूनहि दोन्ही बंगालप्रांतांत बरीच पुंडाई चालू आहे. राजकीय स्वरूपाचे दरोडे अद्यापि पडतच असून, विशेषतः ते घालणाऱ्यांच्याविरुध्द कायदेशीर पुरावा मिळण्यास फारच अडचण पडते. आतां, हीं चिन्हें चांगलीं नाहींत, हें अगदीं उघड आहे. मुख्यतः प्रतिष्ठित लोकांचे आप्त–संबंधी असलेली तरुण मंडळी हत्यारबंद होऊन; जे अत्याचार करितात, त्यांबद्दल खासगी रीतीनें माहिती देण्यास पुष्कळ शांतताप्रिय प्रजाजन तयार असतात. पण, साक्षीदार होऊन पुढें आल्यास, आपला हे लोक सूड घेतील, ह्या भीतीमुळें फारच थोडे लोक साक्ष देण्यास धजावतात. ह्यावरून, ज्या गुप्त मंडळ्यांचें नांव घेतांच लोकांची पांचावर धारण बसते, त्यांचा अद्यापि बीमोड झाला नाहीं, असें दिसतें. हिंदी वकीललोकांतहि राजद्रोह पसरला असल्याकारणानें, न्यायाच्या कामास अडथळा होतो. कारण, राजकीय कैद्यांच्या वतीनें वाक्पांडित्य करून, सवंग लोकप्रीति संपादण्यासाठीं हपापलेले वकील पायलीचे पन्नास मिळतात; पण, सरकारी रीतीनें काम चालविण्यास कधीं कधीं वकीलच मिळण्याची पंचाईत पडते. उलट पक्षीं, जे लोक आरंभाला राजद्रोही लोकांच्या नादीं लागले होते, अथवा त्यांच्याविरुद्ध बोलण्याचें ज्यांना मनोधैर्य नव्हतें, अशा लोकांना आतां अवसान येऊं लागलें आहेसें दिसतें; व ही फार चांगली गोष्ट आहे. बेकायदेशीरपणाचें वर्तन करण्याची लोकप्रवृत्ती दाबून टाकण्याकरितां केलेल्या कायद्यामुळें लोकांचीं डोकीं ताळ्यावर आलीं;

व काउन्सिलें सुधारण्याच्या कायद्यामुळें त्यांत आणखी भर पडली. "तुह्मांलातरी सरकार कोठें भीक घालीत आहे," असा टोमणा **जहाल**–लोक नेहमीं **नेमस्तांना** मारीत असत. परंतु, कायदेकानू करणाऱ्या काउन्सिलांच्या विस्ताररूपानें जी राजकीय सुधारणा घडून आली, त्यामुळें वरील टोमण्यांतील खोंच निघून गेली आहे. तथापि, ह्या सुधारणा बाजूला ठेविल्या, तरी अलीकडे जी अत्यंत जहाल भाषा वापरण्यांत येऊं लागली होती, व राजकीय काम करण्याच्या ज्या भयंकर रीती स्वीकारण्यांत आल्या होत्या, त्यांविरुद्ध लोकमतानें कांहींतरी उलट खालीच असती. शाळा व कॉलेजें यांत शिकणाऱ्या मुलांच्या वर्तनांत दिवसेंदिवस दांडगेपणा व बेहुकमतपणा अधिकाधिक येत चालला, व घरींहि त्यांची अशाच प्रकारची वागणूक होऊं लागली त्यामुळें, सुशिक्षित लोकांपैकीं पुष्कळ प्रतिष्ठित पालकांच्या पोटांत त्यांचीं राजकीय मतें कशींहि असलीं तरी—मोठी धास्ती उत्पन्न झाली. कोणाचाहि जोरा आपल्यावर चालूं द्यावयाचा नाहीं, अशी खोड एकदां कां मुलांना लागली, ह्मणजे तीं आईबापांच्या डोक्यावर तरी मिरें वाटल्याशिवाय कशीं राहतील? अद्यापिहि गुप्त मंडळ्यांची वृद्धि होत असून, त्यांत बहुधा घराणदार लोकांचीं तरुण मुलें जाऊन मिळतात. त्यामुळें, कित्येक जहालांनाहि भय पडलें आहे; व बहिष्कार अमलांत आणण्यासाठीं आणि अस्वस्थता माजविण्यासाठीं ज्या **राष्ट्रीय स्वयंसेवकांच्या** टोळ्या प्रथमतः ठिकठिकाणीं काढण्याकरितां त्यांनीं मदत केली होती, त्यांचा उपयोग आतां दरोड्यांचा पत्ता लावून, त्यांचा बंदोबस्त करण्याकडे करावा, अशी त्यांची सूचना आहे. मि० सुरेंद्रनाथ बानरजीसारख्या लोकांच्या चिथावणीमुळें अशीं अरिष्टें उत्पन्न

झालीं आहेत; पण, आतां त्यांस आळा घालण्याचा प्रयत्न त्यांनीं अगदीं मनापासून केला, तरी ह्या कामांत त्यांना कितपत यश येतें, हें पाहणें आहे. तूर्ततरी ह्या लोकांकडून बहिष्काराच्या चळवळींत विरजण पडल्यासारखें झालें आहे. बंगालच्या फाळणीचा पुनः विचार होत आहे, ह्मणूनच बहिष्काराची चळवळ बंद ठेवण्यास मी कबूल झालों आहे, असें सुरेंद्रबाबू मोठ्या कंठरवानें सांगत आहेत; तथापि, जगांत आपली फजिती होऊं नये ह्मणूनच ही त्यांची खटपट दिसते. फाळणीच्या प्रश्नाचा अझूनहि विचार होईल, असें मानण्याचें ढोंग करणारें बहुतकरून एकच पत्र आहे; आणि तें कोणतें ह्मणाल, तर सुरेंद्रबाबूंचा **बंगाली** होय. वस्तुतः फाळणीहून फारच महत्वाचे विषय हल्लीं पुढें आले असून, त्यांचें पुढें काय होईल, ह्याचा आज कांहींच अंदाज करितां येत नाहीं.

जे लोक शांततेच्या मार्गास परत आले आहेत, ते जुन्या पिढीपैकीं आहेत, ही मोठ्या दुःखाची गोष्ट आहे. कारण, जुन्या पिढींत मध्यम वयाच्या लोकांचा समावेश जरी केला, तरी ही पिढी लौकरच दृष्टीआड व्हावयाची आहे. विशेषेंकरून बंगालमध्यें तरी, आपणास तरुण पिढीच्या बंडखोरपणाशीं गांठ घालावयाची आहे; आणि, ह्या बंडखोरपणास तर धर्म व तत्वज्ञान अशा गोष्टींपासून प्रेरणा मिळत असते. यास्तव लोकांच्या उच्छृंखलपणास दाबून टाकण्याकरितां, अथवा त्यांच्या वाजवी आकांक्षा तृप्त करून त्यांच्याशीं समेट करण्याकरितां, निव्वळ राजकीय स्वरूपाचे कितीही उपाय योजिले, तरी त्यांपासून ह्या बंडखोरपणाचा बीमोड होणार नाहीं. मनुष्यामधील अत्युत्तम गुणांची अशा बंडखोरपणामुळें बहुधा कशी

माती होऊन जाते, ह्याचें उत्कृष्ट उदाहरण ह्मणजे, गेल्या ज्यानेवारी महिन्यांत, कलकत्त्याच्या हायकोर्टांत बिरेंद्रनाथ गुप्तानें शमसुल आलमचा केलेला खून होय. बिरेंद्राची चांगली माहिती असणाऱ्या एका इंग्रज मिशनऱ्यानें मला खात्रीपूर्वक सांगितलें कीं, माझा आजपर्यंत पुष्कळ तरुण हिंदीलोकांशीं परिचय झाला आहे. परंतु बिरेंद्राची कित्ता घेण्यासारखी वर्तणूक व त्याचे उदात्त विचार मला एकामध्येंहि आढळून आले नाहींत. आणि, त्याच्या हातून असा गुन्हा घडेल, हें तर माझ्या स्वप्नांतदेखील कधीं आलें नाहीं. गुप्त मंडळ्यांमध्यें नवीन इसमांस दाखल करितांना, ज्या आणाशपथा देतात व व्रत--संकल्प पाळावयास लावतात, त्यांचा उद्देश फक्त राजकीय गोष्टींपुरताच असतो, असें नाहीं. मोठी उच्चप्रकारची भाषा वापरून, **स्वार्थत्याग** व कधीं कधीं **ब्रह्मचर्य** हीं व्रतें आजन्म पाळण्याची नवीन मंडळीला शपथ देण्यांत येते. आतां, कित्येक विषयासक्त लोकांच्या उच्छृंखलपणावर दाब ठेवण्यास असली शपथ नेहमींच उपयोगी पडते, असें नाहीं. तथापि, असल्या अपवादादाखल असणाऱ्या दुराचारी लोकांच्या उदाहरणांवरून सामान्य सिद्धांत काढणें मूर्खपणाचें व चुकीचें होईल. इंद्रियशास्त्राच्या नियमास धाब्यावर बसवून, बालविवाह प्रचारांत आणण्याची दुष्ट चाल बंगाली लोकांत आज शेंकडों वर्षें असल्यामुळें, अल्पवयांतच त्यांची शक्ति क्षीण होऊन जाते. अशा घातुक चालीस आळा घालून, आळस, चैनबाजी इत्यादि दुर्गुणांचा आपल्यामधून नायनाट करण्याच्या स्तुत्य हेतूनें बहुधा तरुण बंगाली लोकांनीं हा उपक्रम केला आहे, असें नीतिशास्त्रदृष्ट्या विचार करितां, कोणासहि दिसून येईल. हिंदुधर्माच्या

नांवानें कां होईना; पण, हिंदुलोकांच्या समाजपद्धतीमुळें त्यांच्यांत आलेल्या कांहीं अत्यंत घातुक चालीरीतीविरुद्ध हा एकप्रकारचा बंडावा आहे. आणि, तो बंगाली ब्राह्मणांतदेखील ज्याअर्थीं इतका पसरला आहे, त्यावरून ब्राह्मणीधर्माच्या अभेद्य कवचावरहि त्याचा कांहीं परिणाम झाला, असें दिसतें. इकडे कोल्हापुरसारख्या ठिकाणीं दक्षिणी ब्राह्मण ह्मणतात कीं, ह्या **कलियुगामध्यें** ( अज्ञानयुगामध्यें ) **क्षत्रिय**-वर्ग अस्तित्वांत असणें शक्य नाहीं, तर तिकडे बंगाल्यांत त्यांचेच जातभाई कायस्थांचें क्षत्रियत्व मान्य करून, त्यांस जानवीं देण्यास एका पायावर तयार झाले आहेत. ह्याचें कारण असें आहे कीं, वैदिक कालांतील क्षत्रिय-वर्णाचे पुनरुज्जीवन करून, बंगाली लोकांत लढवय्येपणा आणण्याची त्यांस जबर इच्छा झाली आहे. पश्चिमबंगाल्यांतील **जेसोर** व पूर्वप्रांतांतील **फरीदपूर** या दोन जिल्ह्यांतील **नामशूद्रा**ची उन्नति करण्याकरितां ब्राह्मणांचे जे उद्योग चालू आहेत, ते देखील इतक्याच महत्त्वाचे आहेत. **नामशूद्र** लोकांची संख्या मोठी असून, ते मुख्यतः शेतकरी आहेत; व वरील दोन जिल्ह्यांतच त्यांची मोठी वस्ती आहे. ह्या सामाजिक चळवळीचा अंतस्थ हेतु राजकीय स्वरूपाचाच होता. कारण, नामशूद्रांमध्यें राष्ट्रीयत्वाच्या कल्पनांचा प्रसार व्हावा, ह्मणून ब्राह्मणांनीं त्यांस अशी लालूच दाखविली कीं, त्यांच्यापैकीं जे कोणी स्वदेशीव्रत घेतील त्यांच्या संबंधानेंच फक्त जातिनिर्बंध सैल करण्यांत येतील. आणि, असें ह्मणतात कीं, कित्येक खेड्यामध्यें पुष्कळ नामशूद्र लोक त्यांच्या मताला मिळाले; व त्यांनीं ही गोष्ट फार चांगली केली, ह्याबद्दल आपली पसंती दर्शविण्याकरितां, खेड्यांतील न्हाव्याकडून ब्राह्मणांनीं—स्वतः द्विज असतांहि—

मुंडन करून घेतलें. आतां, ही गोष्ट आह्मालोकांस ( इंग्रजांस ) अगदींच क्षुल्लक वाटेल. परंतु, ह्या गोष्टीमुळें तीन हजार वर्षांची रूढी ब्राह्मणांनीं मोडून, समाजव्यवस्थेंत मोठीच क्रांति घडवून आणली, हें लक्ष्यांत ठेविलें पाहिजे.

उलटपक्षीं, **काली** अथवा **दुर्गा** ह्या नांवानें त्या **भयानक** देवीची आराधना करून, परक्या देशच्या जुलमी लोकांस हिंदुस्थानांतून हांकून देण्याविषयीं तिची नेहमीं करुणा भाकण्यासारखा अत्यंत रानटी व क्रूर धर्मभोळेपणा पतकरून, बहुजनसमाजाची मर्जी सुप्रसन्न करून घेण्यास बंगालचे ब्राह्मण तितकेच तयार होते, असें दिसतें. एका प्रसंगीं हीच देवी, स्वतःचें धडापासून निराळें केलेलें शीर हातांत धरून, आपल्याच अंगांतून वाहणारें रक्त तोंड पसरून पीत आहे, अशी दाखविली आहे. अशा प्रकारचें ह्या देवीचें भिसूर चित्र फार लोकप्रिय आहे. ह्याच्या खालीं असें लिहिलेलें असतें कीं, ही देवी ह्मणजे इंग्रजांनीं शिरच्छेद केलेली **देशमाताच** होय; आणि ती आपलेंच रक्त पिऊन जशीच्यातशी जिवंत राहिली आहे. इंग्रजमाणसाचा खून ह्मणजे, "कालीमातेला पांढऱ्या बकऱ्याचा बळी" असें चांगल्या सौम्य शब्दांनीं बोलण्याची जहाल लोकांची वहिवाट आहे; व ह्याबद्दल कांहीं आश्चर्यहि वाटावयास नको. १९०६ सालीं बनारस येथील एका हिंदुदेवळांत मी गेलों होतों. त्याठिकाणीं मौज मारण्याकरितां आलेले कांहीं तरुण बंगाली विद्यार्थी मला भेटले. तेव्हा, बोलतां बोलतां ते आपलीं राजकीयमतें मला समजण्यासाठीं सांगूं लागले; व तीं निश्चयात्मक जहाल पक्षाचीं होतीं. तथापि, त्यांच्या वागण्यांत सभ्यपणा व स्नेहभाव दिसून येत होता. त्यांनीं आपल्या

बरोबर एक लहानसें करडूं आणिलें असून, तें देवीला बळी देण्याचा त्यांचा विचार होता. ह्मणून, तें बलिदान पाहण्यासाठीं मला देवळाच्या दरवाज्यापर्यंत येण्याविषयीं त्यांनीं आग्रह केला. परंतु, मी त्यांच्या ह्मणण्यास जेव्हां रुकार दिला नाहीं, तेव्हां त्यांच्यापैकीं जो एक मनुष्य मला तर्कटी वाटला होता, तोच पुढें येऊन मला फारच आग्रह करूं लागला आणि ह्मणाला कीं, आपण आमच्याबरोबर याल, तर पांढरा बकरासुद्धां बळी देण्यास आह्मी नाहीं ह्मणणार नाहीं. त्याबरोबर सर्व मंडळींत मोठा हंशा पिकला; व त्यावरून, त्यांच्या मतें ही एक जंगी थट्टा असली पाहिजे, असें मला वाटलें. ह्या थट्टेंतील भयंकरपणा आतां जसा मला कळतो, त्याप्रमाणें त्या वेळीं कळला नाहीं. तथापि, हा हांसण्याचा प्रकार पाहून मात्र मी दुसरीकडे वळलों.

हिंदुलोकांच्या व पाश्चात्यांच्या कल्पनांमध्यें मुळांतच विरोध आहे, अशा उपदेशाचा तरुण हिंदुलोकांच्या मनावर जो कांहीं ठसा उमटला आहे, त्यामुळेंच बहुधा प्रत्येक इंग्रजी गोष्टीविषयीं त्यांना मोठी चीड येण्याचा अविचारीपणा त्यांच्या हातून घडून येतो. नाशीकच्या त्या भिकारड्या नादान कान्हे-ऱ्या-प्रमाणेंच, "आह्मांला अन्याय झाला नाहीं, अगर दुसऱ्या-संबंधानेंहि झालेला आह्मांस माहीत नाहीं" अशीच कबुली ह्याहि लोकांना द्यावी लागेल. ह्या लोकांपैकीं पुष्कळांचा एकाहि इंग्रजमनुष्याशीं कधीं परिचय झालेला नसतो; आणि, हिंदुस्थानांतील हल्लींच्या राज्यपद्धतीविषयींहि त्यांचें अज्ञान अगाध असतें. ह्या द्वेषाग्नीच्या ज्वाळांचा झनानखान्यांत (बंगालच्या स्त्रीवर्गांत) देखील चांगला प्रवेश झाला आहे, हें शुभचिन्ह नाहीं. इंग्रज-स्त्रियांना बंगालच्या हिंदुस्त्रियांप्रमाणें पडद्यांत राहावें न

लागतां, जगांत मोकळेपणानें वापरण्यास जरी सांपडतें, तरी ह्यांचें आपल्या नवऱ्यांवर व मुलाबाळांवर जसें वजन असतें तसें इंग्रजास्त्रियांचें नसतें. अशा बाबतींत पक्का खात्रीलायक पुरावा मिळणें कठीण आहे. तथापि, गतवर्षी एक फार महत्त्वाची व चांगली विश्वसनीय गोष्ट घडून आली; आणि ती जरी मुंबईइलाख्यांत घडली, तरी तिचा येथें उल्लेख करणें वाजवी आहे. मुंबईत राहणाऱ्या दोन उच्च कुलांतील ब्राह्मणस्त्रिया कोल्हापुरास संन्याशांच्या वेषांत आढळल्या. अतिदुष्ट व कुटिल अशा परकी लोकांचा निकाल लावून टाकण्याकरितां केलेल्या कटांत, दक्षिणहिंदुस्थानांतलि एका संस्थानिकास सामील करून घेऊन, त्याची मदत मागण्याच्या उद्देशानें आपण आपल्या घरांतून बाहेर पडलों आहों, असें त्या सन्याशी—बायकांनीं कबूल केलें. पुढें, पोलिसानें शहाणपणा करून, ह्या स्त्रियांना त्यांच्या घरीं पोहोंचतें केलें. असें मोठ्या **देशाभिमानाचें** काम करून, आपल्या पतींची गेलेली प्रीति पुनः आपण संपादन करूं, असा ह्या वेड्या बायकांचा मुख्य हेतु होता. खरे **संन्यासी** बहुधा राजद्रोहाचा फैलाव करणारे **मिशनरी** असतात, ह्यांत शंका नाहीं. त्यांच्या पवित्रपणाच्या ख्यातीमुळें त्यांचा झनानखान्यांतहि प्रवेश होतो. अगदीं लहान वयामुळें ज्या मुलांना बंगाल्यांत झनान्यामध्यें **मज्जाव** नसतो, त्यांनादेखील राजद्रोहाची **चर्पटपंजरी** शिकवून ठेवलेली असते; व अशीं मुलें संन्याशाचीं भगवीं वस्त्रें परिधान करून, घरोघर जातात, आणि इंग्रजलोकांचा द्वेष करण्याविषयीं उपदेश करितात.

आतां आपल्यापुढें ( इंग्रज लोकांपुढें ) असा प्रश्न आहे कीं, मनोविकार व पूर्वग्रह यांच्या ह्या गुंतागुंतींतून चांगल्या

गोष्टी निराळ्या करितां येतील किंवा नाहीं? हिंदुधर्माचें पुनरुज्जीवन करूं इच्छिणाऱ्या लोकांत, राजकीयदृष्ट्या निंद्य व दुष्ट अशीं कृत्यें करण्याकडे जी प्रवृत्ति दिसून येते, ती जरी सोडून दिली; तरी आणखी पुष्कळ वाईट गोष्टी ह्या धार्मिक चळवळींत आहेत. तथापि, त्यांत ज्या उदात्त कल्पना कधीं कधीं दृग्गोचर होतात, त्यामुळेंच बहुधा ह्या चळवळीस खरा जोर येत असेल व त्यामुळेंच आह्मांस धोका असावा, असें वाटतें. बंगाली लोकांच्या मनोवृत्ती स्वाभाविकपणेंच मोठ्या विलक्षण रीतीनें उचंबळून जातात; व ह्या लोकांच्या मनावर बाह्यगोष्टींचा तात्काळ संस्कार होतो. त्यामुळें बंगाली लोकांच्या मनावर पारमार्थिक गोष्टींचा जसा परिणाम होतो तसा, केवळ ऐहिक गोष्टींची अपेक्षा असणाऱ्या दक्षिणी ब्राह्मणांवर होत नाहीं, असें ह्मटलें तरी चालेल.

कोणत्याहि गोष्टींचा नेहमीं अतिरेक करण्याचा बंगाली लोकांचा स्वभाव आहे. गेल्या शतकांत पाश्चिमात्य विद्येमुळें ज्यांचीं मनें सुसंस्कृत झालीं होतीं, त्यांपैकीं पुष्कळ वजनदार लोक पहिल्या झपाट्यास आपल्या पूर्वजांचा हिंदुधर्म व त्यांतील समाजव्यवस्था ह्यांवर घसरून पडले; आणि त्यांची प्रवृत्ति प्रथमतः ख्रिस्तीधर्माकडे—अथवा निदान त्यामधील नीतितत्वांकडे झाली; व मागाहून ह्याच लोकांचा कल पाश्चात्यांच्या अज्ञेयवादाकडे गेला. पण आतां हा मनु पालटला असून त्याच्या ऐवजीं पाश्चात्यांच्या प्रत्येक गोष्टीविषयींचा तिटकारा सध्यां सर्वत्र दिसून येतो. आतां तूर्त ह्या पालटलेल्या मनूचें जरी साम्राज्य आहे, तरी हेहि दिवस जातील—ह्मणजे, सध्याची प्रखर द्वेषबुद्धि कालांतरानें नाहींशी होईल. ह्या प्रश्नामधील अनेक गोष्टींचें ज्ञान आपणांस अद्यापि

झालेलें नाहीं; तथापि, ज्या गोष्टी कळून आल्या आहेत, त्यांवरून निदान ह्या प्रश्नाचें महत्त्व किती आहे, हें आपणांस चांगलें समजतें.

## भाग ८ वा.

# पंजाब व आर्यसमाज.

महाराष्ट्र व बंगाल हे प्रांत परस्परांहून जितके भिन्न आहेत तितकाच **पंजाब**—ह्मणजे पांच नद्यांचा प्रदेश—त्या प्रत्येकाहून आहे. बलाढ्य राजघराण्यांच्या सत्तेचें मुख्य स्थान व निरनिराळ्या अनेक लढवय्या लोकांचें व पंथांचें रणमैदान ह्या दृष्टीनें पंजाबचें जसें महत्त्व आहे, तसें हिंदुस्थानांतील इतर कोणत्याहि प्रांताचें नाहीं. सार्वभौम राजांची राजधानी **दिल्ली** व रणजितसिंगाचें **लाहोर** हीं दोन्ही शहरें पंजाबांतच आहेत. ह्या प्रांतांत पुष्कळ भाषा असून, तेथें नानाप्रकारच्या लोकांची वस्ती आहे. पंजाब जरी शीख लोकांची जन्मभूमि आहे, तरी मोंगलांची सत्ता स्थापन झाल्यापासून इकडे मुसलमानांची वस्ती होऊं लागली; व सध्यां तेथें ह्यांचीच संख्या अधिक आहे. आणि, पूर्वबंगालप्रांता-खेरीज येथल्यापेक्षां कोणत्याहि प्रांतांत हिंदूंची वस्ती इतकी कमी नाहीं. पंजाबांत पावसाचें मान फारच थोडें असल्याकारणानें, तेथील हवा अत्यंत रुक्ष असते. वर्षांतील बरेच दिवस तेथें भयंकर उष्मा असून, बाकीच्या हिंवाळ्याच्या दिवसांत थंडी इतकी कडक पडते कीं, पाणी गोठून जाऊन, त्याचें बर्फ देखील होतें. शांतता स्थापन करून, लोकांच्या मालमत्तेचा व जीविताचा सुरक्षितपणा वाढविण्यासाठीं व देशांत सुबत्ता आणण्यासाठीं, ब्रिटिशसरकारानें येथें जितक्या गोष्टी केल्या आहेत, तितक्या इतर ठिकाणीं नाहींत. येथील जमीन

नदींचा गाळ बसून थरावरथर तयार झाली असल्या कारणानें सुपीक आहे; परंतु पावसाच्या कमतरपणामुळें जणुं काय सदा तृषार्त दिसते. त्यामुळें, जमिनींतून उत्कृष्ट फायदेशीर पिकें काढण्याकरितां, पूर्वीं कधीं झालीं नाहींत अशीं येथें पाटबंधाऱ्यांचीं कामें करावीं लागलीं. हिंदुस्थानांतील इंग्रजी राज्यावर अत्यंत बिकट प्रसंग आला होता, तेव्हां पंजाबप्रांतावर सर जॉन लारेन्स साहेबांचा अम्मल होता. हे साहेब मोठ्या दृढनिश्चयाचे असून, पित्याप्रमाणें प्रजेचें पालन करीत असत. पंजाबांतील लोकांनीं मनाचा खंबीरपणा दाखविल्यामुळें, शिपायांच्या बंडाच्या लाटेची येथें समाप्ति झाली. आणि, सरकारची दूरदृष्टि व इंग्रजी इन्जिनिअरांचें कौशल्य ह्यामुळें ह्या प्रांताचें हळूं हळूं रूपांतर होऊन जिकडे तिकडे आबादानी नांदूं लागली आहे, व त्यांतील लोकांच्या राजनिष्ठेबद्दल शंका घेण्याचें थोड्यावर्षांपूर्वींपर्यंत तरी कांहीं कारण दिसत नव्हतें. त्यांतल्यात्यांत शीखलोकांच्या राजनिष्ठेबद्दल तर मुळींच प्रश्न नव्हता. पुष्कळ शीखलोकांचा असा समज होता कीं, त्यांच्या छळ झालेल्या गुरूंपैकीं एकानें भविष्य केल्याप्रमाणेंच हिंदुस्थानांत इंग्रजांचें राज्य झालें आहे. आणि शीख पलटणी ह्मणजे देशी सैन्यांतील अगदीं उत्तमभाग समजला जात असे.

असें असतांहि, पंजाबांतील रावळपिंडी व लाहोर ह्या शहरींच प्रथमतः भयंकर अत्याचार घडून आले, व त्यामुळें, हिंदुस्थानांत खरोखरच अस्वस्थता आहे, अशी विलायतेच्या लोकांची खात्री होऊन, तिकडे त्यांचें लक्ष्य वेधलें. आणि ह्याच अत्याचारामुळें, पूर्वीं कधीं उपयोग न केलेल्या अशा सन १८१८ सालच्या एका जुन्यापुराण्या कायद्याच्या जोरावर, दोन

प्रमुख हिंदी पुढाऱ्यांची चौकशीशिवाय उचलबांगडी करून, त्यांना हद्दपार करण्यासारखे कडक उपाय योजणें हिंदुस्थानसरकारास भाग पडलें. ह्या दंग्याधोप्यास कांहीं स्थानिक व अल्पकाल टिकणाऱ्या गोष्टी अंशतः कारणीभूत झाल्या असाव्यात. रावळपिंडी जिल्ह्यांतील जमिनीचा सारा वाढविण्यांत आल्यामुळें लोकांना फारच संताप आला होता. कालव्यालगतच्या नवीन वसाहतींत जमिनीच्या मालकीसंबंधानें जे नियम केले होते, ते प्रायः शहाणपणाचे नसून, त्यांची अमलबजावणीहि कांहींशी निष्ठुरपणानें होत होती. कालवे नसलेल्या भागांत दुष्काळाचें ठाणें असे; व विशेषेंकरून प्लेगमुळें पंजाबचा कांहीं मुलुख अगदीं बेचिराख होऊन गेला होता. ह्यामुळें लोकांना फार हालअपेष्टा सोसाव्या लागत होत्या; व त्यांच्यामध्यें अत्यंत असंतोष उत्पन्न झाला होता. कांहीं लांबच्या सामाजिक व सांपत्तिक कारणामुळेंहि ह्या असंतोषांत भर पडत होती. इंग्रजी अधिकाऱ्यांनीं केलेले कायदे, व न्याय करण्याची मोठ्या भानगडीची नवीन पद्धत, यामुळें पंजाबामध्यें जो दुष्परिणाम झाला, तसा हिंदुस्थानांत इतर कोठेंहि झाला नाहीं. व गोष्ट अशा थरावर येईल हें सरकारी अधिकाऱ्यांच्या नांवीं गांवींहि नव्हतें. ज्यांच्या प्रत्यक्ष ताब्यांत जमीन असेल त्यांच्याकडे तिची पूर्ण मालकी राहावी, असा जो कायदा करण्यांत आला, त्याचा मूळहेतु असा होता कीं, स्वतः शेत कसणाऱ्या लोकांच्या मालकीस अधिक बळकटी येऊन, त्यांच्या हक्कांचा सुरक्षितपणा वाढावा. परंतु ह्याचा परिणाम असा झाला कीं, सावकारांची मात्र स्थिति सुधारली. हिंदुस्थानांतील शेतकरी लोकांस काटकसरीनें राहण्याची संवय नसून लग्नकार्यें, प्रेतसंस्कार व इतर कुलाचार, ह्यांमध्यें, वाडवडलापासून

चालत आलेल्या रूढीप्रमाणें उधळेपणानें खर्च करून, सावकाराच्या तावडींत सांपडण्याची दुष्ट खोड त्यांना आहे. त्यामुळें खेड्यापाड्यांत ह्या सावकार लोकांनीं गरीब रयतेच्या घरादारांचें वाटोळें करून, आपण स्वतः गबर होऊन बसले आहेत. एम्. **शेले**साहेबानीं ह्या प्रश्नांचा चांगला विचार करून जें उत्कृष्ट पुस्तक लिहिलें आहे, त्यांत त्यांनीं असें ह्मटलें आहे कीं, "कर्जबाजारी शेतकऱ्याजवळ आतां सावकारास देण्यास दोन तारणें झालीं आहेत." पूर्वीं त्याला फक्त जमिनीचें पीक तारण लावून देतां येत असें; पण आतां त्याला जमीनसुद्धां तारण लावून देतां येईल. दुसरे पक्षीं, कायद्यांच्या व न्यायपद्धतीच्या कडकपणामुळें, आपले पैसे जलद उगवून घेण्यास सावकारांस चांगलें साधन झालें होतें. अशा तऱ्हेचे कायदे व न्यायपद्धति अस्तित्वांत आल्यामुळेंच अलीकडचा वकीलवर्ग निर्माण झाला असून, दोन्ही बाजूंस कानमंत्र देऊन व कोर्टाची पायरी चढावयास लावून, पक्षकारांस धुळीला मिळवून आपली तुंबडी भरण्याचें काम त्यांच्याकडून सतत चाललें होतें, ह्या नवीन अनिष्ट प्रकारास आळा घालण्याकरितां, सरकारानें एकामागून एक असे कांहीं विशेष स्वरूपाचे कायदे केले. परंतु, जमिनीच्या धारणेसंबंधानें जी क्रांति घडून येत होती, व त्यामुळें मुख्यतः अगदीं शांतताप्रिय व कायद्यास भिऊन वागणाऱ्या जातींतील लोकांचा तोटा होत होता, तिला मुळींच आळा बसला नाहीं. ह्याच जातींतून देशी सैन्यामध्यें पुष्कळ चांगल्या लढवय्या लोकांची भरती होत असते. कायद्याप्रमाणें अमलबजावणी केल्यामुळें ज्या हतभागी लोकांच्या जमिनी गेल्या त्यांस आपल्या उधळेपणामुळें हा दुर्धर प्रसंग ओढवला आहे, असें न वाटतां

सरकारच्या कायद्यामुळेंच आपली अशी दशा झाली आहे, असें वाटे. उलटपक्षीं, वकील व त्यांचे आशिल जे सावकार, हे बहुधा हिंदु असून, रयतेची स्थिति सुधारण्यासाठीं सरकार जे प्रयत्न करित होतें, त्यांमुळें त्यांच्या पोटावर पाय येत असल्या-कारणानें, तेहि लोक सरकारावर खवळून गेले.

पण हीं सर्व कारणें फक्त साहाय्यकारी होतीं. मुख्य कारणें फार खोल असून, महाराष्ट्रांत व बंगालप्रांतांत जशी अस्वस्थता माजून राहिली होती; त्याप्रमाणें पंजाबांत माजण्यास त्यांचा उपयोग होत होता. आतां, पंजाबांत ज्या कारणांमुळें अस्वस्थता उत्पन्न होत होती, त्यांपेक्षां महाराष्ट्रांतील व बंगाल्यांतील कारणें मुळांतच भिन्न असून, त्यांचे कांहीं परिणामहि भिन्न होत असत. पंजाबांतील अस्वस्थतेचें मुख्य कारण ह्मणजे तेथील हिंदुलोकांची **विरोध करण्याची प्रवृत्तिच** होय. आतां हा विरोध फक्त ब्रिटिश लोकांच्या राजसत्तेलाच करावयाचा त्यांचा इरादा होता, असें नाहीं; तर ज्या ज्या पाश्चिमात्य गोष्टींपासून हिंदुसमाजाची घडी बदलत असेल, त्या सर्वांना—निदान बोलण्यांत तरी, विरोध करावयाचा, असा त्यांचा निश्चय दिसत होता. पण, वस्तुस्थिति अशी होती कीं, ज्या पाश्चिमात्य गोष्टी नकोशा होत्या, त्यांचाच ठसा कांहीं अंशीं ह्या वरील चळवळीवर उत्तम प्रकारें उठलेला होता.

महाराष्ट्रांत अस्वस्थता उत्पन्न करण्याचें काम, पुराणप्रिय ब्राह्मणीधर्माच्या अभिमान्यांच्या हातीं जसें आहे, तसें पंजाबांत नसून, येथील लोकांत बंगाल्याप्रमाणें उतावीळपणा व उल्लूपणा दिसून येत नाहीं. पंजाबांतील चळवळींत महाराष्ट्रांतील चळव-ळीपेक्षां करडेपणा कमी असून, ती शुद्ध प्रतिकाररूपाची आहे;

आणि, तिच्यांत बंगाल्यांतील चळवळीपेक्षां अधिक शिस्त आहे.

हा पांच नद्यांचा प्रदेश मुसलमान लोकांच्या पूर्ण अमलाखालीं गेल्यापासून, जुन्या हिंदुधर्माचें वर्चस्व तेथें नाहींसें झालें. इस्लामलासुद्धां जातिभेदाचें प्राबल्य मोडतां आलें नाहीं; व मुसलमान लोकांमध्येंहि जाती असल्याचीं चिन्हें अद्यापि दिसून येतात. परंतु, पंजाबप्रांतांत जातिभेदांचीं बंधनें जितकीं शिथिल पडलीं आहेत, तितकीं इतरत्र नाहींत. कारण, प्रत्येक जातींत असंख्य पोटभेद पडले आहेत, ह्याच एका गोष्टीवरून जातिभेद रूपी दुर्ग किती ढांसळून पडला आहे, हें निदर्शनास येतें. हिंदुधर्माच्या अर्वाचीन इतिहासांत, त्यांतील जातिभेदाच्या जुलुमास कंटाळून, लोकांनीं जें बंड केलें व मोठा जय मिळविला, तोच शीखधर्म होय. आणि ह्मणूनच, पंजाबांत, इतर प्रांतांच्या मानानें, ब्राह्मणांचें वर्चस्व फारच कमी आहे. ब्राह्मणांमध्यें देखील अनेक पोटजाती असून, प्रत्येक पोटजातींत आणखी लहान लहान जाती झाल्या आहेत. त्यामुळें, पुष्कळ ब्राह्मणेतर हिंदुलोक खालच्या प्रतीच्या ब्राह्मणांनीं शिजविलेलें अन्न ग्रहण करित नाहींत; आणि लग्नसंबंधाच्या खालोखाल अन्नग्रहणावरूनच जातीचें उच्चनीचत्व ठरवितां येतें. असें असतांहि, पाश्चिमात्य आचारविचारांविरुद्ध सामान्य लोकांचीं मनें वळविण्याचा ज्या लोकाग्रणींनीं प्रयत्न केला, त्यांपैकीं एकास पंजाबप्रांतांतील हिंदूमध्येंच पुष्कळ उत्साही अनुयायी मिळाले. आर्यसमाजाचे संस्थापक स्वामी **दयानंद** सरस्वती, हे एक काठेवाडी ब्राह्मण होते. त्यांचा जन्म पंजाबांत झाला नसून, त्यांनीं आर्य–समाजाची स्थापनाहि पंजाबांत केली नाहीं; तर ती मुंबईशहरीं केली. पण, येथें ह्या रोप्यानें मूळ धरलें नाहीं. आयुष्याच्या उत्तरभा-

गांत त्यांनीं पंजाबप्रांत आपल्या चळवळीचें मुख्य ठिकाण केलें. ते जीं मतें प्रतिपादन करित होते, तीं सर्व त्यांनीं आपल्या **सत्यार्थ-प्रकाश व वेदभाष्यभस्मिका** ह्या पुस्तकांत गोविलीं आहेत. जसें ख्रिस्तीलोकांचें **बायबल** तसा आर्यसमाजवाल्यांचा **सत्यार्थप्रकाश** आहे; व दुसरा ग्रंथ ही एक वेदांवरील टीका आहे. हिंदुदेवतांवरील त्यांचा विश्वास पूर्ववयांतच अगदीं साफ उडून गेला होता; व एवढ्या गोष्टींत ते खरोखरच धार्मिक सुधारक होते. कारण, मूर्तिपूजेविरुद्ध त्यांनीं मोठ्या कठोरपणानें चळवळ सुरू केली होती, व त्यांचें मुख्य तत्व "वेदप्रामाण्य" हें होतें. बाकी आपणास वेदग्रंथ उत्तम कळतात, हें त्यांचें ह्मणणें कोणी कबूल करो वा न करो. पण त्यांच्या नीतिविषयक मतांत मोघमपणा होता. कांहीं बाबतींत विषयासक्तीचा पगडा त्यांच्यावर बसलेला असे; व कांहीं गोष्टींत ते सामान्य जनांच्या अडाणी समजुतींसहि बळीं पडत. असें विलक्षणप्रकारचें त्यांचें वर्तन असें. उदाहरणार्थ, प्राणिहत्या करूं नये, किंवा गोमांस भक्षण करूं नये, असें वेदांत सांगितलेलें नाहीं. परंतु, हिंदुलोकांमधील एका सर्वसामान्य भोळसर समजुतीस मान देऊन, गोहत्या हें अत्यंत मोठें पातक आहे, असें ह्मणण्यास दयानंदांनीं मागें पुढें पाहिलें नाहीं. वस्तुतः ह्याच एका गोष्टीवरून त्यांच्या धर्मतत्वांचें मुख्य धोरण कळून येतें. ख्रिस्ती व मुसलमानी धर्माशीं असणारें हिंदूंचें वैर कसास लावण्यास गाईची पवित्रताच फक्त साधनीभूत होते. आणि दयानंदाच्या उपदेशाचा ओघ, हिंदुधर्माची सुधारणा करण्यापेक्षां ज्या परकीय गोष्टीमुळें हिंदुधर्माचा त्यांच्या मतें ऱ्हास होत होता, त्यांना विरोध करण्याकरितां लोकांस उद्युक्त करण्याकडें असे. आणि ह्मणूनच जेव्हां जेव्हां

त्यांना ख्रिस्ती अगर मुसलमानी धर्माविषयीं बोलण्याचा प्रसंग येई तेव्हां तेव्हां त्यांची भाषा अत्यंत खोडसाळपणाची असे. मांसभक्षण व सुरापान करणारे फिरंगी हे गोवध व इतर प्राण्यांची हिंसा करितात, ह्मणून त्यांच्या येण्यामुळें **आर्य** लोकांना हाल-अपेष्टा सोसाव्या लागत आहेत. (हिंदु हा शब्द फारशी भाषेंतला असल्याकारणानें तो टाकून त्याच्या ऐवजीं **आर्य** हा शद्ब दयानंदानें प्रचारांत आणिला.) फिरंगी इकडे येण्यापूर्वीं हिंदुस्थानदेशांत रामराज्य असून जिकडे तिकडे आरोग्य व समृद्धि होती; आणि लोक मोठ्या सुखासमाधानांत होते. "फक्त वेदांचेंच प्रामाण्य माना" ह्या उपदेशापेक्षां, "आर्यावर्त फक्त आर्यांकरितांच आहे," ह्या मतावरच बहुधा दयानंदाच्या उपदेशांत जोर देण्यांत येत असे. स्वामीच्या मोठ्या आस्तेवाईक शिष्यांमध्यें लजपतरायाचा समावेश होतो; व यांनींच मोठ्या जोरानें सांगितलें आहे कीं, "**स्वदेशी** व **स्वज्ञाति** अशा भक्कम खडकावर स्वामी दयानंदजीच्या कारस्थानाचा पाया घातलेला आहे.

दयानंदांच्या मरणानंतर आर्यसमाजाचे **शाकफलाहारी** व **मांसाहारी** असे दोन पक्ष झाले. धार्मिकदृष्ट्या शाकफलाहाऱ्यांस **जुन्या** मताचे, व मांसाहाऱ्यांस **नवीन** मताचे ह्मणतां येईल. ह्या दोन पक्षांतील भेद अगदीं बरोबर रीतीनें सांगणें कठीण आहे; तथापि त्यांच्यांतील भांडणतंटे दिवसेंदिवस कमी होत चालले आहेत. दोन्ही बाजूला सुधारणाप्रिय व सुज्ञ असे लोक थोडे नाहींत; व त्यांची राजकीय मतें कशींहि असलीं, तरी हिंदुधर्माची सुधारणा करण्याचा जो दयानंदाचा कार्यभाग होता तो त्यांनीं आपल्या शिरावर घेतला असून, त्यांत त्यांना बरेंच

यश आलें आहे, ह्यांत शंका नाहीं. अगदीं बाल्यावस्थेंत मुलामुलींचीं लग्नें करून टाकण्याची चाल हिंदुसमाजांत असल्याकारणानें, त्यांचा शारीरिक व नैतिक ऱ्हास होतो. ह्मणून, ह्या हानिकारक चालीस फांटा देण्याचा प्रयत्न अगदीं मनोभावानें आर्यसमाजवाल्यांकडून एकसारखा होत आहे. त्याचप्रमाणें, पत्नीपदाला खरोखर पोहोंचण्यापूर्वींच पुष्कळवेळां हिंदु मुलींना वैधव्य येऊन, जन्मभर त्यांच्या हातीं पोळपाटलाटणें येतें. अशा हतभागी गतभर्तृकांची खडतर स्थिति सुधारण्याच्या कामासहि आर्यसमाजाच्या लोकांनीं आपणांस तनमनधनेंकरून वाहून घेतलें आहे. आणि हाच हेतु साधण्याकरितां स्त्रीशिक्षणास उत्तेजन देण्याच्या कामीं आर्यांनीं केव्हांहि मागें पुढें पाहिलें नाहीं. ह्या दिशेनें काम केल्यास समाजाचा फायदा किती उत्तम तऱ्हेनें होणार आहे, ह्या गोष्टीची प्रचीति, जालंदर येथील 'पोरक्या मुलींचा आश्रय' व त्याच ठिकाणचें 'विधवागृह' ह्यांवरून चांगली येते. हिंदुधर्मांत **अस्पृश्य** मानिलेले पुष्कळ लोक असून, त्यांचा सामाजिकदृष्ट्या उद्धार करण्याचें काम आजपर्यंत सर्वथैव ख्रिस्ती लोकांच्या हातीं असें. कांहीं अंशीं मुसलमान लोकहि ह्या कार्यास हातभार लावीत. परंतु ही स्थिति पालटून, आतां आर्यसमाजवाले आपल्या हतभागी धर्मबंधूंस पूर्वींपेक्षां चांगल्या प्रकारें वागवूं लागले आहेत; व हिंदुधर्मी लोकांत हें काम प्रथमतः आर्यसमाजवाल्यांनींच सुरू करून, ख्रिस्ती व मुसलमान लोकांचें अनुकरण केलें आहे, हें निर्विवाद आहे. निरनिराळ्या जिल्ह्यांत शाळा व विशेषतः धंदेशिक्षणाचे वर्ग काढण्यांत आले आहेत. त्यामुळें, उत्तरोत्तर तरुण पिढीची योग्यता वाढल्याशिवाय राहणार नाहीं; व खालच्या जातींतील लोक आज-

पर्यंत जे दास्यांत आहेत, त्यांतून त्यांची हळूं हळूं मुक्तता होईल. व अशाच दुसऱ्या उदार अंतःकरणानें सुरू केलेल्या सुधारणा जुन्या धर्माच्या अभिमानी लोकांस न आवडल्यामुळें, त्यांना **समाजवाल्यांचा** अत्यंत राग आला; व कांहीं काळ त्यांच्याशीं सर्व प्रकारचा व्यवहार त्यांनीं बंद केला. हिंदुस्थानच्या इतर भागांत, पाश्चिमात्य लोकांच्या आचारविचारांचा पगडा सुशिक्षित हिंदी लोकांच्या मनावर बसल्या-कारणानें, सामाजिक सुधारणेची कल्पना निघाली. ह्मणून, पाश्चिमात्य लोकांच्या विद्याचारसंपन्नतेविरुद्ध जी हल्लीं लाट उसळली आहे, तिच्यामुळें सामाजिक सुधारणेच्या चळवळीचा जोर कमी होऊन, ती अगदीं मागें पडल्यासारखी झाली आहे. परंतु, पंजाबांत सामाजिक सुधारणेचा संबंध, ‘आर्यावर्त आर्य लोकांकरितांच आहे’ ह्या मताशीं आहे. पंजाबांत आर्यसमाजाकडून राजकीय चळवळी होत असतात. निदान, अलीकडे ब्रिटिश सरकाराविरुद्ध ज्या कांहीं खटपटी पंजाबांत झाल्या, त्यांत आर्यसमाजांतील बऱ्याच मोठमोठ्या सभासदांनीं पुढाकार घेतला होता. त्यामुळें हे **समाजवाले** ज्या सामाजिक सुधारणा करूं इच्छितात, तिकडे जुन्या धर्माचे अभिमानी कांहींसा कानाडोळा करूं लागले आहेत, किंबहुना त्यांना यश यावें अशी सदिच्छा देखील प्रगट करित असतात. पण, **समाजवाले** जर राजकीय चळवळींत अंग घालतेना, तर मात्र अशा प्रकारची स्थिति पंजाबांत निःसंशय नसती. आतां ज्या आर्यसमाजाच्या सामाजिक चळवळींमध्यें पाश्चिमात्य शिक्षणाचा ठसा इतक्या स्पष्टपणें उमटलेला दिसतो, त्याच आर्यसमाजानें ब्रिटिश सरकारविरुद्ध असलेल्या राजकीय चळवळींत इतका

पुढारीपणा घ्यावा, ही गोष्ट हिंदुस्थानांतील अस्वस्थतेविषयीं विचार करितांना जे कांहीं परस्परविरोधी विलक्षण प्रकार आढळून येतात, त्यांपैकींच एक आहे.

वस्तुतः पुष्कळ आर्यलोकांचें मोठ्या जोरांचें असें ह्मणणें आहे कीं, **समाजांत** असंतोषाचें बीज मुळींच नाहीं; तसेंच, तो राजकीय चळवळींतहि पडत नाहीं. लाहोर येथील **आर्यसमाजाच्या** शाखेचे अध्यक्ष मि. **रोषनलाल** यांनीं मला खात्रीपूर्वक सांगितलें कीं, **समाज** केवळ नैतिक व धार्मिक सुधारणेकडेच लक्ष देत असतो. मि. रोषनलाल यांच्याविषयीं व्यक्तिशः बोलावयाचें ह्मणजे त्यांनीं जी खात्री दिली आहे, त्याबद्दल मला मुळींच शंका वाटत नाहीं. आणि, **आर्यसमाज** या संस्थेनें राजकीय चळवळींत कधींहि अंग घातलें नसावें. तसेंच, **समाजाचे** पुष्कळ सभासद व्यक्तिशः अशा चळवळींपासून अगदीं अलिप्त राहिले असतील. परंतु, समाजाच्या लहानसान नव्हे, तर चांगल्या वजनदार सभासदांपैकीं पुष्कळांनीं पंजाबांतील व त्याच्या लगतच्याच संयुक्तप्रांतांतील गेल्या कांहीं वर्षांच्या राजकीय चळवळींत पुढाकार घेतल्याबद्दल जो पुरावा पुढें आला आहे तो फारच सबळ आहे. सन १९०७ सालीं रावळपिंडीस जे दंगेधोपे झाले, त्यांतील पुढारी ‘ आर्यच ’ असून, खरोखर गडबड होण्यापूर्वीं दोन वर्षें, दांडगाईस उत्तेजन देण्याकरितां जी चळवळ मोठ्या जोरानें चालू होती, तींत **अजितसिंग** व लाला **लजपतराय** ह्या दोघांनीं जसा पुढाकार घेतला, तसा दुसऱ्या कोणींहि घेतला नाहीं. हे दोघेहि मोठे वजनदार आर्यसमाजवाले आहेत. ह्यांना हद्दपार करतांच तावडतोब शांतता झाली, ह्यावरूनच दंगाधोपा करण्याच्या कामांत त्यांचें अंग असावें, असा जो समज झाला

होता, त्याला बळकटी येते. सध्यां अजितसिंग फरारी आहे. त्यामुळें, बांबगोळे तयार करणें, खून करणें, इमारतींचा वगैरे नाश करणें, इत्यादि विषयांवरील पुस्तकांचें भाषांतर करून व तीं प्रसिद्ध करून राजद्रोह पसरविण्याच्या आरोपाबद्दल, त्याच्या गैर हजेरींत, लाहोर येथें काम चाललें होतें. हा खटला चालला असतां, लाला लजपतरायाचीं कांहीं पत्रें कोर्टांत हजर करण्यांत आलीं होतीं. त्यांवरून असें दिसून येतें कीं, रावळपिंडीस दंगे होण्याच्याच सुमारास, **इंडियन सोशिऑलजिस्ट** ह्या पत्राचे मालक ह्मणून प्रसिद्धीस आलेले जे **शामजी कृष्णवर्मा** यांच्याकडे, लाहोरच्या विद्यार्थ्यांस खऱ्या राजकीय मतांची कल्पना ज्या पुस्तकांवरून होईल, अशा पुस्तकांची मागणी लालाजींनीं केली होती. शिवाय, राजकीय मतांच्या प्रसारार्थ लोक पाठवावे लागतात, त्यांचा खर्च भागविण्याकरितांहि मदत मागितली होती. यांपैकीं एका पत्रांत, "लोक अगदीं दुर्मुखलेले असून, शेतकरी वर्गानें धडपड सुरू केली आहे" असें प्रथमतः लिहून, नंतर अर्थपूर्ण शब्दांनीं लालाजी ह्मणतात कीं "मला फक्त एवढीच भीति आहे कीं, योग्य वेळेपूर्वींच भडाका उडून न जावो." भाई **परमानंद** नांवाच्या एका प्रमुख समाजवाल्याशीं लजपतरायाचा पत्रव्यवहार होता. परमानंद भाई दयानंद अँग्लो-वेदिक कालेजांत अध्यापक असतांना, त्यांचे पाशीं बांब करण्याच्या निरनिराळ्या कृति सांपडल्या होत्या. शिवाय, कलकत्त्याच्या माणिकतोळा बागेंत जें पुस्तक सांपडलें, त्याचीच एक प्रत परमानंदाजवळ होती.

पंजाबामध्यें **पतियाळा** नावाचें एक **शीख** संस्थान आहे. तेथें गेल्या दिसेंबरांत एक राजद्रोहाचा खटला चालू होता.

त्यांतील ७६ आरोपित ह्मणजे बहुतेक सर्वच आर्यसमाजवाले होते. त्यांत पुष्कळ मोठमोठे हुद्देदार व प्रतिष्ठित लोक होते. ह्या खटल्यामुळें **आर्यसमाज** ह्या संस्थेवरच एवढा मोठा दोष येऊं लागला कीं, **समाजा**पैकीं एका प्रमुख कायदेपंडितास **समाजाच्या** वतीनें वकीलपत्र देण्यांत आलें होतें. ह्या खटल्याच्या सुरवातीस सरकारतर्फेच्या वकिलानें जें भाषण केलें त्यावरून असें दिसून येतें कीं, आरोपितांपैकीं कांहीं शाळामास्तर असून, त्यांनीं विद्यार्थ्यांमध्यें बंडाच्या कल्पनांचा प्रसार चालविला होता, व ह्याच बाबतींत जुन्या विद्यार्थ्यांशीं पत्रव्यवहार ठेविला होता. कांहीं जणांवर **युगांतर** व **स्वराज्य** अशा प्रकारच्या पत्रांचा प्रसार करण्याचा आरोप असून, कांहींवर गुप्तसभा भरून, लोकांस चिथविण्यासारखीं व्याख्यानें देण्याचा आरोप होता; आणि कांहींवर मुझफरपूर येथील खुनी मनुष्य खुदिराम बोस ह्यासारख्या प्रसिद्ध बंडखोरांचीं चित्रें व फोटोग्राफ वाटण्याबद्दल होता. हे सर्व आरोपित **आर्य** होते इतकेंच नव्हें, तर मोठे **प्रमुख आर्य** असून, त्यांपैकीं कांहीं या **समाजा**च्या शाखांचे संस्थापक होते, अथवा पतियाळा येथील कमिट्यांचे सभासद होते. सरकारी वकिलानें पुराव्याचें जें दिग्दर्शन केलें, त्यावरून वरील आरोप कितपत शाबित झाले असते, हें सांगणें अशक्य आहे; तथापि, पुढें येणारा पुरावा अत्यंत भयंकर स्वरूपाचा असावा असें ह्मणण्यास कांहींच वाजवी हरकत दिसत नाहीं. कारण, खटल्याची सुरवात होतांक्षणींच, आरोपितांनीं महाराजांकडे अर्ज करून, आपणांवर दया करण्याविषयीं प्रार्थना केली. आपल्याकडून गैरसमज उत्पन्न होण्यासारखी कांहीं वागणूक झाली असल्यास, त्याजबद्दल अर्जांत खेद प्रदर्शित केला होता. तसेंच, आपल्याकडून कांहीं अविचा-

राच्या गोष्टी घडल्या असतील, तर त्याबद्दल सपशेल माफी मागितली होती, व क्रांतिकारक आणि अराजक लोकांविषयीं व त्यांच्या घोर कृत्यांविषयीं "अत्यंत तिटकारा व भयंकर त्वेष" व्यक्त केला होता. यानंतर महाराजांनीं खटला काढून टाकण्याविषयीं हुकूम दिला. परंतु सर्व आरोपितांस तावडतोब संस्थानच्या हद्दींतून घालवून देऊन; जे नोकरींत होते त्यांस बडतरफ करण्यांत आलें. आणि पुढें, फारच थोड्याजणांना त्यांच्या शिक्षेची माफी देण्यांत आली.

खून करण्याकडे लोकांची प्रवृत्ति होईल, अशा प्रकारचा उपदेश शामजी कृष्णवर्मा आपल्या पत्रांतून करित असतो. दोन वर्षांपूर्वीं समाजाला धोक्यांत घालण्यासारखी जी त्याची प्रशंसा शामजीनें आपल्या पत्नांत केली होती, तिच्या खरेपणाची खात्री, गेल्या कांहीं वर्षांतील राजकीय चळवळींत पुष्कळ आर्यसमाजवाल्यांचें निःसंशय अंग होतें, ह्या गोष्टीवरून खास पटते. कृष्णवर्म्यानें ह्मटलें आहे कीं, "राजकीयदृष्ट्या देशाचा उद्धार करण्याकरितां ज्या चळवळी हिंदुस्थानांत चालू आहेत, त्या सर्वांमध्यें आर्यसमाजाइतकी बलवान् दुसरी कोणतीच नाहीं." पुढें त्यानें आणखी असेंहि ह्मटलें आहे कीं, "यत्किंचित् परावलंबी नाहीं असें पूर्णस्वातंत्र्य उपभोगणारें स्वराज्य हेंच आर्यसमाजाचें ध्येय आहे, असें त्याच्या मूळ संस्थापकानें सर्व जगास जाहिर केलें आहे." आणि, दयानंदजींच्या हयातींतच व **समाजाचें** काम चालविण्याकरितां जें **मंडल** त्यांनीं नेमिलें होतें, त्यांत कृष्णवर्मा सभासद असून, दयानंदजींच्या मरणानंतर त्यांच्या मृत्युपत्राची व्यवस्था लावणाऱ्यांपैकींहि ते एक होते.

**आर्यसमाजाचा** कल कोणत्या बाजूस आहे, ह्या प्रश्नाला

इतकें महत्त्व देण्याचें कारण असें कीं, त्यानें एक विशेषप्रकारच्या शिक्षणपद्धतीची प्रचीति पाहण्याचा उपक्रम केला असून, तिचा तरुण पिढीवर फार मोठा परिणाम होण्याचा संभव आहे. या **समाजाचें** एक उत्तम लक्षण ह्मणजे, मुलामुलींच्या शिक्षणाकडे त्यानें पुरविलेलें लक्ष होय. परंतु, सन १८९८ पर्यंत, या **समाजाच्या कार्यकारी मंडलानें** वैदिकपद्धतीनें शिक्षण देण्याचा उपक्रम केला नव्हता. ही कल्पना मूळ दयानंदजीनीं काढिली होती. पण, त्यांना स्वतःला ती मुळींच अमलांत आणितां आली नाहीं. ह्या पद्धतीप्रमाणें ह्मटलें ह्मणजे, मुलास अगदीं बालपणींच धर्मशिक्षकाच्या ( गुरूच्या ) पूर्ण स्वाधीन करण्यांत येतें. हा गुरु त्या मुलाला पितृस्थानीं होतो इतकेंच नव्हें, तर पित्यापेक्षांहि त्याची योग्यता अधिक असते. कारण, मनूनें ह्मटलें आहे कीं, " जन्मदात्या पित्यापेक्षां, वेद शिकवून पारमार्थिक ज्ञान प्राप्त करून देणारा गुरु पूज्य आहे; कां कीं, उपनयनसंस्कारामुळें द्विजातीयांचें ऐहिक व पारलौकिक जन्मांचें सार्थक होतें. " **आर्यसमाजानें** स्थापन केलेल्या **गुरुकुलांमध्यें** ( शाळांमध्यें ) सहा आणि दाहा वर्षांच्या मधील मुलांस **चेले** ( शिष्य ) ह्मणून घेतात. शाळेंत दाखल केल्यापासून शिक्षण संपून मुलगा बाहेर पडेपर्यंत, त्याचा बाहेरील जगाशीं असलेला सर्व संबंध तुटतो. गुरुकुलांत मुलांचें शिक्षण पुरें होण्यास १६ वर्षें लागतात. त्यांपैकीं पहिलीं १० खालच्या वर्गांत व बाकीचीं ६ वरच्या वर्गांत, **ब्रह्मचारी** ह्मणून घालवावीं लागतात. अशा प्रकारें विद्यार्थिदशेंत असतांना, मोठ्या आणीबाणीच्या प्रसंगाशिवाय, चेल्यांना आपल्या घरीं नातेवाईकांना भेटण्यास जाऊं देत नाहींत. आईबापांना देखील

महिन्यांतून एका वेळेपेक्षां जास्त भेटूं देत नाहींत; आणि तेव्हां-सुद्धां गुरुकुलाच्या मुख्याची परवानगी घ्यावी लागते, सांप्रत पंजाबमध्यें तीन गुरुकुलें आहेत. परंतु, सर्व गुरुकुलांत अत्यंत मोठें व अडीचशेंवर विद्यार्थी असलेलें, **संयुक्त**प्रांतांत **कांग्री** मुक्कामीं आहे. हें ठिकाण, जेथें **गंगा**नदी लहानशा दरींतून मोठ्या मैदानांत बाहेर पडते, अशा **हरिद्वार**क्षेत्रापासून सुमारें पांच मैल आहे. मोठी व फार लोकप्रिय अशी यात्रा ( मेळा ) कांग्रीस दरसाल जमते. ह्या वेळीं तेथील गुरुकुलांतील ब्रह्मचारी यात्रेंत व्यवस्था ठेवण्याकरितां व आपल्या गुरुकुलासाठीं पैसे गोळा करण्याकरितां **स्वयंसेवक** होऊन येतात. या वेळीं लोकांत फारच मोठा उत्साह असतो, असें ह्मणतात. गेल्या सालीं गुरुकुलाला तीन लाख रुपयांवर एकंदर देणग्या मिळाल्या, असें चांगल्या आधारावरून कळतें.

गुरुकुलांतली राहणी अगदीं साधी—किंबहुना तपस्वि-वृत्तीची—असते. येथील शिस्त फार कडक असून, खाणेंपिणें अगदीं साधें असतें. दिवसांतून बराच वेळ शारीरिक शिक्षणाकडे दिलेला असतो. अशा तऱ्हेनें गुरूच्या देखरेखीखालीं, १६ वर्षें मठांत राहून शिक्षण पुरें झाल्यावर, ह्या तयार झालेल्या चेल्यांस सर्व हिंदुस्थानांत **आर्यसमाजा**च्या मतांचा प्रसार करण्याकरितां पाठविण्यांत येईल. अर्थात् भावी हिंदुस्थानचें **शील** व **मत** बनविण्याचे कामीं या संस्थांचा फार मोठा उपयोग झाल्याशिवाय राहणार नाहीं. ह्या शिक्षणाचा परिणाम कसा काय होतो, हें पाहण्यास आणखीं पांच वर्षें गेलीं पाहिजेत. कारण, तेव्हां ह्या चेल्यांची पहिली टोळी बाहेर पडून, कामास लागणार आहे. सध्यां तरी, पंजाबचे ले० गव्हनर सर लुई **डेन** यांनीं,

**आर्यसमाजा**च्या अध्यक्षांनीं **समाजा**च्या राजनिष्ठेविषयीं खात्री दिली, त्यावेळच्या आपल्या उत्तरादाखलच्या भाषणांत, जी आशा स्पष्टपणें दर्शविली, तीच पुनः दर्शविण्यापलीकडे दुसरें कांहीं कोणास करितां येणार नाहीं. ते ह्मणाले कीं, "धार्मिक व सामाजिक सुधारणा आणि प्रगति होण्यासाठीं हा **समाज** स्थापन करण्यांत आला आहे, असें वाटतें. ह्मणून, आपला मूळ हेतु बाजूस ठेवून, **समाज** भलत्याच मार्गानें जाणार नाहीं; व येथें (हिंदुस्थानांत) स्थापन झालेल्या सरकाराशीं योग्य प्रकारची राजनिष्ठा असणें शक्य नाहीं, अशा प्रकारचे उद्देश ज्या राजकीय संस्थांचे असतात, त्यांच्या माळेंत हा 'समाज' घसरून जाऊन पडणार नाहीं, अशी मला आशा आहे. परंतु, खुद्द दयानन्दाच्या उपदेशाच्या धोरणावरून व त्यांच्या पुष्कळ शिष्यांच्या आचरणावरून, वरील आशा सफळ होण्याचें चिन्ह दिसत नाहीं. ह्या वरील शिष्यमंडळींत, गुरुकुलाशीं खरोखर संबंध असलेल्या कित्येक गृहस्थांचा समावेश होतो.

तथापि, सन १९०७ सालापासून ह्मणण्यासारखे भयंकर दंगे फिरून पंजाबांत झाले नाहींत. आणि, जरी देशी वर्तमानपत्रांचा जहालपणा नवीन प्रेसआक्ट होईपर्यंत कमी झाला नाहीं, व फौजदारी खटल्यांच्या मोठ्या संख्येवरून राजद्रोहाचा फैलाव होत होता असें दिसून आलें, तरी पण, बंगाल्यांतील व महाराष्ट्रांतील अस्वस्थतेचें पर्यवसान खुनासारख्या घोर कर्मांत व दरवड्यांत होऊन, मोठी शोचनीय स्थिति प्राप्त झाली, तसा प्रकार ह्या प्रांतांत मुळींच झाला नाहीं. तथापि, ब्रिटिश सरकाराविरुद्ध इकडील लोकांची मनांतल्यामनांत जळफळ चाललेली आहेच. पंजाबांतील मोठमोठ्या शहरीं पुष्कळ बंगाली

लोक येऊन राहिले आहेत; व त्यांच्या चिथावणीमुळें कांहीं अंशीं ही वरील स्थिति आलेली आहे. हे बंगालीलोक सुशिक्षित असल्याकारणानें वकिलीच्या व वर्तमानपत्राच्या धंद्यांत त्यांचें वजन चांगलें बसलें आहे. परंतु, जेथें जेथें **आर्यसमाजाचें** काम मोठ्या जोरानें चालू असतें, तेथें तेथें ब्रिटिश लोकांविषयींचा द्वेष ढळढळीत दिसून येतो; आणि परधर्मी लोकांस आपल्या कळपांत ओढण्याचें सामर्थ्य आर्यसमाजाच्या अंगीं फार आहे, ही गोष्ट पूर्वींच सिद्ध झालेली आहे. समाजाचीं सभागृहें धार्मिक उत्सवांसच उपयोगी पडतात असें नाहीं; तर मोठमोठ्या शहरांत सुशिक्षित लोकांचा मोठा भरणा असल्याकारणानें, त्यांचे क्लब तेथें होऊन, सामाजिक गोष्टींकरितांहि त्या गृहांचा उपयोग होतो. समाजांत खरोखर सामील न झालेल्या हिंदु व शीख लोकांस येथें मोठ्या खुषीनें येऊं देतात. येथें अगदीं मोकळेपणानें राजकीय विषयांवर चर्चा चालते. त्यामुळें, अशा हिंदु व शीख लोकांस त्या ठिकाणीं जावेंसें वाटतें. आणि, अशा प्रकारच्या जागा त्यांच्यांत नसल्याकारणानें, सभासदीचे सर्व हक्क मिळवून आपण तेथें जावें, अशी त्यांची लवकरच प्रवृत्ति होते. अशा रीतीनें पुष्कळ सुशिक्षित लोकांस व देशी अमलदारांसहि समाजानें आपल्या कळपांत ओढलें आहे. परंतु, समाजाचें वजन एवढ्याच लोकांवर असतें, असें नाहीं; तर पुष्कळ शीख व नवमुसलमान लोकहि त्याचे सभासद झाले आहेत. मुख्यत्वेंकरून जातिभेदाच्या जुलुमास कंटाळून, ज्या लोकांनीं अलीकडेच महमदी धर्माची दीक्षा घेतली आहे, त्यांस पंजाबांत **नवमुसलमान** ह्मणतात. याच कारणामुळें, पुष्कळ हलक्या जातीचे हिंदुलोक त्यांत शिरतात. कारण, जरी समाजानें उघडपणें जातिभेदास

धाब्यावर बसविलेलें नाहीं, तरी तिकडे लक्ष न देण्याचें धैर्य त्याच्यांत आहे. समाजाचे बहुतेक पुढारी सुशिक्षित आहेत; व कांहींतर फारच मोठे विद्वान् आहेत. तथापि, खालच्या दर्जाच्या लोकांना व विशेषतः शेतकरी वर्गाला आपला पंथ आवडेल, अशा रीतीनें त्यांच्यापुढें आपलीं मतें मांडण्याची विद्या त्यांना अवगत आहे. ह्या समाजाच्या कार्यक्रमाचा एक अत्यंत अनिष्ट प्रकार ह्मटला ह्मणजे, हिंदी सैन्यांत व विशेषतः ज्यांच्यांशीं समाजवाल्यांचा बराच साक्षात्संबंध आहे, अशा शीख व जाट लोकांत, त्यानें चालविलेला आपल्या मतांचा प्रसार हा होय. देशी सैन्यांतील भरतीस अडथळा करण्याचें मुख्यतः आर्यांचें ब्रीद आहे, असें दिसतें. कांहीं पलटणींत तर खरोखरच फितूर करण्याचा उद्योग त्यांनीं कित्येक वेळां केला आहे. तसेंच, हिंदी सैन्याच्या बराकींच्या हद्दींत त्यांचे हेर आढळण्यांत आले आहेत. सध्यां शीखधर्माचें–सुद्धां नवीन रूपांतर होत आहे. त्याचा साधारण कल हिंदुधर्मांत पुनरपि मिसळून जाण्याचा आहे. तथापि, हिंदुधर्माच्या जातिभेदावरूनच निघालेले व शीख लोकांत तूर्त अस्तित्वांत असलेले वर्ग नाहींसे करून, सर्व शीख लोकांस समान मानण्याची जी एक मोठी लक्षांत घेण्यासारखी चळवळ सुरू झाली आहे, ती केवळ **आर्यसमाजा**मुळेंच आहे. आर्यसमाजाच्या उत्क्रांतीचा विचार करूं लागलें ह्मणजे, शीख लोकांचा इतिहास डोळ्यासमोर अगदीं स्पष्ट दिसूं लागतो. ह्या धर्माची स्थापना **नानकानें** सोळाव्या शतकाच्या आरंभीं केली; व त्याचा मूळहेतु केवळ धार्मिक व नैतिक सुधारणा करण्याचा होता. परंतु, पन्नास वर्षांचे आंत, **हरगोविंदनें** त्याला भयंकर राजकीय

स्वरूप देऊन, त्याचें लष्करी सामर्थ्य विलक्षण वाढविलें. ह्मणून, ज्यांना पंजाब प्रांताची उत्तम माहिती आहे, व तेथील कडव्या लोकांच्या अंगांत क्षात्रतेज कसें आहे, हेंहि जे जाणतात, त्यांपैकीं कित्येकांचें मत असें आहे कीं, महाराष्ट्रा-पेक्षां अथवा बंगाल्यापेक्षां पुढें मागें पंजाबांत फार मोठा अनर्थ उसळण्याच्या भीतीबद्दल आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं. आर्य-समाजाचीं मतें पसरविण्याच्या उद्योगाचा एक अत्यंत विपरीत परिणाम ह्मणजे, हिंदुमुसलमानांमधील वाढतें वैर हा होय; व त्याबद्दल आजच मोठी काळजी वाटूं लागली आहे. कारण, मुसलमानांची अशी पक्की खात्री होऊन चुकली आहे कीं, **आर्यसमाजाचें** ब्रिटिशराज्याशीं जितकें वैर आहे, त्यापेक्षां मुसलमानी धर्माशीं कोणत्याहि दृष्टीनें कमी नाहीं.

## भाग ९ वा.

# मुसलमानलोकांची स्थिति.

मोगल बादशाहांची जुनी राजधानी जें दिल्ली-शहर तेथें असतांना, एके दिवशीं संध्याकाळीं तेथील एका पुढारी मुसलमान गृहस्थाबरोबर गाडींत बसून, एक मोठी मशीद पाहण्यास मी गेलों होतों. ह्या मशिदीचें नांव "कुव्वतुल-इस्लाम" (इस्लामचें सामर्थ्य) असें असून, ती सध्यां मोडकळीस आली आहे. परंतु, तिच्या केवळ नांवावरून हिंदुस्थानांतील मुसलमानी बादशाहांच्या वैभवाची जशी साक्ष पटते, तशीच त्या मोडक्या तोडक्या इमारतीची शोभा पाहिली ह्मणजे देखील पटते. आह्मांला भेटण्याकरितां आणखी दोघे तिघे मुसलमान गृहस्थ आले होते. अशी आह्मी सर्व मंडळी नंतर कुतुबमिनारच्या सावलींत बसलों. हा मनोरा फार उंच असून, भव्यहि आहे; व मुसलमानांस नमाज पडण्याची आठवण देण्याकरितां, त्यावरून आज कैक वर्षें सतत बांग देण्यांत येत असते. आह्मी सर्व अलाई दरवाज्याजवळ बसलों होतों. हा दरवाजा मोठा असून, तो तांबडा वाळूचा व पांढरा संगमरवरी, असे दगड घालून बांधलेला आहे. मशिदीच्या बाहेरल्या तटांतील दक्षिण बाजूची वेस ह्मणजेच हा दरवाजा होय. आणि, त्याचा भव्यपणा, व त्यावरील संगमरवरी दगडाचें नाजूक जाळीकाम व त्यांतील नानातऱ्हेच्या आकृती अद्यापि चांगल्या दिसून येत असल्यामुळें, हा मनोरा ह्मणजे मुसलमान लोकांच्या

प्राचीन शिल्पकलेचा, सर्वांगपूर्ण असा, एक नमुनाच आहे. अशा ह्या मनोऱ्याजवळ आह्मी दोन तासांपेक्षां अधिक वेळ बसून, हिंदुस्थानांतील मुसलमानांची पुढें काय स्थिति होईल, ह्याविषयीं वाटाघाट केली. ह्या प्रसंगाचें मला कधींहि विस्मरण व्हावयाचें नाहीं. कारण, ज्या इमारतीजवळ आह्मी बसलों होतों, ती मुसलमानलोकांच्या कुलाभिमानाचें व धर्माभिमानाचें सामर्थ्य जगास शेंकडों वर्षें दाखवित आली असतां, आतां तेथेंच मुसलमानांच्या अंतःकरणांत उत्पन्न झालेल्या उदासीनतेनें व निराशेनें त्यांची बहुतेक कंबर खचून गेल्याचा देखावा दृष्टीस पडला, त्यामुळें माझ्या मनावर एकदम धक्का बसल्यासारखा परिणाम झाला. माझ्या मित्रांच्या एकंदर भाषणावरून मला असें वाटलें कीं, मोठा सारासार विचार करून, मुसलमानांनीं ब्रिटिश लोकांविषयीं राजनिष्ठा दाखविली पाहिजे, असें त्यांचें मत झालें आहे. तथापि, पुढें हिंदुस्थानांतील मुसलमानांस कोणत्या तऱ्हेचे दिवस येतील, ह्याबद्दल त्यांच्या मनांत मोठी चिंता उत्पन्न झाली आहे, असें दिसलें. ह्मणजे, हिंदुस्थानांतून इंग्रजी राज्य जाईल कीं काय? किंवा, "हिंदी स्वराज्य" होऊन, शेवटीं सर्व खरी सत्ता हिंदुलोकांच्या हातीं येऊन, इंग्रजी राज्याचें सामर्थ्य हळूं हळूं नामशेष होईल कीं काय? आणि, असे प्रश्न त्यांच्या डोळ्यांसमोर असल्यामुळें, ते लोक अगदीं गांगरून गेले आहेत. तथापि, मनांत वितुष्ट येऊन किंवा अंगाचा संताप होऊन ते मजपाशीं बोलत होते, असें नाहीं. मुसलमान लोक विद्येंत मागें आहेत; जुन्या पद्धती सोडून, नवीन परिस्थितींत चढाओढ करून जय मिळविण्यासाठीं जे गुण अंगीं असले पाहिजेत, ते संपादन करण्याची त्यांची

तयारी नाहीं; समाजसेवा करणें (सार्वजनिक हितासाठीं झटणें) हें आपलें कर्तव्य आहे, अशी जाणीव अद्यापि त्यांच्यामध्यें पूर्णपणें आली नसल्यामुळें, त्यांना व्यवस्थितपणें व एकजुटीनें काम करितां येत नाहीं; तसेंच, त्यांच्यांतील भिन्न भिन्न पंथ व जाती यांत परस्परांविषयीं बहुधा मत्सरबुद्धि असून, सर्वांमध्यें स्वार्थबुद्धि परिपूर्ण आहे. आणि, अशा तऱ्हेच्या उणीवा आपल्या लोकांत असल्याचें त्यांनीं मजपाशीं मनमोकळेपणानें कबूल केलें. आपल्या अंगच्या कमीपणामुळें आपलें कसें भयंकर नुकसान होत आहे, ही कल्पना त्यांना होऊं लागली आहे. परंतु, अशा उणीवा भरून काढण्यास लागणारा वेळ त्यांना मिळेल किंवा नाहीं? हिंदुस्थानांतील नानाविध वंश, पंथ व जाती ह्यांतील लोकांस समतेनें व न्यायानें वागविण्यासाठीं, व कोणाचें नुकसान न होऊं देतां सर्वांचा फायदा होईल, अशा रीतीनें पितृवत् प्रजापालन करण्यासाठीं, आमची ब्रिटिश लोकांची हिंदुस्थानांत रवानगी झाली आहे, असें राजसत्ताधारी ब्रिटिश लोकांचें नेहमीं ह्मणणें असतें. सर्व प्रकारच्या सरकारी नोकरींत प्रथमपासूनच हिंदूंचा बराच प्रवेश झाला; पण ह्या गोष्टीला कोणाचा खास इलाज नव्हता. कारण, पाश्चिमात्य पद्धतीचें शिक्षण मिळवून, आपल्या अंगीं पात्रता आणण्यांत हिंदूंनीं जशी उत्सुकता दाखविली, तशी मुसलमानांनीं दुर्दैवेंकरून दाखविली नाहीं. आतांशा अगदीं अलीकडे, अशा तऱ्हेचें शिक्षण संपादन करण्याची इच्छा मुसलमानांमध्यें दिसूं लागली आहे. आतां, जोंपर्यंत सरकारनें नोकरींत घेतलेले लोक केवळ सरकारचे नोकर होते, तोंपर्यंत मुसलमानांप्रमाणेंच हिंदूंचाहि सरकारचें राज्यधोरण ठरविण्यामध्यें मुळींच हात नसे.

त्यामुळें, मुसलमानांस तक्रार करण्यास फारशी जागा नव्हती. अथवा, निदान इतकी गोष्ट खरी कीं, जरी त्यांची कांहीं तक्रार असली, तरी त्याबद्दल त्यांना स्वतःखेरीज दुसऱ्यास फारसा दोष देतां आला नसता. पण, अलीकडे हिंदुलोकांच्या चळवळीच्या नेटापुढें ब्रिटिश सरकार हळूं हळूं हात टेंकूं लागलें असून, राज्यकारभाराचें धोरण हिंदुलोकांना अनुकूल असें होत चालल्याचें मुसलमानांच्या नजरेस आलें आहे. त्याचप्रमाणें, आजपर्यंत आपल्या हातीं पूर्णपणें ठेवलेली सत्ता सरकार आपण होऊन कांहीं विशिष्ट वर्गांच्या स्वाधीन करित आहे, हीहि गोष्ट त्यांना कळून चुकली आहे. मुसलमानांचें आणखी असें ह्मणणें आहे कीं, ह्या विशिष्ट लोकांच्या हातीं सत्ता आल्यानें वस्तुतः—तत्वतः नसला तरी—सर्वथैव त्यांचाच फायदा होणार आहे. आणि आपण हिंदीलोकांचे प्रतिनिधी आहों, व त्यांच्या हितसंबंधाचें संरक्षण करण्याचें काम आमचें आहे, असें कितीहि मोठ्या कंठरवानें हे वरील लोक सांगोत; परंतु वास्तविक स्थिति अशी आहे कीं, कांहीं थोडे अपवाद वगळले तर, ज्या लोकांच्या हातीं सरकार आपण होऊन सत्ता देत आहे, ते लोक हिंदु असून, इतर धर्मांच्या लोकांस मागें ढकलून, आपल्याच फायद्याकरितां राजकीय हक्क संपादन करूं इच्छिणाऱ्या हिंदुलोकांचे ते खरोखर प्रतिनिधी आहेत. माझ्या मुसलमानमित्रांनीं मला खात्रीपूर्वक असें सांगितलें कीं, **इंडियन काउन्सिल आक्ट** पास झाल्यामुळें, जे नवीन राजकीय हक्क हिंदीलोकांस मिळाले आहेत, ते सरकारनें मोठ्या उदार मनानें दिले आहेत, असें हिंदूंप्रमाणेंच—किंबहुना त्यांच्यापेक्षां खरोखर मनापासून—मुसलमानांसहि वाटत आहे. परंतु, जी एक गोष्ट

इंग्रजलोकांच्या ध्यानांत येण्यास महत्प्रयास पडतात, ती त्यांच्या लक्ष्यांत येऊन चुकली आहे. ह्या राजकीय सुधारणांमुळें, सरकार–दरबारांत मुसलमानांपेक्षां हिंदूंचें बिनतोड मोठेंच प्रस्थ माजून राहणार आहे. ह्या सुधारणांचा जो मूळखर्डा तयार झाला होता, त्यावरून खरोखरच अशी भीति पडली होती कीं, सरकार मुसलमानांशीं अत्यंत अन्यायाचें वर्तन करित आहे. पुढें, मुसलमानांनीं चळवळ करून, आपलीं गाऱ्हाणीं सरकारपुढें मांडलीं. तेव्हां, त्यांच्या विनंतीस मान देऊन, सुधारणांच्या मूळखर्ड्यांत बरेच फेरफार करण्यांत आले. त्याबरोबर हिंदू राजकारणी पुरुषांस जो संताप चढला त्यावरूनच, ज्याला बघण्यास डोळे असतील व ऐकण्यास कान असतील, अशा कोणाहि मनुष्याच्या लक्ष्यांत हिंदूंचा खरा उद्देश येऊन चुकलाच पाहिजे. ह्या लोकांना अशी आशा वाटत होती कीं, आपण जितके हक्क सरकारापाशीं मागत आहों, तितके आपणांस मिळाले, ह्मणजे मुसलमानलोकांस सहजच बाजूला ठेवितां येईल; मग, हिंदुस्थानांत इंग्रजांचें राज्य राहो वा न राहो. सारांश, अशा प्रकारच्या हिंदुलोकांच्या राजकीय आकांक्षा असून, त्या साध्य करून घेण्याचा त्यांचा हेतु होता.

सामाजिक, धार्मिक व राजकीय बाबतींतील हिंदुलोकांच्या गेल्या २० वर्षांच्या चळवळी पाहिल्या, तर त्या सर्वांचा झोंक, अगदीं प्रथमपासून आतांपर्यंत, जसा इंग्रजलोकांच्या विरुद्ध आहे, तसाच–किंबहुना अधिकच–मुसलमानलोकांच्याहि आहे. कित्येक उदार मनाच्या व नेमस्त पक्षाच्या पुढारी हिंदुलोकांस निःसंशय प्रामाणिकपणानें असें वाटत होतें कीं, मुसलमान व हिंदु असे दोघेहि आपला

धार्मिक व सामाजिक (वंशविषयक) मतभेद विसरून, हिंदुस्थानचें एकराष्ट्र करण्यास तयार होतील. परंतु, ह्या पुढारी लोकांच्या मताची मंडळीच मुळीं एकसारखी कमी होत चालली आहे. क्रांतिवादी पक्षामध्येंदेखील कांहीं लोक असे होते कीं, इंग्रजसरकाराविरुद्ध ज्या चळवळी चालल्या होत्या, त्यांत मुसलमानांस कामापुरते सामील करून घेण्यासाठीं, त्यांना साधूपणाच्या गोड गोड थापा त्यांनीं मोठ्या आनंदानें मारल्या असल्या. कारण, इंग्रजी राज्याचा एकदां कांटा निघाला, कीं पुढें मुसलमानांशींच कायती आपली गांठ पडणार. अर्थात् मग त्यांना धाब्यावर बसवून, आपलाच फायदा करून घेतां येईल, अशी त्यांना आशा वाटत होती. परंतु, 'ज्या गांवच्या बोरी, त्याच गांवच्या बाभळी.' त्यामुळें, जी गोष्ट इंग्रजांच्या लक्ष्यांत येणें शक्य नव्हतें, ती मुसलमानांनीं चांगली ओळखली होती. ह्मणजे, अन्य धर्मांशीं दोन हात करून, आपलें वर्चस्व स्थापन करण्यास सिद्ध झालेल्या नवीन हिंदुधर्माच्या चळवळींचें सुकाणूं ज्या लोकांच्या हातीं गेलें होतें, त्यांचे खरे उद्देश व आशा ह्यांची यथार्थ कल्पना मुसलमानांस आली होती. आतां लवकरच, कल्कि—रूपानें श्रीविष्णु अवतार घेऊन, म्लेंच्छांना—ह्मणजे मुसलमान व इंग्रज अशा दोघांनाहि-हिंदुस्थानांतून हांकून देणार आहे. ह्मणून, हिंदुस्थानच्या तरुणमंडळीनें तयारींत असलें पाहिजे, अशा प्रकारचा उपदेश राष्ट्रीय पक्षांतील हिंदुलोकांच्या वर्तमानपत्रांतून एकसारखा होत आहे, ही गोष्ट मुसलमानांच्या चांगली लक्ष्यांत आली होती. बंगालच्या फाळणीनंतर, पूर्वबंगालच्या मुसलमानांशीं हिंदूंचें जें वर्तन असें, त्यावरून त्यांना मुसलमानांचा किती राग

आला होता, हें दिसून येई. हिंदूंच्या अंगाची अशी लाही होण्याचें कारण ह्मटलें ह्मणजे, नवीन प्रांत अस्तित्वांत आल्यामुळें, तेथील मुसलमानांची स्थिति सुधारली; ह्मणजे, त्या प्रांतांत त्यांना जें स्थान मिळावयास पाहिजे होतें, तें त्यांना प्राप्त झालें. आतां पुढें आपणास कसलें जेवण मिळणार आहे, ह्याची वानगी पंजाबच्या मुसलमानांस चाखावयास मिळाली नव्हती, असें नाहीं. प्रत्येक सरकारी हापिसांत, प्रत्येक धंद्यांत, आपल्या मुसलमान बंधूंविरुद्ध हिंदूंची गट्टी अधिकाधिक जमत चालली होती. विलायती मालावरील बहिष्काराच्या चळवळींत शिरण्याचें मुसलमानांनीं साफ नाकारिलें होतें. आणि दिल्ली, लाहोर व आणखी पुष्कळ ठिकाणीं, हिंदुलोकांनीं आपापसांत असें ठरवून टाकिलें होतें कीं, आपणांपैकीं कोणींहि मुसलमानी दुकानांतून माल घेऊं नये, व मुसलमान व्यापाऱ्यांशीं सौदा करूं नये. दंगाधोपा करण्याकडे स्वाभाविक प्रवृत्ति असणाऱ्या कांहीं लोकांची तर अशी तयारी होती कीं, ज्या ठिकाणीं मुसलमानांची संख्या मोठी असून, ते चिडखोर स्वभावाचे असतील, त्या ठिकाणीं त्यांच्याशीं हातघाईचा प्रसंग मुद्दाम आणावयाचा. हेतु असा कीं, दंगाधोपा झाला ह्मणजे अर्थातच इंग्रजी सैन्याला मध्यें पडून बंदोबस्त करावा लागेल, व त्यामुळें मुसलमानांचा रक्तपात होईल. आणि मग, मुसलमानांमध्यें बहुतकरून इंग्रजीराज्याविषयीं अप्रीति उत्पन्न होईल. माझ्या सोबत्यांनीं मला असें सांगितलें कीं, ज्या एका बाबतींत हिंदुलोकांना मुख्यतः मोठी आशा वाटते, त्याच बाबतींत सुशिक्षित मुसलमानांना मुख्यतः भीति वाटते. ब्रिटिश राजसत्ता त्वरित लयास जाईल, असें हिंदूंना किंवा मुसलमानांनाहि

वाटत नसावें. परंतु, सध्यां ज्या चळवळी चालू आहेत, त्यांची खरी अंतस्थ स्थिति इंग्रजलोकांना कळून येणें शक्य नसल्यामुळें, इंग्रजी राज्यकर्ते व ब्रिटिश लोक कंटाळून जाऊन, शेवटीं हिंदुलोक जे हक्क मागत आहेत, ते त्यांना एकामागून एक मिळत जातील; आणि मग, हिंदुस्थानच्या राज्यकारभाराचें सुकाणूं हळूं हळूं त्यांच्या हातीं येईल. अशा रीतीनें, प्रत्यक्ष इंग्रजलोकांच्या संरक्षणाखालीं, हिंदुलोकांना ज्या प्रकारच्या वर्चस्वाची अपेक्षा आहे, तें वस्तुतः त्यांना प्राप्त होईल.

आतां, ही जी मुसलमानांना भीति वाटत आहे, तिचा विनाकारण भलतीकडेच बाऊ झाला असेल. तथापि, विलायतेच्या कांहीं वजनदार पत्रकर्त्यांच्या व पार्लमेंटसभेंतील बऱ्याच सभासदांच्या मनावर हिंदु राजकारणी पुरुषांच्या ह्मणण्याचा जो कांहीं परिणाम झाला आहे, त्याचा विचार केल्याशिवाय मुसलमानांस गत्यंतर नाहीं; आणि, मजा अशी आहे कीं, हे वर्तमानपत्रवाले व पार्लमेंटचे सभासद मुसलमानांचें ह्मणणें ऐकूनहि घेत नाहींत. ह्याहिपेक्षां आश्चर्याची गोष्ट ह्मणजे, आपल्या वाजवी हक्कांचें संरक्षण करण्याकरितां एकमतानें प्रयत्न करण्यासाठीं **सभा, मंडळ्या** वगैरे संस्था काढण्याची आवश्यकता मुसलमानांस वाटूं लागतांच, हे लोक जातिमत्सराचें व धर्मद्वेषाचें मूळ पुनः उकरून काढित आहेत, असा आरोप वरील इंग्रजी वर्तमानपत्रवाल्यांनीं व सभासदांनीं त्यांच्यावर केला. सुशिक्षित मुसलमानाचे परमपूज्य पुढारी जे **सर सय्यद अहमदखान** यांचा उपदेश ते २० पेक्षांहि अधिक वर्षे अगदीं अक्षरशः पाळित आले असून, कोणत्याहि राजकीय चळवळींत न पडतां, ब्रिटिश सरकारची न्यायप्रीति व ब्रिटिश जनतेचा निःपक्षपातिपणा ह्यांवर

पूर्ण भरंवसा ठेऊन, ते बसले होते. ब्रिटिश सरकार अगर ब्रिटिश लोक यांच्यापुढें आपलें ह्मणणें नीट रीतीनें मांडलें गेलें, तर आपणांस न्याय मिळेल, हा त्यांचा विश्वास गेलेला नव्हता. परंतु, आपल्या प्रतिपक्षानें व्यवस्थितपणानें मोठमोठ्या चळवळींच्या साधनानें, आपल्याविषयीं गैरसमज उत्पन्न करून, मोठें नुकसान करण्याचा जो घांट घातला आहे, तो हाणून पाडण्याकरितां, आपणहि संस्था, मंडळ्या वगैरे काढून, त्यांच्याद्वारें आपलें ह्मणणें अधिकारयुक्त वाणीनें योग्य अधिकाऱ्यांपुढें मांडलें पाहिजे, असें मुसलमान लोकांच्या मनानें घेतलें. शिवाय, ह्यापुढें मुसलमानांनीं राजकारणांत न शिरतां, हात जोडून अगदीं बाजूस उभें राहण्याचा काळ राहिला नव्हता. कारण कीं, हिंदुस्थानांत घडून येणाऱ्या एकंदर गोष्टी व हिंदी काउन्सिलांचा विस्तार यामुळें त्यांच्या पुढाऱ्यांवर नवीन जबाबदाऱ्या येऊन पडल्या होत्या. ब्रिटिश राज्याविषयींची आपली निष्ठा व्यक्त करून दाखविण्याची जबाबदारी जितक्या महत्त्वाची आहे, तशी दुसरी कोणतीच नाहीं, असें मुसलमान पुढाऱ्यांस वाटलें; व ही त्यांची राजनिष्ठा कधींहि ढळावयाची नाहीं. कारण, हिंदुस्थानांतील मुसलमान लोकांचें कल्याण—किंबहुना प्रत्यक्ष त्यांचें अस्तित्व–सर्वस्वी ब्रिटिश राजसत्तेच्या अस्तित्वावर अवलंबून आहे, अशी त्यांची दिवसेंदिवस अधिकच खात्री होत चालली होती.

मजजवळ सध्यां दुसऱ्या एका मुसलमान गृहस्थाचें पत्र आहे. ह्या गृहस्थाचें शिक्षण युरोपमध्यें झालेलें असून, आपल्या हिंदी धर्मबंधूंची त्यांना फारच उत्तम माहिती आहे; आणि, ह्याहि लोकांचा वरील गृहस्थाच्या ठिकाणीं फारच विश्वास आहे. वर सांगितलेल्या प्रकारच्या प्रारब्धवादाच्या प्राबल्याचा माझ्या मना-

वर इतका मोठा परिणाम झाला कीं, मीं ह्या गृहस्थांना पत्र पाठवून, त्यांचें मत विचारिलें. त्यांनीं माझ्या पत्राचें उत्तर पाठविलें तें असें:—

मुसलमानलोकांस असें वाटतें कीं, सध्यां हिंदुस्थान सरकार जसें नांवानें ब्रिटिश आहे, तसें त्याचें धोरणहि ब्रिटिश आहे. परंतु, पुढें जरी येथील राज्यव्यवस्था आतांप्रमाणेंच ब्रिटिश राहिली, तरी वस्तुतः तें हळूंहळूं हिंदु होत जाईल, अशीं चिन्हें पूर्वीच दिसूं लागलीं आहेत. कांग्रेसमधील जहालपक्षाचा व राष्ट्रीय चळवळींच्या पुढाऱ्यांचा एवढाच हेतु आहे कीं, ब्रिटिश सत्ता केवळ नांवाची उलथून पाडून स्वस्थ बसावयाचें असें नाहीं, तर ती खरोखरच रसातळास पोहोंचवावयाची. आपण ह्मणाल कीं, अशी भीति अगदींच निष्कारण आहे, व हिंदुस्थानसरकार केवळ नामधारी होऊन जाण्याइतकें वेडें नाहीं, अथवा निर्बळहि नाहीं. आतां, चार दिवस पाहुण्यासारखें हिंदुस्थानांत येऊन स्वदेशीं परत जाणाऱ्या इंग्रज गृहस्थाच्या मनांत असे विचार येत असतील. ( आणि, आह्मी ह्मणतों कीं, हिंदुस्थानांत येणारे सर्वच इंग्रजलोक असे थोड्या दिवसांचे पाहुणे असतात. कारण, ज्या लोकांचीं मुलेंबाळें ह्या देशचीं असतात, त्यांचाच येथें कायमचा संबंध असतो. ) आह्मांला व आमच्या मुलाबाळांना येथेंच राहावयाचें आहे. ह्मणून, उद्यांची काळजी जशी आह्मांला करावी लागते, तशीच दूरवरचीहि करावी लागते. आतां, येथील राज्यकारभाराचा झोंक कोणीकडे आहे? एकंदर स्थितीचा विचार केला, तर शेवटीं राज्यकारभारांत हिंदूंचीच सरशी होईल व सर्व गोष्टी त्यांच्या तंत्रानें चालू लागतील, हें कोणाला नाकारतां येईल काय? युरोपखंडामध्यें ज्या राजकीय चळवळी यशस्वी झाल्याचें इतिहास सांगत आहे, त्यांची नक्कल इकडे उतरण्याची जबरदस्त प्रवृत्ति हिंदुस्थानच्या सर्व हिंदुलोकांत आहे, ही गोष्ट येथील परिस्थिति पाहण्यास आलेल्या इंग्रज गृहस्थांनीं विसरतां कामा नये. आतां **इटली**–देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठीं ज्या स्वदेशाभिमान्यांनीं प्रयत्न केला, ते जसें राज्यकर्त्या **आस्ट्रियन** लोकांना अगदीं पाण्यांत पाहत होते, त्याचप्रमाणें, ज्या हिंदुलोकांची सरकारच्या कोणत्याहि कृत्यानें समजूत पडत नाहीं, ते ब्रिटिशलोकांना पाहतात. परंतु, मुसलमानांच्या बाबतींत हे हिंदुलोक दुसऱ्याच एका युरोपियन राष्ट्राचा कित्ता गिरविणार आहेत. पुण्यांतील टिळक व त्याच्या पक्षांतील लोकांच्याच नव्हे, तर साऱ्या

पंजाबांतील व बंगाल्यांतील राष्ट्रीयपक्षाच्या लोकांच्या बोलण्यांत नेहमीं असें येतें कीं, स्पेनमधून मुसलमानांची जशी उचलबांगडी झाली, तशीच त्यांची हिंदुस्थानांतूनहि झाली पाहिजे.

ही आह्मीं आपल्या डोक्यांतून कांहीं तरी कल्पना काढली आहे, असें नाहीं. त्याचप्रमाणें, ही कल्पना प्रथमदर्शनीं विलक्षण दिसते, तशीहि केवळ नाहीं. ह्या प्रश्नाचा मीं काळजीपूर्वक विचार केला आहे; आणि ह्मणून, ५० किंवा १०० वर्षांनीं पुढें कशी स्थिति होणार आहे, ह्याची कल्पना मला बरोबर करितां येते. मला असें वाटतें कीं, तेव्हां आमच्यांतील वरिष्ठ दर्जाच्या मध्यम स्थितींतील लोकांस हिंदुस्थानांत राहणें असह्य होईल. आणि, एकदां कां बुद्धिमान् व श्रीमंत मुसलमानलोक नाहींसे झाले, ह्मणजे हिंदु राज्यकर्त्यांच्या अमलाखालीं मुसलमानांच्या बहुजनसमाजाला निव्वळ गुलामगिरींत आपल्या आयुष्याचे दिवस कंठावे लागतील. आतां, सर्वत्र हिंदुलोकांचा असा उद्देश आहे, अथवा ज्या **उदार राष्ट्रीय** पक्षांत **गोखले** आहेत, तो पक्ष नष्ट झाला आहे, असें मी कधींहि ह्मणणार नाहीं. परंतु, प्रतिपक्षाची सध्यांतरी सरशी आहे; आणि, ज्याअर्थी आह्मा मुसलमानलोकांच्या अस्तित्वावरच गदा येण्याची भीति आहे, त्याअर्थीं आह्मी मुळींच धोक्यांत पडूं इच्छित नाहीं; अथवा ब्रिटिशराज्याऐवजीं हिंदुराज्य होण्याचा **श्रीगणेशा**हि आम्ही पाहत बसणार नाहीं. असें जरी आहे, तरी हिंदुलोकांचें वर्चस्व स्थापन करण्याचा आरंभ झाला आहे. बाकी, हा आरंभ जितक्या जलदीनें होईल अशी आह्मांला भीति पडली होती व हिंदूंना आशा वाटत होती, तितक्या जलदीनें झालेला नाहीं, हें खरें आहे. स्पेन--मध्यें आमच्या लोकांवर जो दुःखकारक दारुण प्रसंग कोसळला, तीच गत आमची हिंदुस्थानांत अझून होईल, असें ह्मणणें सकृद्दर्शनीं अतिशयोक्तीचें वाटतें. परंतु, माझें स्वतःचें मत ( आणि, बहुतेक विचारी मुसलमानांचें मत माझ्यासारखेंच आहे. ) असें आहे कीं, ही गोष्ट अगदीं शक्य आहे. आणि, अशा अत्यंत महत्वाच्या बाबतींत **संभाव्यते**प्रमाणेंच **शक्यते**चाहि विचार केला पाहिजे.

आतां, ब्रिटिश साम्राज्याचा एक भाग ह्या दृष्टीनें हिंदुस्थानचा विचार केला ह्मणजे, हा किंवा तो कायदा बदलणें, अथवा इतकें इतकें सैन्य वाढविणें अथवा लोकांच्या अत्याचारांस आळा घालणें किंवा त्यांना कांहीं नवीन हक्क देणें, हेंच राज्यकर्त्यांचें काम आहे, असें नाहीं; तर लोकांच्या विचारास नवें

वळण देऊन, त्यांच्या पारमार्थिक कल्पनाहि बदलून टाकिल्या पाहिजेत. आणि, हल्लींचें आकुंचित दृष्टीचें **राष्ट्रीयत्व** बाजूस ठेवून, त्याऐवजीं विस्तीर्ण पायावर खऱ्या उदारमतवादी **साम्राज्या**ची स्थापना केली पाहिजे; व हिंदुस्थानच्या अडचणी व तेथील पक्षभेद लक्ष्यांत घेऊन, त्यांतील लोकांच्या हिताचें रक्षण करण्याची बुद्धि साम्राज्यांतर्गत सर्व देशांत उत्पन्न होईल, असें त्या साम्राज्याला व्यवहार्य रूप आलें पाहिजे. त्याचप्रमाणें, हिंदुस्थानचा ब्रिटनशीं असलेला संबंध व ब्रिटिश राजसत्ता येथें सहजच खात्रीनें राहील, अशी तजवीज केली पाहिजे. अशा तऱ्हेची मनःप्रवृत्ति लोकांत उत्पन्न करण्याकरितां जो कोणी मुत्सदी व्यवहारोपयोगी उपाय सुचवील, त्याच्या हातून इंग्लंड व हिंदुस्थान ह्या दोन्ही देशांवर येणारे पुष्कळ दुःखाचे प्रसंग व मोठा अनर्थापात टळेल, यांत मुळींच शंका नाहीं.

दुसऱ्या पक्षीं, मला हें सांगितलेंच पाहिजे कीं, जरी दुसऱ्या पुष्कळ मुसलमानांस वरप्रमाणेंच भीतिदायक चिन्हें दिसत आहेत, तरी कपाळास हात लावून, खेद करित बसण्याची प्रवृत्ति त्यांच्यामध्यें दिसून येत नाहीं. कारण, त्यांना अशी खात्री आहे कीं, ब्रिटिश राज्याच्या नशिबीं कांहींहि असो; पण, हिंदुस्थानांतील ज्या लोकांत जननशक्ति इतरांपेक्षां अधिक असेल, त्यांच्या हातीं भविष्यकाळीं हिंदुस्थानची सत्ता राहील. आणि वस्तुतः राज्य स्थापन करणाऱ्या लोकांच्या अंगच्या लढवय्येपणावरच जे केवळ विश्वासून राहत नाहींत, त्यांना अशी वरप्रमाणें खात्री वाटण्यास खरोखरीच पुष्कळ जागा आहे. कारण, हिंदुस्थानांत हिंदूंच्या संख्येपेक्षां मुसलमानांचीच संख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे.

हिंदु राजकारणी लोक आटोकाट प्रयत्न करून, लोकांना असें सांगत सुटतात कीं, सरकार मुसलमानांचें पक्षपाती आहे. त्यांची नेहमींची भाषा ह्मणजे, हिंदुलोकांच्या हिताकडे दुर्लक्ष करून, सरकार मुसलमानांचे ‘ लाड पुरवित ’ आहे. यास्तव,

अशा गप्पांना खऱ्या गोष्टींचें स्वरूप यत्किंचित्‌हि येणार नाहीं, अशी खबरदारी सरकारनें घेतली पाहिजे. त्याचप्रमाणें, इतक्या बुद्धिमान् व सुशिक्षित मुसलमानांच्या मनांत जो अंदेशा आला आहे, त्यालाहि बळकटी येणार नाहीं, अशी सावधगिरी सरकारनें अवश्य ठेविली पाहिजे. ह्या भीतीच्या कारणांचा व्यर्थ बाऊ करण्यांत आला आहे, यांत संशय नाहीं. कदाचित्, त्यांना मुळींच आधारहि नसेल. परंतु, टिळकाला ज्या गोष्टींची मोठी आशा व भरंवसा होता ह्मणून मला लोकांनीं सांगितलें आहे, त्या व ह्या वरील गोष्टी अगदीं बरोबर जमतात. आणि हिंदुस्थानांतील मुसलमान लोक ज्या दृष्टीनें पाहतात तसें पाहण्याचा प्रयत्न करण्याचे फक्त आपण श्रम घेतले, तर मुसलमानांच्या मनाला जी अशी भीति वाटते, ती सर्वथा अवास्तव आहे, असें ह्मणून गोष्ट सोडून देतां येणार नाहीं.

ह्या दोन लोकांमध्यें जें वैर आहे, तें ब्रिटिश राज्यानें उत्पन्न केलें नाहीं, अथवा त्याचा तो परिणामहि नाहीं. तर, हिंदुस्थानांमध्यें ब्रिटिश लोकांचें नांव ऐकूं येण्यापूर्वीं शेंकडों वर्षें, ह्या दोन लोकांमध्यें भांडण चालू असल्यामुळें त्यांचें पूर्वापार वैर चालत आलें आहे. हा वैरभाव नाहींसा करण्याचा ब्रिटिश मुत्सद्दगिरीचा एक मुख्य हेतु आहे, व तसा असलाहि पाहिजे. आणि ब्रिटिश राज्यकर्ते हिंदूंना व मुसलमानांना नेहमीं समतेनें व निःपक्षपातिपणानें वागावितात, ही गोष्ट मुसलमान लोक नाकारित नाहींत. तथापि, यांचें असें ह्मणणें आहे कीं, ब्रिटिश लोकांकडून येथील राज्यकारभार पुष्कळवेळां अशा रीतीनें चालतो कीं, त्यामुळें मुसलमानांचें वजन कमी होतें, व हिंदूंचा वाजवीपेक्षां अधिक फायदा होतो. पाश्चिमात्य

विद्या व पाश्चिमात्य पध्दती यांचा हिंदुस्थानांत प्रवेश झाल्यापासून हिंदू लोकांनीं प्रसंगाप्रमाणें वागून व चलाखी दाखवून, मुख्यतः आपला फायदा करून घेतला आहे, अशी जरी वस्तुस्थिति आहे, तथापि त्यामुळें मुसलमानांच्या मनाला समाधान व्हावें, अशांतली गोष्ट नाहीं. न्यायकोर्टांतून व सर्व सरकारी खात्यांतून इंग्रजी भाषा दरबारीभाषा ठरवून गेल्यामुळें, हिंदूंचा सहजच फायदा झाला. कारण इंग्रजीमुळें फारशी व इतर देशी भाषांचें उच्चाटण झालें. फारशी वगैरे भाषांमध्यें मुसलमानांची हिंदूंपेक्षां पुष्कळच गति असे. हल्लीं, प्रत्येक सरकारी खात्यामध्यें जे नोकर आहेत, त्यांत हिंदूंचा फारच मोठा भरणा आहे; व हिंदुलोकांच्या संख्ये-च्या मानानें, नोकरींतील लोकांची संख्या वाजवीपेक्षां पुष्कळ पटीनें मोठी आहे. १९०१ सालच्या खानेसुमारीच्या आंकड्यां-वरून असें दिसतें कीं, बंगाल्यांत (तेव्हां विभागणी झाली नव्हती) हिंदूंची संख्या मुसलमानांच्या संख्येच्या केवळ दुप्पट असतां, त्यांच्याकडे बंगाल सरकारच्या ताब्यांतील उच्चप्रतीच्या जागा १२३५ असून, मुसलमानांकडे फक्त १४१ होत्या. मुंबई–इलाख्यामध्यें हिंदूंकडे २६६ जागा असून, मुसलमानांकडे २३ होत्या; तसेंच, मध्यप्रांतामध्यें ३३९ हिंदूंकडे व ७५ मुसलमानांकडे होत्या. रिपोर्टांत ज्या प्रांतांविषयीं अशा प्रकारची खुलासेवार माहिती दिली आहे, त्यांत फक्त संयुक्त प्रांतांतच इतका मोठा फरक दिसून येत नाहीं. या प्रांतांत मुसलमानांकडे ४५३ जागा असून, हिंदूंकडे ७११ आहेत; आणि, लोकसंख्येच्या मानानें पाहतां, खरोखर मुसलमानांसच फार अधिक जागा मिळालेल्या आहेत. मुसलमानांची आणखी अशी तक्रार आहे कीं, ज्या सरकारी हापिसांत मुसलमानलोक

क्लार्क असतात, तेथें बहुतेक हिंदू हेडक्लार्क असतात; व वरच्या हापिसराकडे यांनाच जाण्याचा प्रसंग येत असल्यामुळें, ते मुसलमान क्लार्कांविरुद्ध साहेबास सांगून, त्याचें मन कलुषित करून टाकितात. शिक्षणखातें बहुतेक इंग्रजांच्या हातून निघून हिंदूंच्या हातीं गेलें आहे. वकिली, वर्तमानपत्रें, वगैरे सर्व उच्चप्रतीचे उदार धंदे हिंदूंच्याच हातीं असून, एकंदर हिंदुलोकांच्या संख्येच्याहि मानानें ह्या धंद्यांत त्यांचा भरणा फारच मोठा आहे. मुसलमान लोक विद्येंत मागसलेले असल्या कारणानें, पुष्कळ अंशीं अशी स्थिति आहे, हें समंजस मुसलमान चांगलें जाणतात. परंतु, आपल्याच हातून पायावर धोंडा पडला, ह्मणून त्यानें इजा होत नाहीं काय? शिवाय, हिंदुस्थान-सरकारची राजधानी, तसेंच दोन्ही इलाख्यांच्या सरकारच्या मुख्य जागा हिंदुलोकांच्या भरवस्तीच्या ठिकाणींच असल्यामुळें, तेथें मुसलमानांची सहजरीत्या दाद लागत नाहीं.

इंग्लंडमध्यें लोकमत कोणीकडे कसें आहे, इकडे मुसलमानांचें लक्ष असतें. त्यामुळें, त्यांना कळून चुकलें आहे कीं, तेथील दोन पक्षांपैकीं एकाचें आज कित्येक वर्षें असें ह्मणणें आहे कीं, हिंदु राजकारणी लोकांच्या व आमच्या ( लिबरल-पक्षाच्या ) मतांत पुष्कळच साम्य आहे. ह्या पक्षाच्या अध्वर्यूंतील केवळ मुकुटमणि जे **ग्ल्याडस्टन**साहेब त्यांचें नांव निघालें ह्मणजे, यूरोपांतील तुर्कस्थानाशीं त्यांनीं दाखविलेल्या वैरभावाची हिंदुस्थानच्या मुसलमानांस आठवण होते; आणि, कित्येक लिबरल लोकांची तर मजल त्यावेळीं येथपर्यंत गेली होती कीं, त्यांनीं जगांतील सर्वच मुसलमानांवर घसरून पडून, वाटतील ते आरोप त्यांच्यावर केले होते. आमच्या आठवणींत हिंदुस्था-

नच्या व्हाइसरायांमध्यें लॉर्ड **रिपन**साहेबासारखा पक्का उदारमतवादी व्हाइसराय दुसरा झाला नाहीं; व त्यांच्या अंगच्या गुणांमुळें ते हिंदुलोकांप्रमाणेंच पुष्कळ मुसलमानांसहि प्रिय झाले होते. परंतु, हिंदूंच्या राजकीय आकांक्षांबद्दल त्यांना जी सहानुभूति वाटत असे, ती त्यांनीं कधींहि लपवून ठेविली नाहीं. कांहीं थोडे दिवस खेरिज करून, एकसारखीं वीस वर्षें **युनिअनिस्ट** पक्षाच्या हातीं इंग्लंडचा राज्यकारभार असतांना—आणि, विशेषतः लॉर्ड **कर्झनसाहेब** व्हाइसराय असतांना—हिंदुपुढारी व विलायतेचे **र्‍याडिकल**पक्षामधील राजकारणी लोक, यांचा स्नेहभाव वृद्धिंगत होत गेला. मुख्यतः हिंदुलोकांनीं स्थापन केलेल्या राष्ट्रीय परिषदेस ती केवळ हिंदूंचीच एक राजकीय संस्था आहे, असें मुसलमानलोक समजत असत. परंतु, हिंदुस्थानांत नवीनच जन्मास आलेल्या लोकपक्षाची बाजू सरकारपुढें मांडणारी ही सभा आहे, असें विलायतेंतील कांहीं फार पुढें गेलेल्या पत्रकारांचें साधारणपणें ह्मणणें होतें इतकेंच नाहीं, तर खुद्द लंडनमध्येंहि कांग्रेसनें आपलें स्वतःचें **इंडिया** नांवाचें एक वर्तमानपत्र काढिलें आहे. ह्या पत्राचा खर्च कांग्रेस आपल्या फंडांतून करीत असतें; व त्याचें संपादकत्व व व्यवस्था इंग्लिश गृहस्थांच्याच हातांत दिलेली आहे. विलायतेंत ह्या पत्राचा फारसा खप होतो, असें दिसत नाहीं. परंतु, लिबरल पक्षाच्या पुष्कळ वृत्तपत्रांस हिंदुस्थानसंबंधाची बातमी मुख्यतः ह्याच द्वारानें मिळते. र्‍याडिकलपक्षाचे पार्लमेंटचे सभासद हिंदुस्थान पहावयास आले ह्मणजे, ते जी माहिती मिळवितात अथवा स्वदेशीं गेल्यावर तेथें लोकांस सांगतात, ती सर्व हिंदु राजकारणी लोकांकडून घेतलेली

असते. आणि, हे लोक विलायतेस जातात, तेव्हां र्‍याडि-कल लोकांचे क्लब व मंडळ्या यांच्याकडूनच नव्हें, तर र्‍याडिकल वर्तमानपत्रांकडूनहि, लोकांच्या चांगलें डोळ्यांत भरेल अशा रीतीनें, त्यांचें आगतस्वागत होतें.

१९०५ च्या अखेर लिबरल पक्ष अधिकारारूढ झाला, तेव्हां ह्या पक्षाचें हाऊस आफ कामन्समध्यें जें बहुमत होतें, त्यांत कांहीं मोठी उद्योगी मंडळी होती. त्यांनीं हिंदुस्थानां-तल्या एका विशिष्ट प्रकारच्या चळवळीस अगदीं मनापासून पाठिंबा दिला. ह्या चळवळीचा हेतु ब्रिटिश राज्यकारभाराशीं दुशमनगिरीनें वागण्याचा होता, तसाच मुसलमानांशींहि वाग-ण्याचा होता. आणि, लिबरलपक्षाच्या हातीं कारभार येतांच, हिंदुस्थानच्या लोकांस नवीन राजकीय हक्क देण्याच्या हेतूनें, सुधारणेचा खर्डा तयार करण्याचा आपला बेत त्यांनीं जाहिर केला. आतां, ह्या राजकीय मसलतींत कांहींहि गुण असले, तथापि मुसलमानांच्यापेक्षां हिंदूंच्या मताला मान देऊन, हा मनसुबा सरकारनें केला आहे, असा हिंदुस्थानच्या लोकांचा समज झाला. कारण, सर्व सत्ता एके हातीं असली ह्मणजे राज्यकारभार चांगला चालतो, असें मुसलमानलोक आजपर्यंत स-मजत आले आहेत; आणि, सुधारणांच्या मसलतीचा एक हेतु तर अशी एकसत्तात्मक पद्धत थोडीशी मोडून टाकण्याचाच होतो. शि-वाय स्टेटसेक्रेटरीसाहेबांनीं प्रथम सुधारणांचा जो खर्डा तयार केला होता, त्यावरून मुसलमान लोक असें ह्मणूं लागले कीं, हिंदु-स्थानांतील सर्व धर्मांच्या, पंथांच्या व जातींच्या लोकांस न्यायानें व निःपक्षपातिपणानें वागविण्याचें जें ब्रिटिश राज्याचें आजपर्यंतचें धोरण होतें, त्यास आतां ह्या सुधारणांमुळें हरताळ

लागूं पाहात आहे. त्याचप्रमाणें, त्यांच्या मनानें असेंहि घेतलें कीं, चार वर्षांपूर्वीं सुधारणांची मसलत हिंदुस्थान सरकार प्रथम करूं लागलें, त्याबरोबर मुसलमान लोकांच्या प्रतिनिधींनीं सिमल्यास जाऊन, व्हाइसरायसाहेबांची भेट घेतली, तेव्हां ह्या डेप्युटेशनला जीं वचनें दिलीं, तींहि आतां धाब्यावर बसविण्यांत येत आहेत. वाढविलेल्या हिंदी कायदे-काउन्सिलांत सभासद निवडून पाठविण्याच्या हक्कासंबंधानें जें धोरण सरकारनें ठरविलें होतें, तें हिंदुस्थानांतील लोकसंख्येच्या साधारण अजमासावरून ठरविलें होतें. पण, हिंदुलोकांच्या संख्येंत असे कोट्यावधि लोक दाखल करण्यांत आले आहेत कीं, त्यांना ते हिंदुधर्माचे आहेत, असें ह्मणणेंदेखील शोभत नाहीं; निदान ज्यांना वरिष्ठ हिंदुलोक शिवून देखील घेत नाहींत, अशा **अस्पृश्य** वर्गांत त्यांचा समावेश होतो. ह्याचा परिणाम एकंदरींत असा झाला असता कीं, मुसलमान ह्मणतात त्याप्रमाणें हिंदूंना वाजवीपेक्षां कितीतरी अधिक प्रतिनिधी निवडून पाठविण्याचा हक्क मिळाला असता. ह्या हिंदु–मुसलमानांमधील लढ्याचा कसा काय निकाल लागतो, इकडें सर्वांचे पुष्कळ दिवस डोळे लागून राहिले होते; व ह्या बाबतींत शेवटीं काय ठरतें, हें निश्चयात्मक कोणास सांगतां येत नव्हतें. तथापि, सुदैवानें लॉर्ड मोर्लेसाहेबांनीं मुसलमानांची सर्व तक्रार ऐकून घेतली; व शेवटीं, मुसलमानांच्या हितसंबंधाचें योग्य प्रकारें संरक्षण होईल, अशा रीतीनें त्यांना सभासद निवडून पाठविण्याचा हक्क असण्याविषयीं, **इंडियन काउन्सिलस अक्टा**-मध्यें चांगली तजवीज करून ठेविली. पण, कायद्यांत अशा प्रकारची स्वतंत्र व्यवस्था मुसलमानांसाठीं केलेली पाहून, हिंदु

राजकारणी लोक निराशेनें चवताळून गेले. त्यावरून, आपणांस जी भीति वाटत होती ती खरीच होती, अशी मुसलमानांची बालंबाल खात्री होऊन चुकली. ह्या व्यवस्थेमध्यें पुष्कळ चांगल्या गोष्टी असून, लॉर्ड मोर्लेंची इच्छा आपणांशीं अगदीं निःपक्षपातानें वागण्याची होती, ही गोष्ट मुसलमानलोकांस पूर्णपणें कबूल आहे. तथापि, नवीन सुधारणांमुळें देखील मुख्यत्वेंकरून हिंदूंचाच फायदा झाला आहे, असें मुसलमानांचें ह्मणणें आहे; व त्यांत अर्थहि आहे. व्हाइसरायांच्या कार्यकारी काउन्सिलांत एका हिंदी गृहस्थाची नेमणूक केली, त्याबद्दल हिंदूंप्रमाणेंच मुसलमानांनाहि मोठा आनंद झाला आहे. आणि, पहिल्यानें जरी एका हिंदूचीच नेमणूक झाली आहे, तरी मि० **सिंह** हे त्या उच्च दर्जाच्या जागेला फारच लायक आहेत. नवीन कायद्याअन्वयें मुंबईच्या आणि मद्रासच्या कार्यकारी काउन्सिलांत जे दोघे गृहस्थ नेमण्यांत आले आहेत, ते देखील हिंदूच आहेत; व पुढें बंगालच्या कार्यकारी काउन्सिलांत बहुधा एका हिंदूचीच नेमणूक होईल, असें आजपर्यंतच्या अनुभवावरून खचित वाटतें. ह्या नेमणुकांपैकीं एकीला देखील दोष देण्यास जागा नसेल. परंतु, वास्तविक गोष्ट अशी आहे कीं, ही जी नवीन वहिवाट सुरू केली आहे, तिचा ताबडतोब फायदा मुसलमानांस न मिळतां, हिंदूंसच मिळेल. अशा नवीन वहिवाटीला हिंदुस्थानांत फार मोठें महत्त्व देण्यांत येत असतें.

वस्तुस्थिति अशी आहे कीं, आपल्या (इंग्रजांच्या) स्वराज्याच्या कल्पनेंत जीं तत्त्वें आहेत त्यांस अनुसरून, आपण आपल्या हातचे अधिकार जसजसे हिंदी लोकांस देत जाऊं, तसतसे ते खरोखर हिंदुलोकांनाच दिल्याप्रमाणें आहेत. कारण,

अल्पसंख्याक मुसलमानांच्या हक्कांचें व हितसंबंधाचें संरक्षण करण्याचा कितीजरी प्रयत्न आह्मीं केला, तरी हिंदूंची संख्या मोठी असल्याकारणानें, त्याचा कांहीं उपयोग होणार नाहीं. ही गोष्ट मुसलमानांच्या लक्ष्यांत असल्यामुळें त्यांना भीति वाटत असते. ह्याच कारणामुळें, निवडणुकीच्या तत्वावर जेथें जेथें प्रतिनिधींच्या **संस्था, मंडळ्या, सभा** वगैरे स्थापन व्हावयाच्या असतात, तेथें तेथें आह्मी आपले प्रतिनिधी स्वतंत्ररीतीनें निवडून देऊं, असा मुसलमानांचा आग्रह असतो. निवडणुकीच्या तत्वाचा व्यवस्थितपणानें उपयोग करण्याचें ज्ञान हिंदूलोकांना बरेंच आहे; पण, मुसलमानांस बहुतेक नाहींच ह्मटलें तरी चालेल. त्यांना अझून त्याचीं मूलतत्वें शिकावयाचीं आहेत. ह्याचा परिणाम असा होतो कीं, स्थानिक संस्थांत देखील मुसलमानांच्या संख्येच्या मानानें त्यांचे लोक त्यांना निवडून पाठवितां येत नाहींत. पण केवळ ह्यासाठींच त्यांनीं वर सांगितल्याप्रमाणें स्वतंत्र निवडणुकीची मागणी केली होती, असें ह्मणतां येत नाहीं. आपल्या समाजाला पेटींत घालून ठेविल्याप्रमाणें अलग करण्यांत तोटा आहे, हें पुष्कळ मुसलमान लोक जाणतात; पण, "दगडापेक्षां वीट मऊ" असें ह्मणून, ते हा मार्ग स्वीकारितात. ज्या ठिकाणीं निवडणुकीचें तत्व अमलांत येतें, तेथें बहुमतांच्या हातीं सर्व सत्ता असते. ह्मणून, हिंदुस्थानांत हें तत्व लागू झालें, ह्मणजे हिंदूंच्या हातीं सर्व सत्ता जाऊन, तिचा दुरुपयोग झाल्यानें मुसलमानांच्या हितसंबंधाचें संरक्षण होणार नाहीं, असें जें त्यांचें ह्मणणें आहे, तें इंग्लंडांतील नवीन प्रजापक्षाच्या पुढाऱ्यांस मान्य नाहीं. शिवाय, हिंदूलोकांच्या मागणीप्रमाणें त्यांना राजकीय हक्क झपाझप देत जावें, असेंहि ह्याच लोकांचें

मत आहे. ह्या सतत वाढत जाणाऱ्या प्रवृत्तीस आळा घालून, ज्या ठिकाणीं सर्वस्वी किंवा अर्धवट निवडणुकीच्या तत्वावर संस्था स्थापन होतात, तेथें हिंदूलोकांचें प्रस्थ फार माजून जाऊं नये, ह्मणून आपणांस असे स्वतंत्र निवडणुकीचे हक्क द्यावे, असें मुसलमानांचें ह्मणणें आहे.

हिंदुस्थानांतील मुसलमानांचे पुढारी खरोखर काय ह्मणतात, हें फोड करून सांगण्याचा माझा हेतु आहे; पण, त्यांचीं मतें बरोबर आहेत किंवा चुकीचीं आहेत, हें मी सांगूं इच्छित नाहीं. आतां, आपले हिंदू देशबांधव व इंग्लंडांतील एक वजनदार लोकपक्ष, यांच्या वर्तनाचा जो कांहीं अर्थ मुसलमान करीत असतील, तो सर्वथा चुकीचा असला, तरी त्यांच्या वर्तनाचा असा अर्थ मुसलमानांकडून होण्याचा संभव आहे, ही गोष्ट आपण लक्षांत ठेविली पाहिजे. सर्वस्वी किंवा अंशतः निवडणुकीच्या तत्वावर स्थापन झालेल्या **मंडळ्या, संस्था**, वगैरेंच्या हातीं आपल्या हातची थोडीतरी सत्ता देण्यामध्यें आपला (इंग्रजांचा) कितीहि उदारपणा असला, तरी ह्यामुळें अमलबजावणी खात्यांचा अधिकार कांहीं अंशीं कमी झाला पाहिजे, हें अगदीं निर्विवाद आहे. आणि मग, हिंदुस्थानांतील सर्व धर्मांच्या, पंथांच्या व जातींच्या लोकांस समतेनें वागविण्याचें इंग्रजीराज्याचें धोरण टिकणार नाहीं; व त्यामुळें आपल्या आजपर्यंतच्या लौकिकास धक्का बसेल, व इंग्रजी राज्य ह्यापुढें हिंदुस्थानांत राहण्याचें कारण काय, हें सांगतां येणार नाहीं. यास्तव, जुन्या गोष्टी बदलून, जी नवी स्थिति येथें आह्मींच उत्पन्न करित आहों, तीमध्यें सर्व बाजूंना शक्य तितका समतोलपणा राखून कोणाच्या हातीं विनाकारण वाजवीपेक्षां अधिक सत्ता जाऊन,

त्यापासून इतरांचें नुकसान होणार नाहीं, अशी सावधगिरी आह्मीं ठेविली पाहिजे. आणि, जरी चुकी झाली, तरी ती अल्प-संख्याक लोकांच्या कल्याणासाठीं व्हावी, अशीहि खबरदारी घेतली पाहिजे. मुत्सदगिरीची अगदीं साधी गोष्ट ह्मणजे ह्याप्रमाणें व्यवस्था आह्मीं जरूर करणें, ही होय.

हिंदुस्थानांतील एकंदर लोकसंख्येच्या एक पंचमांशापेक्षां अधिक मुसलमान आहेत. हिंदुलोकांमध्यें जसे अनेक मानवीवं-शांतील लोक आहेत, तसेच मुसलमानांमध्येंहि आहेत. हिंदुस्था-नच्या वायव्येकडील सरहद्दीवरील कांहीं अर्धवट रानटी लोकांच्या टोळ्या, व पंजाब आणि संयुक्त प्रांतांतील पूर्वीच्या पुष्कळ मुसलमान राज्यकर्त्यांचे वंशज, हे लोक वगळले, ह्मणजे बाकीचे मुसलमान ह्मटले तर, बहुधा मुसलमानी अमदानींत धर्मांतर केलेले हिंदूच होत. पण, हिंदुस्थानांतील मुसलमानांमध्यें कितीहि निरनिराळ्या वंशांतील लोक असले, तरी एकजीव करण्याची शक्ति महमदी धर्मामध्यें विलक्षण असल्याकारणानें, त्यांचा सर्वांचा आतां चांगला मिलाफ झालेला आहे. ३० वर्षांपूर्वी बंगालमध्यें उठलेलें वाहबी बंड, वायव्येकडील सरहद्दीवरच्या टोळ्यांची नेहमींची पुंडाई व तेथील रानटी धर्मवेड्या लोकांत पुष्कळ वेळां प्रगट होणारी गाझीगिरि पाहिली, ह्मणजे महमदी धर्माच्या लोकांच्या अंगीं दंगाधोपा करण्याची प्रवृत्ति किती आहे व पुढें ती केव्हां बाहेर पडेल, ह्याचा नेम सांगवत नाहीं. तथापि, जे पुष्कळ मुसलमान सर्व हिंदुस्थानभर पसरले आहेत, त्यांच्यामध्यें—विशेषतः उच्च दर्जाच्या मंडळीमध्यें—परधर्मी लोकांचा छळ करण्याची किंवा त्यांना बळजबरीनें आपल्या धर्मांत आणण्याची प्रवृत्ति पुष्कळ अंशानें नाहींशी झाली आहे.

हिंदुधर्मांतील मूर्तिपूजा पाहून मुसलमानांस मोठा तिटकारा येतो. तसेंच त्यांच्या भोंवतीं सर्व बाजूंनें हिंदुलोकांचें कडें पडलें आहे. त्यामुळें, हिंदुस्थानच्या मुसलमानांचें ख्रिस्ती लोकांशीं तितकें वैर राहत नाहीं; व दोन्ही धर्मांतील मुख्य तत्व जें **एकेश्वरी मत**, त्यामुळें ख्रिस्ती लोक नास्तिक नसून, आपल्याप्रमाणेंच एका देवाची भक्ति करणारे आहेत, असें मुसलमानांना वाटतें. त्याचप्रमाणें, ते आह्मांस **ग्रंथाचे लोक** समजतात. आतां, जरी आमचें धर्मपुस्तक **कुराण** नसून **बायबल** आहे, तरी आमच्या धर्मपुस्तकास मुळींच पवित्रता नाहीं, असें मुसलमान कधींहि ह्मणत नाहींत. दुसऱ्याहि कित्येक गोष्टींमुळें त्यांचा ओढा इंग्रजलोकांकडे असतो. इंग्रजलोक **जेते** आहेत; आणि मुसलमानहि एका काळीं असेच **जेते** होते. अर्थात् **जित** लोकांचें वर्चस्व कबूल करण्यापेक्षां **जेत्यांचें** करण्यास त्यांची तयारी असते. तसेंच मुसलमानांचा लढवय्येपणा व मर्दानी खेळांची आवड, ह्या गुणांमुळें पुष्कळ इंग्रजांना ते आवडतात. त्यामुळें, इंग्रजांचें किंवा मुसलमानांचें हिंदूंशीं जितकें साम्य आहे, त्यापेक्षां इंग्रजांचें व मुसलमानांचें परस्परांशीं अधिक आहे, असें ह्या दोघांसहि वाटतें. शिवाय, मुसलमानांची प्रजावृद्धि फार मोठी आहे. त्यामुळें हिंदी सैन्यांतील उत्तम प्रतीचे पुष्कळ शिपाई नेहमीं मुसलमानलोकांतून मिळतात. शिपायांच्या बंडाचा प्रसंग खेरिज करून, मुसलमानांची राजनिष्ठा कधींहि ढळलेली नाहीं. राष्ट्रीय पक्षांतील आधुनिक हिंदी इतिहासकारांची असें दाखविण्याची नेहमीं धडपड असते कीं, मोगल बादशहांचा एक दुबळा वंशज काय तो मिळण्यासारखा असल्यामुळें, त्याचें नांव पुढें करून; त्याच्या निशाणाखालीं बंडवाले लढले, व पुष्कळ मुस-

लमानांनीं त्यावेळीं खरा देशाभिमान दाखविला, तरी नानासाहेब, तात्या टोपी व झांशीची राणी हींच हिंदु माणसें खरीं शूर असून, ‘ हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याकरितां युद्ध ’ करण्याच्या कामीं त्यांनींच खरा पुढाकार घेतला होता.

अलीकडच्या आमच्या काळांत, परलोकवासी सर सय्यद आहमदखानसारखें, हिंदुस्थानांतील आपल्या धर्मबांधवांवर कोणत्याहि मुसलमान गृहस्थाचें वाजवीरीतीनें वजन नव्हतें. सर सय्यद आहमदखानांची अशी पक्की समजूत होती कीं, हल्लीं इंग्लंडचा हिंदुस्थानाशीं जसा संबंध आहे, तसाच तो राहिला पाहिजे. त्यामुळें, ब्रिटिश राज्याची जोरानें तरफदारी करणारा त्यांच्यासारखा दुसरा कोणी नव्हता ह्मटलें तरी चालेल. इंग्लंडांतील सार्वजनिक शाळेच्या धर्तीवर त्यांनीं आपल्या लोकांकरितां अल्लीगड येथें एक कॉलेज काढिलें. त्याचप्रमाणें, येथील मुसलमानांचें भवितव्य ब्रिटिश राजसत्तेच्या अस्तित्वावर पूर्णपणें अवलंबून आहे, असें त्यांचें मत असून, त्याप्रमाणें त्यांनीं बहुतेक सुशिक्षित मुसलमानांस उपदेश करून वागावयास लाविलें. सर सय्यद आहमदी आतां जरी हयात नाहींत, तरी ही वरीलप्रकारची त्यांची कामगिरी अद्यापि जिवंतच आहे, असें ह्मटलें पाहिजे. हिंदुधर्माच्या पुनरुज्जीवनाच्या चळवळीमुळें ह्या वरील मतास अधिकच बळकटी आली; आणि पुढें मागें हिंदुस्थानांत हिंदुलोकांचें राजकीय बाबतींत वर्चस्व होऊन, मुसलमानांस वाईट दिवस खास येतील, अशी जी त्यांना भीति वाटत आहे, त्याप्रमाणें गोष्टी घडून येऊं नयेत अशी जी मुसलमानांची इच्छा ती फलद्रूप होण्यास, येथें ब्रिटिश सत्ता टिकली पाहिजे, हें त्यांच्या मनांत आतां चांगलें बिंबून राहिलें आहे.

हिंदी राष्ट्रीय सभेची प्राणप्रतिष्ठा झाल्यानंतर, मुसलमानांनीं तिला येऊन मिळावें, ह्मणून आरंभीं फार प्रयत्न झाले. त्यावेळीं, सर सय्यद आहमदींनीं आपल्या धर्मबांधवांस निक्षून सांगितलें कीं, तुह्मी राजकीय चळवळींपासून अगदीं अलग राहा; आणि तुमचें कल्याण व्हावें अशी जी सरकारची सदिच्छा आहे तिच्यावर व त्यांच्या शब्दावर पूर्ण भरंवसा ठेवा. पण, ते दिवस जाऊन, आतां स्थिति झपाट्यानें बदलत चालली आहे. ह्मणून, हिंदुलोकांची महत्त्वाकांक्षा पाहून भीति उत्पन्न झाल्या-कारणानें, ऑल–इंडिया--मुस्लिम लीग ( हिंदुस्थानांतील सर्व मुस-लमानांची ऐक्यवर्धक संस्था) नांवाची जी राजकीय संस्था मुसल-मानांनीं उभारली आहे, ती बाह्यात्कारी सर सय्यद आहमदीच्या उपदेशाप्रमाणें नसली, तरी तसें करणें सध्यांच्या कांळीं त्यांना भाग पडलें आहे. शिवाय, हिंदुस्थानांतल्या प्रत्येक जातीचें किंवा समा-जाचें राजकीय बाबतींतलें ह्मणणें सरकारच्या कानावर जावें, अशी नवीन योजना खुद्द इंग्रजसरकारच करित आहे. ह्मणून, मुसलमानांचें असें ह्मणणें आहे कीं, आतां कोणीच मागें राहतां उपयोगी नाहीं.

वर सांगितलेली मुसलमानांची **ऐक्यवर्धक** संस्था **आगा-खान** नामक अत्यंत व्यापकदृष्टीच्या व सुशिक्षित हिंदी–मुसल-मानगृहस्थांनीं प० लो० नबाब मोहसिन-उल्मुल्क यांच्या पूर्ण पसंतीनें स्थापन केली आहे. हे नबाबसाहेब माजी सर सय्यद अहमदींच्या अत्यंत विश्वासांतले असून, ह्यांच्यामागें त्यांनींच मुसलमान लोकांचा पुढाकार घेऊन, सार्वजनिक कामें चालविलीं होतीं. शिवाय, ही **लीग** निव्वळ--किंवा मुख्यत्वेंकरूनसुद्धां–राज-कीय कामासाठींच आहे, असें नाहीं. हिंदुस्थानांतील सर्व ठिका-णच्या मुसलमानांच्या हितसंबंधाचें संरक्षण करून त्याचें दृढी-

करण करण्याकरितां, व त्यांची सामाजिक शिक्षणविषयक, सांपत्तिक व राजकीय बाबतींत सुधारणा करण्याकरितां एक मुख्य मध्यवर्ती संस्था पाहिजे, ह्मणून ही लीग काढण्यांत आली आहे. गेल्या ज्यानेवारींत ह्या लीगची वार्षिक बैठक दिल्लीस झाली. त्यावेळीं, मि० अमीर अल्लीस प्रिव्ही-काउन्सिलच्या कामामुळें जरी सभेस हजर राहतां आलें नाहीं, तरी त्यांनीं आपलें भाषण लिहून पाठविलें होतें; व त्यांत ह्या लीगच्या कार्यक्रमाचा चांगला खुलासा केला होता. तसेंच, सर्व मुसलमानांनीं आपले पुढारी ह्मणून मान्य केलेल्या ना० आगाखानसाहेबांच्या भाषणांतहि लीगच्या उद्देशांचें स्पष्टीकरण झालें होतें. हिंदुस्थानाला स्वराज्य मागण्याची हांव ह्या लीगच्या कार्यक्रमांत कोठें दिसत नाहीं. तिचें मागणें एवढेंच आहे कीं, " साम्राज्याच्या छत्राखालींच ह्या देशाची सुव्यवस्थितपणें सर्व बाजूनें स्थिति सुधारत जावी. लाहोर येथें भरलेल्या कांग्रेसमध्यें राजकीय सुधारणांबद्दल जी कृतज्ञताबुद्धि व आनंद दिसून आला, त्यापेक्षां लीगच्या ठिकाणीं अधिक आला. त्याचप्रमाणें, ह्या सुधारणांविषयीं लीगची दृष्टि आकुंचित नसून, त्यापासून एका विशिष्ट वर्गाचा किंवा जातीचा फायदा करून घेण्याचीहि तिची इच्छा नाहीं. एकमेकांशीं सलोख्यानें व एकजुटीनें वागून, हिंदु-मुसलमानांस निरनिराळ्या दिशेनें कसें काम करितां येईल, व त्यांनीं दोघांनींहि कसें केलें पाहिजे, हें उत्तम रीतीनें दाखवून देण्याकरितां, ना० आगाखानांनीं खरोखर विशेष खटपट केली. ना० आगाखानच्या मतानें, मुसलमानांच्या प्रतिनिधींस नवीन काउन्सिलांत तीन प्रकारचें काम करावयाचें आहे.

पहिली गोष्ट अशी कीं, शिक्षणप्रसार करणें, सर्व शिकणाऱ्या मुलांस

प्राथमिक शिक्षण फुकट मिळेल अशी व्यवस्था करणें, व्यापार-धंद्याची वाढ करणें, सहकारी पतपेढ्या वगैरे स्थापन करून शेतकीची सुधारणा करणें, देशांतील नैसर्गिक संपत्ति बाहेर काढणें, इत्यादि गोष्टी करून, देश सर्व प्रकारें सुखी करण्याकरितां, इतर हिंदी गृहस्थांबरोबर हिंदी लोकांचे प्रतिनिधी ह्मणून अगदीं मनापासून त्यांनीं काम केलें पाहिजे. हिंदु-मुसलमानांस एकजुटीनें काम करण्यास अशी पुष्कळच जागा आहे. दुसरी गोष्ट अशी कीं, हिंदु व हिंदी समाजांतील इतर जाती, पंथ वगैरेस, त्यांच्या विशेष परिस्थितीप्रमाणें, आपापल्या समाजाची स्थिति सुधारण्याकरितां कांहीं विशेष गोष्टी करावयाच्या असतात, त्या घडून येण्यासाठीं बंधुप्रेमानें त्यांना मदत करणें, होंहि आमच्या प्रतिनिधींचें काम आहे. कारण, हिंदु व मुसलमान ह्या उभयतां बंधूंची सुधारणा भिन्न तत्वांवर झाली अहि, तरी ह्या प्रत्येक समाजांत कांहीं विशेष प्रकारच्या उणीवा आहेत व त्यांपासून प्रत्येकाचें नुकसान होत आहे. शिवाय, सांपत्तिक स्थिति व शिक्षण ह्या बाबतींत दोन्ही समाजांचा सारखाच कमीपणा आहे. तिसरी गोष्ट अशी कीं, आपल्या मुसलमान धर्मबांधवांच्याच केवळ हितासाठीं जे कांहीं सामाजिक उपाय व्हावयास पाहिजे असतील, ते देखील करण्यासाठीं आमच्या प्रतिनिधींनीं डोळ्यांत तेल घालून बसलें पाहिजे. ह्या कामीं हिंदु सभासद मुसलमानांस बंधुप्रेमानें मदत करतील, अशी आह्मांला आशा आहे. कारण, आमच्या कांहीं अडचणी अशा असतील कीं, त्या त्यांना माहीत देखील नसतील; व त्या आमच्या आह्मांलाच फक्त बरोबर रीतीनें कळून येत असतात.

ह्या भाषणांत जें औदार्य व जी मुत्सदगिरी दिसून येते, तशी दुसरीकडे कोठें दिसून येणार नाहीं. हिंदु व मुसलमान ह्या दोन समाजांचें कमीअधिक दूरचें भवितव्य कांहीं जरी असलें, तरी अलीकडे थोड्या वर्षांत हिंदु राष्ट्रीय पक्षाकडून मुसलमानांची आगळीक होत असून, त्यांना बाजूला सारण्याचा जो प्रयत्न होत आहे, त्यावरून उभय समाजांत परस्परांविषयीं द्वेषबुद्धि वाढत चालली आहे, व तिचा परिणाम लवकरच वाईट झाल्यावांचून राहणार नाहीं, ही गोष्ट ना० आगाखानांच्या निःसंशय लक्ष्यांत आली आहे. ना० आगाखान यांचें भाषण पंजाबांत झालें, व

त्या ठिकाणीं तर हिंदु–मुसलमानांमधील वैषम्य जसें विकोपास गेलें आहे, तसें साऱ्या हिंदुस्थानांत इतरत्र आढळून येत नाहीं. आपला गुरु जो स्वामी **दयानंद** त्याच्या ग्रंथांतील वचनें घेऊन, आर्यसमाजवाले उपदेशक मुसलमानी धर्मावर, वर्तमानपत्रांतून व भाषणांतून, दोष दाखविण्याच्या बुद्धीनें वारंवार निंदाप्रचुर टीका करित असतात. पण शिवाय, दंगाधोपा करण्यास सज्ज झालेली हिंदुमंडळी, इंग्रजांच्या विरुद्ध चाललेल्या चळवळींत मुसलमानलोक येऊन मिळत नाहींत, ह्मणून त्यांच्यावर व्यापार-धंद्यांत व सामाजिक बाबींत बहिष्काररूपी शस्त्र चालवून, त्यांची खोड मोडण्याच्या उद्योगास लागली आहे.

आतां, ह्या बहिष्कार अस्त्राचा प्रयोग उघडपणें जरी होत नाहीं, तथापि त्यापासून मुसलमानांचा छळ होत नाहीं, व त्यांचें नुकसान होत नाहीं, असें मात्र समजतां कामा नये. अशा रीतीनें उत्पन्न झालेली द्वेषबुद्धि गेल्या सालीं पेशावरास भयंकर दंग्यांच्या रूपानें बाहेर पडली, व पूर्वबंगालमध्यें बहिष्काराची चळवळ अगदीं शिखरास जाऊन पोहोंचली, तेव्हां तेथेंहि असाच प्रकार झाला. निजामशाहींतील हिंदु-मुसलमानांमध्यें आजपर्यंत चांगला सलोखा असे. खुद्द निजामसरकार मुसलमान असून, त्यांचा राज्यकारभार मोठ्या शहाणपणानें चालला आहे, व त्यांचे मुख्य दिवाण एक हिंदु गृहस्थ आहेत. परंतु, निजामसरकारची राजधानी जी हैदराबाद तेथें आतां ही स्थिति हळूंहळूं पालटूं लागली आहे. कारण, तेथें कांहीं थोडे बंगालीलोक येऊन राहिले आहेत; आणि ‘ आर्यांकरितां आर्यावर्त ’ असल्या राष्ट्रीय मतांचा तेथें ह्या लोकांकडून प्रसार होत आहे. त्यामुळें, हिंदुलोकांच्या मनाची चलबिचल होऊन, मुसलमानां-

विषयींच्या आजपर्यंतच्या त्यांच्या प्रेमांत विरजण पडूं लागलें आहे. हिंदु—मुसलमानांमध्यें—विशेषतः दोन्ही समाजांतील खालच्या प्रतीच्या लोकांत—निरंतरचा वैरभाव आहे; व त्यामुळें हिंदुस्थानांतील इंग्रज अधिकाऱ्यांस नेहमीं मोठी चिंता वाटत असते. धर्मसंबंधीं मतें, सामाजिक चालीरीती, लोकांचा इतिहास, वगैरे कारणांमुळें जें वैषम्य उत्पन्न होतें, तें जसजसा शिक्षणाचा प्रसार होईल, तसतसें हळूंहळूं नाहींसें होणार आहे. अगदीं क्षुल्लक गोष्टी, विरुद्धपक्षाच्या मिरवणुकींची एके ठिकाणीं भेट, हिंदु-लोकांनीं पवित्र मानिलेल्या गाईंचा छळ, कांहीं केवळ व्यक्तिवाचक भांडण, अशासारख्या गोष्टींमुळें मोठ्या हातघाईचा प्रसंग येऊन, त्यांत दोन्ही जातींतील सर्व लोक सामील होतात; व आपण हा भांडणतंटा कशाकरितां करित आहों, हेंहि त्यांना माहीत नसतें. चोरून आंतल्या बाजूनें कांहीं गुप्त कारस्थानें करून, दुसरी बाजू आपलें घोडें पुढें ढकलूं पाहत आहे, असें जेव्हां एका बाजूला वाटूं लागतें, तेव्हां तर फारच मोठा धोका असतो. अलीकडे हिंदुलोकांनीं ज्या राजकीय चळवळी सुरू केल्या आहेत, त्यांमुळें मुसलमानलोकांना वर सांगितल्याप्रमाणें वाटूं लागलें आहे. महाराष्ट्रांत टिळकाची **गोरक्षणी** चळवळ सुरू असतां, १८९३ सालीं मुंबईस हिंदु—मुसलमानांत मोठमोठे दंगे झाले; व हाच प्रकार थोड्याबहुत प्रमाणानें मधून मधून सर्व हिंदुस्थानभर होत होता. त्यावेळीं मुंबई-सरकारनें असा रिपोर्ट केला होता कीं, मुसलमानांच्या मनांला अशी भीति पडली आहे कीं, हिंदुलोकांमुळें आपलें व आपल्या धर्माचें नुकसान होत आहे; तसेंच, देशांत आज-पर्यंत त्यांचें जें वजन होतें व जो दर्जा होता, तो हळूं हळूं

नाहींसा करण्याची खटपट हिंदुलोक करित आहेत. आणि, आपल्या धर्माचें संरक्षण करण्याकरितां कांहीं विशेष उपाय योजले पाहिजेत, असेंहि त्यांच्या मनानें घेतलें आहे. अशी जी ही भीति मुसलमानांना वाटत होती, ती हळूं हळूं बळावत जाऊन आतां त्यांच्यापैकीं बहुतेक सर्वांची ह्या गोष्टीबद्दल पक्की खात्री होऊन चुकली आहे. आणि, राष्ट्रीय चळवळ ह्मणून चाललेल्या तमाशाचे जे पुष्कळ अनिष्ट परिणाम झाले आहेत, त्यांपैकींच मुसलमानलोकांची ही वरील समजूत होय.

मुसलमानलोकांस आपल्या इतिहासाचा अद्यापि अभिमान वाटतो; त्यांची आपल्या धर्माच्या ठिकाणीं अढळ निष्ठा आहे; व आपल्या प्रजावृद्धीच्या सामर्थ्याबद्दल त्यांच्या ठिकाणीं जाणीव आहे. अशा लोकांच्या मनानें आतां असें घेतलें आहे कीं, हिंदुस्थानांत हिंदुलोकांचे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष वर्चस्व स्थापन झालें, तर आपल्या समाजास फारच वाईट स्थिति येणार आहे. ह्मणून, हिंदुवर्चस्वाचा प्रतिकार करण्याचा प्रयत्न आपल्या हातून झालाच पाहिजे. आतां, मुसलमान लोकांचा जर कां एकदां असा समज झाला कीं, हिंदुलोकांच्या वर्चस्वाचा प्रतिकार करण्यास इंग्रजीराज्य समर्थ नसून, ह्या लोकांच्या ठिकाणीं अशी न्यायबुद्धिहि वसत नाहीं, व ह्मणून आपण आपल्याच मनगटाच्या जोरावर आपला कार्यभाग उरकून घेतला पाहिजे, तर देशांतील शांततेच्या बाबतींत हिंदुस्थानचें दुर्भाग्य ओढवलेंच ह्मणून समजा. कोणी असें ह्मणतील कीं, इंग्रजसरकारशीं एकनिष्ठेनें वागण्यापासून कांहींच फायदा नाहीं, असें मुसलमानांस वाटून, ब्रिटिश सत्ता उलथून पाडल्यावर पुढें देशांत जो ब्रह्मघोटाळा माजून राहील, त्यांत थोड्या फार वेळांत, आपण आणखी एकदां

पुढें येण्यास खास चुकणार नाहीं, असा त्यांचा ग्रह होऊन, ते इंग्रजी राज्याच्या शत्रूंस जाऊन मिळाले, तरी देखील हिंदुस्थानचें दुर्दैव ओढवेल. सारांश, आमचें राज्य हिंदुस्थानांत स्थापन झाल्यापासून, ह्या दोन्ही समाजांस अगदीं समतेनें व निःपक्ष-पातानें वागविण्याविषयीं अत्यंत सावधागिरी राखण्याची वेळ कधींहि आली नव्हती. गेल्या थोड्या वर्षांत इंग्रजलोकांविरुद्ध ज्या कांहीं राजकीय चळवळी उपस्थित करण्यांत आल्या आहेत, त्यांपासून मुसलमानलोक अगदीं खंबीर मनानें अलग राहिले आहेत; व एकंदरींत कोणतीहि क्रांति घडवून आणण्याच्या अगदीं विरुद्ध असून, ह्या कामीं त्यांचें सामर्थ्यहि फार मोठें आहे, ही गोष्ट विसरणें गैरमुत्सदीपणाचें होईल. दुसरी गोष्ट अशी कीं, हिंदुसमाजांतील बहुतेक लोक अद्यापि आमच्याशीं मित्र-भावानें वागत असून, त्यांच्यापैकीं फारच थोडे लोक सरकारशीं राजद्रोहाचें वर्तन करीत आहेत. अर्थात् अशा थोड्या लोकांच्या अपराधासाठीं एकंदर हिंदुसमाजावर आग पाखडण्याकरितां, आह्मी मुसलमानांवर मेहरनजर करून, त्याचें नुकसान करण्यास उद्युक्त झालों आहों, असा हिंदुलोकांचा समज आह्मीं करणें, हें देखील गैरमुत्सदीपणाचें होईल.

## भाग १० वा.

# दक्षिणहिंदुस्थान.

हिंदुस्थानांतील विशेष भयंकर स्वरूपाची अस्वस्थता ह्मटली ह्मणजे आजपर्यंत **महाराष्ट्र**, **बंगाल** व **पंजाब** ह्या प्रांतांतच मुख्यतः आढळून आली आहे. महाराष्ट्राचा कांहीं भाग **मध्यप्रांतांत** मोडतो; व ह्या **मध्यप्रांतांत** मुंबई-इलाख्यांतूनच अस्वस्थतेची लाट कांहीं अंशीं गेली आहे. तसेंच, बंगाल व पंजाब ह्या प्रांतांना लागून असणाऱ्या **संयुक्त प्रांताच्या** कांहीं जिल्ह्यांत ह्या दोन प्रांतांतीलच अस्वस्थतेच्या पुराचा लोट शिरला आहे. पण, मध्यप्रांताचे कमिशनर मि० **क्रॅडॉक** व संयुक्तप्रांताचे ले० गव्हरनर सर जॉन **ह्यूवेट** ह्यांच्या निश्चयी व अनुभवी कारभारामुळें, ह्या गडबडीच्या काळांतसुद्धां हे दोन्ही प्रांत सरकारच्या आंवाक्याबाहेर बेताल होऊन गेले नाहींत. पेशावर येथें जाऊन राहिलेल्या कांहीं भांडखोर बंगाली लोकांच्या चिथावणीमुळें व चळवळीमुळें, हिंदु व मुसलमान यांच्यामध्यें नेहमीं धुमसत राहणाऱ्या वैराग्नीचा भडाका उडाला खरा; तथापि, सरहद्दीवरील नवीन प्रांतांत व एकंदर वायव्येकडील सरहद्दीवर आह्मांला ज्या अडचणी आहेत, त्या अगदीं निराळ्या प्रकारच्या आहेत. पठाणांचा दंगेखोरपणा व कधीं कधीं दृष्टीस पडणारी त्यांच्यांतील धर्मवेडाची उसळी, या गोष्टींमुळें हिंदुस्थानसरकारास नेहमीं चिंता उत्पन्न होत असते. पण, बंगा-

त्यांच्या **स्वदेशी**ची व **स्वराज्या**ची ओरड, किंवा पंजाब्यांची "आर्यांकरितांच आर्यावर्त" अशी गर्जना, असल्या गोष्टींचा त्या आडदांड व बहुतेक अर्धवट रानटी अशा डोंगरी लोकांवर कांहींएक परिणाम व्हावयाचा संभव नाहीं. दूर अंतरावरील राजद्रोहाचा प्रतिध्वनि त्यांच्या डोंगरी किल्ल्यांत घुमूं लागला, ह्मणजे केवळ कांहीं अस्पष्ट कल्पना त्यांच्या मनांत येऊन, इंग्रजलोकांच्या क्षमाशीलतेचें व सौम्यपणाचें त्यांना आश्चर्य वाटूं लागतें. आणि, जर कधींकाळीं ब्रिटिश राज्यावर संकट आलें, तर पठाण व बलुची लोकच सर्वांच्या अगोदर आपल्या तरवारी पाजळतील व बंदुका खांद्यावर टाकतील; आणि, आह्मी आमच्या मदतीला बोलावल्यावरून किंवा आपल्या वाडवडिलांच्या रीतीला अनुसरून, स्वतःचा फायदा करून घेण्यासाठीं, हिंदुस्थानच्या सुंदर सुपीक मैदानांत टोळधाडीप्रमाणें उतरतील. आणि, इंग्रजी राजसत्ता उलथून पडल्यावर जो ब्रह्मघोंटाळा माजेल, त्यांत आपला लाग साधून घेऊन, येथें राज्यस्थापना करतील. हिंदुस्थानच्या ईशान्येकडील सरहद्दीवर जीं अर्धवट स्वतंत्र राज्यें आहेत, त्यांचा व बाकीच्या हिंदुस्थानचा अर्थाअर्थीं कांहींएक संबंध दिसून येत नाहीं. नेपाळ, भुतान व सिक्किम हीं संस्थानें हिमालयाच्या डोंगराळ प्रदेशांत असून, तेथें मुख्यतः मंगोलियन वंशाचे बौद्धलोक राहतात. ह्या लोकांचें दक्षिणेकडील हिंदी लोकांशीं जितकें सख्य आहे, त्यापेक्षां उत्तरेकडील तिबेटी व चिनी लोकांशीं फारच अधिक आहे. केवळ राज्यकारभाराच्या सोईसाठीं आसामप्रांत पूर्व बंगालशीं जोडला आहे; आणि, ब्रह्मदेशतर खरोखर ह्याच कारणामुळें हिंदुस्थानाचें एक शेंपूट होऊन बसला आहे.

नाहींतर, बंगालचा उपसागर व पटकाई पर्वतांतील घनदाट जंगलें ह्यामुळें जसा हा प्रदेश हिंदुस्थानापासून अगदीं अलग झालेला आहे, त्याचप्रमाणें, जाती, धर्म, आचारविचार, रीती-भाती, इतिहास, इत्यादि गोष्टींमध्येंहि येथील लोक हिंदीलोकां-पासून अगदीं भिन्न आहेत.

ह्या सरहद्दीवरील कोणत्याहि प्रदेशांत हिंदुधर्म दृढमूल झाला नाहीं; आणि ह्मणूनच, हिंदुधर्माशीं इतक्या संलग्न अस-लेल्या हिंदी राष्ट्रीय पक्षास इकडल्या कोणत्याहि प्रदेशांतील हवापाणी मानवणार नाहीं. परंतु, दक्षिण–हिंदुस्थानांत हिंदु-धर्माचें वर्चस्व फारच असतांहि, महाराष्ट्रांतून उत्तरेकडे पसरत जाऊन बंगालप्रांतांत शिरलेली राजकीय अस्वस्थतेची लाट अद्यापि दक्षिण–हिंदुस्थानांत जाऊन पोहोंचूं नये, हें सकृद्दर्शनीं थोडेंसें चमत्कारिक दिसतें. परंतु, ह्या विस्तीर्ण प्रदेशांत सृष्टिदेवतेनेंच मोठमोठाले भेद निर्माण करून ठेविले आहेत, ही गोष्ट लक्ष्यांत घेतली असतां, वरील चमत्काराचा तात्काळ उलगडा होतो. मद्रासइलाखा आणि ह्मैसूर, कोचीन व त्रावणकोर हीं तीन संस्थानें मिळून दक्षिण–हिंदुस्थान होतें; व ह्यामध्यें आणि मध्य व उत्तर हिंदुस्थानामध्यें जमीन–आसमानाची तफावत आहे. महाराष्ट्र–प्रांत ह्मटला ह्मणजे उंच डोंगरसपाटीचा प्रदेश असून, तो प्रखर सूर्यतापानें अगदीं भाजून निघत असतो. महाराष्ट्राच्या दक्षिणे-कडील हिंदुस्थानच्या द्वीपकल्पाचा प्रदेश, कृष्णेच्या मुखापासून हिंदीमहासागरापर्यंत, झपाट्यानें चिंचोळा होत गेला आहे. येथें पाऊस वारंवार पडत असल्याकारणानें, व मलबार आणि कारोमां-डल अशा दोन्ही किनाऱ्यांवरून वाहत येणाऱ्या हवेंत अधिक ओलावा असल्यामुळें, येथील हवा अधिक समशीतोष्ण आहे;

व उन्हाळा पुष्कळ दिवस एकसारखा असतो, तरी तो महाराष्ट्रापेक्षां कमी कडक असतो. उष्णकटिबंधांतील प्रदेशांत ज्याप्रकारचें सृष्टिसौंदर्य दृष्टीस पडतें, त्याप्रमाणें येथेंहि दृष्टीस पडतें. गंगानदीच्या मुखांमधील त्रिकोणाकृति प्रदेशांचा सुपीकपणा अद्वितीय आहे; व त्यापेक्षां दक्षिण हिंदुस्थानांतील सखल प्रदेशाचा सुपीकपणा जरी अधिक नसला, तरी सर्व समुद्रकिनाऱ्यावरील डुलत असणाऱ्या नारळीच्या बागा, मदुरा आणि कोईमतूर येथील तंबाखूची उत्तम पिकाऊ शेतें, निलगिरीच्या उतरणीवरील सिंकोना, मिरीं, वेलदोडे व इतर मसाल्यांच्या पदार्थांचे मळे, तसेंच पश्चिमभागच्या घांटास आच्छादून टाकणारी साग, आबनस व चंदन इत्यादि इमारती लांकडांचीं वनें, असा देखावा पाहिला, ह्मणजे सृष्टिदेवीच्या विशेष कृपेमुळें ह्या प्रांताला तिच्याकडून नानाप्रकारच्या देणग्या अगदीं सढळ हातानें मिळाल्या आहेत, असें वाटूं लागतें. इकडील लोकवस्ती कित्येक ठिकाणीं विलक्षण दाट असून, सर्व लोकांचा निर्वाह बहुधा जमिनीपासून प्राप्त झालेल्या पदार्थांवरच असतो. हे लोक प्राचीन द्राविडी वंशाचे असून, इतर ठिकाणच्या हिंदी लोकांप्रमाणेंच उद्योगी व मितव्ययी आहेत. शिवाय, ते स्वभावानें शांत असून, त्यांच्या अंगीं संथपणा असतो. हिंदुस्थानांतील मूळचे **अनार्य** लोक ह्या ठिकाणीं जसे आढळून येतात व त्यांच्याविषयीं जशी माहिती मिळते, तसा प्रकार इतरत्र होत नाहीं. त्याचप्रमाणें, आर्यलोकांची विद्याचारसंपन्नता उत्कृष्ट प्रकारची असल्याकारणानें, अगदीं आरंभीं त्यांनीं ज्या सामाजिक व धार्मिक संस्था हिंदुस्थानांत येऊन स्थापन केल्या, त्यांचें मूळचें शुद्ध स्वरूप येथें जसें दृष्टीस पडतें, तसें दुसरीकडे कोठें पडत नाहीं. कारण, इतर

ठिकाणीं पुढें अनेक प्रकारच्या क्रांत्या घडून आल्यामुळें, आर्यांच्या मूळसंस्थांत पुष्कळच फेरफार होऊन गेले; पण असा प्रकार दक्षिण–हिंदुस्थानांत मुळींच झाला नाहीं. तसेंच, ह्या विलक्षण देशामध्यें जे नानाप्रकारचे लोकोत्तर चमत्कार दृष्टोत्पत्तीस येतात, त्यांपैकीं एक असा आहे कीं, ह्या अज्ञात भूमीकडे यूरोपखंडाची नजर वळण्यापूर्वींच शेंकडों वर्षें, हिंदुस्थान व त्याच्या पश्चिमेकडील देश यांचा जो वेळोवेळीं परस्परांशीं परिचय झाला होता, त्याची प्रत्यक्ष साक्ष देणाऱ्या पुष्कळ गोष्टी फक्त ह्याच प्रांतांत सांपडतात; पण, इतर कोठें आढळण्यांत येत नाहींत. उदाहरणार्थ, अलीकडच्या काळांत ह्या प्रांतांत जितके लोक ख्रिस्ती झाले, तितके दुसरीकडे कोठेंहि झाले नाहींत. ह्याचें कारण बहुतकरून असें असावें कीं, ज्यांच्या उत्पत्तीचा काळ ख्रिस्ती शकाच्या अगदीं पहिल्या शतकापर्यंत मागें जातो, असे एतद्देशीय ख्रिस्ती समाज अझूनहि इकडे आढळण्यांत येतात. ख्रिस्ती धर्मप्रसारक **सेंट टॉमस**, ह्यानेंच प्रथम दक्षिण-हिंदुस्थानांत धर्मोपदेश केला व अखेरीस मद्रासजवळच्या **सेंट टॉमस** नांवाच्या टेंकडीवर स्वधर्मासाठीं त्याला आपला प्राण खर्च करावा लागला, ही दंतकथा खरी मानण्यास इतिहासाचा आधार नसला, तरी त्यानंतर थोडक्याच शतकांनीं, **इराण** व **मेसापोटेमिया** येथील **नेस्टोरियन** व **खाल्डियन** धर्मोपदेशकांनीं तिबेट, तार्तरी इत्यादि देशां–सुद्धां सर्व आशियाखंडाभर धर्मप्रसार केल्यावर, दाक्षिण हिंदुस्थानांत येऊन, तेथें त्याचें बीजारोपण केलें, असें मानण्यास सबळ पुरावा आहे. इंग्लंडचा राजा **आल्फ्रेड** ह्यानें, इ. स. ८८३ मध्यें **सेंट टॉमस** व **सेंट बार्थालोम्यू** ह्यांच्याकरितां, हिंदुस्थानांत कांहीं धर्मादाय रकम पाठविली होती,

असें साक्सन बखरीवरून दिसून येतें. आणि, कारोमांडल किनाऱ्यावरील लहान लहान ख्रिस्ती समूहांशिवाय, मलबार किनाऱ्यावर त्या काळीं भरभराटीस आलेले ख्रिस्ती लोकांचे दोन समाज होते. ह्याच ठिकाणीं, आपणांस **सिरियनचर्चचे** ह्मणून ह्मणविणारे ख्रिस्ती लोक अद्यापि आपला धर्म संभाळून आहेत. **पॅलेस्टाईन**—मधील दुसऱ्या **देवळाचा** नाश झाल्यावर, तेथील **ज्यू** लोकांना हांकून देण्यांत आलें होतें. त्यांच्यापैकीं कांहीं लोक हिंदुस्थानांत पळून येऊन, येथें वसाहत करून राहिले, अशी दंतकथा, कोचीनप्रांतांत जे थोडेसे श्वेतवर्ण ज्यू—लोक सध्यांच्या काळीं आढळून येतात, त्यांच्यांत आहे. ह्यावरून पश्चिमेकडील देशांशीं हिंदुस्थानचें प्राचीनकाळीं दळणवळण होतें, ही गोष्ट सिद्ध करण्याकरितां वर जो पुरावा दिला आहे, त्याच्याच सांखळींतिल ही दंतकथा एक चमत्कारिक दुवा आहे, असें ह्मटलें पाहिजे. ह्या लोकांच्या पूर्वजांना, पश्चिम किनाऱ्यावरील वहिवाटीप्रमाणें, सनदेदाखल जो ताम्रपट मिळाला होता, व जो अद्यापिहि ह्या लोकांजवळ आहे, तो इ. स. ७०० च्या सुमारास दिलेला असावा, असें चांगल्या तज्ज्ञ लोकांचें मत आहे. आणि, ह्या ताम्रपटानें त्या लोकांस, इतक्या प्राचीन काळीं, जे विशेष प्रकारचे हक्क व अधिकार देण्यांत आले होते, त्यांवरून त्यांनीं मलबारच्या हिंदुराजांचा लोभ व विश्वास विलक्षण संपादन केला होता, ह्याची साक्ष पटते. जोंपर्यंत ख्रिस्ती व ज्यू लोकांपासून हिंदुराजांस त्रास पोहोंचत नव्हता, तोंपर्यंत ह्या लोकांना पूर्ण शांततेनें राहण्यास मिळून, आपापल्या धर्मसमजुतीप्रमाणें बिनहरकत वागण्यास सांपडत असे. परंतु, **पोर्तुगीज** लोकांच्या ह्या प्रांतावर स्वाऱ्या सुरू झाल्यापासून ही स्थिती पाल-

टून, ख्रिस्ती व ज्यू लोकांच्या समाजांस उतरती कळा लागली, असें दिसतें.

आर्यलोकांच्या श्रेष्ठतर विद्याचारसंपन्नतेपुढें प्राचीन द्राविडी लोकांस केव्हां मान वांकवावी लागली व त्यांचें हें वर्चस्व पुढें कसें राहिलें, हें समजण्यास अद्यापि कांहीं मार्ग नाहीं, असें ह्मटलें तरी चालेल. हल्लीं खरोखर आपणांस इतकीच माहिती आहे कीं, फार प्राचीन काळीं उत्तरेकडील ब्राह्मणांनीं दक्षिण हिंदुस्थानांत आपला धर्म आणून, प्रथमतः बहुधा बळजबरीनें त्याची तेथें स्थापना केली असावी; आणि, तेव्हांपासून ह्या नवीन ब्राह्मणांचें इकडे इतकें प्रस्थ वाढलें कीं, सांप्रत धार्मिक व सामाजिक बाबतींत त्यांच्या-इतका श्रेष्ठपणा दुसऱ्या कोणत्याहि ब्राह्मणजातीस इतर ठिकाणीं मिळत नाहीं. मलबार-प्रांतांतील **नामपुत्री** ब्राह्मणांच्या हातीं—केवळ ब्राह्मण ह्मणूनच—जितकी सत्ता आहे व जे हक्क ते उपभोगीत आहेत, तितकी सत्ता व तसे हक्क हिंदुस्थानांत इतरत्र कोणत्याहि ब्राह्मणजातीस भोगावयास मिळत नाहींत. त्रावणकोरचे महाराजे क्षत्रियकुलोत्पन्न आहेत; तथापि, त्यांनासुद्धां सिंहासनारूढ होण्यापूर्वीं, मोठ्या खर्चाचा एक विशेष संस्कार करवून घेऊन, द्विज-पदास पोहोंचून, **क्षत्रियत्व** संपादन करावें लागतें. नामपुत्री ब्राह्मणांत अझवंचरी ह्मणून जें कुल आहे, त्यांतील मुख्य पुरुषास दर सहा वर्षांनीं स्वतः महाराजास नमस्कार करावा लागतो. ही चाल अद्यापि पाळण्याचा हेतु असा आहे कीं, ब्राह्मणाकडे क्षत्रियांचें धर्मगुरुत्व असल्यामुळें, ह्यांनीं त्यांना पूज्य मानिलें पाहिजे, व सिंहासनाधीश क्षत्रियाचीसुद्धां योग्यता ब्राह्मणापेक्षां कमी आहे, असें जगास दाखवावयाचें. शिवाशिवीसंबंधानें सर्व मलबारप्रांतांतील

ब्राह्मण जे कडक नियम स्वतः पाळतात व दुसऱ्यास पाळावयास लावितात, त्यांवरून ब्राह्मणांची जात इकडे किती लोकोत्तर पवित्र मानिली जाते, ह्या गोष्टीची जशी यथार्थ कल्पना येते, तशी दुसऱ्या कशानें येत नाहीं. खालच्या जातींतील मनुष्य किती अंतरावर आला असतां, ब्राह्मणाच्या पवित्र देहास त्याचा विटाळ होतो, ह्याबद्दलचे इतके कडक नियम दुसरीकडे कोठेंहि करण्यांत आलेले नाहींत. **बाजार** जातीचा मनुष्य जवळ आल्यास हरकत नाहीं; पण, त्यानें ब्राह्मणांस स्पर्श करितां कामा नये. **चोगन** जातीचा मनुष्य २४, **कनिसन** जातीचा ३६, **पुलायन** जातीचा ६४ व **नायडी** जातीचा ७२ फुटाचे आंत ब्राह्मणाजवळ येतां कामा नये. निरनिराळ्या मुख्य जातींमध्येंच नव्हें, तर अशा जातींच्या—विशेषतः वरिष्ठ जातींच्या—असंख्य पोटभेदांमध्यें देखील, लग्नकार्य, अन्नव्यवहार, धंदा, भक्ष्य पदार्थ, धार्मिक विधी व संस्कार आणि स्वतःची वागणूक, ह्यांसंबंधानें जे अनेक नियम पाळले जातात, ते देखील वरच्याप्रमाणेंच मोठे श्रम घेऊन, अगदीं नक्की करून टाकण्यांत आले आहेत. ह्या प्रांतांतील कांहीं उच्च जातींत, विवाह, कुल व वारसा ह्या संबंधाचे जे नियम आहेत, त्यांवरून दक्षिण–हिंदुस्थानांत अतिप्राचीन काळची समाज-व्यवस्था अद्यापि अस्तित्वांत राहिली आहे, ह्या गोष्टीची खात्री पटून मनाला कांहीं विशेष प्रकारचा आनंद होतो. हल्लीं मलबार-प्रांतांत प्रचारांत असलेल्या मातृशासित गृहव्यवस्थेप्रमाणें, फक्त स्त्रियांच्या द्वारें कुळी ठरविली जाते. कुटुंबांतील पुरुषाकडे मालमत्तेचा वारसा येतो; पण तो त्या कुटुंबांतील कोणत्यातरी स्त्रीशीं नातें असल्यामुळेंच येतो. ह्मणजे, एखाद्या मनुष्याचा वारस त्याचा मुलगा, पुतण्या किंवा कुळांतील मूळपुरुषाचा

पुरुषवंशज होत नाहीं; तर, त्याच्या मालमिळकतीचा वारसा भाचा, भाचीचा मुलगा किंवा कुळांतील मूळ स्त्रीपूर्वजाचा वंशज ह्याच्याकडेसच जातो. कोणी असा वारसदार नसेल, तर दत्तक घेण्याची परवानगी असते. परंतु, स्त्रियांनाच मात्र दत्तक घेतलें पाहिजे. अशा दत्तक स्त्रीला जीं मुलें होतील, त्यांच्याकडे नंतर वारसा जाऊन, वंश चालू राहतो. अशा ह्या प्राचीन गृहव्यवस्थेमुळें त्या समाजांत लग्नसंबंधाच्या व मालमत्तेच्या धारणे-संबंधाच्या बाबतींत जे कांहीं विलक्षण प्रकारचे व अत्यंत भानगडीचे नियम पाळण्यांत येतात, त्यांच्या संबंधानें मला येथें लिहिण्याचें कांहीं प्रयोजन दिसत नाहीं.

जंगली डोंगराळ प्रदेशांत अद्यापिहि मूळच्या रानटी लोकांपैकीं कांहीं थोडे चमत्कारिक लोक आढळून येतात; व हे लोक कधींहि हिंदुधर्माच्या कक्षेंत आलेले नाहींत. तसेंच, ह्या प्रांतांत कोठें कोठें मुसलमानांची तुरळक वस्ती आहे, तीवरून उत्तरेकडील विजयी मुसलमानांच्या स्वाऱ्या ह्या देशांत होऊन, कांहीं थोडा वेळ त्यांचा अमल इकडे बसला होता, ह्या गोष्टीचें स्मरण होतें. परंतु, इकडे शेंकडा ९० लोक हिंदु असून, हिंदुधर्माच्या सामाजिक व धार्मिक वर्चस्वास आजपर्यंत कधींच बाध आलेला नाहीं. हिंदु शिल्पकलेचें इकडे जसें भव्यस्वरूप दृष्टीस पडतें, तसें इतरत्र पडत नाहीं. मदुरा व तंजावर येथील देवळांचे प्राकार पाहिले, ह्मणजे **नाईल** नदीच्या कांठीं **इजिप्शियन** लोकांनीं बांधलेल्या भव्य देवळांच्या चिरकाल टिकणाऱ्या वैभवाची आठवण होते. यूरोपखंडाच्या मध्ययुगांत, मोठमोठ्या देवळांना इंग्लंडांत जें महत्त्व होतें, तेंच दक्षिणहिंस्थानांतील देवळांना असून, अशा पवित्र ठिकाणांची इकडे खरोखर अगदीं

गर्दी आहे. असें असतांहि, येथील हिंदुलोक, इतर प्रांतांतील हिंदुलोकांप्रमाणें, आपल्या धर्माचें घोडें पुढें ढकलून, परधर्माची पायमल्ली करण्याचा प्रयत्न करीत नाहींत. प्रत्यक्ष राजकीय सत्तेची कधींहि आकांक्षा न ठेवितां, सामाजिक व धार्मिक बाबतींत इकडील हिंदुलोकांस जें वर्चस्व आज शेंकडों वर्षें, कांहींएक व्यत्यय न येतां, प्राप्त झालें आहे, तें आपल्या हातून कोणी हिरावून घेईल, अशी भीति त्यांना कदाचित् मुळींच वाटत नसावी. कदाचित्, द्राविडी लोकांच्या संकरामुळें येथील हिंदुलोक शांतस्वभावी व परधर्मसहिष्णु बनले असतील. कदाचित्, दक्षिणहिंदुस्थानांत इंग्रजांचें राज्य झाल्यापासून, तेथील दंगेधोपे, भांडणतंटे व रक्तपात यांचा बीमोड झाला, ह्या गोष्टीचा त्यांना चांगला उमज पडला असावा. इंग्रजलोकांनीं प्रथमतः हिंदुस्थानच्या किनाऱ्यावर पाय ठेविला, त्यावेळीं दक्षिणहिंदुस्थानांत कशी स्थिति होती, ह्याचें उत्तम वर्णन, कै० श्रीनिवासराघव आयंगर नांवाच्या एका मद्रासी ब्राह्मण–गृहस्थानें केलेलें आहे. टिळक व त्याचा महाराष्ट्रांतील व बंगाल्यांतील शिष्यवृंद यांनीं इंग्रजी अमलापूर्वींच्या **सुवर्णयुगाची** कथा रचून, लोकांपुढें गाण्याचा सपाटा चालविला होता, तिची वरच्या वर्णनाशीं तुलना करून पाहा. मि० आयंगर ह्मणतातः—

लढाय, दुष्काळ व दरोडेखोरांच्या टोळ्या यांनीं दक्षिण–हिंदुस्थान अगदीं उजाड करून टाकिलें होतें. जबर कर, सरकारी कामदारांचा बेकायदेशीर वसूल, फाळा वसूल करण्याकरितां नेमलेल्या लोकांचा जुलूम, ज्यांच्या–वांचून शेतकऱ्यांचा धंदा मुळींच चालत नसून त्यांचा निर्वाहहि होत नव्हता व जे त्यांना जवळ जवळ कायमच्या गुलामगिरींत ठेवीत होते, अशा सावकार लोकांच्या लबाड्या वगैरे कारणांमुळें शेतकरीवर्ग अगदीं धुळीस मिळाला होता. मालमत्तेला सुरक्षितपणा नसून, दळणवळणाच्या गैरसोयी

व जकातींचे भारी जबर दर असल्यामुळें, व्यापारास अडथळा होत असे. पिकलेल्या भागांतून नापीक ठिकाणीं धान्य नेण्याची मोठी अडचण असल्याकारणानें, लहानशा प्रदेशांतसुद्धां एखादे वर्षी चांगलें पीक न येतां, थोडासा दुष्काळ पडला कीं, तेथील लोकांचे भयंकर हाल होत. सरकारी नोकरींत नसलेल्या रयतलोकांस व मोठमोठ्या जमीनदारांससुद्धां, सरकारच्या क्षुद्र नोकरांपुढें मान वांकवावी लागे, व अगदीं क्षुल्लक कारणावरून जरी अशा सरकारी अधिकाऱ्यांनीं त्यांचा उपमर्द केला व त्यांना त्रास दिला, तरी ह्या सर्व गोष्टी ते लोक मुकाट्यानें सहन करीत. खालच्या जातींतील लोकांस संपत्ति मिळाली, तरी वरिष्ठ वर्गांतील लोक आपणांस लुटून फस्त करतील, ह्या भीतीनें जवळच्या संपत्तीचा उघडपणें उपभोग घेण्याची अगर डामडौल करण्याची त्यांची छाती नसे. कुडींत प्राण ठेवण्याकरितां लागणाऱ्या थोड्या वस्तूंशिवाय, बहुतेक सर्व शेतकऱ्यांस दुसऱ्या कशाचीहि गरज लागत नसे. नवीन नवीन धंदे हातीं घेण्याची त्यांना वासनाहि नसे, व त्यांची हिम्मतहि होत नसे. तसेंच, स्वतःची स्थिति सुधारण्याचा प्रयत्न करण्याकरितां लागणाऱ्या उत्तेजनादाखल कोणाचें उदाहरणहि त्यांच्या डोळ्यांपुढें नसे. आणि, ज्या कडक जातिभेदाच्या पायावर समाजाची रचना केलेली होती, त्यामुळें मनुष्याचें उद्योगस्वातंत्र्य नष्ट होऊन, व्यक्तिशः एखाद्या नवीन गोष्टीचा उपक्रम करण्याची पूर्ण मुभा नव्हती. हल्लींची देशस्थिति जरी कित्येक बाबतींत असमाधानकारक असली, तरी तिच्यांत जी क्रांति घडून आली आहे, तिचें यथार्थ ज्ञान होण्यास, प्रस्तुतच्या स्थितीची वर वर्णिलेल्या स्थितीशीं तुलना करून पाहिली पाहिजे. राष्ट्रीयतेची भावना व धर्मसंबंधी उत्साह ज्या मार्गांनीं उत्पन्न होईल, असे मार्ग पतकरून, देशाची सुधारणा करण्याची हांव प्रस्तुतच्या स्थितींत धरणें हें अगदीं निरुपयोगी आहे, ही गोष्ट लक्ष्यांत ठेविली असतां, हल्लीं झालेली प्रगति ह्मणजे जवळजवळ एक मोठाच चमत्कार आहे.

इंग्रजलोक प्रथमतः हिंदुस्थानांत आले, ते राज्यस्थापनेच्या उद्देशानें मुळींच आले नव्हते. परंतु, पुढें दैवयोगानें त्यांची सत्ता जी आसेतुहिमालय बसली, तिचा आरंभ मद्रासेस होऊन, त्यांना जयश्री एकसारखी माळ घालीत गेली. १९ व्या शतकाच्या आरंभापासून, मद्रास इलाख्याच्या सुदैवानें त्याचा

स्वतंत्र इतिहास नाहीं. ह्या इलाख्याचे उत्तरेकडील प्रतिस्पर्धी (महाराष्ट्र, पंजाब वगैरे प्रांत) त्याला **मागसलेला** (अंधेरांतील) इलाखा असें तुच्छतेनें ह्मणतात. वास्तविक पाहतां, हें विशेषण मद्रासइलाख्यास लावणें फारच अनुचित आहे. कारण, गेल्या शंभर वर्षांत, मनुष्याच्या मनोवृत्ती उचंबळून टाकणाऱ्या गोष्टी जरी तेथें घडून आल्या नाहींत, तरी शिक्षण, शहाणपणानें चाललेला राज्यकारभार, संपत्तीच्या दृष्टीनें लोकांची भरभराट व शांततेच्या काळांत एकसारखी होत जाणाऱ्या सुधारणेच्या अंगभूत असणाऱ्या गोष्टी, इत्यादि बाबतींत ह्या इलाख्यानें मारलेली मजल पाहिली असतां, त्याला **नमुनेदार इलाखा** हेंच नांव विशेषेंकरून शोभण्यासारखें आहे. दक्षिणेकडील देशी संस्थानें —विशेषतः पुष्कळ वर्षें प्रत्यक्ष ब्रिटिश अमलाखालीं असलेलें ह्मैसूर संस्थान—तुलनात्मक दृष्टीनें पाहिलीं असतां, मध्य व उत्तर हिंदुस्थानांतील कोणत्याहि संस्थानापेक्षां उत्तम ठरतील. हिंदुस्थानांत ख्रिस्ती लोकांची जी एकंदर संख्या आहे, त्यापैकीं दोन तृतीयांशापेक्षां अधिक वस्ती फक्त दक्षिण—हिंदुस्थानांत आहे. त्यामुळें, शिक्षणाच्या बाबतींत ह्या प्रांताचा पहिला नंबर पुष्कळ दिवस लागत होता; व कदाचित् अझूनहि लागत असेल. परंतु, साक्षरतेसंबंधाचे (लिहितां वाचतां येण्यासंबंधाचे) खानेसुमारीचे आंकडे पाहिले, तर सर्व हिंदू जातींमध्यें ब्राह्मणांचा नंबर वर लागतो. ह्यांच्यांत दर हजारीं ५७८ पुरुषांना व ४० स्त्रियांना लिहितां वाचतां येतें; व ही गोष्ट त्यांना मोठी भूषणावह आहे. पाश्चात्य विद्येनें विभूषित झालेले दक्षिण—हिंदुस्थानांतील लोक, इतर कोणत्याहि प्रांतांतील अशा लोकांप्रमाणेंच प्रगमनशील आहेत. व त्यांच्या विचारांत बंगाल्यांच्या विचारांपेक्षां अधिक समतोलपणा

असून, त्यांची मनःप्रवृत्ति महाराष्ट्रांतील लोकांप्रमाणें प्रत्येक पाश्चिमात्य गोष्टीस तितका विरोध करण्याची नाहीं. ह्या प्रांतीं पाश्चात्य शिक्षणाची वाढ स्थिरपणानें होत असून, बहुधा तिची मांडणी भक्कम रीतीनें होत असावी, असें एकंदरींत दिसतें. अशा प्रकारच्या शिक्षणामुळें ह्या प्रांतांत मोठे कार्यक्षम व प्रख्यात अधिकारी पुष्कळच निर्माण झाले असून, ब्रिटिश राज्याबद्दल त्यांच्या ठिकाणीं असलेल्या निष्ठेंत यत्किंचित्हि दोष काढण्यास जागा नाहीं. पाश्चात्य कल्पनांचें इकडे बीजारोपण झाल्यावर, त्यापासून जें पीक निघालें आहे, त्यांत निरुपयोगी गवतकांटा कमी उत्पन्न झाला आहे. वरिष्ठ जातींच्या सुशिक्षित हिंदु गृहस्थांनीं सामाजिक सुधारणेच्या बाबतींत मोठी कामगिरी बजाविली आहे; व त्यांच्यापैकीं पुष्कळ लोक हिंदी राष्ट्रीय सभेच्या नेमस्त पक्षाशीं संबंध ठेवून, काम करीत असतात. तीन वर्षांपूर्वीं **स्वराज्यवादी** पक्षातर्फे, मि० पाल यांनीं ह्या प्रांतावर लहानशी स्वारी केली होती. त्यावेळीं, त्यांचें जें मोठ्या उत्साहानें लोकांकडून स्वागत करण्यांत आलें, त्यावरून जहाल पक्षाच्या राजकीय मतांस मान डोलविणारे निदान कांहीं थोडे लोक मुख्यत्वेंकरून तरुण पिढीमध्यें तयार आहेत, ही गोष्ट दृष्टोत्पत्तीस आली. पुढें लौकरच तिनवेल्ली व तुतिकोरिन येथें, व पुनः एक वर्षानें गंतूर येथें, जे दंगे झाले, त्यांवरून ह्या प्रांतांत पेट घेणारी सामग्री—ह्मणजे दंगाधोपा करण्यास प्रवृत्त असलेले लोक—अस्तित्वांत असल्याची खात्री पटली. तथापि, असे दंगे सार्वत्रिक न होतां, कांहीं थोड्या ठिकाणीं मात्र झाले; व त्यांचा उपशमहि तात्काळ केला गेला. आणि, हिंदुस्थानच्या इतर प्रांतांत राजद्रोहाची लाट सर्वत्र उसळली असून, राज्यक्रांति घडवून आणण्यासाठीं उत्पन्न झालेल्या कटांचें जाळें सर्व देशभर

पसरलें असतांहि, दक्षिण—हिंदुस्थानांत कोठेंहि पुनः दंगाधोपा न होतां, सर्वत्र शांतता नांदत आहे, ह्यावरून इकडील देशस्थिती-बद्दल मनाला मोठी उमेद वाटण्यास एक जागा झाली आहे. दक्षिण—हिंदुस्थानांतील हिंदुधर्मांत एक विशेष प्रकारची पुराण-प्रियता व शांतता आहे. त्यामुळें, तेथील हिंदुलोकांस गैरका-यदा वर्तनाचा अत्यंत तिटकारा वाटतो, असें दिसतें. शिवाय, उत्तर हिंदुस्थानामध्यें "आर्यांकरितांच आर्यावर्त" ही रणगर्जना उठून, इंग्रजलोकांविरुद्ध मोहीम सुरू झाली आहे; परंतु, दक्षिण व उत्तर हिंदुस्थानांतील हिंदुलोकांचा धर्म एकच असून, समाजव्य-वस्थाहि एकसारखीच असल्याकारणानें, ह्या दोन्ही भागांतील लोकांचें मोठें सख्य असलें पाहिजे, असें वाटतें. तरी, शुद्ध द्रविड–वंशांतील हिंदुलोकांचें रक्त इंग्रजांविरुद्ध तापून जाण्यास, ह्मणजे ह्यांच्याविषयीं त्यांच्या मनांत द्वेषबुद्धि उत्पन्न होण्यास, वरील रणगर्जना बहुधा उपयोगी पडत नसावीसें वाटतें.

## भाग ११ वा.

# हिंदुस्थानाबाहेरील क्रांतिकारक संस्था.

खुद्द हिंदुस्थानामध्यें इंग्रजी राज्याविरुद्ध ज्या चळवळी चालू आहेत, त्यांतील आवेशी ( जहाल ) पुढाऱ्यांविषयीं सहानुभूति असल्यामुळें व बहुधा त्यांच्या कृत्यांकडे मुद्दाम डोळेझांक केल्यामुळें, हिंदुस्थानाबाहेर क्रांतिकारक चळवळी सुरू झाल्या असून, त्यांचें काम अद्यापिहि चालू आहे. अशा चळवळींचें खरोखर स्वरूप काय आहे, ह्या गोष्टीकडे विलायतेंतील अधिकाऱ्यांचें लक्ष्य जाण्यास, लंडन शहराच्या मध्यवस्तीमध्यें खून होऊन, लोकांच्या अंतःकरणास धक्का बसण्याचा प्रसंग यावा लागला. क्रांतिकारक लोकांना हिंदुस्थानाबाहेरून जी मदत मिळते, तिचें महत्त्व किती आहे, ह्या गोष्टीचा पुरा उमज त्यांना पडला आहे किंवा नाहीं, ह्याबद्दल अझूनहि शंका येते. नवीन धार्मिक चळवळी उत्पन्न करून, प्रसिद्धीस येऊं पाहणाऱ्या कांहीं विक्षिप्त अमेरिकन व युरोपिअन लोकांपासून, हिंदुधर्माचें पुनरुज्जीवन करणाऱ्या प्रतिगामी पक्षास मानसिक साहाय्य मिळतें. त्याचप्रमाणें, इंग्लंडमधील कांहीं पार्लमेंटच्या सभासदांस व वर्तमानपत्रकारांस, हिंदुस्थानांतील जहाल राजकारणी पुरुषांविषयीं सहानुभूति असल्याकारणानें, ते ह्यांचें साहाय्य करीत असतात. परंतु, ह्या गोष्टीला उद्देशून, मी येथें लिहीत नाहीं; तर ब्रिटिश राज्याविरुद्ध खटपटी करण्यास साधनभूत होण्याकरितां, हिंदी

अराजकांनींच यूरोप व अमेरिका येथें ज्या गुप्त संस्था स्थापन करून, जणुं कांहीं लढाईचा तळ दिला आहे, त्यांविषयीं माझें लिहिणें आहे. पाश्चिमात्य लोकांच्या विद्याचारांचा परिणाम हिंदुस्थानांत होऊं नये, ह्मणून अराजक पक्षाची कितीहि मोठी ओरड असली, तथापि पाश्चिमात्य देशांतील क्रांतिकारक लोकांनीं स्वीकारिलेले मार्ग पुढें ठेवून, त्यांचें अनुकरण करावयाचें नाहीं, असा अभिमान त्यांच्या ठिकाणीं खास दिसून येत नाहीं. आयर्लंडांतील **फेनियन** पंथ व रशियांतील अराजक लोक ह्यांचा कित्ता गिरविल्यामुळें, हिंदुस्थानांतील क्रांतिकारक पक्ष, तारतम्य न पाहतां अगदीं मूढपणानें, पश्चिमेकडील लोकांचेंच अनुकरण करीत आहे, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. हिंदी अराजक लोकांच्या लेखांत ह्या दोहोंविषयीं पुष्कळ उल्लेख असतो. " सारा देऊं नका " अशा तऱ्हेचा रयतेस उपदेश करण्याची जी मोहीम टिळकानें महाराष्ट्रांत सुरू केली होती, ती आयर्लंडांतील चळवळीची नक्कल होती. बहिष्काररूपी अस्त्राच्या प्रभावाविषयीं बंगाली लोकांस जी मोठी आशा वाटूं लागली होती, तीसुद्धां आयर्लंडाच्या तत्कालीन इतिहासावरूनच वाटत होती. **गोस्वामी** नांवाच्या माफीच्या साक्षीदाराचा खून अलीपुरच्या तुरुंगांत झाला, त्याबद्दल **राष्ट्रीय** पक्षाच्या लोकांस मोठी प्रौढी वाटली. फिनिक्स–पार्कमधील खुनांच्या कज्जांतील माफीचा साक्षीदार जेम्स **केरी** ह्याचा प्याट्रिक **ओडोनेल** ह्या इसमानें खून केला, त्यापेक्षां गोस्वामीच्या खुनाचें महत्त्व फारच अधिक आहे, असें **राष्ट्रीय** लोकांस वाटलें. कारण, केरीचा खून झाला, तो त्याची साक्ष झाल्यावर बऱ्याच उशिरानें झाला. त्यामुळें, त्याच्या साक्षीचा परिणाम व्हावयाचा तो झालाच.

परंतु, गोस्वामीचा खून त्याची साक्ष होण्यापूर्वींच झाल्यामुळें, आपल्या लोकांचा विश्वासघात करण्यास त्याला संधि मिळाली नाहीं. जगांतील सर्व ठिकाणचे क्रांतिकारक लोक बांबगोळ्याचा उपयोग करूं लागले आहेत. पण, क्रांतिकारक चळवळींकरितां लागणाऱ्या पैशाचा भरपूर पुरवठा होण्यासाठीं, दरोडे घालणें किंवा हत्यारबंद होऊन चोऱ्या करणें, ह्या गोष्टी ह्मणचे थोड्या दिवसांपूर्वीं राशियन अराजकांनीं सुरू केलेल्या धोरणाची हुबेहुब नक्कल आहे. इटाली–देशाच्या स्वातंत्र्यप्राप्तीच्या इतिहासाचा–देखील उपयोग करण्यांत येऊं लागला आहे; आणि, क्याव्हूरच्या चारित्राचें जरी एकाहि देशभाषेंत भाषांतर झालेलें नाहीं, तरी लजपतरायानें लिहिलेलें ' माझनीचें चरित्र ' व विनायक सावरकराचें ' माझनीचें आत्मचरित्र ' ह्याचें भाषांतर, हीं पुस्तकें ' राष्ट्रीय ' पक्षाच्या लोकप्रिय प्रमाणग्रंथांत मोडत असून, तीं त्यांच्या इतर पुस्तकांपेक्षां सौम्य आहेत. राष्ट्रीय लोकांच्या चळवळीच्या एखाद्या मुख्य ठिकाणची पोलिसाकडून झडती झाली, ह्मणजे तेथील लोकांच्या चळवळी क्रांतिकारक आहेत, असें सिद्ध करण्याकरितां जीं पुस्तकें जप्त केलीं जातात, त्यांत यूरोपांतील क्रांतिकारक चळवळीच्या कोणत्याना कोणत्यातरी काळच्या इतिहासाचीं पुस्तकें नाहींत, असें बहुधा घडावयाचें नाहीं. ह्मणून, हिंदुस्थानांत अस्वस्थता उत्पन्न करण्याकरितां जीं पुस्तकें वगैरे लिहिलीं जातात, त्यांत हिंदुलोकांचे देव व देवता, क्रामवेल आणि वाशिंगटन व प्रसिद्ध अराजक लोक, ह्यांची एकाच वेळीं प्रार्थना करून साहाय्य मागितलेलें असतें; व अशा प्रकारच्या नांवांची विलक्षण खिचडी पुष्कळवेळां पाहण्यांत येते.

हिंदुस्थानाबाहेर क्रांतिकारक चळवळीकरितां ज्या निरनि-

राळ्या मुख्य संस्था स्थापन करण्यांत आल्या आहेत, त्यांचा उगम असाच परदेशांत झालेला आहे. अमेरिकेमध्यें दोन स्वतंत्र संस्था असून, त्यांचीं मुख्य ठिकाणें कालिफोर्नियामध्यें असावींत, व त्यांच्या शाखा न्यूयार्क, शिक्यागो इत्यादि मोठमोठ्या शहरीं असाव्यात, असें दिसतें. हिंदी व अमेरिकन लोकांनीं मिळून काढलेल्या मंडळीमार्फत **स्वतंत्रहिंदुस्थान** नांवाचें एक इंग्रजी भाषेमध्यें निघणारें **नियतकालिक** ( Periodical ) चालविलें जात असतें. हें नियतकालिक मूळ कानडामध्यें निघालें. परंतु, पुढें कानडादेशांतील सरकारची नजर त्याच्याकडे जाऊं लागतांच, आपलें चंबुगबाळें आटोपून त्याला **सिआटल** येथें प्रयाण करावें लागलें. ह्या चळवळीमध्यें विद्यार्थिवर्गाकडे पुढारीपणा असून, त्यांत मुख्यतः बंगाल्यांचा भरणा विशेष आहे; व त्यांना अमेरिकेंतील **फेनिअन** पंथाचे आयरिश लोक मदत करण्यास तयार आहेत. अमेरिकेमध्यें पासिफिक—महासागराच्या किनाऱ्यावरील प्रांतांत उद्योगधंद्यानिमित्त जे हिंदी लोक जातात, त्यांना आशियाखंडांतील रहिवाशांविरुद्ध अमेरिकन लोकांनीं चालविलेल्या चळवळीमुळें फार त्रास होऊन नुकसान पोहोंचतें. अशा हतभागी हिंदी लोकांपैकीं बरेच लोक वरील संस्थेस जाऊन मिळाले आहेत. त्यांच्यामध्यें शीख व इतर पूर्वीं सैन्यांत नोकरी केलेले लोक असल्याकारणानें, क्रांतिकारक चळवळ्यांस त्यांचा विशेष उपयोग होतो. कारण, ज्या पलटणींत ते नोकर होते, त्यांतील लोकांशीं, निदान ज्या जातींतून हिंदी सैन्यांत शिपायांची बरीच भरती केली जाते त्या जातींशीं, प्रत्यक्षसंधान बांधण्यास त्यांच्यामार्फत सुलभ पडतें. तीन वर्षांपूर्वीं, हिंदी सैन्यामध्यें राजद्रोही मजकुरांचीं हस्तपत्रकें वाटण्यांत आलीं होतीं, त्यां-

पैकीं बरींच अमेरिकेंतून छापून आणलीं होतीं. वर सांगितलेल्या संस्थांपैकीं दुसरीचें "तरुण हिंदी संस्था" असें नांव आहे. 'मुख्य मंडळ्या,' 'आंतल्या मंडळ्या,' 'बाहेरल्या मंडळ्या' अशा प्रकारची तिची रचना असून, आयर्लंडांतील **फेनियन** मंडळीप्रमाणेंच हिचे खरोखर उद्देश असावेत, असें वाटतें. ही **संस्था** फेनिअन मंडळीपेक्षांहि जालीम असून, तिचा हिंदुस्थानांतील 'हिंदी तांबडें निशाण' ह्या मंडळींशीं संबंध आहे. केनडीबाई व तिची मुलगी ह्या दोघींचा मुझफ्फरपुर येथें खून करणारा इसम **खुदिराम** बोस व ह्याच नमुन्याचे इतर तरुण माथेफिरू लोक 'तांबड्या निशाणाच्या' पंथाचे होते. स्फोटकारक पदार्थांच्या गुणधर्माचें ज्ञान संपादन करणें व हिंदुस्थानांत गुप्तरीतीनें हत्यारें पाठविणें, हीं दोन कामें वरील संस्थेनें मुख्यत्वेंकरून आपल्या शिरावर घेतलीं आहेत, असें दिसतें. हिंदुस्थानांतील इंग्रज अधिकारी ह्या बाबतींत एक अवाक्षरहि बोलत नाहींत; व हें अगदीं स्वाभाविक आहे. परंतु, अन्य मार्गांनीं माहिती मिळाल्यामुळें, माझी अशी खात्री होऊन चुकली आहे कीं, हिंदुस्थानांतील सर्व ठिकाणच्या—महाराष्ट्र, बंगाल व पंजाब येथल्या—राजद्रोही वर्तमानपत्रांशीं ह्या उपरिनिर्दिष्ट दोन्ही संस्थांचा नेहमीं पत्रव्यवहार चालत असे.

जपानच्या अभ्युदयामुळें हिंदुस्थानच्या लोकांवर फारच मोठा परिणाम झाला आहे. त्यामुळें, अज्ञानजन्य मनोराज्यांत बहुधा दंग होऊन राहणाऱ्या क्रांतिकारक हिंदुलोकांस अशी आशा वाटूं लागली होती कीं, जपान हिंदुस्थानाला मार्ग दाखवील इतकेंच नाहीं, तर प्रसंगीं मदतहि करील. पण, ह्या बाबतींत त्यांची आतां चांगलीच निराशा झाली आहे. जपानामध्यें हिंदी

विद्यार्थ्यांची चांगली संभावना होते. परंतु तेथें त्यांचें कोणत्याहि प्रकारानें विशेष लाड किंवा कौतुक होत नाहीं. आणि जर कां ते आपलीं राजकीय मतें प्रगट करून, इंग्रजीराज्याविरुद्ध बडबडूं लागले, तर तात्काळ त्यांचे कान उपटून हातावर देण्यांत येतात. मी जपानांतून अमेरिकेस जात होतों, तेव्हां मला एकजण भेटला. त्यानें **टोकियो** शहरीं दोन तीन वर्षें घालविलीं होतीं, व आतां तो आपलें औद्योगिक शिक्षण पुढें चालविण्या-करितां अमेरिकेस चालला होता. तो बोलून चालून फार चांगला माणूस असून, मोठा बुद्धिमान् दिसला. त्यानें मजपाशीं असें कबूल केलें कीं, "मीं जपानांत ज्या गोष्टी पाहिल्या आहेत, त्यांवरून **स्वातंत्र्य** अथवा **स्वराज्य** ह्यास माझे देशबांधव कित-पत लायक आहेत, ह्याविषयीं बंगाल सोडतेवेळीं जीं माझीं मतें होतीं, त्यांत आतां बराच फरक पडला आहे. जपानी प्रोफे-सरांनीं मला मोठ्या ममतेनें वागविलें. पण, सामान्यतः जपानी लोकांचें वर्तन मुळींच मित्रत्वाचें नव्हतें; आणि हिंदुस्थानांतील राजकीय चळवळीबद्दल त्यांना यत्किंचित्‌हि सहानुभूति वाटत नाहीं." टोकियो शहरामध्यें हिंदी व जपानी लोकांची मिळून एक **मंडळी** आहे. पण, तिचा राजकारणाशीं बिलकूल संबंध नाहीं. आणि, हिंदी लोकांची अशी ओरड आहे कीं, ही संस्था आमच्या फायद्यापेक्षां जपानी लोकांच्याच फाय-द्याकरितां चाललेली आहे. इंग्रजी राज्याविरुद्ध चळवळ करण्या-करितां जे लोक तींत सामील झाले आहेत, त्यांच्या श्रमाचें खचित कांहीं चीज झालें नाहीं. कारणपरत्वें ते लोक अगदीं थोड्या सोशिआलिस्टिक (ह्मणजे प्रचलित समाजव्यवस्था मोडून, सर्वांस सारखे हक्क व मालमत्ता मिळेल, अशा प्रकारची काल्पनिक

समाजघटना स्थापन करण्याचा प्रयत्न करणाऱ्या) वर्तमानपत्रांकरितां लेख लिहीत असतात. पण, ह्या पक्षाला त्यांची खरी खरी मदत ह्मटली ह्मणजे अगदींच क्षुल्लक आहे.

हिंदुस्थानाबाहेरील निःसंशय अत्यंत धोक्याची संस्था ह्मटली ह्मणजे **हायगेट**–मधील **इंडिया हाऊस**–मध्यें आपलें मुख्य ठाणें ठेवणारी संस्था होय. ह्याच ठिकाणीं कट करून, सर डब्ल्यू **कर्झन वायली** व डा० **लालकाका** यांचे खून **धिंग्रानें** केले, असें दिसतें. आणि, जरी **काळ** पत्राचा लंडन येथील बातमीदार विनायक सावरकर याच्या मताप्रमाणें, सर डब्ल्यू कर्झन वायली हे स्टेट सेक्रेटरीचे **डोळे** असून, ते सांगतील त्याप्रमाणें हिंदुस्थानांतील कामें होत असत; व त्याप्रमाणें त्यानें बोलून दाखवून, धिंग्रानें केलेल्या खुनाचें महत्त्व फुगवून दाखविलें, तरी, सदरहु मेजवानीच्या प्रसंगीं, जहालपक्षाच्या विशेष डोळ्यांत खुपणारा असा एक इंग्रज अधिकारी (सर डब्ल्यू कर्झन वायली नव्हेत) आपणास आढळेल व त्याला आपण नाहींसा करून टाकूं, अशी धिंग्राची अटकळ होती. परंतु, ह्या अधिकाऱ्याची गांठ न पडल्यामुळें, सर डब्ल्यू कर्झन वायलीवर त्यानें हत्यार चालविलें, असें मानण्यास कांहीं आधार सांपडतो. विनायक सावरकरावर मोठा भयंकर आरोप येऊन, त्याची चौकशी मुंबईस होण्याकरितां, १९१० सालीं त्याला लंडन येथें पकडण्यांत आलें होतें. ह्याच **इंडिया हाऊसमधून** ज्याकसनला ठार मारण्याची कल्पना निघाली व त्या कामाकरितां येथूनच हिंदुस्थानांत हत्यारें पाठविण्यांत आलीं, असें मानण्याससुद्धां आधार आहे. इंडिया–हाऊसमध्यें येऊन राहण्याविषयीं हिंदुस्थानच्या सर्व ठिकाणच्या विद्यार्थ्यांस मोह पाडण्याची खटपट

होत असे; तथापि, ही संस्था दक्षिणी ब्राह्मणांच्या हातांत होती, असें दिसतें. आरंभीं ही संस्था श्यामजी कृष्णवर्माच्या ताब्यांत होती. हिंदुस्थानांत खुनासारखीं घोर कृत्यें केल्यामुळें, जे हिंदी लोक अपराधी ठरून फांसावर चढविण्यांत आले होते, त्यांचा गौरव करण्याच्या हेतूनें, श्यामजीनें त्यांच्या नांवानें शिष्य-वृत्या चालू केल्या होत्या. ह्या संस्थेच्या भयंकरपणाबद्दल लंड-नच्या **टाइम्स**-पत्रानें १९०८ सालच्या आरंभीं लेख लिहून, तिकडे लोकांचें लक्ष्य जावें, अशी तजवीज केली होती. सर कर्झन वायलीच्या खुनानंतर, लंडनच्या अधिकाऱ्यांमध्यें अगदीं संथपणानें जागृति उत्पन्न झाली, व इंडिया-हाऊसमधील संस्था भयंकर स्वरूपाची आहे, अशी त्यांच्या मनाची खात्री पटली. अद्यापिहि ह्या संस्थेची सर्व व्यवस्था यूरोपच्या मुख्य भूमीवरून श्यामजीच करीत आहे. तरुण हिंदी विद्यार्थ्यांचीं मनें कलुषित करून, त्यांना राजकीय खून करण्याच्या कामीं उद्युक्त करण्याचें काम आपल्या हस्तकांकडे सोंपवून, कृष्णवर्मा फार दिवसांपूर्वींच पारीस-शहरीं पळून गेला होता. श्यामजीचें वर्तमानपत्र **इंडियन सोशिआलजिस्ट** लंडनमध्यें उघडपणें प्रसिद्ध होत असून, त्यांतून खून करण्याचा उपदेश चालूच होता. परंतु, इंपेरियल इन्स्टिटयूटमधील घोर कर्मानंतर, सरकारी अधिकाऱ्यांनीं ह्या पत्राच्या दोघां मुद्रकांवर एका-मागून एक अशा फिर्यादी करून, अपराध शाबीत केला, तेव्हां मात्र ह्या पत्राचें प्रयाण पारीस शहरीं झालें.

अशा प्रकारच्या अनेक संस्थांमार्फत पुष्कळशीं आगलावीं पुस्तकें, हस्तपत्रकें व चिटोरीं हिंदुस्थानाबाहेर छापवून, इकडे चोरूनमारून पाठविलीं जातात, ह्याबद्दल मुळींच संशय नाहीं.

कित्येकप्रसंगीं, सावरकराचें "१८५७ सालामधील हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याकरितां युद्ध" अशा प्रकारचीं पुस्तकें, त्यांच्या कव्हरावर **पिकविक पेपर्स** अथवा अशाच प्रकारच्या निरुपद्रवी पुस्तकांचीं नांवें घालून, लबाडीनें तयार करीत असत. सावरकराचें हें पुस्तक ह्मटलें ह्मणजे सत्तावन सालच्या बंडाचा मोठा विलक्षण रीतीनें लिहिलेला इतिहास होय. सावरकरानें पुष्कळ मेहनत घेऊन हें पुस्तक तयार केलें आहे खरें; पण त्यांत धडधडीत खोट्या गोष्टी घातल्या आहेत. पुस्तकाची भाषा चांगली असून, विषयाची मांडणीहि पद्धतशीर आहे. परंतु, त्यांत अत्यंत प्रखर द्वेष भरलेला आहे. बंडाला चिथावणी देणारीं जीं हस्तपत्रकें देशी सैन्यांत वाटलीं गेलीं होतीं, त्यांशिवाय इतरहि अमेरिकेंतून आलीं होतीं, असें दिसतें. कृष्णवर्म्याच्या **सोशिआलजिस्ट** पत्राप्रमाणेंच खुनाचा उपदेश करणारीं **तलवार** आणि **वंदेमातरम्** इत्यादि वर्तमानपत्रें, इंग्लंडच्या बाहेर यूरोपमध्यें छापलीं जातात. ह्या पत्रांचे मोठाले गठ्ठे चोरून हिंदुस्थानांत येतात. किंवा शाळेंतील व कालेजांतील विद्यार्थी, शाळामास्तर, वकील, सरकारी नोकर यांच्याकडे—ह्मणजे, खरोखर कोणत्याहि दर्जाचा व प्रकारचा मनुष्य अशा प्रकारचीं वर्तमानपत्रें वाचण्याविषयीं कोणत्याहि कारणानें उद्युक्त असावा असें वाटेल, त्याकडे —तीं पाकिटांतून त्यांच्या नांवावर पोष्टानें पाठविण्यांत येतात. आतां, कधींकधीं अशीं पत्रें चुकून भलत्याच हातीं लागतात; आणि अशीं लागावीं, हें अगदीं स्वाभाविक आहे.

हिंदुस्थानाशीं दळणवळण ठेवण्याकरितां, अशा प्रकारच्या वाटा चालत्या ठेवण्याविषयीं, जहाल लोकांचा किती कटाक्ष असतो व त्यांस त्यांची किती मातब्बरी वाटते, ही गोष्ट **वंदेमातरम्**च्या

मार्च महिन्यांतील अंकावरून दिसून येईल. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्या-करितां प्रयत्न करणाऱ्या लोकांचें हें मासिक असून, तें जिनिव्हा येथें छापून प्रसिद्ध होत असतें. वरील अंकांतील उतारा असा आहे:—

तूर्त आह्मीं असें ओळखून चाललें पाहिजे कीं, हिंदुस्थानामध्यें क्रांतिकारक वाङ्मय बाहेरून पाठविण्यावरच आमच्या पक्षाची सर्व मदार आहे. ह्यामुळें, तरुणमंडळीचा उत्साह कायम राहून, आपला पक्ष जिवन्त आहे, अशी त्यांची खात्री पटते. ह्मणून, हिंदुस्थानाबाहेर जे लोक काम करीत आहेत, त्यांची संख्या वाढविली पाहिजे. राजकीय चळवळीचा गुरुत्वमध्य आतां कलकत्ता, पुणें व लाहोर येथून पारिस, जिनिव्हा, बर्लिन, लंडन व न्यूयार्क येथें सरकला आहे. स्वदेशांत विरुद्ध पक्षाकडून छळ होऊं लागला असतां, जेथें काम चालू ठेवितां येईल, असें ठिकाण परदेशांत नव्हतें, ह्मणून १८६२ मधील वहाबी कट साफ चिरडून टाकला गेला. आपल्या पक्षाचें पाऊल पुढें पडत आहे व त्याच्या आंगांत जोम आहे, असें आपल्या निदर्शनास येण्याकरितां, हिंदुस्थानां-तील इंग्रज अधिकाऱ्यांचे खून आणखी झाले आहेत, अशी वार्ता आपल्या कानीं पडावयास पाहिजे असेल, तर पुष्कळ परक्या देशांत आमचीं काम करण्याचीं ठिकाणें स्थापन होऊन, त्यांचें सामर्थ्य वाढलें पाहिजे, हा धडा वरील उदाह-रणावरून आपण चांगला शिकून ध्यानांत ठेविला पाहिजे. हस्तपत्रकें, वर्तमान-पत्रें व विनंतिपत्रें ह्यांच्या द्वारें क्रांतिकारक कल्पनांचा फैलाव लोकांत करणें, हें आपलें पवित्र कर्तव्य आहे, असें सर्व देशाभिमानी लोकांस वाटलें पाहिजे. अशा प्रकारची भाषा वापरून, वरील कामाचें महत्त्व आह्मी विनाकरण भलती-कडेच वाढवीत आहों, असें नाहीं. क्रांतिकारक मतांचा प्रसार करणाऱ्या प्रत्येक चिटोऱ्याबद्दल, आपणांस जवळ जवळ धर्मभोळ्या लोकांप्रमाणें श्रद्धा असली पाहिजे; व आपलें सर्व सामर्थ्य खर्च करून, असलें वाङ्मय हिंदुस्था-नांत जाऊन पोहोंचेल, अशी व्यवस्था केली पाहिजे. कारण, तें आमच्या लोकांच्या जीवित्वाचें बियाणें आहे, वगैरे.

हिंदुस्थानांत बाहेरून हत्यारें आणण्यासंबंधानें ह्मटलें तर, ज्याकसनसाहेबाच्या खुनामुळें क्रांतिवाद्यांस वरच्याप्रमाणेंच मोठा आनंद मानण्यास एक संधि मिळाली. हा खून ह्मणजे जणुंकाय

" सर्व खऱ्या देशभक्तांना आनंदाचें भरतें येऊन, त्यांनीं नाशिकास एक मोठा राष्ट्रोत्सव केला. " ह्याप्रसंगामुळें उद्गार निघाले ते असेः—

आह्मांस माहीत आहे कीं, ह्या वीराजवळ ब्राउनिंग पिस्तूल होतें. हीं पिस्तुलें हिंदुस्थानांत तयार होत नाहींत, तर यूरोपांत होतात. आतां, तीं क्रांतिकारक लोकांनीं इकडे कशीं आणिलीं? ह्याच गोष्टीवरून आमच्या संस्थेचें कर्तृत्व किती आहे व तींत गुप्तपणा कसा राखला जातो, ह्याची उत्तमप्रकारें साक्ष पटते, हें उघड आहे. खेरिज, बाहेरून आलेल्या हत्यारांवरच आह्मांस अवलंबून राहिलें पाहिजे, असें नाहीं. इंग्रजी राज्यांतील सर्व नीच वृत्तीचे अधिकारी—मग ते इंग्रज असोत वा हिंदी असोत—यांच्या छातींत खुपसण्याकरितां तिखट अणीच्या खिळ्यामोळ्यांचे खंजीर हिंदुस्थानांतल्या हिंदुस्थानांत तयार करितां येतील.

परंतु, ह्या बाबतींत विलायतेंत अधिक सावधगिरी ठेवण्यांत आल्यापासून, व हिंदुस्थानांतील कष्टम व पोष्ट खात्यांनीं अधिक हुशारी दाखवून बंदोबस्त ठेवल्या कारणानें, इकडे हत्यारें येण्याच्या कामास आळा बसूं लागला आहे. आणि, वरील लेख लिहिल्यानंतर केवळ दोन महिन्यांनींच, **वंदेमातरम्** पत्राला आपली आनंदाची उकळी कमी करावी लागली. हें पत्र अगदीं उघडपणें ह्मणतें कीं, " इंग्रजांच्या राज्याबाहेर इतर निशाणाखालीं जोंपर्यंत स्वदेशाभिमानी हिंदीलोक आहेत, तोंपर्यंत आमच्या चळवळीचा बीमोड करणें शक्य नाहीं." तथापि, सांप्रतची स्थिति " काळजी करण्यासारखी आहे," ही गोष्ट त्या पत्रांस कबूल आहे; व शेंवटीं खालीं दिल्याप्रमाणें उदासीनतेचे उद्गार काढून, त्यानें आपला लेख संपविला आहेः—

आह्मांला ही गोष्ट कबूल आहे कीं, हिंदुस्थानांतील तरुण मंडळीचीं मनें वळवून, त्यांना अराजक पंथांत काम करण्याकरितां सामील करून घेण्याचें काम सध्यां अत्यंत कठीण झालें आहे. तथापि, आज अमेरिका व जपान

येथें जे शेंकडों स्वदेशाभिमानी हिंदी विद्यार्थी शिकत आहेत, त्यांचीं मनें वळविण्याकरितां कांहीं हुशार लोक तिकडे पाठविले, तर आपल्या मतांचा प्रसार मोठ्या उत्कंठेनें करण्याची बुद्धि त्यांच्या ठिकाणीं उत्पन्न करितां येईल. पीक विपुल आहे; परंतु मजूरच थोडे आहेत. आतां, एका गोष्टीचा उमज आह्मांला पडला पाहिजे, तो असा कीं, जरी हिंदुस्थानांत सरकार आह्मांला पदोपदीं नडवूं लागलें, तरी हिंदुस्थानाबाहेर राहणाऱ्या हिंदी लोकांत, कित्येक वर्षेंपावेतों काम करीत राहण्यास, आह्मांस पुष्कळ सवड आहे. विचाराअंतीं आपली खात्री झाली पाहिजे कीं, सतत काम करीत राहणें, हेंच त्या कामाचें बक्षीस आहे. आपल्या एखाद्या विशिष्ट वर्तमानपत्राचा प्रसार करितां आला नाहीं, किंवा आपणास्वतःला ज्यांची माहिती आहे, असे काम करणारे लोक नाहींसे झाले आहेत, ह्मणून आपल्या मताचा प्रसार होत नाहीं, असें आपण समजूं नये. तसेंच, राजकीय खुनांच्या रूपानें दृग्गोचर होणारे वीरशाली पराक्रम प्रत्येक आठवड्यास घडून आले नाहींत, ह्मणून आपली चळवळ नष्ट होऊन जाईल, अशी कल्पना करून घेऊं नये.

अशा प्रकारच्या संस्थांकडून विषारी वाङ्मयाचा अथवा हत्यारांचा पुरवठा हिंदुस्थानास होतो, ह्मणूनच त्यांच्या हालचालीवर सतत बारीक नजर ठेविली पाहिजे, असेंच केवळ नाहीं. **वंदेमातरम्** पत्रानें ह्मटल्याप्रमाणें, जे तरुण हिंदी लोक बाह्यदेशीं जातात—विशेषतः जे विद्यार्जनाकरितां तिकडे जातात—त्यांना वळवून आपल्या बाजूला आणणें, हा ह्या संस्थांचा एक मुख्य हेतु असतो. अशा हिंदी लोकांशीं संबंध ठेवून, राजकीय व इतर बाबतींत त्यांच्या मनावर अनिष्ट परिणाम घडूं नयेत, ह्मणून काळजी घेण्याकरितां एक संस्था ( मंडळी ) लंडनशहरांत स्थापन केली पाहिजे, ही गोष्ट इंडिया आफिसास—ह्मणजे हिंदुस्थानच्या कारभारावर विलायतेंत देखरेख ठेवणाऱ्या सरकारास—मान्य झाली आहे. आतां, हें योग्य दिशेनें पाऊल पडत आहे खरें; पण ह्याहिपेक्षां पुष्कळ प्रयत्न व्हावयास

पाहिजे, व तो लंडनखेरीज इतर ठिकाणींहि झाला पाहिजे. तसेंच, इतर मोठमोठ्या शहरीं कमिट्या स्थापन झाल्या पाहिजेत. व अशा प्रकारची समाजसेवा करण्यापेक्षां, बाहेरदेशीं असणाऱ्या लोकहितैषी इंग्रज-लोकांना दुसरी चांगली कामगिरी करितां येईल, असें वाटत नाहीं. आणि, आह्मांला जर कांहीं शाश्वत व खरें लोककल्याण करावयाचें असेल, तर क्रांतिकारक लोकांप्रमाणेंच आह्मीं आपलीं जाळीं लांबवर पसरलीं पाहिजेत. उदाहरणार्थ, इंग्लिश खाडी ओलांडून पलीकडे गेल्या दिवसापासून, कृष्णवर्म्यांनें पारिसमध्यें एक संस्था स्थापन केली आहे. तिच्या द्वारें तो इंग्लंडला जाणाऱ्या तरुण हिंदी लोकांस वाटेंत गांठतो; व तिकडे गेल्यावर, कोणी इंग्रज-गृहस्थ त्यांच्याशीं स्नेह करूं इच्छितील, तर त्यांच्यापासून अलग राहण्याविषयीं तो त्यांचीं मनें वळवीत असतो. शास्त्रीय व औद्योगिक शिक्षणाची सोय हिंदुस्थानांत अद्यापि पुरेशी नाहीं; व दिवसेंदिवस ह्या शिक्षणाची आवश्यकता अधिकच भासूं लागली आहे. त्यामुळें, हें शिक्षण संपादण्याकरितां बाह्यदेशीं जाणाऱ्या हिंदी विद्यार्थ्यांची संख्या एकसारखी वाढतच जाणार आहे. हिंदी आईबापें व हिंदी संस्था—ज्यांना वास्तविक खरी स्थिति कळली पाहिजे—यांची अशी समजूत होण्याचा संभव असतो कीं, विद्यार्थ्याला फक्त प्रवासखर्च दिला, ह्मणजे पुढें तो आपली सोय कशीतरी लावून घेईल. अशा विद्यार्थ्यांस पर मुलुखामध्यें हालअपेष्टा सोसाव्या लागल्या व त्यांना त्रास झाला, ह्मणजे ते अविचारानें राजकीय चळवळीमध्यें पडतात; निदान दैन्यावस्थेमुळें मोहजालांत सांपडण्यास त्यांना वेळ लागत नाहीं, असें वारंवार घडून येतें. ह्या कामीं इंग्लंडांतील कारखानदारांचीसुद्धां बरीच मदत होऊं शकेल. हिंदी आईबापांची

अशी ओरड आहे कीं, सर कर्झन वायलीच्या खुनामुळें इंग्रज-लोकांना संताप आला आहे; व त्यामुळें, ते हिंदी विद्यार्थ्यांना आपल्या कारखान्यांत **शिकाऊ नोकर** ह्या नात्यानें घेण्यास नाखूष असतात. त्यामुळें, ज्या देशांत हिंदी विद्यार्थ्यांबद्दल कमी अविश्वास असतो, अशा ठिकाणीं त्यांना जाणें भाग पडतें. इंग्रज कारखानदारांच्या ह्या नाखुषीचें खरें कारण कदाचित् असें असूं शकेल कीं, जपानी लोकांनीं इंग्रजापांसून विद्या प्राप्त करून घेऊन, नंतर आपल्या देशांत तेच कारखाने काढून, व्यापारांत चढाओढ सुरूं केली आहे, तोच कित्ता गिरवून, हिंदी विद्यार्थी आपल्या व्यापारास धक्का आणतील, अशी त्यांस भीति असावी. तें कसेंहि असो; पण झालेला परिणाम खरोखरच शोचनयि आहे. कारण, मी गेल्या खेपेस हिंदुस्थानांत प्रवास करीत होतों, तेव्हां जी एक गोष्ट माझ्या मनावर बिंबली आहे, ती ही कीं, जर आपणाला आपली सत्ता हिंदुस्थानदेशावरच नव्हे, तर तेथील लोकांवरहि ठेवावयाची असेल, तर आह्मी व हिंदुस्थानांतील तरुण पिढीचे लोक ह्या उभयतांच्यामध्यें जें वितुष्ट वाढत चाललें आहे, त्यास आळा घालण्याची एकहि संधि आपण व्यर्थ जाऊं देतां कामा नये. हिंदुस्थानाबाहेर ज्या क्रांतिकारक संस्था आहेत, त्यांची सर्व मदार विशेषतः ह्या वितुष्टावरच आहे. ह्मणजे, ह्या वैरभावामुळेंच आपल्या कार्यांत यश येईल, असें त्यांस वाटत आहे. परदेशांतून स्वदेशी परत जातांना, तरुण हिंदी लोकांच्या मनांत बहुधा द्वेषबुद्धि उत्पन्न झालेली असते; व त्यामुळें तें कोणतेंहि अविचाराचें व साहसाचें कृत्य करण्यास तयार होतात. आणि, ह्यापासून क्रांतिकारक लोकांचा जसा फायदा होतो, तसा दुसऱ्या कशानेंहि होत नाहीं.

## भाग १२ वा.

# हिंदी राष्ट्रीय सभा.

हिंदुस्थानांत सर्वत्र अस्वस्थता माजवून, लोकांची दंग्याधोप्याकडे प्रवृत्ति करण्याचा हेतु जरी राष्ट्रीय सभेच्या मुख्य संस्थापकांचा मुळींच नसला व राष्ट्रीय सभेच्या बहुतेक सभासदांची तशी जरी इच्छाहि नसली, तरी ह्या सभेमुळें सध्यांची वाईट स्थिति येण्यास मदत झाली आहे, ह्या आरोपामधून तिची मुक्तता कोणासहि करितां यावयाची नाहीं. हिंदुस्थानांत पाश्चिमात्य शिक्षण बहुतेक दुष्परिणामीं झालें आहे, ह्याचें कारण असें कीं, ज्या परिस्थितींत हिंदी मनुष्य जन्मास येऊन आयुष्य कंठितो, त्या परिस्थितीशीं अगदींच विसंगत असणाऱ्या कल्पनांवर पाश्चिमात्य शिक्षणाची इमारत उभारलेली असल्यामुळें, त्याला अशा शिक्षणाचा उपयोग आपल्या नित्याच्या आयुष्यक्रमांत करितां येत नाहीं; व ही सृष्टिविरुद्ध गोष्ट आहे, असेंहि ह्मणतां येत नाहीं. आतां, हाच नियम हिंदी राजकारणी पुरुषांसहि लागू पडतो. ह्यांचे हेतु जरी अत्युत्तम असले, तरी पाश्चात्य लोकांपासून उसनें घेतलेल्या राजकीय शिक्षणाचा हिंदुस्थानच्या राजकीय परिस्थितीशीं व्यावहारिक रीत्या मेळ बसवून, त्याचा योग्य उपयोग त्यांना करून घेतां येत नाहीं.

अगदीं आरंभापासूनच, हिंदी राष्ट्रीय सभेनें पार्लमेंटसभेची कामगिरी आपल्या शिरावर घेतली, असें ह्मटलें तरी चालेल. हिंदुस्थानांत पार्लमेंट असणें शक्य नव्हतें व नाहीं; कारण,

लॉर्ड मोर्लेसाहेबानीं स्पष्ट ह्मटल्याप्रमाणें, हिंदुस्थानांत वस्तुतः ब्रिटिश राज्य असेपर्यंत, येथील राज्यव्यवस्था एकतंत्रीच असली पाहिजे. हिंदुस्थानसरकारच्या मनांत कितीहि सद्बुद्धि वसत असो, व हिंदी लोकांच्या विचारांबद्दल त्यांना कितीहि सहानुभूति वाटो; परंतु, एकंदरींत येथें एकतंत्रानेंच राज्यकारभार चालला पाहिजे. शिवाय, जरी येथें पार्लमेंट असणें शक्य असतें, तरी अशा प्रकारची कामगिरी बजावण्यास ह्या राष्ट्रीय सभेची मुळींच लायकी नव्हती. कारण, हिंदुस्थानांतील केवळ एका वर्गाचें देखील नाहीं, तर त्यांतील एका भागाचेंच प्रतिनिधित्व ह्या सभेकडे येतें. हा भाग ह्मटला ह्मणजे, पाश्चिमात्य तऱ्हेचें शिक्षण मिळालेला मध्यम लोकांचा वर्ग असून, त्यांत मुख्यतः वकील, डाक्टर, शिक्षक व वर्तमानपत्रकार इत्यादि धंदेवाईक लोकांचाच केवळ समावेश होत असतो. हा वर्ग महत्त्वाचा असून वजनदार आहे, हें खरें आहे; परंतु एकंदर लोकसंख्येपैकीं तो फारच अल्प—पराकाष्ठा शंभरावा हिस्सा—आहे. राष्ट्रीय सभेच्या सभासदांची निवड मतदारांच्या कोणत्याहि ठराविक संस्थांमार्फत अथवा निवडणुकीच्या एखाद्या नियमबद्ध पद्धतीनें होत नसल्यामुळें, ह्या लहानशा वर्गाचें तरी प्रतिनिधित्व खरोखर ह्या कांग्रेसकडे कितीसें येत होतें, हें सांगणें अशक्य आहे. ह्या सभेंत हिंदूंचा नेहमींच फार मोठा भरणा असतो. तथापि, अगदीं आरंभाला देखील इतर बऱ्याच लोकांचा कांग्रेसला पाठिंबा मिळाला होता. ही संस्था आपल्याला हिंदुस्थानची **राष्ट्रीय सभा** असें मोठें नांव घेत असते. आतां, हिंदुस्थानांतील भिन्न भिन्न धर्मपंथांचे व जातींचे लोक ज्या सभेंत असतात, तिला **राष्ट्रीय** हें विशेषण देणें वाजवी असेल, तर

दादाभाई नवरोजीप्रभृति थोडे सुप्रसिद्ध पारशी गृहस्थ, व त्यांच्याहि पेक्षां कमी असणारे मुसलमान गृहस्थ, ह्यांच्या आगमनामुळें कांग्रेस-ला **राष्ट्रीयत्व** प्राप्त होण्यास साहाय्य झालें, असें ह्मटलें पाहिजे. परंतु, हळूं हळूं ह्या सभेचें धोरण केवळ हिंदुलोकांच्या मताप्रमाणें जसजसें ठरूं लागलें, तसतसें बहुतेक मुसलमानांनीं तिच्यांतून आपलें अंग काढून घेतलें; व कांग्रेससंबंधी पारशी लोकांच्या हातांत एका काळीं जो अधिकार होता, तोहि आतां लयास जाऊन, ते केवळ निर्माल्यवत् होऊन राहिले.

वरच्यापेक्षां व्यापक दृष्टीनें विचार केला, तर पाश्चिमात्य देशांतील प्रजापक्षीय समाजांत **राष्ट्रीय** ह्या शद्बाचा जो अर्थ आहे, त्या अर्थानें कांग्रेसकडे राष्ट्रीयत्व कधींहि येऊं शकणार नाहीं, कारण, कांहीं व्यक्तींच्या बाबतींत कांग्रेसनें कितीहि अपवाद केले असले, तरी साधारणपणें असें दिसतें कीं, हिंदु-स्थानांत सार्वजनिक प्रतिनिधित्व कोणाकडे येणें शक्यच नाहीं. कांकीं, येथें जोंपर्यंत हिंदूंचा जातिभेद कायम आहे, तोंपर्यंत कोट्यावधी हिंदु ह्मणविणाऱ्या लोकांचा खऱ्या हिंदुधर्मांत प्रवेश न होतां, त्यांना **अस्पृश्य** ह्मणून बाहेर राहावें लागणार आहे; व लोकांची त्यांच्याशीं वागणूकहि तशाच प्रकारची असते. आतां, हा सृष्टिक्रमबाह्य अघटित प्रकार जोंपर्यंत येथें चालू आहे, तोंपर्यंत, सर्व लोकांचे राजकीय व सामाजिक हक्क सारखेच आहेत, वगैरे प्रजापक्षीय कल्पनांचे आपण चहाते असून पूर्ण कैवारी आहों, अशी बढाई मारणें, हें अगदीं वेडगळपणाचें आहे; व ही गोष्ट कांहीं थोड्या सुज्ञ गृहस्थांनीं प्रसंगोपात कबूल केली आहे. परंतु, हा वेडगळपणा तत्वतः जरी कबूल करण्यांत आला आहे, तरी त्याचा नायनाट करण्याकरितां कांग्रेसनें आपल्या सगळ्या

जन्मांत यत्किंचित्देखील प्रयत्न केलेला नाहीं. अस्पृश्य नसलेल्या व काबाडकष्ट करून पोट भरणाऱ्या लोकांचें प्रतिनिधित्व कांग्रेसकडे येतें, असें देखील ह्मणतां येणार नाहीं. हिंदुस्थानांतील शेतकरी–वर्ग व इतर गरीब स्थितींतील लोक, हेच **हिंदुस्थानचे खरे लोक** आहेत; व ह्यांच्या प्रतिनिधिपणाचा मान कांग्रेसकडे बिलकूल नसतांहि, त्यांचें नांव पुढें करून, ही सभा मोठा गिल्ला करून सोडित असते. परंतु, १९०० सालच्या "पंजाब लँड एलिनेशन अक्टा"–प्रमाणें, हिंदुस्थानच्या लोकांच्या खऱ्या हिताचे कायदे सरकारनें केले व त्यांपासून ह्या लोकांचा फायदा होत होता, तरी कांग्रेसनें संपापून जाऊन, त्यांविरुद्ध इतकी ओरड केली कीं, तशी दुसऱ्या कोणत्याहि कामांत केली नसेल.

"नीच स्थितींत असलेल्या निराश्रित" जातींतील लोकांची सुधारणा करण्यासारख्या सामाजिक प्रश्नांकडे प्रथमतः लक्ष देण्याची अत्यंत आवश्यकता आहे, ही जाणीव हल्लींच्या पिढीच्या मागल्या हिंदुलोकांत पूर्णपणें झाली होती. त्याचप्रमाणें, हिंदी लोकांनीं आपल्या चालीरीती व समजुती ह्यांत योग्य ती सुधारणा करून, पाश्चिमात्य लोकांच्या आचारविचारांशीं कांहीं अंशीं तरी त्यांची संगत लाविली नाहीं, तोंपर्यंत राजकीय बाबतींत युरोपियन लोकांच्या जोडीस बसण्याची आशा त्यांना करितां यावयाची नाहीं, हीहि गोष्ट जुन्या पिढींतील हिंदुलोकांस मान्य होती. परंतु, सामाजिक सुधारणेच्या मार्गांत बहुजनसमाजाचें अज्ञान व पूर्वग्रह असे मोठमोठाले अवघड डोंगर असल्याकारणानें, ती बिकट वाट सोडून देऊन, इंग्लंडपासून राजकीय हक्क संपादन करण्याचा मार्ग सर्वांत कमी अडथळ्याचा असून, शत्रूच्या सैन्यांत आपले

मित्र असल्यामुळें तो पतकरणें उचित आहे, असा मोठा पोक्त सल्ला मि० का० त्रिं० तेलंग ह्या एका सुप्रसिद्ध हिंदु—गृहस्थानें पुष्कळ वर्षांपूर्वी कांग्रेसला दिला; व सर्वांच्या कमनशिबामुळें ह्या मोहाला ती संस्था बळीहि पडली. मि० तेलंग हे स्वतः मोठे सुज्ञ सामाजिक सुधारक होते, ह्याबद्दल कोणास शंका नाहीं; व हेच गृहस्थ पुढें हायकोर्टाचे जज्ज झाले होते. कांग्रेसचे पुष्कळ सभासद सामाजिक परिषदांमध्यें देखील काम करितात, व सामाजिक सुधारणेचें महत्त्व त्यांस चांगलें कळतें, ह्या गोष्टी खऱ्या आहेत. तथापि, त्यामुळें वस्तुस्थितींत फरक पडत नाहीं. कारण, त्यांच्या मनांत असणाऱ्या गोष्टींकडे कांग्रेसनें पाठ फिरविल्यामुळें, पाश्चिमात्य शिक्षणामुळें अस्तित्वांत आलेल्या एका अत्यंत उपयुक्त चळवळीस उत्तेजन मिळण्याऐवजीं तिचे पाय मात्र मोडले.

तथापि, ह्याचा सर्वच दोष आपण कांग्रेसवर घालणें वाजवी होणार नाहीं. कारण, ब्रॉडला, ह्युम, वेब, सर वुईलम वेडरबर्न आणि अलीकडे अलीकडे सर हेनरी कॉटन व मि. मॅकार्नेस, ह्यांच्यासारख्या बहुधा भिन्न भिन्न प्रकारच्या इंग्रज—गृहस्थांनीं आपल्या वर्तनानें, "शत्रूच्या सैन्यांत आपले मित्र आहेत," असा कांग्रेसचा समज करून दिला; व ह्या मित्रमंडळीच्या साह्यावर अवलंबून राहण्याकडे कांग्रेसची जी प्रवृत्ति झाली, तिचें श्रेय मि० तेलंगाप्रमाणेंच ह्या वरील इंग्रज—गृहस्थांकडे आहे. अर्थात्, पुष्कळ उत्तम बुद्धिवान् व कर्तृत्ववान् सुशिक्षित हिंदी लोकांचीं मनें सामाजिक सुधारणेच्या कंटकयुक्त मार्गापासून परावृत्त करून, लोकांस अधिक प्रिय असणाऱ्या राजकीय चळवळीच्या मार्गाकडे त्यांना वळविलें, ह्याबद्दल वरील इंग्रजलोकांच्या अंगावर कमी जबाबदारी येऊन पडते, असें नाहीं,

आतां, ह्या सर्वांचा परिणाम काय झाला आहे? ह्या स्वयंसिद्ध हिंदी गृहस्थांच्या सभेला हिंदी लोकसमाजाच्या तर्फेनें बोलण्यास मुळींच अधिकार नाहीं. फार झालें तर, हिंदी समाजांतील वरिष्ठ वर्गांच्या प्रतिनिधित्वावर तिचा कांहींसा हक्क पोहोंचेल. पण, मीं पूर्वीं सांगितलें आहे, त्याप्रमाणें पाश्चिमात्य शिक्षणानें अलंकृत झालेल्या लोकांपैकीं बऱ्याच मोठ्या व वजनदार भागाचें प्रतिनिधित्व मात्र ह्या सभेकडे येतें, ह्यांत शंका नाहीं. आतां, जे सामाजिक प्रश्न आपण होऊन हातीं घेणें हिंदुस्थानच्या विदेशी राज्यकर्त्यांस व कायदे करणारांस विशेष अडचणींचें असून धोक्याचेंहि आहे, त्यांचा ह्या संस्थेच्या सभासदांनीं चांगला अभ्यास केला असता, तर ह्या मंडळीची इंग्रज अधिकाऱ्यांना फारच मदत झाली असती. परंतु, हें बाजूस ठेवून, अधिकार नसल्यामुळें जें काम त्यांच्या हातून होणें शक्यच नव्हतें, अशा भलत्याच कामास त्यांनीं हात घातला. त्यांचें नेहमीं हवेंत भांडण चाललेलें असे; व त्यामुळें, त्यांच्या कृतींत खरा भाग नसून, सगळें नाटक दिसे. कांग्रेस ही एक बेजबाबदार संस्था होती इतकेंच नाहीं, तर तिच्या सभासदांत मतवैचित्र्य दिसून येत नसे, व तिचें काम चाले, त्यावेळीं साधकबाधक प्रमाणें देऊन, प्रश्नांची कोणी चर्चाहि करित नसे. वास्तविक पाहतां, कोणत्याहि संस्थेंत असा प्रकार असल्याशिवाय तिच्या कामापासून चांगला परिणाम होत नाहीं, व तिला अवश्य तो स्थिरपणाहि प्राप्त होत नाहीं. कांग्रेस ह्मटली ह्मणजे वादविवाद देखील करण्याची सभा नव्हती. कारण, सर्वांचे वस्तुतः सारखेच उद्देश होते; सर्वांचीं एकसारखींच मतें असत; सर्वांचीं एकाच धर्तीवर भाषणें होत; व ह्या सर्व प्रकाराबद्दल कांग्रेसला एका शब्दानें

बोलण्यास किंवा तिचीं मतें खोडून काढण्यास तेथें एकदेखील माणूस नव्हता. आणि ह्मणूनच, कांग्रेसचें सर्व काम एक सुरांत चालून, अगदीं कंटाळवाणें होई, व तींच तीं भाषणें होत. आतां, हीं भाषणें जरी दरसाल थोड्या (तीन) दिवसांच्या बैठकींतच होत असत, तरी कधींकधीं त्यांमध्यें मोठें बुद्धिवैभव दिसून येई; व साधारपणें तीं चांगलीं वक्तृत्वपूर्ण असून, मोठ्या कळकळीचींहि असत. कांग्रेसच्या कामाचीं सूत्रें नेहमीं थोड्याशा शेलक्या मंडळीच्या हातीं असून, त्यांच्याकडून लांब लांब ठरावांचे मसुदे तयार होत असत; व त्यांत पूर्वींच्या बैठकींत पास झालेले दहा दहा ठराव बहुधा कोंबण्यांत येत. अंतःकरण अगदीं हालवून सोडणारें असें भाषण कोणी एखादा सभासद करीत असे; व लागलाच कंठाळी ठराव,—कधीं कधीं तर तो सभेंत वाचून दाखविल्याशिवायच,—पुढें मांडण्यांत येऊन, एकमतानें पास करून टाकण्यांत येत असे. जुन्या गह्रांतील तक्रारींविषयीं असो, किंवा चालू वर्षांतील राज्यकारभारामुळें उपस्थित झालेल्या एखाद्या नवीन प्रश्नाविषयीं असो; पण त्यावर बोलणारा हरएक वक्ता सरकारच्या धोरणावर घसरून पडणारच, हें प्रत्येक सभासदास पूर्वींपासून माहीत असावयाचें; व सर्वजण टाळ्यांचा गजर करून सोडतील, हेंहि प्रत्येकांस माहीत असावयाचें. झणझणेल अशी टीका व अतिशयोक्तीनें अगदीं ओथंबलेलें असें वक्तृत्व, ह्या गुणांमध्यें प्रावीण्य दाखविल्याशिवाय, प्रसिद्धीस येऊन लोकमान्यता संपादन करण्याचा दुसरा मार्ग नव्हता. पडद्याआड बहुधा कडाक्याचीं भांडणें व परस्परांविषयीं भयंकर मत्सर, ह्या गोष्टी निःसंशय चाललेल्या असत; व ह्या काळोखांत गुप्तरीतीनें चाललेल्या लठ्ठालठ्ठया कधींकधीं मोठ्या विकोपास

जाऊन, आपापसांत "विळ्या-भोपळ्या" एवढें वांकडें पडल्याविषयीं बाहेर बातम्या आलेल्या आहेत. परंतु, आपल्यांत पूर्ण एकी आहे, असें बाहेर दाखविण्याविषयीं मात्र खबरदारी घेण्यांत येत असे; व कांग्रेसचें तारूं आंतील पक्षभेदामुळें शेवटीं खडकावर आपटून, त्याचा बहुतेक चुराडा झाला, तो पक्षभेद, कांग्रेसचा जन्म होऊन २० वर्षें लोटेपर्यंत, बाहेर दिसूं देण्यांत आला नव्हता, असें ह्मटलें तरी चालेल.

लॉर्ड लॅन्सडौऊन हे हिंदुस्थानचे व्हाइसराय असतांना, सन १८९० सालीं प्रथमतः कांग्रेसच्या चळवळीसंबंधानें सरकारी मत प्रदर्शित करण्यांत आलें. "आपण पूर्ण राजनिष्ठ आहों," असें जें कांग्रेसचें ह्मणणें होतें तें व तिनें ठरविलेले आपले उद्देश हे "मुळांतच अगदीं योग्य" आहेत, असेंहि सरकारतर्फे मान्य करण्यांत आलें. खालीं दिलेल्या उताऱ्यावरून सरकार कांग्रेसच्या विरुद्ध निखालस नव्हतें, हें दिसून येईलः—

यूरोपखंडामध्यें **उदारमतवादी** ( लिबरल ) पक्षास जें स्थान आहे, तेंच हिंदुस्थानांत कांग्रेसला आहे, ही गोष्ट हिंदुस्थानसरकारास मान्य आहे. परंतु, त्याबरोबरच ह्या देशांत **पुराणस्थितिप्रिय** ( कान्झरवेटिव्ह ) असे पुष्कळ लोक आहेत, हेंहि लक्ष्यांत ठेविलें पाहिजे. अशा ह्या दोन्ही पक्षांशीं तटस्थवृत्तीनें राहण्याची सरकारची इच्छा आहे. मात्र त्यांच्या चळवळी अगदीं कायदेशीर मर्यादेंत असल्या पाहिजेत.

आणि, १९०५ सालीं, बंगाली लोकांच्या **बहिष्कारा**च्या धोरणास कांग्रेसनें आपली संमति देऊन, कायदेशीर मर्यादेचें उल्लंघन केलें, असें जरी मानितां आलें असतें, तरी त्या वेळींसुद्धां हिंदुस्थानसरकारानें आपली तटस्थवृत्ति मुळींच सोडली नाहीं.

सरकारची कानउघाडणी करणें व मनधरणी करणें, असेंहि

आरंभीं कांग्रेसचें धोरण असे. पण, पुढें हा मार्ग सोडून देऊन, सरकारवरच घसरून पडण्याची व त्यांच्या सर्व कृत्यांचा जोरानें निषेध करण्याची नवीन पद्धत तिच्यांतील बहुतेक लोकांनीं स्वीकारली. आतां, हा असा फरक कदाचित् न कळत झाला असावा; किंवा, निदान त्या लोकांचा असा मुद्दाम बेत झालेला नसावा. तथापि, अगदीं उघड उघड व कधींहि समेट होणार नाहीं अशा रीतीचें वैर सरकारशीं करण्यास, मोठ्या नेटानें अथवा आंतून डावपेंच लढवून, आपल्या कांग्रेस बंधूंस एकजुटीनें लावण्याची खटपट करणारीं थोडीं दृढनिश्चयीं माणसें अगदीं पहिल्यापासून कांग्रेसमध्यें होतींच. ह्या अशा मंडळीचा पुढारी-पणा टिळकाकडे होता. हिंदी राजकारणी पुरुषांमध्यें ह्याच्याइतका कर्तृत्ववान् माणूस दुसरा कोणीहि नसून, सर्व हिंदुस्थानांतील जहाल उत्साही लोकांस तो हळूंहळूं आपल्या कळपांत ओढीत होता. सन १८९५ सालीं, टिळकाच्या खुद्द पुणें-शहरांतच कांग्रेस भरली होती. त्या वेळीं, महाराष्ट्रांत ज्या जहाल (सरकारविरुद्ध) मतांचा तो स्वतः पूर्वींच प्रसार करूं लागला होता, तींच मतें कांग्रेसनें स्वीकारावीं, अशी त्याची मोठी खटपट होती. परंतु, बहुमत आपल्याविरुद्ध आहे, असा त्याला ताबडतोब अनुभव आला. तथापि, आपला डाव फसला, ह्मणून हार खाऊन स्वस्थ बसणारा पुरुष तो मुळींच नव्हता; अर्थात् योग्य संधी येण्याची तो वाट पाहत बसला. व्यक्तिविषयक जबरदस्त मत्सराशीं आपणास टक्कर द्यावयाची आहे, हें तो पक्केपणीं जाणून होता. ह्मणून मागें राहूनच, आपला डाव साधण्याची युक्ति तो लढवूं लागला. पुण्याची कांग्रेस झाल्यापासून दहा वर्षेंपावेतों, टिळकाला पाहिजे होती

तशी संधी आली नाहीं. परंतु १९०५ व ६ सालीं, अनुक्रमें बनारस व कलकत्ता येथें कांग्रेसचीं वार्षिक अधिवेशनें झालीं; व ह्या दोन्ही प्रसंगीं टिळकाला कळसूत्रीपणा करून, चित्रें नाचवा-वयास सांपडलीं. सरकारावर नुसती टीका करून त्यांच्याशीं विरोध करण्याच्या मार्गाचा त्याग करून, सरकारची सत्ता उघडउघड धाब्यावर बसविण्याचें धोरण ह्या वेळींच कांग्रेसनें स्वीकारिलें. लोकांचीं मनें सरकाराविरुद्ध चिथावण्याचें व प्रत्येक गोष्टींत मागें पाऊल घेऊन, सुधारणेला प्रतिबंध करण्याचें जें व्रत टिळकानें स्वीकारून, महाराष्ट्रांत मोठी धांदल मांडली होती, त्याविरुद्ध मि० गोखले यांनीं मोठ्या धैर्यानें त्याच्याशीं पुष्कळ वेळां दोन हात केले होते. पण, ह्याच गोखल्यांस टिळकाच्या हातांतलें बाहुलें होऊन, कांहीं विशेष राजकीय हेतु साधण्यासाठीं बहिष्कार–अस्त्राचा उपयोग करणें वाजवी आहे, असें बनारसच्या कांग्रेसमध्यें अध्यक्षाच्या आसनावरून ह्मणण्याची पाळी आलेली पाहून, टिळकाच्या पोटांत आनंद मावेनासा होऊन, त्याला आपल्या कर्तबगारीचा मोठा अभिमान वाटला असेल. बहिष्का-रापासून बेकायदेशीर वर्तनास कसें उत्तेजन मिळतें, हें एका वर्षाच्या आंतच मि० गोखले व कांग्रेसमधील **नेमस्त** पक्ष यांच्या निदर्शनास आल्यामुळें, पुढल्या वर्षाच्या कलकत्त्याच्या बैठकीच्या वेळीं, बनारस येथें त्यांनीं ज्या गोष्टींस मदत केली होती, त्यांस हरताळ लावण्याचा अथवा निदान त्यांचे दुष्प-रिणाम कमी करण्याचा प्रयत्न केला, हें खरें आहे. परंतु, ह्या वेळींसुद्धां सभासदांची मनधरणी करून, आपल्या बाजूला पुष्कळ मतें मिळवून व विशेषतः कांग्रेस मोडून टाकण्याचा धाक घालून, टिळकानें आपला हट्ट पुरा पाडला; व त्याचें जें ह्मणणें होतें कीं,

बहिष्काराचा उपाय वाजवी आहे, त्याप्रमाणेंच कांग्रेसनें ठरावहि पास केला. ह्या गैरकायदा उपायाचें अवलंबन करण्याच्या उपदेशाचीं कधींहि न चुकणारीं फळें येऊन, जिकडे तिकडे गुन्ह्यांचा सुकाळ झाल्यावर, ह्मणजे एक वर्ष लोटून गेल्यावर, जहालपक्षानें आपल्याला चिखलांत नेऊन कसें रुतविलें आहे, ह्याची नेमस्त पक्षाला ओळख पटली; आणि मग शेवटीं सुरतेस धडपड करून, ह्या वरील प्रसंगांतून सुटून जाण्याचा प्रयत्न त्यांनीं केला. तथापि, टिळकानें स्वतः घातलेला धाक खरा करून दाखविलाच; आणि, मोठ्या लज्जास्पद रीतीनें दंगा करून व घोंटाळा घालून, टिळक व त्याची मित्रमंडळी ह्यांनीं कांग्रेसचें वाटोळें करून टाकिलें.

इतकें झालें, तरी आपल्या मताप्रमाणें वागण्याचें धैर्य नेमस्तांत नव्हतेंच. कांग्रेसचीं हीं जीं दोन शकलें सुरतेस झालीं, त्यांचा सांधा चांगल्या रीतीनें कधींच जुळून आला नाहीं. तरी पण, परस्परांचीं तडजोडीचीं बोलणीं वारंवार होत असून, उभयतांचे शिष्टाचाराचे नमस्कार—चमत्कारहि होत असतात. पुढल्याच वर्षीं, मद्रासेस डा० **राशबिहारी घोस**सारखे, कधीं स्वप्नांत देखील बेकायदेशीर चळवळींना उत्तेजन न देणारे किंवा आपली पसंती न दर्शविणारे गृहस्थ, ज्यांनीं सुरतेस त्यांची फटफजिती उडविली होती, अशा आपल्या “स्वच्छंदी बहकलेल्या” देशबांधवांशीं सलोखा करण्यास एका पायावर तयार होते. तसेंच, गतवर्षीं (१९०९ सालीं) लाहोर येथें, पंडित मदनमोहन मालवीय हे अध्यक्ष नात्यानें कांग्रेसच्या अगदीं अलीकडच्या ध्येयांचें स्पष्टीकरण करून दाखवीत होते, त्यावेळीं त्यांचा मुख्य प्रयत्न एवढेंच सिद्ध करून दाखविण्याचा होता कीं, सुरतेस बंड करून जे लोक बाहेर निघून गेले आहेत,

त्यांना पुनः आंत कळपांत येण्यास, ह्या नवीन क्रीडमुळें कोणतीच हरकत नाहीं. हें क्रीड असें आहे कीं, " इंग्लंडच्या साम्राज्याचे जे देश निरनिराळे घटकभाग आहेत, त्यांना जसे स्वराज्याचे हक्क आहेत, तसे हिंदुस्थानास प्राप्त करून देऊन, साम्राज्याला जे हक्क आहेत व त्याच्या ज्या जबाबदाऱ्या आहेत, त्यांमध्यें बरोबरीच्या नात्यानें हिंदुस्थानदेशास वाटेकरी करणें, असा कांग्रेसचा उद्देश आहे. " ह्या राजकीय सूत्राचा अर्थ पुष्कळ नेमस्त लोक खऱ्या राजनिष्ठेशीं सुसंगत असाच लावितात, ह्यांत संशय नाहीं. परंतु, मि० पाल—सारख्या **जहाल** राजकारणी लोकांनीं **स्वराज्य** ह्या शब्दाचा जो अर्थ केला आहे, तो वरील सूत्रांतून निघत नाहीं, असें मात्र ह्मणतां येत नाहीं.

गेल्या दिसेंबरांत ( १९०९ सालीं ) लाहोर येथें जी कांग्रेस भरली होती, तिच्याबद्दल लोकांत फारच थोडा उत्साह दिसून येत होता, असें बहुतेक सर्वांचें ह्मणणें आहे; आणि, पुष्कळांचें असें मत आहे कीं, नुकत्याच झालेल्या फुटाफुटीमुळें अगोदरच निर्बळ झालेली कांग्रेस, आतां विस्तार पावलेल्या कायदेकाउन्सिलांपुढें बहुधा जीव धरून राहणार नाहीं. योग्यता किंवा अधिकार नसतां, कांग्रेसनें जें काम आपण होऊन अंगावर घेतलें होतें, तें अधिक चांगल्या प्रकारें बजावितां येईल, अशी नवीन काउन्सिलांची घटना करण्यांत आली आहे. ह्या काउन्सिलांपुढें इतउत्तर कांग्रेसचें तेज निदान फिकें पडेल, ही जाणीव असल्यामुळेंच, कदाचित् पं० मालवीयांनीं आपल्या लाहोर येथील अध्यक्षनात्यानें केलेल्या भाषणांत, सुधारणांना शेवटीं जें स्वरूप प्राप्त झालें, त्याबद्दल इतक्या संतापानें कडक टीका केली असावी. ह्या सुधारलेल्या काउन्सिलांमुळें

" हिंदी नेमस्तपक्षाला " पूर्वीपेक्षां थोडें अधिक स्वावलंबन प्राप्त होईल, अशी उमेद आहे. उच्च शीलाचे व विशेष कर्तृत्ववान् असे पुष्कळ लोक नेहमींच कांग्रेसमध्यें असत. ह्यांच्या मतें देशाचें खरें हित ज्या गोष्टींत असे, त्या करण्याकडे ते आपणाला पूर्णपणें वाहून घेत. ब्रिटिशराज्यापासून हिंदुस्थानाला फायदे असून, येथील लोकांचें कल्याण होऊन त्यांचा सुरक्षितपणा वाढण्यासाठीं, येथें ब्रिटिश सत्ता अवश्य टिकली पाहिजे, ही त्यांची समजूत उघडपणें सांगण्याची, निदान पहिल्यापहिल्यानें तरी, त्यांची अगदीं तयारी असे. आपण देशांतील बुद्धिमान् लोकांच्या वतीनें बोलत आहों, असें ह्मणणारे सरकाराविषयीं सतत प्रतिकूल टीका करीत राहिल्यानें, त्यांच्या अजाण व अनुभवशून्य देशबांधवांच्या अंतःकरणामध्यें असंतोषाचें बीं रुजून, त्यांच्याठिकाणीं बंडाव्याची प्रवृत्ति उत्पन्न होणें, हें अगदीं स्वाभाविक आहे, अशाबद्दल त्यांच्यापैकीं पुष्कळांची खात्री झाली असली पाहिजे. परंतु, सुरतेस ही सर्व मंडळी खरोखर सपशेल तोंडघशी पडेतोंपर्यंत, आपण कोणत्या उतरणीला लागलों आहों व त्याचा अखेर परिणाम कसा भयंकर आहे, हें आपल्या देशबांधवांच्या नजरेस आणून, कांहीं अल्पकाळ त्यांना अप्रिय होऊन राहण्याचें त्यांच्यांतील एकालाहि धैर्य झालें नाहीं. अर्थात, असा नेभळेपणा दाखविल्यामुळें जो दुष्परिणाम झाला, त्याचें परिमार्जन करण्यास त्यांना अवकाशच मिळाला नाहीं. तसेंच, त्यांच्या जहाल सोबत्यांनीं जो मार्ग पतकरला होता, त्याला अडथळा न करितां, पुष्कळ दिवस सहनशीलपणा दाखविल्यामुळें, जीं अरिष्टें उत्पन्न झालीं होतीं, त्यांच्या जबाबदारींतून आपली सुटका करून घेण्यासहि त्यांना अवसर राहिला

नाहीं. हिंदुस्थानांत प्रातिनिधिक राज्यपद्धति सुरू केली पाहिजे, असा हक्क सांगण्याचा कांग्रेसचा एक मुख्य हेतु आहे, ही अगदीं उघड गोष्ट आहे. परंतु, ह्याच कांग्रेसची सर्व व्यवस्था थोडक्याशा कर्तबगारीच्या माणसांनींच सर्वस्वी आपल्या हातीं ठेविली असून, तिच्या कामांत अगदीं बेजबाबदारीनें वागून व दडपशाई करून, आपल्या मनाप्रमाणें सर्व गोष्टी हे लोक घडवून आणीत असतात. हिंदी म्युनिसिपालिट्यांमध्यें जो प्रकार दिसून येतो, तसाच वस्तुतः अगदीं तंतोतंत कांग्रेसमध्यें येतो. ह्याचा अर्थ असा कीं, हिंदुस्थानांत प्रातिनिधिक तत्वावर स्थापन झालेल्या संस्थांचें चालकत्व, जेथें तेथें आपलेंच घोडें पुढें ढकलून, सर्व सत्ता बळकावून बसणाऱ्या अगदीं थोड्या लोकांच्या हातीं जाऊन, त्यांपासून ह्या लोकांचाच फायदा होईल, अशा रीतीनें त्यांचीं कामें चालू लागतात.

---

## मूळपुस्तकांतील चुकीची दुरुस्ती.

पान १०९ ह्यावर नाशीक येथील ज्याकसनसाहेबाच्या खुनाची जी हकीकत आली आहे, ती मि० चिरोलसाहेबांच्या मूळ इंग्रजी पुस्तकांत (पान ५९) जशी आहे, तशीच भाषांतर करून दिली आहे. सदरहु भाषांतर छापून गेल्यावर, आमच्या कांहीं मित्रांनीं आह्मांस असें कळविलें कीं, ह्या हकीकतींत मि. पळशीकरांचें नांव आलें आहे, तें चुकून आलें असलें पाहिजे. कारण, कान्हेऱ्यानें ज्याकसन—साहेबाच्या अंगावर पिस्तूल झाडल्यावर, त्याचा एक हात मि. **जॉली** यांनीं व दुसरा मि. **विनायक नारायण खोपकर**, डि० डेप्युटी कलेक्टर, यांनीं धरून ठेविल्यामुळें, त्याला आपल्या स्वतःवर पिस्तूल झाडून घेऊन, आत्महत्त्या करितां आली नाहीं. आपल्या जिवाकडे न पाहतां, खुनी माण-

साच्या अंगावर धैर्यानें जाऊन, त्याला गिरिफतार करण्यामध्यें मि. **पळशीकर** नव्हते. शिवाय, मि. पळशीकर त्यावेळीं डेप्युटी कलेक्टर नसून, शहर-मामलेदार होते. तसेंच, खून झाल्याबरोबर नाशीकच्या रेलवे ष्टेशनावर वर्दी देऊन, कान्हेऱ्याच्या कांहीं साथीदारांस पकडण्याच्या कामीं जें प्रसंगावधान दाखविण्यांत आलें होतें, त्याचेंहि श्रेय मि. पळशीकरांकडे नाहीं. कारण, ही शिताफी नाशीक जिल्ह्याचे डे० पोलीस सुपरिंटेडन्ट मि. ( आतां रावबाहादूर ) **मारुतीराव पांडुरंग तोरडमल** यांनींच केवळ दाखविली होती. कान्हेऱ्याचे साथीदार सांपडल्यामुळें, खुनाच्या गुप्त कटाचा तपास लागण्यास किती सोपें गेलें, हें सर्वविश्रुत आहेच.

मि० चिरोल यांचें पुस्तक बाहेर पडल्यावर, खुद्द मि. पळशीकरांनीं **बांबे ग्याझेटला** पत्र पाठवून, सदरहु चुकी झाल्याबद्दल कळविलें होतें. हें पत्र ता. १८ फेब्रुवारी १९११ च्या अंकांत प्रसिद्ध झालें आहे. त्यांत मि० पळशीकर ह्मणतातः—

" ज्याकसनसाहेब नाटकगृहांत आले, त्यावेळीं त्यांच्याबरोबर मी नव्हतों, तर मि. खोपकर डि. डे. कलेक्टर हे होते; व ते आणि मि. जॉली असे दोघेहि खुनी मनुष्याच्या एकदम अंगावर गेले व त्यांनीं त्याला गिरिफतार केला. मी स्वतः नाटकगृहांत कांहीं अंतरावर होतों. परंतु, लागलाच धांवत जाऊन, खुनी मनुष्याला मीं मारिलें, व मि. खोपकरानीं धरून ठेविलेल्या हातांतून रिकामें पिस्तूल काढून घेतलें. .... .... .... .... रेलवेष्टेशनावर वर्दी गेली, ती मि. ( आतां रावबाहादूर ) मारुतीराव पांडुरंग तोरडमल डे० पोलीस सुपरिन्टेन्डट यानींच दिली होती. "

ह्या बाबतींत झालेला एकंदर पत्र-व्यवहार व खुनासंबंधी इंग्रजी व देशी पत्रांतून आलेली हकीकत मि० चिरोलसाहेबांकडे पाठवून दिल्यावर, त्यानीं पत्र पाठवून आह्मांस कळविलें कीं, " मि. पळशीकरांचें नांव मला नाशकास सांगण्यांत आलें होतें. परंतु, एकंदर पत्रव्यवहारावरून आतां माझी खात्री झाली आहे कीं, ह्या बाबतींत दुरुस्ती करणें वाजवी आहे. यास्तव, इष्ट ती दुरुस्ती आपण आपल्या भाषांतरांत करावी. "